म. ग्र. स. ठाण
विषय निबंध
सं. क्र. 9822

# भारताची भाषा-समस्या



REFBK-0012298

महामहोपाध्याय
दत्तो वामन पोतदार

# भारताची भाषा-समस्या

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. १२२९८
(संग्र शाखा स्थळ प्रत)

लेखक

महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 3४990 वि: निबंध
क्रमांक 12298 नों: दि: 9/12/63

REFBK-0012298

महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणें

: प्रकाशक :

**ग. वा. करमरकर**

मंत्री, महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा,

राष्ट्रभाषा भवन, नारायण पेठ, पुणें २

●

किमत : एक रुपया पन्नास नये पैसे

प्रकाशन क्रमांक : ७३

आवृत्ति पहिली : १४ सप्टेंबर १९६२

( हिंदी दिन )

●

: मुद्रक :

**गो. प. नेने**

**राष्ट्रभाषा मुद्रणालय,**

**३८७, नारायण पेठ, पुणें २**

# प्रकाशकीय

महाराष्ट्रांतील एक थोर विचारवंत व व्यासंगी विद्वान् ह्या नात्यानें महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार ह्यांचा साऱ्या देशभर लौकिक आहे. शिक्षण, साहित्य, इतिहास प्राच्यविद्या, राष्ट्रभाषा अशा विविध क्षेत्रांतील त्यांची कामगिरी सर्वश्रुत आहे.

गेल्या तीन तपांच्या अवधींत म. म. पोतदार यांनी भारतांतील भाषेच्या प्रश्नासंबंधीं वेळोवेळीं जीं व्याख्यानें दिलीं व लेख लिहिले त्यांत ह्या प्रश्नाबाबतचा त्यांचा व्यापक व उदार समाजशास्त्रीय दृष्टिकोन दिसून येतो. भारतासारख्या बहुभाषा-संपन्न देशांत राष्ट्रीय एकात्मता आणि वेगवेगळ्या भाषिक गटांची प्रादेशिक अस्मिता ह्यांचा मेळ कसा घालावयाचा हा प्रश्न स्वाभाविकपणेंच समाज-धुरीणांना भेडसावत असतो. विज्ञानांतील प्रगतीमुळें दिक्कालावर मानवानें विजय मिळविला असून विश्व-नागरिकत्वाची आकांक्षा हा आगामी काळांतील युगधर्म होऊं पहात आहे. सामाजिक व्यवहारांत मातृभाषा, राष्ट्रभाषा, विश्वभाषा ह्या प्रत्येकीचें निश्चित असें स्थान आहे, व तें नाकारतां येणार नाहीं. ह्या प्रत्येकीची परस्पर-सापेक्ष भूमिका समजून घेण्याच्या दृष्टीनें पोतदारांचीं हीं वक्तव्यें व लेख अभ्यसनीय होत.

व्याख्यानांच्या व लेखांच्या कालानुक्रमानुसार ह्या संग्रहांतील क्रम ठेवण्यांत आलेला आहे. तीन तपांपूर्वी प्रकट केलेल्या मतांमध्यें आजच्या घडीसहि बदल करण्याची आवश्यकता उद्भवलेली नाहीं, ह्यावरून पोतदारांच्या दूरगामी दृष्टीचा व विवेचक विचारसरणीचा प्रत्यय येतो.

ह्या संग्रहांतील ‘ स्वभाषांचा विकास ’ हा लेख मूळ हिंदी भाषणाचा अनुवाद असून, ‘ शिक्षणाचे माध्यम ’ हा लेख मूळ इंग्रजी भाषणाचा अनुवाद आहे. लेखांना मथळे देणें, जरूर तेथें मजकुराचा संक्षेप करणें, अन्य भाषांतील लेखांचा अनुवाद करणें ह्या कामीं श्री. लालजी उपाध्ये यांचे सहकार्य मिळालें आहे.

द्विरुक्ति टाळण्यासाठीं ह्या लेखांतील कांहीं भाग गाळलेला असून कांहींचा संक्षेप करण्यांत आलेला आहे. तसें करतांना मूळ लेखांतील विचारांचा गाभा व शैली यांना धक्का लागणार नाहीं अशी यावच्छक्य दक्षता घेतलेली आहे. मुंबई सरकारनें १९५१ साली पोतदार यांचे अध्यक्षतेखालीं हिंदी शिक्षण समिति नेमलेली होती. भारताच्या राजभाषेबाबतच्या राज्य घटनेंतील तरतुदींची छाननी त्या समितीच्या अहवालांत करण्यांत आलेली असल्यामुळें परिशिष्टांत संदर्भादाखल तत्संबंधीं भाग समाविष्ट केला आहे. समितीच्या शिफारशींचा मुंबई सरकारनें शिक्षण खातें जी. आर. एच. एन. ई. १३५१ ता. १९-९-१९५१ अन्वयें स्वीकार केला.

महाराष्ट्रांतील राष्ट्रभाषा प्रचारकार्याचे प्रणेते, तसेंच महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेचे एक संस्थापक आणि पोशिंदे हें नातें लक्षांत घेता ह्या संकलनाच्या प्रकाशनास अनुमति दिल्याबद्दल पोतदारांचे आभार कोणीं व कशा शब्दांत मानावयाचे ?

राष्ट्रभाषा भवन, पुणें,<br>
१४ सप्टेंबर १९६२

गो. प. नेने

# निवेदन

राष्ट्रभाषा, राज्यभाषा, मातृभाषा, इंग्रजी आणि संस्कृत या भाषांचें स्थान शिक्षणांत तसेंच लोकव्यवहारांत कोणतें आणि कसें असावें या प्रश्नावर अनेक विद्वान आणि अनुभवी लोकांनीं पक्ष प्रतिपक्ष करून चर्चा केलेली आहे. म. गांधीनीं या देशांत वैचारिक आणि सक्रिय असें प्रचंड आंदोलन केलें. त्यांतही त्यांनीं या प्रश्नाला मोठें महत्व देऊन आपले विचार वेळोवेळीं मांडले आणि आपल्या विचारांना कृतिरूप देण्याचा कळकळीचा प्रयत्न केला. त्यांनीं राष्ट्रापुढें जो चौदा कलमी कार्यक्रम ठेवला त्यांत राष्ट्रभाषेच्या प्रचाराचा समावेश केला होता. पुढें भारत स्वतंत्र झाला आणि त्यानें स्वयंप्रभु लोकशाही घटनेचा स्वीकार करून आपल्या स्वतंत्र जीवनाला प्रारंभ केला. या घटनेच्या सतराव्या अध्यायांत शासकीय भाषा म्हणून देवनागरी लिपींत लिहिलेल्या हिंदीचा स्वीकार केला असून त्या संबंधीचें धोरण स्पष्ट करणारा आदेश ग्रथित केला आहे. (अध्याय १७ कलम ३५१,) तथापि गांधीयुगांतील आंदोलनांत त्यांच्या आदेशानुसार राष्ट्रभाषेच्या प्रचाराचें कार्य अखिल भारतांत जोमानें सुरू झालें होतें. घटनेंत स्वीकारलेल्या भूमिकेला सक्रिय रूप देण्याचें काम दोन बाजूंनीं चालत आहे. एक सरकारी व दुसरी बिनसरकारी. तथापि सरकार हे सत्ताधारी असल्यामुळें सरकारी गति-विधीमुळें बिनसरकारी कार्य साहजिकच मर्यादित होत गेलें. घटनेचा स्वीकार केल्यापासून पंधरा वर्षांच्या अवधींत शासकीय व्यवहारांत आणि लोक-व्यवहारांतही घटनेंत घालून दिलेल्या मर्यादेप्रमाणें आणि व्यवस्थेप्रमाणें हिन्दीचा क्रमा-क्रमानें विकास करून तिच्या द्वारें शासकीय व्यवहार पूर्णतेला यावा आणि इ. स. १९६५ नंतर इंग्रजीचा वापर शासकीय व्यवहारांत शक्य तितक्या मर्यादित करावा असा निश्चय झाला होता. परंतु या कामीं निकराचे प्रयत्न न झाल्यानें स. १९६५ ची मर्यादा वाढवावी लागेल असें स्पष्ट दिसत आहे. अतिदक्षिण भारतांत हिन्दीच्या प्रसाराच्या ज्या योजना संथपणें आणि

निश्चयानें चालूं होत्या त्यांनाही पुढे विरोध होऊं लागला. कित्येकांच्या विरोधाची मजल भारतापासून तुटून स्वतंत्र होण्याच्या गोष्टी बोलण्या-पर्यंत गेली. तरीही शासक या विरोधाची उपेक्षाच करीत गेले. त्यामुळें वेळ आतां अशी प्राप्त झाली आहे कीं पं. नेहरू सारख्यांनीं नुकतीच घोषणा केली कीं अतिदक्षिणेच्या लोकांनीं आपण होऊन हिन्दीची मागणी केल्या-शिवाय आपण कांहीं हालचाल करणार नाहीं. आणि ही सोय साधण्या-साठीं घटनेंतील १९६५ च्या मर्यादेचें बंधन आड येईल, तें दूर करावें म्हणून घटनेंतच दुरुस्ती करून भाषा–सखी म्हणून इंग्रजीला घटनात्मक स्थान प्राप्त करून द्यावें आणि तदनकूल बदल घटनेंत करावा अशी नीति त्यांनीं स्वीकारली आहे.

शासनाच्या या दोलाचल नीतीचा साहजिकच असा परिणाम झाला कीं घटनेंच्या १७ व्या अध्यायांत केलेला निर्णय आपापल्या मतीप्रमाणें फिरवून घेण्याच्या दृष्टीनें अनेकांनीं आपलीं मतें जनतेसमोर मांडण्याचा क्रम चालविला. काँग्रेस पक्षांतील कित्येक श्रेष्ठींनीं (उदाहरणार्थ डॉ. काटजू) संस्कृत भाषेचा स्वीकार राष्ट्रभाषा म्हणून करावा अशी मतें मांडून दाखविली. इंग्रजी भाषेचा अनिर्बंध प्रचार चालूं राहावा अशाही सूचना पुढें आल्या. यांत रोख असा दिसून आला कीं, राष्ट्रभाषेच्या प्रश्नाचा पुन्हा आमूलाग्र विचार व्हावा.

आमच्या मतें या प्रश्नाचा भरपूर विचार झाला आहे. महाराष्ट्रांत तर अखिल भारतीय व्यवहारासाठीं हिन्दी किंवा हिन्दुस्तानी अशा दोन्ही नावानें ओळखली जाणारी जी भाषा तीच या कामासाठीं योग्य आहे; असा विचार आज ७५–८० वर्षे तरी साधारण मानानें मान्य झाल्यासारखा दिसतो. इंदापूरचे एक सार्वजनिक कार्यकर्ते आणि अक्कलकोटच्या स्वामींचे शिष्य रयतेचे कुलमुख्त्यार कै. गोपाळराव देशपांडे यांनीं पुण्याची सार्वजनिक सभा आणि पुढें काँग्रेस या मोठ्या संस्था स्थापन होण्याच्या पूर्वी आपल्या प्रचार कार्यासाठीं आपल्याला जशी येईल तशी भाषा वापरून आपलीं पुस्तकें हिंदुस्तानीतहि छापलीं. तीं आमच्या संग्रही आहेत. पुढें सन १८८३ च्या मराठी ग्रंथकारांच्या सभेंत हिन्दी–हिन्दुस्तानीचा स्वीकार करण्याचा ठराव सुचविला गेला होता.

पुण्याच्या वक्तृत्व सभेंत कै. केशव वामन पेठे यांनीं याच विषयावर व्याख्यान देऊन बक्षिस मिळविलें होतें. आणि आश्चर्याची गोष्ट अशी कीं त्यांचें हें व्याख्यान स्वतंत्र पुस्तक रूपानें 'राष्ट्रभाषा' या नावानेंच सन १८९४ सालीं छापलेलें आहे. तेही आमच्या संग्रहीं आहे. कबीर, तुळशीदास आदि हिन्दी संतांची वचनें आमच्याकडील हरिदास कीर्तनकार अनेक शतकें वापरीत आलेले आहेत. आणि त्यांचा आदर अखिल मराठी जनतेंत झालेला आहे. या विषयासंबंधाने सर्व माहिती एकत्र करून पुस्तक रूपानें स्वतंत्रपणें प्रसिद्ध करण्याचा आमचा विचार आहे. प्रस्तुत मुद्दा एवढाच कीं कोणी विद्वान् कांहीं म्हणोत, महाराष्ट्रीय बहुजन समाजाचा या प्रकरणीचा कौल स्पष्ट आहे. आणि जर आम्हीं स्वातंत्र्योत्तर स्वीकारलेली लोकशाही निष्ठा प्रामाणिकपणें आणि समजुतीनें स्वीकारलेली असेल तर या विषयासंबंधानें आमच्या घटनेंत समाविष्ट झाला आहे त्याहून अन्य निर्णय करणें शक्य नाहीं ही खूण-गाठ सर्वांनीं मनाशीं पक्की बांधून ठेवावी. आणि तो निर्णय आपल्या सर्व अडचणी आणि गरजा यांचा विचार करून आपल्या सर्वांगीण प्रगतीला साहायक होईल या धोरणानें प्रत्यक्ष कृतींत आणण्याच्या कामाला लागावें हेंच युक्त होय.

आमच्या स्वतःच्या या विषयीं विचारांनीं स्थिर झालेल्या निर्णयाचें प्रतिपादन आम्ही आज अनेक वर्षे करीत आलेलों आहोंत. त्यांतील मूलभूत धारणा स्थिर आहे. परंतु त्यांतील अनेक पर्याय सूक्ष्मपणानें विचारांत घेत असतांना जो परिष्कार आणि जी स्पष्टता करावी लागली ती आम्ही वेळोवेळीं केली आहे. हे आमचे विचार आणि सिद्धांत अभ्यासू वाचकांना उपयुक्त वाटतील असें वाटल्यावरून महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेनें त्याचें एक पुस्तक काढावें असा निर्णय केला आणि विखुरलेले लेख एकत्र करून त्यांतील या प्रकरणीं उपयोगीं पडणारे भाग घेऊन हें पुस्तक सिद्ध केलें. सभेनें हे परिश्रम केले या बद्दल मी सभेचा आभारी आहें. निवडीचें काम मी केलेलें नाहीं. त्याच प्रमाणें या पुस्तकांतील उताऱ्यांना उचित शीर्षकेंही सभेच्या संपादकांनीं दिलेलीं आहेत. ज्यांतील उतारे घेतले आहेत ते सर्व लेख मुद्रित आहेत आणि त्यांच्या प्रसिद्धीचीं स्थळें आणि काळ उताऱ्यांच्या अंतीं नमूद केले आहेत. त्या वरून कळून येईल कीं

हे निरनिराळे लेख सन १९२६ ते १९५९ या सुमारें तीस वर्षांच्या कालावधींत लिहिलेले आहेत त्यांचे काळजीपूर्वक वाचन केलें असतां आमच्या भाषाविषयक विचारांचीं सूत्रें कळून येतील, आणि त्या संबंधी गुण-दोष-विवेक करता येईल. आम्ही आमच्या अल्पबुद्धिप्रमाणें सर्व सिद्धांत तर्कशुद्ध मांडून शक्य त्या सर्व शंका-आशंकांचें समाधान होईल, असा प्रयत्न केला आहे. नुसतेच विचार न मांडता विचारांना कृतींत आणून ही मिळालेल्या अनुभवाची बैठक प्राप्त करून दिली आहे. या विषयाचा विचार करणाऱ्या सर्व लोकांस या पुस्तकाचा उपयोग होईल अशी आमची श्रद्धा आहे.

आमचे सिद्धान्त पुढील तत्वांवर आणि गृहीत कृत्यांवर आधारलेले आहेत. —

(१) भारताचें शासन लोकशाही पद्धतीचें राहील.

(२) लोकशाही पद्धतीचें शासन खरे खुरे प्रतिष्ठित व समर्थ व्हावयाचे असेल तर लोकभाषांचाच आश्रय केला पाहिजे.

(३) अगदीं बाल्यावस्थेंतील भाषा या कामीं उपयोगी पडणार नाहींत. वयांत आणि पणांत आलेल्या भाषांचाच उपयोग केला पाहिजे. म्हणून हिन्दुस्तानांत जरी भाषा नांवानें असलेल्या चार हजार भाषा विचारांत घेतल्या तरी वयांत आणि पणांत आलेल्या अशा भाषा वीसाच्या वर नाहींत.

(४) अशा वीस भाषा बोलणारे लोक बहुतांशीं बहुसंख्येनें भारताच्या विशिष्ट भागांत एकत्र राहात आहेत. त्यामुळें भारताचे भाषानुसारी असे सुमारे वीस पर्यंत गट सहज पडू शकतात. चौदा भाषांचा उल्लेख घटनेंत आहे. त्यांतील संस्कृत आणि उर्दू या सर्व भारतांत कमी अधिक पसरलेल्या आहेत. बाकीच्या बारा भाषा बहुतांशीं विशिष्ट विभागांतच विकास पावलेल्या आहेत. असें असलें तरीही आम्ही कांहीं कमी अधिक विचार, गरज, सवलत वगैरे मनांत घेऊन सर्वांत अधिक होऊं शकणारी संख्या म्हणून वीस धरली आहे.

(५) या वीस भाषिक गटांत लोकशाही संपन्न करणें असेल तर त्यांची वीस राज्यें किंवा उपराज्यें करावी लागतील. हीच भाषिक राज्यें

होत. अशा राज्यांनाच आमच्या घटनेंत स्टेट असें नांव दिलेलें आहे. आणि लोकशाही सिध्दांत मान्य करावयाचा असेल तर दुसरा कोणताही पर्याय योग्य ठरणार नाहीं. भाषिक राज्यवादी कोणाही जबाबदार व्यक्तीनें वा संघटनेचें आज संविधानांत दिले आहेत त्यापेक्षां अधिक अधिकार संकल्पित भाषिक राज्यांसाठीं मागितलेले नाहीत. म्हणून केवळ राज्यें भाषिक करा म्हटल्यानें केंद्रसत्तेला कमीपणा येण्याचें कारणच नाही.

(६) भारतीय एकता हें तर आमच्या सर्व भारतीय प्रपंचाचे मूळ अधिष्ठान असले पाहिजे आणि या श्रध्देनें पडणाऱ्या मर्यादेच्या आंतच आपले सर्व व्यवहार चालले पाहिजेत. अनेक जाती, अनेक पंथ, विविध हित-संबंध, सर्वांचा मेळ भारतीय हिताशी घालूनच निर्णय केले पाहिजेत. भारताच्या हिताला आपल्या सर्व आचारांत व विचारांत प्राधान्य दिलें पाहिजे.

(७) वर सांगितलेलें भारतीय हित साध्य व्हावयाचे असेल तर सर्व भारतीयांना समान अशी भाषा आली पाहिजे आणि याच दृष्टीनें उपयोगी पडणारे वहिवाटीचे, संख्येचे, लवचिकपणाचे वगैरे अनेक गुण विचारांत घेऊन हिन्दी-हिन्दुस्तानीचा स्वीकार केला पाहिजे. आणि निकराचे प्रयत्न करून भारतांतील ४०–४५ कोटी प्रजेला ही भाषा लिहितां, बोलतां, वाचतां, त्याच प्रमाणें गरजे प्रमाणें सर्व वरिष्ठ क्षेत्रांत, शिक्षणांत, संशोधनांत सर्वत्र वापरतां आली पाहिजे.

(८) तथापि आपापल्या क्षेत्रांत क्षेत्रीय भाषाच प्रधान राहतील. मात्र क्षेत्रीय सर्व प्रजांनाही हिन्दीचें ज्ञान असलेंच पाहिजे, असा प्रयत्न झाला पाहिजे.

(९) या नीतीच्या अवलंबनानें भारतांतील कोणचाही प्रजाजन भारताच्या कोणच्याही विभागांत कोणत्याही कामासाठीं गेला तर त्याला आपलीं सर्व उद्दिष्टें साध्य करण्यासाठीं लोकाशीं जोडावयाचे संपर्क हिन्दी भाषेच्या साहाय्यानें साध्य करतां आले पाहिजेत.

(१०) चाळीस कोटी प्रजाजनांतील प्रत्येक व्यक्तीच्या ज्ञानाचा आणि गरजेचा एकच स्तर कधीही असणार नाहीं. तो भिन्नच असेल आणि क्षेत्रीय काय किंवा राष्ट्रीय काय, ज्ञानाचें आदान-प्रदान ज्याच्या त्याच्या आकारमानाप्रमाणें भिन्न भिन्नच राहील. परंतु आपलें आकारमान, पात्रता सिद्ध करीत करीत कोणालाही केवढेंही बदलतां किंवा वाढवितां येईल.

(११) शास्त्रांतील शुद्ध पारिभाषिक शब्द आणि शासकीय आणि लौकिक व्यवहारांत लागणारे सर्व शब्द हे सगळया भारतांत सर्वांना समजतील असेच एकरूपच मुक्रर केले पाहिजेत. म्हणजे अध्ययना साठीं किंवा कारभारासाठीं एका भाषिक विभागांतून दुसऱ्या भाषिक विभागांत जाणें येणें, काम करणें, राहणें वगैरे कसलाही अडथळा येण्याचा संभव नाहीं आणि यामुळें भारतीय एकता अभंग टिकवता येईल.

(१२) संस्कृत भाषा अशा परिभाषेच्या कामीं मुख्य आधारभूत भाषा राहील. कांहीं प्रक्रियेनें नवे शब्द घडविण्यासाठीं जुन्या परंपरेचा आधार घेऊन त्या धोरणानें संस्कृताच्या विकासाची योजना ही आखून पार पाडावी लागेल. पण त्यासाठीं भारतांतील प्रत्येक शिकाऊ व्यक्तीला संस्कृत आलेच पाहिजे अशी सक्ती करण्याचें प्रयोजन नाही.

(१३) सर्व क्षेत्रीय भाषांमधून समान असणाऱ्या शब्दांना प्राधान्य दिले पाहिजे. त्याच प्रमाणें क्षेत्रीय भाषांत एकमेकांत सहकार वाढून शब्दांचे आणि ज्ञानाचे आदान-प्रदान झाले पाहिजे, ही सर्व प्रक्रिया स्पर्धेवर किंवा आग्रहावर न आधारता प्रेम व हितसाधना यांवर आधारली पाहिजे. इंग्रजी हे आधुनिक विद्या संपादन करण्यास उपयुक्त असलेले सर्वांत मोठें हत्यार आमचे जवळ उपलब्ध आहे. तें हत्यार फक्त आमच्या उणीवा भरून काढण्याच्या साठींच चालविलें पाहिजे. जो व्यवहार आम्हांला आमच्या भाषेंत करतां येतो किंबहुना आम्हाला केला पाहिजे त्या व्यवहारांत इंग्रजीचा वापर चालू देतां कामा नये.

आज आमच्या विद्यापीठीय म्हणजे उच्च शिक्षणांत आपापल्या विषयाचें ज्ञान देणारे सर्व ग्रंथ समाविष्ट झाले पाहिजेत पण या साठीं इंग्रजी माध्यम ठेवण्याचें कारण नाहीं. तसेंच हर एक भारतीय माणसानें इंग्रजी शिकलेंच पाहिजे असा आग्रहही धरतां कामा नये.

पुस्तकें नाहींत, परिभाषा नाहीं, या गोष्टी सत्य आहेत. परंतु तीं निर्माण करणें हें ज्याचें प्राप्त कर्तव्य आहे त्या आम्हां सर्व विद्या-विभूषितांनीं आंग झाडून कामाला लागले पाहिजे. आंग झटकून बाजूला होता कामा नये. विद्यापीठें स्थापन करणाऱ्या हॅलिफॅक्स खलित्यांत ज्या निर्झरीय (फिल्ट्रेशन) कार्याचा उल्लेख केला आहे तें कार्य करून दाखविणें हें विद्यापीठांचे आणि विद्यावंतांचें कर्तव्यच आहे. विद्यापीठें तें कार्य न करतील तर प्रजांच्या करांतून कांहींही साहाय्य मिळण्याचा हक्क त्यांना राहणार नाहीं. इष्ट काम करून आपल्या हक्काचा शेर त्यांनीं पदरांत पाडून घेतला पाहिजे. सबबी सांगून त्यांची सुटका होणार नाहीं. आणि या गोष्टीकडे दुर्लक्ष झाल्यास त्याची कटु फळें देशास भोगावी लागतील हें उघड आहे.

वर नमूद केलेले सिद्धांत या पुस्तकांतील लेखांतून इतस्ततः परिपुष्ट केलेले दिसतील. विचारी वाचकांच्या पसंतीला आमचे विचार उतरल्यास आम्हाला समाधान वाटेल.

१५ ऑगस्ट १९६२
पुणें

दत्तो वामन पोतदार

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| प्रकाशकीय | तीन |
| निवेदन | पांच |
| अनुक्रमणिका | बारा |
| १. भारतीय भाषांचें जीवन-कार्य | १ |
| २. मातृभाषा प्रथम | ५ |
| ३. माध्यमिक शिक्षणांत हिंदी | १४ |
| ४. आधीं समजणें बोलणें, मग लिहिणें वाचणें | १५ |
| ५. मराठी व हिंदी | २५ |
| ६. हिंदी संबंधीं भूमिका | ३२ |
| ७. स्वभाषांचा व्यवहार | ३९ |
| ८. आमची राजभाषा | ४५ |
| ८-अ. राष्ट्रभाषा प्रश्नाची मीमांसा | ६१ |
| ९. प्रादेशिक भाषा आणि संघ भाषा | ७० |
| १०. सक्ती नको पण सोय हवी | ८० |
| ११. समन्वयाची दृष्टि | ८७ |
| १२. स्वभाषांचा विकास | ९४ |
| १३. शिक्षणाचें माध्यम | १०४ |
| १४. इंग्रजी कीं हिंदी ? | ११२ |
| १५. संसदीय समिति | १२५ |
| १६. मराठीचा कर्मयोग | १४५ |

परिशिष्ट :

1. Report of the Hindi Teaching Committee State of Bombay 1951.
2. President' Order.

शुद्धिपत्र

मराठी ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........



# १ : भारतीय भाषांचें जीवन-कार्य

·· भावी भारतीय जीवनांत देशभाषांचें कार्य काय ? ह्या प्रश्नाचा सांगोपांग विचार व त्यासंबंधी अगदीं ठाम निर्णय ह्यांची आज फार आवश्यकता आहे. एकछत्री इंग्रजी अंमल सुरू झाल्यापासून इकडील विद्वानांस असें एक मत पढविण्यांत आलें कीं, (भारतांत जाती, भाषा, धर्म ह्यांचा भेद फार दाट माजलेला आहे; तें तण काढल्याशिवाय उन्नतीचीं बीजें जोगावून ही भूमि समृद्ध होणार नाहीं. आतां येथें राजकीयांशीं संबंध ठेवण्याची भाषा पडली इंग्रजी; सबब ती पुढें आली. आम्ही सज्ञान, समर्थ आणि समंजस झालों म्हणजे जसें आमचें राज्य आमच्या हवालीं व्हावयाचें आहे त्याप्रमाणें देशी भाषा बलिष्ठ झाल्या म्हणजे मग इंग्रजी खुषीने रिटायर होईल असा पुकारा १८५४ सालीं झाला. पण इकडे पहावें तो शाळा उघडल्या, विद्यापीठें निघालीं पण अलिपष्टनाचे वेळीं देशी वाङमयाला चारण्यांत येणारा खुराक मात्र हळू हळू बंद करण्यांत आला, आणि देशी भाषा भीक मागत दारोदार फिरूं लागल्या !) आपल्या सभांतून, लेखांतून, ग्रंथांतून, कचेऱ्यांतून, घरादारांतून आणि अखेर मनोमंदिरांतून देशी भाषेची हकालपट्टी याप्रमाणें निमूटपणें होत गेली; नव्हे, आपण आपल्या हातानें करीत गेलों. आपणांतील हा मोह एवढा वाढला आहे कीं, स्वकीया-स्वकीयांतील खाजगी पत्रव्यवहार राहो, घरादारावरील नांवांच्या पाट्या, पुस्तकांवरील, छत्र्यांवरील आणि कदांमुकटचांवरील नांवें देखील आपण इंग्रजींत घातलेलीं दिसून येतात. इतकी इंग्रजी आपल्या अंगवळणीं पडलेली आहे.

दा. क्र. १२२८८

## एकराष्ट्रीयत्वाची भावना

·· बारीक निरीक्षणांनीं माझी खात्री झालेली आहे कीं, आपल्या ठायीं विचार-विकृति अजून मुरलेली आहे. महाराष्ट्र प्रांत एक करा, महाराष्ट्र विद्यापीठ स्थापन करा, महाराष्ट्र भाषेंतून शिक्षण द्या, महाराष्ट्र भाषेंतून व्यवहार करा, असें म्हटलें कीं, आपणांपैकीं पुष्कळांचें चित्त डळमळतें; मराठी, बंगाली, हिंदी, तामिळ, तेलगू, गुजराथी, कानडी, असे प्रांत आणि भाषा पुनरपि जागृत करून आम्ही भारतवर्षाचीं शकलें तर करणार नाहीं ना, असा संशय कित्येकांच्या मनांत अद्यापि आल्याविना रहात नाहीं, आणि असें

## इंग्रजी आणि एकतेचा व्यामोह

राजकीय सत्ता हातीं येतांच इंग्रजांनीं इंग्रजी भाषेंतून सर्व शिक्षण देण्याचें धोरण निश्चित केलें. हा क्रम सुरू झाल्याबरोबर अहद काश्मीरापासून तों तहद कन्याकुमारीपावेतों असा एक इंग्रजी शिकलेल्यांचा वर्ग निर्माण झाला कीं, त्यानें आपला सर्व व्यवहार इंग्रजींतून करण्यास उत्साहानें प्रारंभ केला. फक्त ‘घराऊ’ व्यवहारापुरता जन्मभाषेशीं त्यांचा संबंध उरला; कारण घरें होतीं स्त्रियांच्या हातांत. हळू हळू स्त्रियांवरहि पुरुषांप्रमाणेंच परिणाम होऊन त्याहि पुरुषांचा ‘मागोवा’ घेत चालूं लागल्या ! घरीं आजीबाईच्या संगतींत अंगीं मुरलेली शुद्ध मराठी त्यांचीहि सुटत चालली, आणि इंग्रजी किंवा इंग्रजीमिश्र मराठींत पुरुषांप्रमाणेंच त्यांचाहि व्यवहार होऊं लागला. सर्वत्र एका भाषेंतून नवीन शिक्षण फैलावूं लागलें. इंग्रजींतून बंगालचा सुरेंद्रनाथ मद्रासच्या आनंदाचार्लूशीं आपलें हृद्गत व्यक्त करूं लागला, आणि काश्मिरी अजोध्यानाथ महाराष्ट्रीय महादेव गोविंदाला आपलीं मनोगतें सांगूं लागला. कैक वर्षें चिरफळचा होऊन पडलेला हा प्राचीन भारत देश या नवीन ऐक्य साधनांनीं सांधला जाण्याचीं दिव्य स्वप्नें या नवशिक्षितांस पडूं लागलीं. याप्रमाणें इंग्रजींतून बोलणारा, इंग्रजींतून चालणारा असा इंग्रजीमय सुशिक्षितांचा नवीन वर्ग तयार झाला, आणि एकछत्री इंग्रजी राज्याबरोबरच एकंकारी इंग्रजी भाषेचाहि तो तीव्र अभिमानी बनला.

इंग्रजीचा संसार वाढत होता आणि इंग्रजीचें वैभव चढत होतें; त्या मानानें पहावें तों देशी भाषांचा संसार अगदींच रोडका वाटे, आणि त्यांचें वैभव भिकार दिसे. यामुळें आपल्या देशी भाषा या नवशिक्षितांच्या मनांतून उतरल्या. आधींच शिक्षणांत देशी भाषांस जवळ जवळ काट मिळाला असल्यामुळें त्यांचा परिचय या नवशिक्षितांस नाममात्रच होता, आणि उलट नवीन इंग्रजीची जबरदस्त मोहिनी त्यांचे मनावर अनावर होती. अनेक नव्या कल्पना, नवे शब्द, नवीं शास्त्रें त्यांस इंग्रजींत दिसत, त्यांचा मराठी आणि

## बहुसंख्यांकांवर जुलूम कां ?

या बाबातींत दुसरा असा एक विचार पहा कीं, अल्पसंख्यांकांचा बहुसंख्यांकांचेवर भाषेच्या बाबतींत जुलूम कां असावा ? महाराष्ट्रांत रहावयाचें असेल त्यांना मराठी बोलतां, लिहितां आलेंच पाहिजे. चारदोन अ-महाराष्ट्रीयांसाठीं परक्या इंग्रजीचा स्वीकार करणें याचा अर्थ काय ? लंडनांत हा नियम कसा लावावा तें कोणी दाखवून देईल काय ? उद्यां फ्रान्समध्यें चार इंग्रज गेले किंवा राहिले तर काय त्यांच्यासाठीं इतर फ्रेंचांस देखील इंग्रजींतून व्यवहारावयास लावतील ? गुजराथेंत दोन बंगाली मुलें असलीं म्हणून काय त्या दोघांसाठीं इतर सर्व गुजराथी मुलांनीं स्वभाषा टाकून इंग्रजींतून शिकावें ? हा न्याय कोठला ? व ही तर्कपद्धति तरी कोठली ? वास्तविक हा प्रश्न केवळ साहित्यभक्तांचे समोर कां मांडावा अशी शंका कोणी घेईल; पण हा मूळ तत्त्वाचा राष्ट्रीय प्रश्न आहे. आपली त्या संबंधानें मति निर्मळ, असली म्हणजे पुढें विचारैक्य व कार्यैक्य होण्याला सुलभ जाईल. महाराष्ट्र कर्नाटक, बंगाल, बिहार, राजपुताना, पंजाब, आंध्र, गुजरात इत्यादि प्रमुख प्रांत हिंदुस्थानांत रहावे असें आम्हांस वाटतें; आणि तेथें तेथें सर्व व्यवहार त्या त्या प्रांतिक भाषांत व्हावा. सर्व भारतीय आणि आंतरराष्ट्रीय कार्यासाठीं, अवश्य तेवढा व्यवहार इंग्रजींतून चालेल. या सर्व प्रांत-स्तंभांवर भारतमातेचें भव्य मंदिर ऐटींत खंबीरीनें उभें राहील अशी आमची दृढ श्रद्धा आहे. वरील विवेचनावरून आमच्या मतें हें सिद्ध झालें कीं, भावी भारतीय जीवनांत देशी भाषांचें जीवनकार्य म्हणजे स्वप्रांतांत अनिर्बंध वाढून प्रांतस्थांच्या सर्व गरजा भागविणें, त्यांचे सर्व विचार प्रगट करणें, आणि व्यवहार उरकणें आणि असें करतांना परप्रांतीय भाषाभगिनींशीं प्रेमानें व शेजारधर्मानें वागणें.

हें त्यांचें कार्य त्यांस पूर्णपणें साधतां यावें आणि प्रस्तुतचीं जीं कृत्रिम बंधनें प्रांतिक भाषांच्या अभिवृद्धीच्या आड येत असतील, तीं दूर करून घ्यावीं. एतदर्थ झटणें हें साहित्यभक्तांचें प्रधान कर्तव्य होय. भावी महाराष्ट्र विद्यापीठांत महाराष्ट्र भाषेसच अग्रमान रहावा आणि महाराष्ट्र भाषेचें अध्ययन जसें सर्वांगीण व्हावें, तसें अध्यापनार्थहि शक्य तेथें तेथें महाराष्ट्र भाषेचा स्वीकार केला जावा. किंबहुना महाराष्ट्र भाषेला अशी संपन्नता आणावी कीं, पृथ्वीवरील कोणताहि विषय तींत लीलेने, समाधानकारक

रीतीनें प्रतिपादितां यावा, पृथ्वीवरील भाषांत ती पूजनीय गणली जावी व तिचें वैभव सर्वमान्य व्हावें आणि तिचा डंका सर्वत्र गाजावा.

येथवर मजल गांठण्यास महान् परिश्रमांची अपेक्षा आहे. अद्यापि स्वदेशांत, स्वगृहांतच तिचा योग्य तो सन्मान राखला जात नाहीं, तेथेंच ती विपत्ति भोगीत आहे. आपण सर्व तिच्याविषयींचें कर्तव्य ओळखून तिचें दैन्य फिटेल आणि तिला सोन्याचे दिवस दिसतील यासाठीं झटलें पाहिजे. स्वजनांतील तिच्या योग्यतेसंबंधाचें अज्ञान नाहींसें केलें पाहिजे. नंतर मग जबरदस्त परकीय भाषेनें केलेल्या आक्रमणांतून तिची सुटका केली पाहिजे. विद्यापीठ स्थापन करणें किंवा परिषदा स्थापणें किंवा संमेलनें भरविणें हे उपाय फलद्रूप व्हावयाचे असतील तर तिच्या सेवेप्रीत्यर्थ आपला सर्व जन्म वाहणारे बुद्धिमंत तरुण तिच्या उपासनेसाठीं धांवून आले पाहिजेत. वस्तुतः पाहतां भाषेची किंमत काय आहे ? शब्दांच्या टरफलांत व वाक्यांच्या सांखळ्यांत काय तत्त्व आहे ? वस्तुतः ज्या मानानें भाषेंतील शब्द आणि वाक्यें म्हणजे त्यांनीं घडलेले ग्रंथ ज्ञानाचा संग्रह करीत असतील त्या मानानें त्या भाषेची योग्यता ! यासाठीं प्रथम अहर्निश ज्ञानवृद्ध्यर्थ खपलें पाहिजे; तें ज्ञान या जगांतून मधुकरवृत्तीनें गोळा करून त्याचा खळबळणारा प्रचंड सागर आपण निर्मिला पाहिजे; विचार-विकारांच्या अलोट ऊर्मि तेथें निरंतर उसळत राहिल्या पाहिजेत, या सागराच्या तळांत प्रमेयमुक्तांनीं अलंकृत केलेल्या शब्दशुक्तींचा खच पडला पाहिजे आणि या मुक्तामाला कंठीं धारण करून त्यांच्या तेजानें तळपणारे आमचे महाराष्ट्रीय बंधु आणि महाराष्ट्रीय भगिनी पृथ्वीवरच स्वर्गसुखानुभव पावून धन्य झाल्या पाहिजेत ! भारतीय भाषांचें हें जीवन-कार्य अभिप्रेत नसतां आणि उपरिवर्णित समुन्नत दशेला त्यांसकट आपण पोंचावयाचा निर्धार अमान्य असतांहि जर कोणी त्यांच्या अभ्युदयाच्या आणि उत्तेजनाच्या कामीं शिणत असतील तर त्यांचें तें कृत्य बलिदानार्थ तयार करावयाच्या यज्ञीय पशूस मारण्यापूर्वीं परिपुष्ट करण्यासारखेंच होईल यांत शंका नाहीं. हें फसवें उत्तेजन स्वीकारण्याचे प्रसंगीं आपली सावधानता ढळू न देण्याविषयीं आपण दक्ष असलें पाहिजे.

**द्वितीय शारदोपासक संमेलन, पुणें १९२६**
स्वागताध्यक्षीय भाषणांतून

## इंग्रजी आणि एकतेचा व्यामोह

राजकीय सत्ता हातीं येतांच इंग्रजांनीं इंग्रजी भाषेंतून सर्व शिक्षण देण्याचें धोरण निश्चित केलें. हा क्रम सुरू झाल्याबरोबर अहद काश्मीरापासून तों तहद कन्याकुमारीपावेतों असा एक इंग्रजी शिकलेल्यांचा वर्ग निर्माण झाला कीं, त्यानें आपला सर्व व्यवहार इंग्रजींतून करण्यास उत्साहानें प्रारंभ केला. फक्त 'घराऊ' व्यवहारापुरता जन्मभाषेशीं त्यांचा संबंध उरला; कारण घरें होतीं स्त्रियांच्या हातांत. हळू हळू स्त्रियांवरहि पुरुषांप्रमाणेंच परिणाम होऊन त्याहि पुरुषांचा 'मागोवा' घेत चालू लागल्या ! घरीं आजीबाईच्या संगतींत अंगीं मुरलेली शुद्ध मराठी त्यांचीहि सुटत चालली, आणि इंग्रजी किंवा इंग्रजीमिश्र मराठींत पुरुषांप्रमाणेंच त्यांचाहि व्यवहार होऊं लागला. सर्वत्र एका भाषेंतून नवीन शिक्षण फैलावूं लागलें. इंग्रजींतून बंगालचा सुरेंद्रनाथ मद्रासच्या आनंदाचार्लूशीं आपलें हृद्गत व्यक्त करूं लागला, आणि काश्मिरी अजोध्यानाथ महाराष्ट्रीय महादेव गोविंदाला आपलीं मनोगतें सांगूं लागला. कैक वर्षें चिरफळ्या होऊन पडलेला हा प्राचीन भारत देश या नवीन ऐक्य साधनांनीं सांधला जाण्याचीं दिव्य स्वप्नें या नवशिक्षितांस पडूं लागलीं. याप्रमाणें इंग्रजींतून बोलणारा, इंग्रजींतून चालणारा असा इंग्रजीमय सुशिक्षितांचा नवीन वर्ग तयार झाला, आणि एकछत्री इंग्रजी राज्याबरोबरच एकंकारी इंग्रजी भाषेचाहि तो तीव्र अभिमानी बनला.

इंग्रजीचा संसार वाढत होता आणि इंग्रजीचें वैभव चढत होतें; त्या मानानें पहावें तों देशी भाषांचा संसार अगदींच रोडका वाटे, आणि त्यांचें वैभव भिकार दिसे. यामुळें आपल्या देशी भाषा या नवशिक्षितांच्या मनांतून उतरल्या. आधींच शिक्षणांत देशी भाषांस जवळ जवळ काट मिळाला असल्यामुळें त्यांचा परिचय या नवशिक्षितांस नाममात्रच होता, आणि उलट नवीन इंग्रजीची जबरदस्त मोहिनी त्यांचे मनावर अनावर होती. अनेक नव्या कल्पना, नवे शब्द, नवीं शास्त्रें त्यांस इंग्रजींत दिसत, त्यांचा मराठी आणि

इतर देशी भाषांत कोठें थांग ना पत्ता! जन्मभाषेविषयीं उदासीनता कां, या प्रश्नाचें उत्तर ही वर्णिलेली परिस्थिति.

## देशी भाषांमुळें भेदभाव वाढेल हें भय

उदासीनता एक राहो; परंतु विरोधवृत्ति कां उद्‌भवावी? याचें उत्तर उघड आहे. "देशाच्या निरनिराळ्या भागांत ज्या ज्या निरनिराळ्या देशी भाषा आहेत, त्यांची जर अभिवृद्धि केली तर देशाच्या ऐक्याच्या मार्गांत मोठेच अडचणीचे धोंडे आम्ही ठेवल्यासारखें होईल! प्रांतिक भाषांचें पोषण केलें आणि इंग्रजी सोडलें तर मग हे प्रांत, हीं एका हिंदुस्तानाचीं अनेक शकलें, एक कशानें होतील? एका प्रांतांतल्या माणसाला दुसऱ्या प्रांतांतल्या माणसाची भाषाच समजली नाहीं तर दोघे एका जागीं बसून आपल्या सुख-दुःखांचा विचार एकत्र कसा करूं शकतील? तेव्हां प्रांतिक भाषांना उत्तेजन देणें, त्यांच्या उणीवा दूर करून त्यांचें सामर्थ्य वाढवणें म्हणजे आपण होऊन परस्परांतील दूरीभाव दृढ करून आपल्या अडचणी वाढवणें होय. प्रांतिक भाषा मूळच्याच दुर्बल आहेत, त्या तशाच उपाशी राहून हळूहळू मृत्युवश होतील तेंच बरें! त्यायोगें इंग्रजीच्या प्रसाराला सारें मैदान चटकन मोकळें होईल, आणि हिंदुस्तान एक भाषा बोलणारा देश करण्याचे प्रयत्न लवकर यशस्वी होतील."

अर्थात् ज्याचा मृत्यु इष्ट वाटतो त्यांचें पोषण करणें हें त्यांच्या मनास कसें सहन होईल? देशी भाषांस विरोध कां या शंकेचें समाधान हें असें आहे.

जगभर एकच भाषा चालू असती तर काय बहार झाली असती! हे इतके भाषाभेद म्हणजे या इतक्या भिंतीच आड उभ्या असून त्या मनुष्याचें मलभूत ऐक्य आपल्या दृष्टीस पडूं देत नाहींत, आपणांमध्यें हे भाषाभेद आपला इतिहास आपणांस आठवतो तेव्हांपासून तरी आहेतच.

## भाषा कशाला

भाषेचें प्राथमिक कार्य काय? विकार व विचार यांचें प्रदर्शन एवढेंच. शरीराच्या अवयवांची साभिप्राय हालचाल करून विचार-विकार प्रदर्शन पुष्कळ प्राण्यांत करतां येतें. आपण मनुष्येंहि अंगविक्षेपांची भाषा योजतों; पण ध्वनीची जोड या अंगविक्षेपाला दिली म्हणजे विकार-विचारांचीहि

परिस्फुटता अधिक विशद रीतीनें करतां येते, ध्वनींना शब्दरूप प्राप्त झालें म्हणजे ध्वनींचें कार्य अधिकच वाढतें. या शब्दरूप ध्वनींना चिह्नांकित करून टिकवून धरण्याची सोय सांपडल्यापासून तर माणसांचें भाषासामर्थ्य अत्यन्त वृद्धिंगत झालेलें आहे. बहुधा आज भिन्न-भिन्न दिसणाऱ्या भाषांचें मूळ शोधलें तर सर्वांचे मूळ-ध्वनि एकत्रच असावेत असा तर्क होतो.

## जगाची एक भाषा अशक्य

आहेत त्या भाषा जमेस धरूनच आजचें बोलणें करावयाचें आहे. भाषांतील भेदांमुळें जगांच्या ऐक्यसाधनास होणारी अडचण लक्षात घेतां, जुनी मूळची नसली तर नवीनच एक भाषा बनवून ती सर्वांनीं शिकावी व वापरावी असें कां करूं नये ? या विचारानें प्रेरित होऊन नवीन, सोपी व सर्वग्राह्य अशी कृत्रिम विश्वभाषा बनवण्याचा अनेकांनीं प्रयत्न केला आहे. गेल्या तीनशें वर्षांत विश्वभाषेच्या दोनशें योजना प्रसिद्ध झालेल्या आहेत. पण या विश्वभाषावाद्यांची भूमिका जगांतील विद्यमान भाषांची जागा घेण्याची नाहीं. आपल्या प्रयत्नांचें वर्णन ‘ साहाय्यक आंतरराष्ट्रीय भाषा ’ असें ते करतात; तिचा उद्देश मातृभाषांस साहाय्य करणें, असाच मर्यादित राखण्यांत आला आहे.

येणेंप्रमाणें पहातां व्होलापुक, इस्पेरँटो, इडो किंवा इंटरलिंग्वा प्रभृति विश्वभाषा किंवा विश्ववाणी यांचा प्रांत मर्यादित झाला. सर्व जगाचा व्यवहार त्यांतून करविण्याची भूमिका व्यवहार्य कोटींतली नाहीं. एका कोणत्या लहानशा देशांतहि अशी कृत्रिम भाषा रूढ झालेली नाहीं, तशी ती झाल्यास इतर विरोधी राष्ट्रें तिचा स्वीकार करणार नाहींत. याच कारणामुळें विद्यमानांतून एकहि भाषा विश्वभाषा म्हणून स्वीकृत केली जात नाहीं. इंग्रजीचा प्रसार जगांत बराच झालेला आहे; पण इंग्रजीचा स्वीकार विश्वभाषा म्हणून होणें शक्य नाहीं, कारण त्यायोगें जगाचें राजकीय स्वास्थ्य बिघडेल. इतर जे आज इंग्रजी शिकतात ते दुय्यम भाषा म्हणूनच होय. मातेप्रमाणेंच आमचा प्रतिपाळ मातृभाषांनींहि केला असल्यामुळें अपूर्व स्वार्थत्यागानें मातृभाषांची जोपासना ज्या अनेक देशांतील लोकांनीं केली आहे ते पळभरहि मातृभाषांच्या वरची पदवी कोणास देण्यास खचित तयार होणार नाहींत !

तेव्हां एखादी कृत्रिम भाषा तयार करून अथवा एकाद्या सोयीस्कर विद्यमान भाषेलाच विश्वभाषेचा मान देऊन आपापल्या मातृभाषा नष्ट करण्यास कोणीच तयार होणार नाहीं. जग केवळ एक भाषा बोलणारें असतें तर पुष्कळ फायदे झाले असते. पण मग वैचित्र्याचें वैभव या जगांत कोठें आढळलें असतें काय ? या वैचित्र्यामुळेंच संसाराला खरी लज्जत आलेली आहे. एकनादी, एकरंगी, एकरूपी जगाचा आपणांस ताबडतोब वीट येईल. एकच रस, एकच अन्न, एकच फळ असें एकच एक आपणांस रुचेल काय ! वीट आणणारा एकपणाहि आपणांस नको; आणि याच्या उलट सगळा भेदच भेद झाला तर तोहि तितकाच आपणांस तापदायक वाटेल. एकाचा एकाला मेळ नाहीं, प्रत्येकाची भाषा वेगळी, प्रत्येकाची रुचि वेगळी, प्रत्येकाचें सर्वच वेगळें झालें तर हा अतिरेकी विविधपणाचा व वैचित्र्याचा देखावा आपणांस खचित खरोखरीच वेड लावील ! सृष्टीनें आपल्या साम्राज्यांत मध्यम मार्गाचा अवलंब केलेला आहे. अनेक माणसांत एक माणुसकी म्हणून आहे, आणि अनेक रंग मिळून एक शुभ्रवर्ण होतो यांतच सृष्टीची सारी चमत्कृति सांठविलेली आहे. साऱ्या जगाची एक भाषा ही माणसाच्या स्वभावास खपणार नाहीं, आणि माणसागणिक वेगळी भाषाहि तो चालूं देणार नाहीं !

## प्रौढ देशींचाच आश्रय

हीं दोन टोकें सोडलीं म्हणज ज्या मधल्या भाषा उरतात त्याच या जगांत व्यवहारांत आहेत. ज्याप्रमाणें कांहीं समाज, कांहीं राष्ट्रें व कांहीं धर्म हे जगांत प्रमुख म्हणून सहज दाखवितां येतात त्याप्रमाणें कांहीं भाषा म्हणजे जगांतील प्रमुख भाषा असें स्वच्छ दाखवितां येईल. जसें जगांतील राजकारण कांहीं प्रमुख राष्ट्रांच्याच हातांत खेळत रहातें तसें जगांतील भाषांमधील राजकारणहि बहुधा त्याच राष्ट्रांच्या अनुरोधानें चाललेलें असतें. जगांतील प्रबळ राष्ट्रांच्या ५।७ भाषा, दुय्यम राष्ट्रांच्या १०।१५ भाषा व छोट्या स्वतंत्र राष्ट्रांच्या भाषा यांचा विचार करणें क्रमप्राप्त आहे. विस्तारानें जगांतील अग्रवर्ति राष्ट्रांत बसण्याचा अधिकार असलेला आपला भारत देश एकभाषात्मक नाहीं. पहिल्या व दुसऱ्या वर्गांत मोडण्यासारख्या सुमारें पंन्नास भाषा जगांत आज विद्यमान आहेत. इतक्या भाषा आज जगत।

पोक्त्या म्हणून नांदत आहेत. इतक्यांचा संसार सुखानें आणि गोडीनें चालेल असेंच धोरण जगानें आखलें पाहिजे. प्रौढ व पोक्त अशा मातृभाषांचा पोषक गुण फार मोठा आहे. जीवन उन्नत होण्याला लागणाऱ्या विचारांचा पौष्टिक खुराक पुरविण्याचें सामर्थ्य ज्या मातृभाषेंत असेल ती मातृभाषा थोर व पूज्य गणलीच पाहिजे.....

या मातृभाषांच्या द्वारां सर्वांना ज्ञानाचें अत्युच्च शिखर गांठण्याची सोय करून दिली पाहिजे. हर एक मनुष्याला ज्ञानाच्या या उच्च शिखरावर आरोहण करण्याचा हक्क आहे. ती पात्रता प्राप्त होण्यासाठीं परिश्रम व बुद्धि यांची आवश्यकता आहे. या परिश्रमास अधिक फळ मिळावें म्हणून जी जी योजना करतां येईल ती करणें अवश्य आहे. ज्ञानाचा मुक्काम गाठण्यांस मातृभाषेचा रस्ता हा सगळ्यांत जवळचा व ओळखीचा होय. अर्थात् याच रस्त्यानें रस्ता आहे तेथवर मजल मारली पाहिजे; म्हणजे तेणेंकरून ज्ञानसाधनाचा काळ पुष्कळ वांचेल; आणि काळाची जेवढी बचत होईल तेवढी आपणांस पाहिजे आहे. काळाइतकी मौल्यवान् वस्तु नाहीं. हा बहुमोल काळ मातृभाषेचा आश्रय केल्यानें वांचतो, म्हणूनहि मातृभाषेचा आश्रय करणें अत्यंत आवश्यक आहे. मातृभाषेचा रस्ता थेट शेवटच्या टप्प्यापर्यंत नेतां येईल तर तें आपणांस पाहिजे आहे. आणि यास्तव तसे प्रयत्नहि आपणांस करावयास पाहिजेत.

## जिज्ञासूंचा दुहेरी धर्म

मातृभाषेचा जेथें लाग चालत नाहीं तेथें परक्या भाषांचा आश्रय करणें भागच पडतें, आणि जिज्ञासूनें ज्ञानसाधनासाठीं वाटेल त्या भाषेचा आश्रय करावा, पण कधींहि माघारें फिरूं नये. पण जिज्ञासूला दुर्बल अशा मातृभाषाश्रित लोकांची आठवण ठेवलीच पाहिजे; व मागाहून येणाऱ्या या दुर्बलांसाठीं स्वार्थत्यागपूर्वक रस्त्याचा टप्पा नेववेल तितका शिखराजवळ नेला पाहिजे. केवळ ज्ञानानंदांत मग्न राहून आपण स्वतःच एकट्यानें त्या सुखाचे वांटेकरी होणें न्याय्य ठरणार नाहीं. मातृभाषेच्या साहाय्यानें ज्ञानाची चढण जेथवर चढतां येईल तेथवर चढणें व तदनंतर पुढें जाणाऱ्या दुसऱ्या परक्या भाषेची सोबत पाहून वाट चालणें, हा खऱ्या जिज्ञासूंचा दुहेरी धर्म होय. ज्ञानाच्या वाटेनें ज्या भाषा जितक्या उंच गेल्या असतील त्या सर्व

भाषा, परकीय असल्या तरी खऱ्या जिज्ञासूंस वंद्यच असल्या पाहिजेत. जेथें मातृभाषा थबकल्या तेथून पुढें दुसऱ्या भाषांचा आश्रय घेणें आणि मातृभाषांची गति व सामर्थ्य वाढवण्यासाठीं झटणें हें पुण्यकर्म होय.

## अल्प श्रमानें बहुसंख्यांकांना ज्ञानी करा

आपणांस जगाची प्रगति झपाट्यानें कशी होईल तें पहावयाचें आहे. जग त्वरेनें अधिकांत अधिक ज्ञानसंपन्न ज्या उपायांनीं होईल ते उपाय आपणांस ठरवावयाचे आहेत. ज्ञानग्रहणाचें साधन भाषा; आणि ही भाषा जगाची तर एकच होऊं शकत नाहीं. प्रौढ व पोक्त्या अशा मातृभाषांच्याच आश्रयानें गेलें तरच अल्प श्रमानें बहुसंख्य लोकांना ज्ञानसंपन्न होतां येईल. बहुश्रमानें अल्पसंख्य लोकांनीं ज्ञानसंपन्न – आणि तें सुद्धां अर्धवट – होण्यापेक्षां अल्पश्रमानें बहुसंख्य लोकांनीं पूर्ण ज्ञानी बनणे हेंच जगाच्या फायद्याचें आहे. आणि असें व्हावयाचा एकच सरळ व सोपा मार्ग म्हणजे पोक्त अशा मातृभाषांची उपासना. पुष्कळ श्रम करूनहि परकी भाषा धड येत नाहीं. किती आली तरी तिचा गुप्त भाव बहुधा हातीं येत नाहीं. एकाद्या भाग्यवंतालाच त्याचें दर्शन घडतें. भाषेच्या द्वारां साध्य होणारा सरस्वतीचा साक्षात्कार परकीय भाषेच्या द्वारें अनुभवास येणें परम दुर्घट असतें. " मनुष्याणां सहस्रेषु कश्चित् यतति सिद्धये । यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः । " असे उद्गार भगवंतांनीं स्वरूपाकार होणाऱ्या ज्ञान्यासंबंधीं भगवद्गीतेंत काढले आहेत; नेमकी तशीच स्थिति परकीय भाषेच्या द्वारां विद्येचा साक्षात्कार मिळवूं पहाणाऱ्यांची होते. मातृभाषेंतून भाव सहज व्यक्त होतात, परंतु परकीय भाषेच्या साहाय्यानें किती खटपट केली तरी परम सूक्ष्म भाव 'अव्यक्त'च राहतात, आणि अशा 'अव्यक्तासक्तचेतसां' ना अधिकतर कष्ट मात्र व्यर्थ पडतात.....

## हिंदी-हिंदुस्तानी हीच राष्ट्रभाषा

या देशांतील प्रत्येक पोक्त भाषेनें आपापल्या लेकरांची काळजी वाहिली पाहिजे. परंतु या सर्व भिन्नभाषी लोकांना सामान्य असणारी परिस्थिति व विषयहि बरेच आहेत, आणि ते अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. परक्या इंग्रजी भाषेच्या द्वारां केली जाणारी सार्वभारतीय प्रश्नांची

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ....

क्रमांक .... नों. दि. ....

वाटाघाट खालच्या तळच्या थरापर्यंत जाऊन त्यांच्या रक्तांत भिनत नाहीं. इंग्रजी ही या देशाची राष्ट्रभाषा–सर्वसाधारण व्यवहाराची भाषा–होऊं शकत नाहीं. मग काय एकादी नवीन कृत्रिम भाषा राष्ट्रभाषा म्हणन बनवावी ? कृत्रिम भाषेचा प्रयत्न व्यर्थ आहे. विद्यमान भाषांतली जी फार मोठ्या समाजास कळते तिचाच स्वीकार राष्ट्रभाषा म्हणून करणें हाच एक उपाय आहे. आतां सोयीची निवड करण्याचा प्रश्न राहिला. देशांतील एक-तृतीयांश लोक आज हिंदी समजतात. हिंदी म्हणा, हिंदुस्थानी म्हणा; हिचा राष्ट्रभाषा होण्याविषयींचा अधिकार संख्यादृष्टीनें सर्वांत मोठा आहे. हीच भाषा राष्ट्रभाषा म्हणून स्वीकारली जाईल तर तें योग्य असेंच घडलें असें म्हणावें लागेल. आणि मग राष्ट्रभाषेचा प्रश्न या रीतीनें सुटेल.

## क्षेत्र-मर्याद

···जन्मभाषेचें ऊर्फ मातृभाषेचें क्षेत्र म्हणजे त्या त्या भाषांनीं व्यापृत देशभूमि–आपलें घर. तिनें ज्ञानदृष्ट्या आक्रमण करावयाच्या क्षेत्राला मात्र कसलीहि कृत्रिम मर्यादा नाहीं. स्वगृहीं राहून साऱ्या ज्ञानविश्वाचें भ्रमण करण्यास ती स्वतंत्र आहे. पतंगाला ज्याप्रमाणें एकदां आकाशांत चढल्या-वर आपलें मूळ सूत्र संभाळून वाऱ्याशीं हवा तसा झगडा करण्याची मुभा आहे तशीच मुभा आपलें घर संभाळून वर उंच ज्ञानशिखराकडे जाण्याची जन्मभाषेला वा मातृभाषेला आहे !

राष्ट्रभाषेची स्थलसीमा जन्मभाषेच्या स्थलसीमेपेक्षां व्यापक आहे. सार्वजनिक व्यवहारापुरता तिचा अभ्यास हर एकानें करावयास हवा. परंतु अत्युच्च ज्ञानसंग्रह तींत होईल तो ती ज्यांची जन्मभाषा आहे त्यांच्या-साठींच प्राधान्यें करून असेल; आणि या बाबतींत तिचा दर्जा इतर प्रांतिक भाषांचे बरोबरीचाच राहील. ....

## अल्पसंख्यांकांना संरक्षण

एका गुंतागुंतीच्या प्रश्नाचा थोडासा विचार करणें अवश्य आहे. एका प्रांतांत जरी एक भाषाच बोलणाऱ्या बहुसंख्य लोकांचा गट असतो तरी अनेक कारणास्तव अन्य प्रांतांतले पुष्कळ गट आपापला प्रांत सोडून राज-धर्म, व्यापार इ. कारणांमुळें इतर प्रांतांत जाऊन कायमची वसति करून

राहिलेले असतात. अशा अल्पसंख्य लोकांच्या शिक्षणाचा व इतर व्यवहाराचा प्रश्न फार भानगडीचा होतो. ज्ञानाचें व वैभवाचें अत्युच्च शिखर गांठण्याचा त्यांचा मानवी व मूलभूत हक्क त्यांनाहि बजावतां आला पाहिजे. युरोपच्या पुनर्घटनेच्या वेळीं राष्ट्रसंघानें अशा अल्पसंख्य लोकांना कांहीं संरक्षण निर्माण करून दिलें आहे. हीं संरक्षणें या देशांतहि उपयोगी पडतील.

रानटी संघांच्या प्राथमिक अवस्थेंतील भाषा संवर्धनाला व पोषणाला पात्र ठरणार नाहींत, त्यांच्या भाषा प्राथमिक अवस्थेंत असल्यानें त्यांचा शब्दकोश फारच बाल्यावस्थेंत आहे. त्यांचा मातृभाषेचा संसार अगदींच अप्रौढ व जुजबी असल्यामुळें त्यांनीं दुसऱ्या प्रौढ समाजास दत्तक होणेंच त्यांस परवडणारें आहे.....

एतावता आपण असें पाहिलें कीं, कृत्रिम विश्वभाषा किंवा विद्यमान पराक्रमी भाषा या कोणीहि प्रबळ व प्रौढावस्थेंतील मातृभाषांना पदभ्रष्ट करूं शकत नाहींत, आणि रानटी व असंस्कृत भाषांचा तर या प्रकरणीं हिशेबहि घेण्याचें कारण नाहीं.

## संस्कृत व प्रचलित भाषा

आणखी एका भाषाभ्रमाचा उच्छेद होणें हितकारक आहे. स्वभाषांविरुद्ध प्राचीन भाषांचा झगडा लावण्यांत किंवा मानण्यांत येतो. संस्कृत विरुद्ध प्रचलित भाषा असा आपल्याकडे हा वाद आहे. इंग्लंडांत सुप्रतिष्ठित प्राचीन लॅटिन भाषा व नवोदित, अर्वाचीन इंग्रजी भाषा यांचा तीव्र संगर झाला, व अखेर आज इंग्रजी भाषा ज्ञानसाम्राज्यांत ऐटीनें अधिराज्य मिरवीत आहे. प्राचीन भाषांचें व वाङ्मयाचें अध्ययन करणारांची संख्या सांप्रतच्या युगांत रोडावली असली तरी तेवढ्यानें कांहीं त्यांचें महत्त्व किंवा योग्यता कमी झाली असें कोणी सूज्ञ जन मानीत नाहींत. लोकाश्रयाच्या परिसाच्या संगानें लोकभाषारूपी कनिष्ठ धातूंचें सुवर्ण बनलें तरी त्यामुळें मूळच्या जातिवंत सुवर्णाची श्रेष्ठता कमी कशी होईल? प्राकृताच्या पुरस्कर्त्यांनीं असे युक्तिवाद केलेले आहेत. ज्ञानेश्वर, एकनाथ दासोपंत, तुकाराम, मोरोपंत प्रभृति 'प्राकृतिकां'नीं संस्कृताची थोरवी

अमान्य केली नाहीं; पण प्राकृताच्या पळसाच्या द्रोणांतून संस्कृताच्या रत्नमणिचषकाप्रमाणेंच जीवनदायी अमृत देऊं असें त्यांनीं विनयानें पण निश्चयानें, युक्तिवादानें पण 'प्रतिज्ञोत्तरें' बोलून वारंवार सांगितलें आहे !

प्राकृत भाषांचा संस्कृताच्या भांडारावर परिपूर्ण हक्क आहे. शब्द व विचार संस्कृतांतून घेण्यास आपणांस कसलाच प्रत्यवाय नाहीं. संस्कृताची जुळणीहि शक्य तोंवर अनुसरण्याची सोय व शक्ति संस्कृतोद्भव प्राकृतांत सापिंड्यामुळें आहेच आहे. पण संस्कृतांत आतां नवीन प्रवाह उत्पन्न होण्याचें थांबलें आहे. प्राकृतांत तें काम जोमानें चालू आहे. भोवतालच्या प्राकृतांचा व इतर शेजाराला आलेल्या परकी भाषांचाहि कांहीं लळा त्यांना लागणें अपरिहार्य आहे. आपला स्वभाव व स्वातंत्र्य संभाळून हा लळा पाळला तर ती विकृति मारक न ठरतां संवर्धकच ठरते !

भारतांत प्रमुख व प्रौढ अशा प्रांतिक भाषा अवश्य रहाणार. सर्वैक्याच्या गोड कल्पना कशा स्वप्नवत् विरतात तें लक्षांत घतलें म्हणजे माणसांना आज जेवढी शक्ति आली आहे तीस अनुसरून व तिला झेपतील असेच त्यांचे गट नांदूं देणें व वाढूं देणें हाच व्यवहार्य मार्ग होय, या भाषांच्या अंतस्थ वाढीला कसलीच कृत्रिम मर्यादा कल्पिण्याचें कारण नाहीं. याखेरीज हिंदी-सारखी सार्वभारतीय भाषाहि आपणांस स्वीकारावी लागेल. आपल्यांतील ज्यांचा संबंध वारंवार भारताबाहेरील जगाशीं व्यापारासाठीं, प्रवासासाठीं किंवा ज्ञानसंग्रहासाठीं येईल अशांस इंग्रजीसारखी सर्वप्रसृत अशी परकी भाषाहि शिकावी लागेल. ज्यांना पंडित व्हावयाचें असेल त्यांना विषयानुरूप संस्कृत, फारसी, हिब्रू, जर्मन, चिनी इत्यादि भाषा शिकाव्या लागतील त्या खेरीजच !

या हिशेबानें पहातां प्रथम प्रांतिक, नंतर सार्वभारतीय म्हणून हिंदी, नंतर आंतरराष्ट्रीय म्हणून इंग्रजी व नंतर पांडित्यासाठीं ज्या एक किंवा अनेक हस्तगत करतां येतील त्या भाषा असा क्रम लागतो.

बहुभाषिक झाल्याशिवाय आपला तरणोपाय नाहीं.

**ग्वाल्हेर साहित्य संमेलन, उज्जैन: १९३४ अध्यक्षीय भाषण**

'प्रांतिक भाषांचें भवितव्य' यांतून

# ३ : माध्यमिक शिक्षणांत हिंदी

…जन्मभाषेच्या हक्काच्या क्षेत्रावर कसलेंहि आक्रमण कोणीहि सुबुद्ध मनुष्य मान्य करणार नाहीं. हिंदी प्रचार-वाद्यांच्याहि लक्षांत ही गोष्ट आहेच. प्रथम मान प्रांतिक भाषेचा. तिचें अध्ययन प्रथम आवश्यक. प्रांतिक व्यवहारहि सारा प्रांतिक भाषेंतच झाला पाहिजे हेंच प्रशस्त व हितकर धोरण होय. याप्रमाणें प्रांतिक भाषेची जोपासना व हक्क निर्बाध ठेवल्यावर दुसरें महत्त्वाचें स्थान राष्ट्रभाषा म्हणून हिंदीला दिलें पाहिजे.....

## सार्वदेशीय व्यवहार-भाषा

आजच्या काळाला केवळ प्रांतिक भाषेवरच आपलें निभणार नाहीं अखिल भारतीय व्यवहार-भाषाहि आपणांस अवगत करून घेणें अवश्य आहे यामुळें आपलें प्रांतिक सामर्थ्य उणें न होतां बळ उलट वाढेलच. हिंदी ही अखिल भारतीय व्यवहाराची भाषा करण्याखेरीज अन्य उपाय नाहीं. हिंदीला अखिल भारतीय व्यवहार-भाषेचें स्थान प्राप्त झालें म्हणजे प्रांतिक मूळ हिंदीपेक्षां तिचें स्वरूप बरेंच संमिश्र झाल्याशिवाय राहणार नाहीं. ही गोष्ट क्रमानेंच घडेल. आपणांस उपक्रम करतांना प्रचलित हिंदीचें जें व्यापक व लवचिक स्वरूप असेल तेंच उचलावें लागेल; परंतु स्वस्थ न बसतां आपणांला उद्योगाला लागलें पाहिजे. कालेंकरून शिष्ट अशी राष्ट्रभाषा रूढ होईल.

ही इष्टसिद्धि व्हावी म्हणून शिक्षणक्रमांतहि हिन्दीचें अध्ययन-अध्यापन झालें पाहिजे, हें ओघानेंच येतें. प्राथमिक बालकांचा सर्व वेळ प्रांतिक भाषेच्या संगतींतच गेला पाहिजे. ती त्यांना उत्तम रीतीनें पेलतां गेऊं लागल्यावर जेथें त्यांना पुढील व्यापक व्यवहारासाठीं अभ्यासक्रमांतून सामान्यतः सुटण्याचा टप्पा गांठावयाचा प्रसंग येईल त्या सुमारास त्यांना सुलभ व सोपी अशी हिंदी राष्ट्रभाषेची परिचयात्मक परीक्षा द्यावयास लावल्यानें मोठेंच कार्य सहजासहजी घडून येईल.

मॅट्रिक हा एक टप्पा आपल्या इकडील शिक्षण – प्रणालींत रूढ आहे. तेव्हां या सुमारास हिंदी प्रवेश करून देणें अवश्य आहे. परीक्षेच्या क्रमांत विषय समाविष्ट झाल्याशिवाय त्याचें अध्ययन मनःपूर्वक होऊं नये अशी आमची मनोरचना अनुभवानें ठरली आहे. म्हणून हिन्दी प्रवेश ही सुद्धां परीक्षेची एक बाब समजली जाण्यावी व्यवस्था व्हावयास पाहिजे.....

**मध्यमहाराष्ट्र हिंदी प्रचार समितीचे अध्यक्ष**
**ह्या नात्यानें काढलेलें पत्रक : १९३७**

# ४ : आधीं समजणें आणि बोलणें, मग लिहिणें वाचणें

शिकणें आणि शिकविणें या दोन्हीं गोष्टी निराळ्या असल्या तरी त्यांत पुष्कळ सारखेपणाहि आहे. जी गोष्ट शिकण्याला लागू तीच शिकविण्याला. नीट शिकतां आलें तरच नीट शिकवतां येईल. म्हणून खरा शिक्षक नेहमींचा विद्यार्थीच असतो. शिकणें व शिकविणें हीं एकाच ज्ञानाच्या नदीचीं दोन तीरें आहेत.

खरें पाहिलें तर " गरज " ही जगांतील प्रत्येक कल्पनेच्या मुळाशीं आहे. " भाषा " ही अशाच गरजेमुळें निघाली आहे. ज्ञानाची देवघेव करण्याची युक्ति म्हणजे भाषा. आपली हल्लीची प्रसिद्ध भाषा ही मुळाक्षरांची बनली आहे. या मुळाक्षरांचेच शब्द बनतात. आणि या शब्दांचींच वाक्यें आपण बनवितों व तीच आपली भाषा. तेव्हां अगोदर हीं मूळाक्षरें कशीं बनलीं तें जरा पाहूं. हीं अक्षरें म्हणजे ठराविक खुणा किंवा चिह्नें होत. पशु-पक्षी सुद्धां आपलें म्हणणें एकमेकांना कांहीं आवाजांच्या वगैरे खुणांनीं कळवितात. ह्या खुणा कांहीं अवयव हालवून, आवाज वगैरे काढून ते करीत असतात. त्यांच्या डोळ्यांवरून अगर शेपटीच्या वगैरे हालचालींवरून अगर निरनिराळ्या ठराविक आवाजावरून ते आपला मतलब एकमेकांना कळवितातसें दिसतें. हीच या पशुपक्ष्यांची भाषा असें म्हणतां येईल. पण त्यांना माणसासारखा विचार मात्र करतां येतो, किंवा कल्पना करतां येतात असें दिसत नाहीं. मनुष्य प्राणी साऱ्या सृष्टींत सर्वांत श्रेष्ठ किंवा पूर्ण असें समजतात. त्याला नुसता विचारच करतां येतो असें नव्हे तर आपला विचार दुसऱ्याला हातांपायांनीं अगर डोळ्यांनीं खुणा करूनहि दाखवितां व कळवितां येतो. पण येवढ्यावरच तो थांबत नाहीं. पशु-पक्ष्याप्रमाणें तोहि आवाज करूं शकतो. माणसांना जीभ वळवून जितके आवाज काढतां येतात तितके इतर प्राण्याला काढतां येत नाहींत. जेव्हां पावसाळ्यांत आकाशांत मेघ गरजतात तेव्हां होणाऱ्या 'गडगड' अशा आवाजासारखा 'गडगडणें' हा शब्द त्यासाठीं माणूस वापरूं लागला. कडकडणें, हंबरणें,

वगैरे अनेक शब्द असे आवाज दाखविण्यासाठीं काढलेले आहेत. पण तो आजचा आपला मुख्य विषय नव्हे. दोन निरनिराळ्या प्रांतांतील माणसें जर कांहीं दिवस एकत्र ठेवलीं तर लवकरच ते आपले विचार एकमेकांना कळवूं लागतील व आपली एक भाषा बनवितील.

## ज्ञान म्हणजे समजणें

आतांपर्यंत आपण असें पाहिलें कीं, मनुष्यप्राण्याला आपले विचार बनविण्याची गरज म्हणून ते विचार तो खुणांच्या साहाय्यानें बाहेर दाखवितो. हातांनीं, डोळ्यांनीं, वगैरेंनीं करावयाच्या खुणांचा संग्रह जेवढा आहे त्यापेक्षां अधिक खुणा हव्यात म्हणून तो आवाजाची मदत घेतो. ध्वनींच्या योगानें शेंकडों हजारों खुणा होतात आणि तेच आपले शब्द. ह्या प्रत्येक शब्दामध्यें एक एक निराळा अनुभव सांठवलेला आहे. शब्दांचीच भाषा तयार झाली. ही भाषा ज्ञानाची देवघेव करण्याचें आपलें मनुष्याचें मुख्य हत्यार आहे. ज्याला ज्ञान असा आपण जाडा शब्द वापरतों त्यालाच सोप्या भाषेत "समजणें" असें म्हणतां येईल. हें समजणें– ही समजण्याची क्रिया आम्हां माणसांना सर्वांत महत्त्वाची आहे. प्रत्येकानें कोणचीहि गोष्ट आपणांला नीट समजलेली आहे किंवा नाहीं तें पाहिलें पाहिजे. शिक्षकालाच जर नीट समजलें नाहीं तर तो विद्यार्थ्यांना काय समजावून देणार? असें पाहा कीं, छापखान्यांत खिळे जुळविणारा माणूस असतो. त्याच्या हातून अनेक जाडे जाडे ग्रंथ जुळवून तयार होतात, पण ते त्याला समजलें असें थोडेंच होतें! दुसरें उदाहरण घेऊं पाठ म्हणणाऱ्या भिक्षुकांचें. हे लोक बारानि बारा चोवीस वर्षें मेहनत, अध्ययन करून वेद शिकतात; पण जें पाठ केलें त्यांतल्या एका वाक्याचाहि अर्थ समजत नाहीं असें यांत कितीतरी सांपडतात. म्हणजे त्यांना तें 'ज्ञान' झालें किंवा समजलें असें ठरत नाहीं.

आपल्या शास्त्रांत एक शब्द जरी नीट समजला तरी पुष्कळ झालें असें म्हटलें आहे तें फार लक्षांत ठेवण्यासारखें आहे. त्याचा अर्थ काय आहे तें पाहूं. प्रत्येक शब्दामागें मोठा अनुभव सांठविलेला आहे. नेमका तोच अनुभव तो शब्द उच्चारला असतां येणें म्हणजेच समजणें किंवा ज्ञान होणें. तो विशिष्ट शब्द इतर शेंकडों शब्दांपेक्षां कसा निराळा अर्थ दाखवतो हें समजूं

लागलें म्हणजेच भाषा खरी समजूं लागली. ज्ञानेश्वरीबद्दल "एकतरी ओवी अनुभवावी" असें एका साधूनें म्हटलें आहे. त्यांतलें मर्म हेंच आहे. तोच अनुभव येणें म्हणजेच समजणें. या म्हणण्याची जरा आणखी फोड करूं.

सारख्या-सारख्या दिसणाऱ्या गोष्टींमधील सारखेपणा व फरक कोणता हें नक्की आणि पक्केपणें सांगतां येणें म्हणजेच 'समजणें' असें म्हणतां येईल. एक उदाहरण घेऊं. आपण सर्वच गाणें ऐकतों. सगळेच सूर ऐकूं येतात. पण निरनिराळ्या सुरांमधील बारीक फरक कोणता हें आपणांस सहज सांगतां येत नाहीं. पण कान तयार झालेला गवई तेंच नेमकें सांगूं शकतो. म्हणून तर तंबोरा लावणाऱ्याला घटका घटका वेळ लागतो. हीच गोष्ट हर एक विषयाच्या संबंधीं. दोन जुळ्यांमधील फरक वर्गावर घटकाभर शिकविणाऱ्या शिक्षकाला सहजासहजीं सांगतां येत नाहीं. पण त्या मुलांच्या आईला तो चट्दिशीं सांगतां येतो. कारण त्यांच्या सारखेपणांतील बारीक फरक फक्त तिलाच माहीत असतो. बाजारांतून दोन मुलांसाठीं जर सारख्या रंगाच्या व सारख्या आकाराच्या टोप्या मुलांना आणून दिल्या तर आपणाला त्यांतील फरक दुसरे दिवशीं सांगतां येणार नाहीं. पण त्या मुलांना आपापल्या टोप्या चटकन् ओळखतां येतात. तेव्हां सारख्या दिसणाऱ्या गोष्टींतील सूक्ष्म सुद्धां फरक सांगतां येणें म्हणजे खरें समजणें असें म्हणतां येईल. यालाच तर्कशास्त्रांत वस्तूची व्याख्या करणें असें म्हणतात. एकाद्या गोष्टीची व्याख्या करणें म्हणजे ती गोष्ट इतर सर्वांपासून कोणत्या बाबतींत भिन्न आहे हें निश्चित सांगणें.

समजण्याची आणखी खूण म्हणजे 'फरक' मोजतां येणें. नुसता फरक सांगणें हें ढोबळ झालें. तो फरक अगदीं मोजून सांगतां आला पाहिजे, इतका बारीक सांगतां आला पाहिजे. सोनें मोजण्याचा हि तराजू पहा. गुंजेचा एक शतांश भाग सुद्धां तो इकडे तिकडे होऊं देणार नाहीं. नवीन शास्त्रीय प्रयोगांत तर या सूक्ष्मपणाची कमाल झाली आहे. गुंजेचा $\frac{१}{१०००}$ वा हिस्सा, इंचाचा लाखावा हिस्सासुद्धां मोजण्याची यत्रें झालीं आहेत. त्यावरून दर सेकंदाला सूर्यप्रकाशाची गति एक लक्ष ब्याऐंशी हजार मैल आहे ही गोष्ट किंवा सूर्य चंद्र

वगैरेंच्या मधील कोट-कोट मैलांचें अंतर मोजून काढतां येतें ही गोष्ट सूक्ष्मपणाचीं उदाहरणें होत. सारांश, समजणें म्हणजे निश्चित ज्ञान होणें, सूक्ष्मसुद्धां फरक ओळखतां येणें हें होय. तो जर सांगतां आला नाहीं तर त्याला नुसतें सारवणें असें म्हणणें शोभेल. डोळयांनीं सारवलें असें म्हणतात ना ? तेव्हां खऱ्या जातिवंत शिक्षकानें अशी नुसती सारवासारव करून चालणार नाहीं. त्यानें स्वतः नीट समजून घेतलें पाहिजे व मग इतरांस नीट समजावून दिलें पाहिजे. आणि भाषा हें ज्ञानाचें साधन.

## ज्ञानार्जनाचें साधन

प्रथम बोलणें घेऊं. कंठांतून काढलेले तऱ्हेतऱ्हेचे सूर अथवा खुणा म्हणजेच शब्द हें आपण मागें पाहिलें. या खुणांची जुळणी म्हणजेच वाक्य किंवा बेतापुरती पुरी एक कल्पना व अशा वाक्यांच्या यागानें म्हणजे कल्पनांच्या तुकडयांनीं एकानें दुसऱ्याला आपला अनुभव तोंडानें देणें म्हणजेच बोलणें. बोलणें व ऐकणें या क्रिया जोडक्रिया चालतात. कारण एकानें बोललेलें दुसऱ्यानें ऐकावें लागतें आणि ऐकून पुनः बोलावें लागतें. म्हणूनच कान या महत्त्वाच्या इंद्रियाचा उपयोग ज्ञानेंद्रिय म्हणून होतो. मुलें कांहीं उपजतांच बोलूं लागत नाहींत तर इतर मंडळींचें ऐकून ऐकून बोलूं लागतात. प्रथम अस्पष्ट व बोबडें बोलतात, पण हळुहळू नीट बोलूं लागतात. एकच शब्द पुनः पुनः उच्चारून मुलें कित्येक वेळां कंटाळा आणतात, पण आपला अनुभव दुसऱ्याला कळावा हीच भावना तेथें असते. पुनः पुनः क्रिया करण्यानेंच ती पक्की होते. म्हणूनच मुलें हजारदां तेवढेंच करतात व अशा रीतीनें तीं शिकतात.

व्यवहारांतील शेंकडा नव्वद गोष्टी ऐकण्यानें आणि बोलण्यानें होतात. म्हणून खूप ऐकणें व खूप बोलणें हीं समजण्याची मुख्य साधनें होत. सर्व गोष्टी कळवून घेण्याची व कळवावयाची हौस लहानापासून थोरापर्यंत सर्वांना आहे. तोंडानें बोललेल्या खुणा आकारानें उतरविण्याची कला म्हणजे लिहावयाची कला. या लिहिण्याच्या कलेची युक्ति निघेपर्यंत हजारों वर्षें सर्व गोष्टी बोलणें, ऐकणें या एकाच प्रकारांनीं चालत. आपले मंत्र प्रथम ऐकूं आले म्हणतात (श्रुति). तसेंच आपल्याकडील विद्वान् माणसाला

बहुश्रुत म्हणत तें याच कारणासाठीं. कारण, आधीं बोलणें व ऐकणें; लिहिणें वाचणें नंतर निघालें. लहान मुलें बुद्धीनें फार चपल असतात. तीं अनेक शंका विचारतात. त्यांचें समाधान शिक्षकानें शक्य तेवढें करावें. पण उगाच कांहीं तरी दडपून देऊं नये. जेवढें नक्की माहीत असेल तेवढेंच सांगावें. माहिती नसेल तें माहीत आहे असा आव केव्हांहि आणू नये. अलीकडील अभ्यासक्रमांत अनेक विषय गोंवल्यामुळें अनेक विषय शिकवावे लागतात हें खरें, पण सर्वज्ञ होणें फारच थोडयांना शक्य असतें. यासंबंधानें एक जुनी गोष्ट सांगतों.

आत्रेयी नांवाची एक विद्वान् स्त्री वाल्मीकि ऋषीजवळ शिकत होती. तेथील अध्ययन संपल्यावर वेदांतासंबंधी आणखी ज्ञान मिळवावें असें तिच्या मनांत आलें. मग वेदांत शिकण्यासाठीं ती शेंकडों मैल दूर असलेल्या दक्षिणे-कडील अगस्ति नांवाच्या ऋषीकडे आली; पण असें करण्यांत वाल्मीकीला अथवा आत्रेयीला कमीपणा कांहींच येत नाहीं अशी ती गोष्ट आहे. सारांश जो ज्या गोष्टीचा माहितगार असेल त्याचेपासून तें ज्ञान ऐकून बोलून मिळवावें म्हणून पुस्तकें, वर्तमानपत्रें वगैरे इतर कितीहि साधनें निघालीं तरी शाळा-कॉलेजांतून शिकणें व शिकविणें या गोष्टींचें महत्त्व कमी व्हावयाचें नाहीं. अल्लाउद्दीन, अकबर, हैदरअल्लीसारखे लोक लिहितां-वाचतां येत नव्हतें तरी राज्यें चालवीत, कारण ते बहुश्रुत होते. त्यांची आठवण जबरदस्त होती. पुरुषांपेक्षां स्त्रिया पुष्कळ व्यवहार स्मरणशक्तीच्या जोरावर चालवितात. खेडवळ बायका मुलांची जन्मतिथि आठवून नेमकी पुसी पुनव वगैरे सांगतात. ऐकणें, तें ध्यानांत ठेवणें या गोष्टीला शिक्षणांत फार महत्त्वाचें स्थान आहे. हल्लींच्या काळीं सुद्धां वर्तमानपत्रें वाचण्यापेक्षां रेडिओच्या द्वारें बातमी ऐकणें सर्वांना आवडतें आणि ऐकण्यानें वाचण्यापेक्षां जास्त लवकर आणि जास्ती ज्ञान मिळवितां येतें.

सारांश, खूप ऐकणें व खूप बोलणें ही शिकण्याची व खूप ऐकविणें व खूप बोलविणें हीं शिकविण्याचीं खरीं व मुख्य साधनें होत.

## लिहिण्याची गरज

आतां लिहिणें-वाचणें या मुद्यांकडे वळूं. लिहिण्याची गरज प्रथमतः दूर अंतरावर असलेल्या आपल्या मित्राला अथवा नातेवाइकाला आपले

विचार कळविण्याची फार हुरहुर वाटते म्हणून सुचली व पटली. कंठांतून निघणारे सूर म्हणजे जशा खुणा, तशाच पानावर, लाकडावर, दगडावर, धातूवर कशावरहि कंठांतून निघणारे आवाज उतरविण्याची कल्पना निघाली. उदाहरण घेऊं. 'आ' ही एका ठराविक आवाजाची खूण, 'ई' ही एका दुसऱ्या आवाजाची खूण ठरली. तोंडाचे जे आकार होतात त्यांच्या खुणांशीं संबंध असावा. मग त्याप्रमाणें मजकूर लिहून तो शेंकडों मैल दूर असलेल्या माणसाकडे पाठवितां येऊं लागला. जी खूण येथें तोंडानें बोलावी ती कशावर तरी उतरविली म्हणजे शेंकडों मैलांवरील आपला मित्र ती खूण ओळखून वाचूं लागला. आणि आपला मूळचा अनुभव व अर्थ समजूं लागला. लिहिणें व वाचणें या कला अशा निघाल्या. लिहिण्यांत हात व डोळे यांचाच विशेष उपयोग करावा लागतो. म्हणून हें लिहिणें निव्वळ ऐकण्या-बोलण्यापेक्षां अवघड आहे. पण वाचणें म्हणजे डोळ्यांनीं ऐकणेंच होय. यांत दोन सोई झाल्या. अंतरावरील मनुष्याला कळवितां यऊं लागलें, शिवाय खासगीपणा राखतां येऊं लागला. यांतच हळूहळू कागद, शाई, छापखाने, पुस्तकें अशी प्रगति होत होत लिहिणें, वाचणें ही शिक्षणाचीं आजकाल मुख्य हत्यारें बनलीं आहेत.

सारांश, समजणें व समजून देणें हा पाया व बोलणें, लिहिणें, वाचणें हे त्यावरील मजले होत. लहान मुलांना गोष्टी ऐकण्यांत खूप मौज वाटते. त्यांना खूप ऐकवा, त्यांच्याजवळ खूप बोला. मग हळुहळू अक्षर ओळख करून द्या व वाचावयाला शिकवा. त्यांना स्वतःच्या कल्पनेनें लिहूं द्या. शाळांतील अभ्यास यांत्रिक व कृत्रिम न करतां तो शक्य तेवढा स्वाभाविक करा. वाचण्या-लिहिण्यापेक्षां बोलण्या-ऐकण्यावर प्रथम भर द्या. जसजशी समजूत वाढत जाईल तसें मुलांना आपलें ज्ञान वाढविणें सोपें जाईल.

**पुणें सेवासदन ट्रेनिंग कॉलेजांतील भाषण, १३-२-३७**

पुरवणी : १-१-१९६०

वर सांगितलेला साधा सरळ सिद्धांत नीट लक्षांत घेतला नाहीं म्हणजे अनेक सोपे प्रश्न वांकडे होतात. ज्याची जी मातृभाषा ती त्याला घरांत आई-बाप, काके-मामे, हजारदां प्रेमानें बोल बोलून, हंसत खेळत आणि

न कळत शिकवीत असतात; या बाळक्रीडेंत ते स्वतःला विसरून जातात. अहोरात्र त्या क्रीडानंदांत ते जे श्रम करतात, किंबहुना त्यांच्या हातून सहज होऊन जातात, त्यांची गणती व्हावयाची नाहीं. बाळें अशी मातृभाषा शिकतात. संसारांतला तो एक हृद्य खेळ आहे. तो निसर्गधर्म आहे. ज्ञानाची साधना करण्याचें हें मातृभाषेचें साधन बालपणींच फुकटांत पदरीं पडतें म्हणून तें सोडतां कामा नये. या मातृभाषेच्या वाटेनें बाळ मोठा होत जाईल तसा त्याला ज्ञानाच्या उंच उंच पहाडावर चढण्या-चढवण्याचा अखंड प्रयत्न करीत राहिलें पाहिजे. अज्ञानाला सज्ञान करण्याची आटाआटी याचसाठीं साधुसंतांनीं, ज्ञानोपासकांनीं, महाकवींनीं, कथा-नाटककारांनीं, तत्त्वज्ञान्यांनीं, संशोधकांनीं केलेली आढळते. मिळवलेलें धन पुढिलांसाटीं ठेवावें तसें संपादलेलें ज्ञानधनहि मातृभाषेंतून 'पुढिलांसाठीं' दान करावें, अशानेंच समाज ज्ञानसंपन्न होतात, ज्ञानानें वैभवाला चढतात, आणि त्यांची कीर्ति जगांत दुमदुमत रहाते. गुरुत्व त्यांना लाभतें.

कोणतीहि भाषा शिकण्याचें प्रयोजन नीट लक्षांत घेऊन मग भाषा-शिक्षणाची तशी मांडणी केली असतां व्यर्थ वाद व घोटाळा होणार नाहीं. समजणें, बोलणें, वाचणें व लिहिणें ह्या चार निरनिराळ्या शक्ति आहेत. त्यांवर सर्वांना सारखेंच प्रभुत्व मिळवणें शक्य नाहीं. एकाद्यालाहि ह्या चारींवर अप्रतिहत प्रभुत्व मिळणें अशक्य नसलें तरी कठिणच.

## तीन प्रकारचे विद्यार्थी

अनुभव असा आहे कीं लहानपणीं कित्येक विद्यार्थ्यांना अनेक विषयांत आपली मति चालवतां येते. मातृभाषा मराठी बरोबरच इंग्रजी, संस्कृत, हिंदी ह्या भाषांहि ते ग्रहण करूं शकतात. इतकेंच काय, पण गणित, इतिहास आदि विषयांतहि त्यांची गति चालते. खेळांतहि ते पुढें असतात. इतकें करूनहि खोड्या करणें, रिकामपणीं भटकणें, सहली करणें अशा विविध कार्यांत भाग घेण्याची त्यांची तयारी असते. तथापि असे भाग्यवान् विद्यार्थी फार थोडे. वर्गांतील सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या समुदायांत कोंडल्यानें सांप्रतच्या शिक्षण व्यवस्थेंत अशा विद्यार्थ्यांची योग्य प्रकारें वाढ होत नाहीं.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत, नों: दि:

वास्तविक अशा विद्यार्थ्यांस निराळें निवडून त्यांचा पूर्ण विकास घडवून आणला पाहिजे. म्हणजे हेच विद्यार्थी पुढें अनेक क्षेत्रांत अगदीं वरच्या थरांत चमकतील.

दुसरे कित्येक विद्यार्थी असे असतात कीं ते परिश्रमानें व निश्चयपूर्वक कांहीं मर्यादित विषयांत आपली प्रगति दाखवितात. अशांस पहिल्या वर्गातील विद्यार्थ्यांइतका बोजा सहन करतां येणार नाहीं.

ह्याहून वेगळ्या प्रकारच्या विद्यार्थ्यांना पुष्कळ हात देऊन व मदत करून अभ्यासाचा कमींत कमी बोजा त्यांचेकडून व्यवस्थितपणें उठवून घ्यावा लागतो.

ह्या तिन्ही प्रकारच्या विद्यार्थ्यांना भाषा समजण्याची किमया शिकविली पाहिजे. तसेंच त्या भाषेंत बोलण्याची व वाचण्याची शक्ति जमेल तेथवर त्यांना प्राप्त करून दिली पाहिजे. लिहिण्याची शक्ति सर्वांनाच साध्य होईल असें नाहीं. पण त्याहि बाबतींत यथाशक्ति प्रयत्न केले पाहिजेत. ह्या चारहि शक्ति निरनिराळ्या आहेत. सर्वच व्यक्तींच्या ठायीं त्या सारख्या प्रमाणांत असत नाहींत. कित्येकांची समजण्याची शक्ति मोठी पल्लेदार असते. एकदां सांगतांच त्यांच्या चटकन् ध्यानांत येतें. बोलणें व लिहिणें हें व्यवहारापुरतें प्राय: सारेच जण कमी जास्त प्रमाणांत करीत असतात. पण जें बोलणें पुन: पुन: ऐकावेसें वाटेल व म्हणून ज्याला वक्तृत्वाचा रंग चढेल असें बोलणें सर्वांनाच जमण्यासारखें नसतें. म्हणून तारतम्यानें व्यवहार केला पाहिजे. व्यवहारापुरतें तरी लिहिणें-बोलणें मातृभाषेंत सरळ, शुद्ध करतां येईल एवढी तयारी सर्वांची करून घेतली पाहिजे. पण ज्यांचा कस अधिक उतरेल, ज्यांचें बोलण्यांत वक्तृत्व व लिहिण्यांत कवित्व विकसित होण्याचीं चिह्नें प्रतीत होतील, त्यांना मुक्त हस्तानें तसा वाढीसाठी वाव दिला पाहिजे. सारेच जण वक्ते व लेखक होणार नाहींत. ती एक देणगी आहे, हें लक्ष्यांत घेतलें पाहिजे. त्या देणगीची कुचंबणा वा हत्या होऊं देतां कामा नये.

## बालकांचा शक्ति-विकास

पुढें कोण काय होणार हें बालपणीं हमखास सांगतां येत नाहीं. पण मुलांचे पाय पाळण्यांत दिसतात ही म्हण लक्ष्यांत ठेवली पाहिजे. बालकांत

आढळणाऱ्या शक्ति विकसित करून ठेवाव्या, म्हणजे गरज पडेल तेव्हां त्यांचा उपयोग व्यक्ति व समाज यांना करून घेतां येईल.

येथें इंग्रजीचेंच उदाहरण घेऊं. ज्यांना इंग्रजी शिकण्याची हौस आहे त्यांना प्रथम ही भाषा बिनचूक समजेल असा प्रयत्न केला पाहिजे. म्हणजे गरजेप्रमाणें ते त्या त्या विषयाचें वाचन करूं शकतील. बोलणें ही एक कल आहे. व्यावहारिक बोलणें मात्र थोडें फार शिकवतां येण्यासारखें आहे. कलात्मक बोलणें सर्वांनाच शिकवावें म्हटलें तर तें जमणार नाहीं, व तशी गरजहि नाहीं.

देशांतील व परदेशांतील वकील, प्राध्यापक, प्रचारक, पत्रकार ह्यांना लिहिण्या-बोलण्याची विशेष प्रकारची शक्ति असावी लागते. त्या क्षेत्रांत जाणाऱ्यांसाठीं त्या शक्ति विकसित करण्याच्या सोयी केल्या पाहिजेत. आज ज्या प्रकारें इंग्रजी शिकविलें जातें, त्या प्रकारांत लिहिणें, बोलणें, भाषांतर करणें आदि गोष्टींचा सरसकट सर्वांवर बोजा लादला जातो. तो अशास्त्रीय, अव्यवहार्य व अनुपयुक्त होय. म्हणून इंग्रजी बिनचूक समजेल असें शिक्षण देण्यावर विशेष भर दिला पाहिजे. लिहिणें-बोलणें ह्यांवरील सार्वत्रिक बोजा काढून टाकला पाहिजे. ह्या देशांत त्याची आतां गरज उरलेली नाहीं.

तात्पर्य, इंग्रजी शिकण्या-शिकवण्याबाबत ह्या देशांतील सारा थाटच बदलला पाहिजे. शिक्षणशास्त्राच्या व समाजशास्त्राच्या दृष्टीनें विषय-विस्तार ह्या जागीं करतां येणार नाहीं. पण भाषेची समस्या सोडवतांना ज्या अडचणी येतात त्यांची गुतागुंत उकलून त्या बाबतचे कांहीं भ्रम दूर करण्यासाठीं हें अल्पसें विवेचन येथें केलें आहे.

अभ्यासक्रमांत संस्कृतचा समावेश करण्याच्या प्रश्नाचाहि सामान्यत: वरील धोरणानेंच विचार करावा लागेल.

म्हणून साऱ्या भारताच्या व समाजाच्या हिताच्या दृष्टीनें पहातां मातृ-भाषेंतून समजणें, बोलणें, वाचणें व लिहिणें ह्या चारी प्रकारांत प्रत्येकाची होईल तेवढी गति घडवून आणण्याचा प्रयत्न करावा. नंतर मातृभाषेच्या क्षेत्राबाहेरील लोकांचें बोलणें समजावें म्हणून सर्वांना समान अशी हिंदी-हिंदुस्तानी ही सर्वांनीं शिकावी, व सर्वांना शिकवावी. इतकें अवश्य व्हावें.

या पलीकडे जागतिक ज्ञानाचा संग्रह करणारी इंग्रजी सारखी एकादी भाषा वर विवेचन केल्या प्रमाणें जे शिकूं इच्छितील त्यांना शिकवावी, व तिजमध्यें अधिक गति करूं शकतील त्यांना करूं द्यावी. मात्र मातृभाषेचें काम टाळून हें करूं नये. या खेरीज गरजेप्रमाणें किंवा हौसेनें इतर जेवढ्या भाषा शिकतां येतील त्या शिकाव्या.

त्यांतहि साक्षेपानें हें धोरण संभाळावें कीं हिंदी समजली तर पाहिजेच बोलतांहि कामापुरती तरी यावी. मग वाचणें व लिहिणें शक्तीनुसार, गरजेप्रमाणें व्हावें व करावें. तशी सोय मात्र केली जावी. इंग्रजीबाबतहि असेंच. प्रथम समजणें पक्कें करावें, मग वाचणें. सर्वांनाच बोलणें-लिहिणें शिकवण्याचे श्रम व्यर्थ होत.

ही मांडणी सर्वकार्य-साधक होईल व्यर्थ वादाचें कारण रहाणार नाहीं. व्यक्तींची व समाजाची सोय अणि गरज ह्या नीतीनें भागेल.

# ५ : मराठी व हिंदी

भाषेचा आणि सामाजिक जीवनाचा निकट आणि अतूट असा संबंध आहे. विशेषतः जेथें सामाजिक जीवनाचें स्वरूप लोकशाही असतें किंवा त्या मार्गानें ते विकसित करावयाचें असतें तेव्हां तर भाषेचा प्रश्न हा एक सर्वोच्च प्रश्न होऊन बसतो ! कारण लोकशाही रचनेमध्यें समाजांतील प्रत्येक घटकाला करवेल तितका विचार करावा लागतो. कारण अशा घटकांच्या बहुमतांप्रमाणेंच त्यांच्या जीवनाचें नियमन लोकशाहींत व्हावयाचें असते. लोकशाही शिक्षणाशिवाय खरी लोकशाही नाहीं; आणि लोकभाषे-शिवाय खरें लोकशिक्षण नाहीं, हें आपण नीट आणि संपूर्ण ध्यानीं घेतलें पाहिजे.

## लोकशाहीसाठीं लोकभाषा

स्वतंत्र हिंदुस्थानाला सोडवावयाच्या प्रश्नांपैकीं भाषेचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे परकी इंग्रजांनीं परकी इंग्रजी भाषा वापरून आपला कारभार यशस्वीपणानें हांकून दाखविला, पण हिंदुस्थानांतील इंग्रजशाही ही खरी लोकशाही कधींच नव्हती. आपणाला खरी लोकशाही चालवाव-याची आहे अर्थात् स्वतंत्र हिंदुस्थानचा कारभार कोणत्या भाषेंत आपण चालविणार हा महत्वाचा प्रश्न आहे. इंग्रज येण्यापूर्वी येथें मुसलमानी सत्ता होती आणि त्यापूर्वी भारतीय सत्ता होत्या. पुढें हिंदुस्थानांतील मुसलमान हे भारतीय रहिवासीच झाले.

जो इतिहास उपलब्ध आहे त्यावरून एवढें निश्चित कीं संस्कृत भाषेंत या देशांतील शास्त्रीय व लौकिक विविध प्रकारचें वाङमय पुष्कळच रचिलें जात होतें; त्याचप्रमाणें "प्राकृत" भाषांचाहि लोकव्यवहारांत उपयोग होत होता. संस्कृत भाषेचा एकरूप अभ्यास निखिल भारतवर्षांत अनेक शतकें रूढ आहे. आजहि तो चालू आहे. प्राकृतांचा प्रचार मात्र मंदावला आहे, आणि देशी भाषांचा संसार बळावला आहे. याला स्थूल मानानें एक सहस्र वर्षें होत आलीं. या काळांत सुमारें दहा-बारा देशी भाषा तरी चांगल्या मान्यता पावल्या. त्यांचा विकास इंग्रजी आमदानींतहि अधिका-

धिकच जोरावला. पंडितांचें संस्कृत आणि जनतेचें प्राकृत किंवा देशी भाषा यांचा कारभार एकमेळानेंच चालत राहिला. तथापि भारतवर्ष हा ग्राम-प्रधान देश असल्यामुळें स्थानिक भाषांतून लोक-व्यवहार निर्वेध चालत राहिले. राज्यकर्त्यांचा संपर्क थोडा. कोणी राजानें प्रजेच्या रूढ भाषेंत ढवळाढवळ केली नाहीं. हिंदू राजे होते तेव्हां धर्म-भेदाचा प्रश्नहि आड येत नव्हता. आलाच तर पंथभेदाचा येई. वैदिक किंवा अवैदिक असें असलें तरी उभयतांत पुष्कळ जागा होत्या. तेव्हां वरिष्ठ कामकाज संस्कृतांत चाले किंवा त्यांतून समजण्याची सोय होती आणि कनिष्ठ काम स्थानिक आणि दुभाषे अधिकारी यांच्या द्वारें सहज साधून जाई. पूर्वी ग्रीक, हूण, शकादि परकीय मंडळें हिंदुस्थानावर येऊन गेली. याचा भाषादिकांवर कांहीं परिणाम झाला. पण तो जाणवण्याइतका तीव्र नव्हता. परकीय आणि विधर्मी मुसलमानांची सत्ता येथें स्थापन झाल्यावर मात्र भाषेची अडचण भासूं लागली. स्थानिक विशेषतः मध्यदेशांतली प्राकृत किंवा देशभाषाच त्यांना वापरावी लागली. अर्थात् तुर्की, फारसी वगैरे भाषांतील अनेक शब्द, लकबी आणि प्रयोग दरबारी देशी भाषेंत रूढ झाले. या भाषांना एक एक नवें रूप आलें ! जोडीला अस्सल फारशीहि चालू झाली ! लोकभाषा थोड्या बदलल्या पण मोडल्या नाहींत. दक्षिणेंत तर सरकारी कारभार दुभाषीच राहिला. शिवाय लोकभाषांत हा जो बदल झाला. तो जमीन-जुमला, कायदा, युद्ध वगैरे प्रकरणींच विशेष झाला. आमच्या घरांत आमच्या भाषा शुद्धच राहिल्या. त्यांचें रक्षण आमच्या आया-बहिणींनीं केलें ! कारण घरांत त्यांचेंच राज्य होतें.

मुसलमान काळीं धर्म रक्षणार्थहि तीव्र संघर्ष करावा लागला. संघर्षाला जनतेचा पाठिंबा लागतो. पंडित सर्वथा लोकविमुख आणि अहंकारी बनलेले ! तेव्हां जाणत्यांनीं लोकांचा कळवळा धरून प्राकृतांची महती गायिली व त्यांचें वैभव वाढविलें. अखिल भारतवर्षांत प्राकृतांचा हा असा उदय झाला. मुसलमानांचे मागून आले इंग्रज. तेव्हां त्यांची राज्य-पद्धति सर्वंकष. शिवाय नव्या विज्ञानाचा जोर. आम्हांला नांगी टाकणें भागच पडलें ! इंग्रजी भाषेचें वैभव पाहून आम्ही दिपून गेलों ! इंग्रजींत पारंगत होऊन मग पुन्हा आपला अभ्युदय साधूं ही ईर्ष्या लोकधुरीणांनीं धरिली !

अपार कष्ट सोसून आम्हीं अखेर स्वातंत्र्य मिळविलें ! पण तोंवर आमचा कारभार, आमचें शिक्षण सारें इंग्रजींतच चाललें. " आधीं स्वराज्य साधूं. मग इंग्रजीच्या मगर-मिठींतून सुटका करून घेऊं. " असा यावर आमचा मनसुबा ! ती वेळ आतां आज दाराशीं येऊन ठेपली आहे.

## एकभाषी हिंदुस्थान ?

येथें कांहींच्या विचारें हिंदुस्थान एकभाषी करण्याचें धोरण अंगीकारावें. तर दुसऱ्या कांहींचा विचार असा कीं प्रौढ देशी भाषांतून त्या त्या देश-विभागी जनतेचा संपूर्ण व्यवहार होऊं द्यावा आणि सार्वभारतीय व्यवहार आणि आंतर-प्रांतीय व्यवहारासाठीं सर्व-सुलभ भाषेचा अंगीकार करावा. स्वराज्य येण्यापूर्वीहि या भावी अडचणींचा परिहार करण्याचे उद्योग कित्येकांनीं हातीं घेतले होतें. १८८५ च्या अधिवेशनापुढेंहि हा विषय आला होता. भाषांप्रमाणेंच आमच्या देशांत लिपींचेंहि बाहुल्य आहे. ती मोठीच अडचण. संस्कृत पंडितांना देवनागरी यावीच लागते. परंतु देशी-भाषा पंडितांचा व्यवहार आपापल्या भाषा-लिपि पुरताच पुष्कळ वेळां मर्यादित असतो. एक-लिपि-विस्तार-परिषद कै. न्या. मू. शारदाचरण मित्र यांनीं स्थापिली होती. असे अनेक उद्योग झाले.

असा एक भ्रम रूढ आहे कीं इंग्रज-पूर्व कालीं आमच्यांत आंतरप्रांतीय व्यवहाराचें साधन नव्हतें. या लोकांच्या लक्षांत येत नाहीं कीं त्या काळीं असा आंतरप्रांतीय व्यवहार बव्हंशीं तोंडी असे. शिवाय तितके उभय भाषाज्ञानी किंवा अनेक भाषाज्ञानी लोकहि सहज उपलब्ध होत, मुसलमानी काळांत जी एक मिश्र भाषा चालू झाली होती तिला अकबर, जहांगीर यांच्या राजधानींत खिस्तीधर्मप्रसारार्थ राहिलेल्या पादरींनीं " इन्दोस्तान " भाषा म्हणजे हिंदुस्थानी भाषा असें चक्क म्हटलेलें नमूद आहे. हीच पहिली जुनी उर्दू किंवा मध्यदेशची मुसलमानी मिश्र देशी भाषा. अकबर, जहांगीर, कालीन बनारसिया व्यापाऱ्यांने आपल्या आत्मचरित्रपर अर्ध कथानकांत हीच वापरली आहे. ख्रिस्ती मिशनरी एकमेकांस धर्म-प्रसारार्थ हिचाच आश्रय घेण्याची सूचना देत असलेले आढळतात. अर्थात् हीच भाषा स्थूलमानानें मुसलमानी युगांत भारत वर्षांत आंतरप्रांतीय व्यवहारांत रूढ असली पाहिजे.

दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे इंग्रजीला आंतरप्रांतीय स्थान हिंदुस्थानांत मिळण्यापूर्वी तें हिंदुस्तानीला मिळालें होतें. आणि हिंदुस्तानीच्या पूर्वी येथील प्राकृतींचा भरपूर उपयोग अशा कामीं होई. "प्रकृष्ट प्राकृत" म्हणून "महाराष्ट्री" चा मान केलेला आढळतो. पण पूर्व काळीं या कामीं राजकीय सक्ती नव्हती !

आतां आज लोकशाहीच्या युगांत आमचा आंतरप्रांतीय संबंध घनिष्ठ होणार. मध्यवर्ती सभा, संमेलनें, कारभार, न्याय-निवाडे इत्यादि व्यवहारांसाठीं उपयोगाचें एक भाषा-साधन पाहिजे. तें सुलभतेनें वापरणारेहि पुष्कळ पाहिजेत. त्या सार्वभारतीय भाषेला प्रतिष्ठाहि पाहिजे.

हिंदुस्थानची वाढ करण्याची जी दिशा तिच्या पुरस्कर्त्यांनीं स्वीकारिली तीमुळें तिचें रूप अरबी-फारसीच्या अधिकाधिक जवळ गेलें. मूळ तें देशी भाषांना जवळ होतें. या दूरीकरणामुळें तुटकपणा वाढला. या तुटकपणाचें पोषण इंग्रजांनीं स्वार्थासाठीं केलें. राजकीय झगड्याची तीव्रता जशी वाढली तसें हिंदु-मुसलमानांमधलें अंतर वाढतच गेले. तेव्हां हिंदुस्तानीकडे बघण्याचा दृष्टिकोणहि निराळाच होऊं लागला ! त्यांतून दोन लिप्या— अरबी व देवनागरी— यांचा आग्रह या प्रकरणीं चिकटविल्यामुळें एकमत होण्याचा संभव दुरावतच चालला !

उत्तर हिंदुस्थानांत व्रज, अवधी, मैथिली, राजस्थानी वगैरे हिंदी कुलांतील भाषा एकेका विभागांत रूढ आहेत. सुशिक्षितांनीं हिंदी म्हणून ज्या भाषेची वाढ चालविली आहे त्याला संस्कृत तत्समांची जोड देऊन त्या हिंदीचें स्वरूप बोजड करण्याचे प्रयत्नहि चालविले आहेत. यामुळें हिंदी हिंदुस्तानी या प्रश्नावर मोठीं रणें माजलीं.

आपली मातृभाषा हिंदी. हिचा कैवार आम्ही मराठीचा घेतो त्याप्रमाणें हिंदी मंडळींनीं घेतला तर तें सर्वथा स्पृहणीय होय. पण हीच हिंदी अखिल भारतीय आंतरप्रांतीय भाषा म्हणून स्वीकारिली जावी असा त्यांपैकीं कित्येकांचा स्पष्ट आग्रह आहे. विद्यापीठांतून सर्वत्र भारतांत या हिंदी भाषेच्या माध्यमांतून अध्यापन व्हावें असाहि आग्रह कांहीं जण करीत असतात. हा आग्रह मान्य केला तर उघड आहे कीं कांहीं वर्षांनीं हें लोण

खालील माध्यमिक शिक्षणांत आणि तेथून प्राथमिक शिक्षणापर्यंत पोंचल्याशिवाय रहाणार नाहीं. जे एकभाषावादी त्यांच्या दृष्टीनें ही स्वागतार्ह घटनाच होईल. आणि असें झालें म्हणजे अखिल भारतीयता, एकता, राष्ट्रीयता वगैर वृत्ति बळावतील असा त्यांचा दावा आहे.

हा एक भाषापक्ष, मग ती भाषा हिंदी असो, कीं कांहीं म्हणतात तसली हिंदुस्तानी असो पक्ष आपण सोडून दिलात आणि दुसरा पर्याय वर सुचविला आहे, तो स्वीकारावयाचें म्हटलें तर मग हा मराठी, बंगाली वगैरेंच्या उच्चाटनाचा प्रश्नच उद्‌भवणार नाहीं. पण दुसऱ्या शंका उरतातच. भारतीय एकता तर अभंग राखली पाहिजे. मध्यवर्ती कारभाराची बळकटी कणखरपणें सांभाळली पहिजे. त्या सरकारची प्रतिष्ठा आणि इभ्रत पेलील अशी भाषा त्या सरकारच्या हातीं दिली पाहिजे. मध्यवर्ती न्यायालयाचें काम चोख चाललें पाहिजे. हिंदी नको, तर हें सर्व कसें साधणार ? भारतीय संस्कृतीचा पाया संस्कृतांत आहे हें मागें सांगितलेंच आहे. त्या संस्कृतची बांधणी पाणिनीनें सर्वांगसुंदर केली. एका दृष्टीनें व्याकरणाचा अपूर्ण ताजमहाल त्यानें बांधला. पतंजली, कात्यायनादींनीं त्याचा परिपोष केला. याच भाषेच्या आधारानें आणि वार्तिकादि पद्धतीचें मर्म लक्षांत घेऊन आम्ही नव-युगाला पुरून उरेल इतकी शब्द-संपत्ति—प्रातिपदिकें आणि धातु-साधितें—तुम्हांला पुरवूं.... आम्ही सर्व शास्त्रावबोधक संपूर्ण परिभाषा परिश्रमपूर्वक सिद्ध करूं. जगांतील सर्व परिभाषांपेक्षां आमची परिभाषा आम्हांला पाया-शुद्ध, संकोच-विस्तारक्षम, स्वयं-विकासी अशी सहज रचतां येईल. आमचा पायाच तसा मजबूत आहे. येवढी प्रधान परिभाषा सार्वभारतीय शास्त्रांत आणि अनिवार्य रूपानें शासनादि व्यवहारांत वापरली जाईल. पण परिभाषेचा विस्तार आणि तदंगभूत गण-घटनांचें वर्णन, परिष्कार, विवरण सर्व विविध देशीभाषा आपल्या ढंगानें करतील. त्यामुळें कसलीच अडचण येणार नाहीं..... आपणांपैकीं पुष्कळांनीं बहु-भाषिक झालेंच पाहिजे. शिक्षणप्रणालीचें धोरण या बहु-भाषिकत्वाला पोषक असें ठेवलें पाहिजे.

बहु-भाषिक बुद्धिवंतांचें एक मध्यवर्ती मंडळ स्थापन केलें पाहिजे. तेथला एक एक पंडित अनेकभाषाकोविद असल्यानें आणि अनेकशास्त्र-

कोविद मंडळीहि त्यांत समाविष्ट केल्यानें मराठी, कानडी, बंगाली, तामीळ, हिंदी, गुजराथी वगैरे भाषांत जो कांहीं नवा विचार, नवा साक्षात्कार, नवा शोध असेल तो भाषांतर रूपानें सर्वत्र भारतांत पसरवितां येईल आणि अशा रीतीनें अखिल भारताची संस्कृतीची आणि ज्ञानाची समपातळी कायम राखतां येईल.

या मंडळींत केवळ भारतीय भाषा-कोविद विद्वान्च असून भागणार नाहीं. तर प्रौढ आणि विचार-श्रीमंत अशा बाह्य प्रदेशांतील भाषांचे आणि भारतीय भाषांचे असे सव्यसाची ज्ञाते आपणांस नेमावे लागतील. सर्वत्र शहाणे आणि प्रगति-प्रिय राज्य-चालक यांसारख्या योजना करीतच असतात. सविस्तर आणि सांगोपांग योजना सादर करण्याचा हा प्रसंगहि नव्हे आणि हें स्थळहि नव्हे !

याहूनहि एक महत्त्वाचा मुद्दा असा कीं भाषा एक असल्यानें एकतेला मदत होते हें खरें पण त्याला मर्यादा आहे. नाहीं तर एकच भाषा बोलणारे सख्खे भाऊ, जीवघेणीं भांडणें भांडतांना कां आढळते ? एकभाषी प्रांतांत किंवा भारतांत पक्ष, मतभेद, भांडणें राहणारच नाहींत काय ? भाषेचा आडपडदा तसें म्हटलें तर वादाच्या उपशमाला उपयोगी पडूं शकतो असाहि युक्तवाद करतां येण्यासारखा आहे. विचारांचें, हेतूंचें आणि हितांचें ऐक्य पाहिजे तें जास्त महत्वाचें, टिकाऊ आणि खात्रीचें असतें. सर्व देशी भाषांतून एकच रामायण आमच्या पूर्वजांनीं सांगितलें, एकच भक्ति प्रतिपादिली ! आणि भाषा निरनिराळ्या असतां सांस्कृतिक एकमूलता टिकविली ! तोच मार्ग यापुढेंहि अनुसरला पाहिजे. जर स्वातंत्र्य, स्वराज्य, लोकशाही अशा थोर कल्पना आणि ध्येयें आपलीं हिताहितें आणि मनोगतें अगदीं एकजीव झालेलीं असतील तर फुटीरपणाची बिशाद काय ? प्रमुख देशी भाषांतून ते ते विचारवंत आणि भाषाप्रभु हीं एकहितात्मतेचीं मनोगतें मनोहारी पद्धतीनें विशद करतील तेव्हां तीं फारच परिणामकारक बनून तत्तज्जनतेच्या पिंडांत घुसतील आणि त्यांचे आत्मे रंगवून आणि भरून सोडतील. तो प्रभावी परिणाम दीर्घकाल वाढीस लागलेल्या आपापल्या भाषा त्यांस सोडावयास लावून घडवून आणतां येणार नाहीं. ह्या मार्गांत सुकरता, सहजता आणि न्यायहि नाहीं.

ज्या ज्ञानेश्वरांनीं मराठीचाहि पाया रचिला त्यांनीं केवढा आत्मविश्वास आणि कसली दुर्दम्य निष्ठा प्रगट केली ! "निजजन कल्पलता, जी श्रीमंत अंबा तिला त्या ज्ञानोबांनीं कृपेची विनवणी केली कीं, **नवरसां भरवि सागर** । भरवि रत्नांचें आगर । भावार्थाचे गिरिवर । निपजवि माय ॥ **साहित्य सोनियाचिया खाणी** । उघडवि देशीचिया क्षोणी ॥ संवाद फल विधानें । प्रमेयाची उद्यानें । लावी म्हणे गहनें । निरंतर ॥ " आणि ही **थोर** मागणी करून लगेच लडिवाळपणें " तूं हो म्हण, कीं मी सारें करून टाकतों" हा आशय पुढील शब्दांत सांगून टाकिला : " तूं आपुलेनि स्नेहपल्लवें । मातें पांघुरविसी सदैवें । तरि आतांचि हें आहावं । निर्मान मी "

जनतेच्या कळवळ्यांतून जन्मलेली कल्याणनिष्ठा हीच या युगांतील तुमची श्रीमंत अंबा होय ! ती तशीच निजजन कल्पलता आहे ! ती तुमचा अडसा खचित पुरवील, खचित पुरवील !.......

( मराठी साहित्य संमेलन पुणें, १४-५-१९४९ :
स्वागताध्यक्षीय भाषण )

......महात्मा गांधींच्या प्रेरणेनें राष्ट्रभाषेची देशव्यापी चळवळ भारताच्या कोनाकोपऱ्यापर्यंत जाऊन पोहोंचली. महाराष्ट राष्ट्रभाषा सभा हें त्याचेंच एक फळ होय. महात्माजींच्या कार्याचें केंद्र कित्यक वर्षें वर्ध्यांत होतें, त्यामुळें वर्धा राष्ट्रभाषा-प्रचाराचेंहि केंद्र बनलें. नंतर स्वतःच वाढवलेल्या या कार्यकेंद्रापासून अलग व्हावयाचें महात्माजींनीं ठरविलें आणि आपल्या धोरणाप्रमाणें राष्ट्रभाषा-प्रचाराचें कार्य स्वतंत्र संस्थेच्या द्वारा चालविण्याचा निर्णय घेतला. तेव्हां वर्धा केंद्राशीं संबंध सोडून स्वतंत्रपणें राष्ट्रभाषेची सेवा करणें हेंच योग्य असें आमच्या कार्यकर्त्यांना वाटूं लागलें. महाराष्ट्रांतील कॉंग्रेसचे पुढारी श्री. शंकरराव देव यांनीं या गोष्टीला खंबीरपणें पाठिंबा दिला. व आम्हांला संपूर्ण सहकार्य देण्याचें जाहीर केलें. त्यामुळें आमचें सामर्थ्य अधिकच वाढलें. महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीनेंहि आम्हांला या बाबतींत पाठिंबा दिला. आमचे जुने अनुभवी कार्यकर्ते व उत्साही प्रचारक यांनीं बहुसंख्येनें आम्हांला साथ दिली.

राष्ट्रभाषा-प्रचाराच्या बाबतींत आमची भूमिका स्पष्टपणें मांडण्याची आम्हांला संधि मिळाली. मीं स्वतःचा दृष्टिकोण 'सबकी बोली' मासिकांत आधींच स्पष्टपणें मांडला होता, राष्ट्रभाषा याचा अर्थ आंतरप्रांतीय भाषा असा असल्यानें हिंदुस्तानीवाल्यांनीं हिंदी साहित्यसंमेलनापासून अलग होणेंच योग्य, असें मीं लिहिलें होतें. आंतरप्रांतीय भाषेसाठीं हिंदीपेक्षां हिंदुस्तनी हें नांव आम्हांला अधिक योग्य वाटलें. कारण हिंदी या नांवानें एक भाषा मातृभाषा या स्वरूपांत प्रचलित असून ती इतर मातृभाषांप्रमाणें आपल्या भागांत स्वतंत्र आणि सुरक्षित रहावी, तेथील लोकांनीं तिच्या उद्धाराचा व वाढीचा प्रयत्न करीत रहावें. हें कार्य हिंदी साहित्यसंमेलनाच्या अखत्याराखालीं असावें. वेगवेगळ्या भाषांच्या उन्नतीसाठीं त्या त्या भाषांच्या मध्यवर्ती संस्था आहेत, मराठीसाठीं मराठी साहित्यसंमेलन आहे, त्याच धर्तीवर हिंदी साहित्यसंमेलनानें काम करावें न्याय आणि सुव्यवस्था या दृष्टींनीं आम्हीं हा दृष्टिकोण पत्करला. एक

प्रौढ भारतीय भाषा या नात्यानें मातृभाषेच्या स्वरूपांतील हिंदीबद्दल आमच्या मनांत पूर्ण प्रेम आणि आदर आहे. तसेंच तिच्यामुळें राष्ट्रभाषा म्हणून उपयोगांत आणण्यासाठीं भाषेचा जो ठेवा आम्हांला उपलब्ध झाला त्याबद्दल आमच्या मनांत कृतज्ञता राहील. भाषिक उत्कर्षासाठीं भावी काळांत हिंदीचा उपयोग करून घेण्याच्या कामीं आम्ही अनमान करणार नाहीं.

राष्ट्रभाषेच्या चळवळीच्या दृष्टीनें हिंदी आणि अ–हिंदी असे भारताचे दोन भाग मानले जातात. जेथें मातृभाषा हिंदी आहे ते हिंदी प्रांत व जेथें मातृभाषा दुसऱ्या भाषा आहेत ते अ–हिंदी प्रांत समजले जातात. हिंदी प्रांतांची मातृभाषा ही एक हिंदी आणि हिंदी व अहिंदी अशा साऱ्या विभागांची मिळून आपापसांतील सामान्य व्यवहाराची सर्वसाधारण भाषा ही दुसरी हिंदी.

पश्चिम भारतांतील बहुसंख्य प्रजा अहिंदी आहे. मराठी, गुजराती व कन्नड अशा तीन मुख्य भाषा येथें प्रचलित आहेत या भाषा प्राचीन, प्रौढ, संपन्न व वर्द्धिष्णु आहेत. या तिन्हीं भिन्नभाषी विभागांत आंतर-विभागीय व्यवहारासाठीं एका सामान्य भाषेची गरज आहे. ह्या कामासाठीं वर सांगितलेली दुसरी हिंदी आम्ही स्वीकारूं शकतों ह्या दुसऱ्या हिंदीचेंच एक दुसरें नांव हिंदुस्तानी असें आहे. ही हिंदुस्तानी म्हणजे एकादी नवीन भाषा नव्हे. या देशांत सर्वसाधारण भाषा या नात्यानें हिंदुस्तानी प्रचलित होती मोगल राजवटींत याचा पुरावा आढळतो. अकबराच्या कारकीर्दींत ख्रिस्ती पाद्री आले व धर्म-प्रचार करूं लागले. त्यांनीं लिहून ठेवलें आहे कीं, या देशांतील सामान्य जनतेंत धर्मप्रचार करावयाचा तर ‘इंदोस्तान’ भाषेंतून केला पाहिजे. पेशव्यांच्या कालांतील ऐतिहासिक कागदपत्रांत ‘हिंदवी’ चा जो नमुना आढळतो त्यांत हिंदुस्तानीचा रंग भरपूर मिसळलेला दिसतो. यावरून हें स्पष्ट दिसतें कीं, हिंदुस्तानी एकादी नवी वस्तु नव्हे; ती कुणीं तरी जबरीनें आमच्यावर लादली आहे अशांतला प्रकार नाहीं; ती कालाची निर्मिति आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ................ वि: ................
क्रमांक ................ नों: दि: ................

या देशांत इंग्रजीचा शिरकाव होण्यापूर्वी भारतीय जनतेच्या आंतर-प्रांतीय व्यवहारासाठीं सामान्य भाषा नव्हती असें समजणें अगदीं चुकीचें आहे. उत्तर भारताचे रहिवासी दक्षिणेकडे येत, तरवार गाजवीत, व्यापार करीत, तीर्थक्षेत्रें पहात; त्याचप्रमाणें दक्षिणेंतील लोक उत्तरेकडे जात आणि आपापलीं कामें करीत. हें दळणवळण नित्य व वेगानें चालू असे. एका सामान्य भाषेवांचून हें चालूं शकलें असतें काय ? मात्र ह्या सर्व-साधारण भाषेचा उपयोग प्रामुख्यानें बोलण्या-चालण्यापुरताच होई, आतां काळ पालटला, यंत्रयुग आलें. रेल्वे, रेडिओ, तारायंत्रें, मोटारी विमानें यांचा हा जमाना आहे. सरंजामदारीचे दिवस गेले. लोकशाहीच्या जोपासनेचें हें युग आहे. सर्वसाधारण व्यवहार शेंकडों पटीनें वाढला आहे व नित्य वाढत आहे. पूर्वी राजे-रजवाड्यांच्या काळींहि हातानें लिहिलेली वर्तमान-पत्रें प्रचलित असत; पण आतां यंत्रांवर छापलेलीं वर्तमानपत्रें रोज सांज-सकाळ आपणांला जगभरच्या बातम्या हातीं आणून देतात सर्वांसाठीं सामान्य भाषा प्रत्येक भारतीयाच्या जीवनांतील एक आवश्यक वस्तु बनली आहे. सामान्य भाषा म्हणजेच राष्ट्रभाषा हें आपल्या जीवनाचें एक अत्यंत महत्त्वाचें अंग होय म्हणूनच महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेनें राष्ट्रभाषा-प्रचाराच्या क्षेत्रांत पदार्पण केलें आहे.

आपल्या समोर राष्ट्रभाषेचें वास्तविक क्षेत्र व कार्य कोणतें आहे तें या सभेनें पहिल्यापासूनच स्पष्टपणें ठरवून घेतलें आहे. सभेच्या घटनेंत राष्ट्रभाषेची व्याख्या आहे ती अशी : "**भारतांत आंतर-प्रांतीय व्यवहारासाठीं कित्येक शतकांपासून सर्वसाधारणपणें ज्या भाषेचा उपयोग चालू आहे तीच या देशाची राष्ट्रभाषा होय.**" या व्याख्येमुळें दोन गोष्टी स्पष्ट होतात. एक म्हणजे राष्ट्रभाषा याचा अर्थ आंतर-प्रांतीय भाषा, दुसरी गोष्ट अशी कीं, ही भाषा नवी नसून पूर्वापार चालत आलेली आहे. भाषेच्या नांवाच्या बाबतींत स्पष्टीकरणार्थ सभेच्या घटनेंत म्हटलें आहे कीं, "या भाषेसाठीं हिंदी, हिंदुस्तानी आणि उर्दू अशीं तिन्हीं नांवें रूढ आहेत." ही व्याख्या अगदीं साधी व सरळ आहे.

संविधानसभेंत भाषेच्या प्रश्नावर कडाक्याची चर्चा झाली. संतोषाची गोष्ट अशी कीं अखेरचा निर्णय सारे वेगवेगळे दृष्टिकोण एकत्र करून

समाधानकारक असा झाला आमच्या सभेनें त्याचें आनंदानें स्वागत केलें. सभेनें स्वीकारलेल्या तीन नांवांपैकीं हिंदी हें नांव संविधान सभेनें मंजूर केलें देवनागरी लिपि स्वीकारण्यांत आली. संविधानाच्या १७ व्या अधिकरणांत राजभाषेचा सारा विषय आहे. राजभाषेसाठीं स्वीकारण्यांत आलेलें नांव हिंदी, व तिची लिपि देवनागरी, असें ३४३ व्या कलमांत स्पष्ट करण्यांत आलें आहे. हिंदी या शब्दाचे दोन वेगवेगळे अर्थ समजून घेतले पाहिजेत. संविधानाच्या १७ व्या अधिकरणांत हिंदी या शब्दाचीं द्विविध स्वरूपें आलीं आहेत ३४३ व्या अनुच्छेदांतील हिंदी या शब्दानें राजभाषेचें नांव निश्चित करण्यांत आलें आहे. ३५१ व्या अनुच्छेदांत ह्या हिंदीच्या विकासाच्या धोरणाचा निर्णय आहे, तो महत्वाचा आहे. ह्यामध्यें दोन गोष्टी आहेत. एक म्हणजे भारताच्या संपृक्त संस्कृतीच्या साऱ्या प्रवाहांचा आविष्कार करण्याची शक्ति त्या हिंदींत असली पाहिजे व दुसरी गोष्ट अशी कीं, ह्या हिंदीचें पोषण आणि विकास आटव्या परिशिष्टांतील चौदा भाषा आणि हिंदुस्तानी भाषा यांच्या सहाय्यानें व्हावयाचें आहे. परिशिष्टां-तील १४ भाषांच्या यादींत मराठी, गुजराती वगैरे भाषांच्या जोडीनें हिंदी आणि उर्दू याहि भाषांचा समावेश केलेला आहे. ह्याचा काय अर्थ होतो ? हिंदीचा विकास आणि पोषण हिंदीच्या मदतीनें करावें, असा हा आदेश आहे. म्हणजे, अनुच्छेद ३४३।१७ मध्यें उल्लेखिलेल्या **राजभाषा** हिंदीचा विकास करण्यासाठीं **मातृभाषा** हिंदीची मदत घ्यावी, असा यांतून स्पष्ट अर्थ निघतो.

## हिंदीचीं दोन स्वरूपें

मी कपोलकल्पित गोष्टी सांगत नाहीं. हिंदीचे श्रेष्ठ पंडित माझे मित्र डॉ. अमरनाथ झा यांनीं पूर्व पंजाब विश्वविद्यालयाच्या एका सभेंत सांगितले होते कीं, " हिंदीचीं दोन स्वरूपें असतील; एक राष्ट्रीय व दुसरें प्रांतिक. " घटना परिषदेच्या निर्णयांत हिंदीची दोन स्वरूपें गर्भित आहेत. डॉ. झा यांच्यासारख्या पंडितांनींहि हें मान्य केलें आहे (स्टेट्समन, कलकत्ता, २९ जानेवारी, १९५०)

राजभाषा हिंदी आणि मातृभाषा हिंदी अशीं दोन स्वरूपें राज्यघटनेंत अभिप्रेत आहेत. आतां प्रश्न असा उद्‌भवतो कीं, अनुच्छेद ३५१।१७ मध्यें उल्लेखिलेल्या हिंदुस्तानीचा अर्थ काय ? ३५१।१७ आणि ३४३।१७ या अनुच्छेदांत राजभाषा हिंदीचा उल्लेख आहे. आठव्या अनुसूचींतील हिंदी ही मातृभाषा हिंदी. आतां राहिली हिंदुस्तानी; ती राष्ट्रभाषा होय. राष्ट्रभाषा आणि राजभाषा दोन वेगवेगळया वस्तु आहेत काय ? नाहीं; एकच वस्तु, पण तिचीं रूपें दोन. राजभाषेंमध्यें निश्चित शब्दांचा वापर करावा लागतो; पर्यायवाचक शब्द वापरतां येत नाहींत. संविधान, संसद, आपात हे राजभाषेंतील शब्द होत. व्यवहारांत या शब्दांऐवजीं घटना, लोकसभा, आकस्मिक यांसारखे शब्द रूढ आहेत. मराठी, बंगाली, गुजराती वगैरे भाषांतील रूढ शब्द त्या त्या भाषांच्या क्षेत्रांत राष्ट्रभाषेमध्यें वापरले तर तें अनुचित ठरणार नाहीं. पारिभाषिक आणि व्यावहारिक शब्दांचा परस्परांवर प्रभाव पडत रहाणारच. व्यवहारांत पर्यायवाचक शब्दांची गर्दी असते. राज्यशासन संस्थेच्या वेगवेगळ्या अंगांच्या व्यवहारांत पारिभाषिक शब्दच वापरणें उचित असतें. राष्ट्रभाषेचें शब्दभांडार दोन्हीं प्रकारच्या शब्दांनीं संपन्न होत राहील. राजभाषेचें स्वरूप नियमानुसार स्वीकारलेल्या पारिभाषिक शब्दांच्या द्वारें आंखीव राहील. राष्ट्रभाषेचें क्षेत्र वाढतें राहील. त्याचा विस्तार वाढत जाईल, पण राजभाषा आणि राष्ट्रभाषा यांचा उगम मात्र एकच.

कित्येक प्रौढ भाषा देशांत प्रचलित आहेत. ह्या प्रौढ आणि विकसित भाषांच्या द्वारेंच त्या त्या विभागांतील जनतेच्या मनःपिंडाचें पोषण होत आलें आहे. लोकांच्या मनाचा पिंड पोसावयाचें कार्य पूर्णपणें यशस्वी करण्यासाठीं ह्या प्रौढ भाषांची भरपूर मदत घेतां येण्यासारखी आहे, म्हणून संघराष्ट्र भारताच्या राज्यांची पुनर्रचना भाषांच्या आधारें व्हावी.

घरांत घुसून एका कोपऱ्यांत जाऊन बसलेल्या इंग्रजीला काढून लावावयाचें आहे खरें, पण तिला घरांतून पार हाकलून द्यावयाचें आहे असें मात्र नव्हें. प्रत्येकाच्या बोकांडीं इंग्रजीला बसवावयाचें नाहीं; पण कांहीं लोकांनीं इंग्रजीचा मुकुट डोक्यावर चढवावयाचा आहे. मात्र त्यांनीं थेट

आमच्या घरांत घुसून आमच्या गादीवर बसतां कामा नये. आम्हाला इंग्रजीचा उपयोग करून घ्यावयाचा आहे.

## प्रांतिक भाषांचा विस्तार

मराठी, गुजराथी, कन्नड वगैरे भाषांचा विस्तार उंचीच्या दृष्टीनें थेट आकाशापर्यंत व्हावा; पण रुंदीच्या दृष्टीनें नव्हे. रुंदीच्या दृष्टीनें त्यांचा प्रसार होऊं लागला तर इतर भाषांच्या क्षेत्रावर त्यांचें आक्रमण होण्याचा संभव आहे. जगांतल्या सर्वच भाषांचा सर्वत्र आदर व्हावा हें खरें; पण प्रत्येक भाषेचें व्यवहार-क्षेत्र निश्चित व मर्यादित असलें पाहिजे. भाषिक संघर्षाची शक्यता नांवापुरतीहि राहूं नये.

आंतरप्रांतीय किंवा आंतरराज्यीय व्यवहाराच्या क्षेत्रांत राजभाषा व राष्ट्रभाषा हिंदीला सफलता प्राप्त करून देणें आपलें पवित्र कर्तव्य होय. साऱ्या राष्ट्राला एक भाषा प्रचलित असावी असा कित्येकांचा आग्रह असतो. साऱ्या जगाचें एकच राष्ट्र व एक भाषा असावी असेंहि कित्येकांना वाटतें. पण आपले पाय नेहमीं जमिनीवर असले पाहिजेत. भाषा एक असण्यापेक्षां विचारांच्या ऐक्याचा आपला खंबीर आग्रह असावा. भारतांत ऐक्याच्या सरस्वतीचा प्रभावी ओघ वहात आला आहे. एकतेंतच विविधतेचें मनोरम दर्शन घडतें. विविधतेचें स्वागत आणि संवर्धन केलें पाहिजे. विविधतेंत नुकसान नाहीं, विरुद्धतेंत मात्र नुकसान आहे. बागेंत तऱ्हेतऱ्हेच्या रंगी-बेरंगी फळा-फुलांनीं बहरलेली झाडें-झुडपें आणि वेली असतात, त्यांमुळें बागेची शोभा वाढते. आपणहि कुशल माळ्याचें कौशल्य प्राप्त करून घेतलें पाहिजे. सर्व भाषांसंबंधी आपल्या मनांत प्रेम आणि सद्भावना असली पाहिजे.

भाषिक विविधता आणि भाषिक एकता या दोन्हींची आपणांस साधना करावयाची आहे यासाठीं खालील गोष्टी करणें आवश्यक आहे : (१) एक मध्यवर्ती भाषांतरगृह असावे. एकाहून जास्त भाषा जाणणारे पंडित या संस्थेंत असावेत, कोणत्याहि भाषेंतील चांगलें साहित्य आणि नवें ज्ञान इतर भाषांमध्यें भाषांतरित करण्याची व्यवस्था या संस्थेकडून व्हावी;

(२) साऱ्या भारतासाठीं एक निश्चित पारिभाषिक शब्दावली तयार करावी; (३) मातृभाषांचें शिक्षण, शिक्षणाचें व एकंदर व्यवहाराचें माध्यम म्हणून त्यांचा वापर, त्यांचें संवर्धन या गोष्टींत कसलेहि कृत्रिम अडथळे वा कोणाचा हस्तक्षेप नसावा; (४) राजभाषा आणि राष्ट्रभाषा यांचें शिक्षण सक्तीचें असावें; (५) एकभाषी लोकांमध्यें भारताच्या इतर भाषांच्या अभ्यासाला प्रोत्साहन द्यावे. हिंदी मातृभाषा असणाऱ्या लोकांनींहि राजभाषा व राष्ट्रभाषा यांचा पद्धतशीरपणें अभ्यास करून इतर भाषिकांप्रमाणेंच परीक्षा द्याव्यात.

राजभाषा आणि राष्ट्रभाषा यांच्या प्रचाराच्या व संवर्धनाच्या कामासाठीं अखिल भारतीय संघटना आवश्यक आहे. सरकार प्रमाणेंच लोकांचेंहि या बाबतींत महत्वाचें कर्तव्य आहे, या दृष्टीनें अ. भा. हिंदी परिषदेची स्थापना झाली आहे. महाराष्ट्रांत महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा काम करीत आहे.

ह्या प्रसंगीं एक जुनीं आठवण सांगतों. १९१६ मध्यें लखनौला एक सभा झाली. मुंबई प्रांतांत राष्ट्रभाषा हिंदीच्या प्रचाराच्या कार्याची जबाबदारी श्री. जमनादास द्वारकादास आणि मी, अशा दोघांकडे सोपवण्याचें त्या सभेंत ठरलें. पुढें मीं पुणें शहरांत हिंदीचे वर्ग काढण्याच्या कामाला चालना दिली. ह्या विषयाकडे महाराष्ट्राचें लक्ष फार पूर्वींपासून आहे.

**( पश्चिम भारत राष्ट्रभाषा संमेलन, मुंबई : २४–६–१९५० स्वागताध्यक्षीय भाषण )**

# स्वभाषांचा व्यवहार

आपल्या देशाचा कारभार आज जरी बहुतांशीं इंग्रजींत चालत असला तरी नवीन घटना-कायद्याप्रमाणें इंग्रजीच्या जागीं भारताची राजकाज भाषा हिंदी असल्याचें ठरलें आहे. घटनेच्या सतराव्या अधिकरणांत हे निर्णय समाविष्ट केलेले आहेत. सतराव्या अधिकरणांत जरी भाषा-धोरणाचा स्वतंत्रपणें निर्णय केला असला तरी पांचव्या अधिकरणांतील अनुच्छेद १२० वा आणि सहाव्या अधिकरणांतील अनुच्छेद ११० वा ह्यांचाहि या प्रकरणी संबंध येतो. सतराव्या अधिकरणांत कांहींहि म्हटले असलें तरी तें बाजूस ठेवून चालण्याचा अधिकार ५।१२० व ६।२१० मध्यें देण्यांत आलेला आहे. तसेंच अधिकरण ३ मधील अनुच्छेद २९ व ३० हेहि अंशमात्रानें या प्रकरणीं लक्षांत घतलेले बरे......

भाषाधारी राज्यरचना आम्हांला लोकशाही संपन्न करण्यासाठीं हवी, भारताची घटनाहि त्याच कारणासाटीं प्रवर्तित झाली आहे. म्हणून घटनेंत जे अधिकार किंवा सोयी दिलेल्या आहेत त्यांचा जर नीट आणि वेळींच उपयोग केला नाहीं तर पस्तावण्याची पाळी आपणावर आल्याशिवाय राहणार नाहीं.

अधिकरण सतरा यांत कांहींहि म्हटलें किंवा ठरविलें असलें तरी अनुच्छेद १२० मध्यें निर्णय केला आहे कीं, संसद आपला कारभार—बिझिनेस—हिंदींत किंवा इंग्रजींत चालवील. घटना अंमलांत आल्यापासून पंधरा वर्षांच्या आंत पार्लमेंटनें कायदा करून व्यवस्था न केल्यास इंग्रजी आपोआप गळून पडेल आणि फक्त हिंदींतूनच पार्लमेंटचें कामकाज चालेल. तसा कायदा करून पंधरा वर्षांपलीकडेहि इंग्रजी चालू ठेवण्याची सवलत सतराव्या अधिकरणांतील अनुच्छेद ३४३ मध्यें आहे.

अनु. १२० मधील या तजविजीस फक्त अनु. ३४८ मधील बंधनें लागू राहतील. अनु. ३४८ मधील हीं बंधनें भारतीय अधिन्यायालयांतील कारभार आणि पार्लमेंटांतील कारभार, कायदेकानू, हुकूम, वटहुकूम वगैरे पार्लमेंटनें

कायदा करून निर्णय घेईपावेतों इंग्रजींतच चालतील अशा अर्थाचीं आहेत. पार्लमेंटला कायदा करून भारत सरकारची चालू व्यवहारभाषा जी इंग्रजी ती बदलता येईल. तसें होईपावेतों घटनाजन्मापासून पंधरा वर्षेंपर्यंत चालू व्यवस्थाच चालवावी लागेल. असें बंधन अनु. ३४३ मध्यें आहे. मात्र अनु. ३४३ नें भारतीय लोकसभेच्या अध्यक्षांना या मुदतीपूर्वींहि इंग्रजीच्या जोडीला हिंदी चालू करण्याचा अधिकार दिला आहे. याप्रमाणे भारतीय लोकसभेच्या कारभारांत हिंदी प्रविष्ट होण्याची सोय आणि बंधनें अनु. १२० व अनु ३४३ व ३४८ लक्षांत घेऊन कशी होऊं शकेल ते आपण पाहिलें.

## राज्य विधिमंडळाचें काय ?

भारतीय लोकसभेप्रमाणेंच राज्य विधिमंडळांनाहि असाच अधिकार अनु. २१० (अधि. ६) अन्वये देण्यांत आला आहे. फरक इतकांच कीं अनुच्छेद १२० प्रमाणें हिंदी किंवा इंग्रजी अशी अनुज्ञापक व्यवस्था भारतीय लोकसभेच्या कारभारासाठी निश्चित केली आहे तर अनुच्छेद २१० हा राज्यविधिमंडळांना तीच अनुज्ञापक सत्ता देतांना हिंदी किंवा इंग्रजी यांच्या जोडीला किंवा राज्यांतील स्वीकृत इतर एक किंवा अधिक भाषांची भर घालतो. शिवाय अनु. ३४८ प्रमाणें राज्यमहान्यायालयाचे कामकाज भारतीय पार्लमेंट तसा कायदा करीपावेतों इंग्रजींतच चालावयाचे. शिवाय राज्य विधिमंडळापुढें यावयाचे मसुदे, व्हावयाचे कायदे, निघावयाचे सरकारी हुकुम, वटहुकूम वगैरे राज्यविधिमंडळाला कायदा करून इंग्रजींत न काढतां इतर भाषेंत काढतां येतील. पण अशा इतर भाषेंतील कायद्याचे वगैरे अधिकृत भाषांतर इंग्रजींत त्या सोबतच करावें लागेल व ते प्रमाणभूत समजले जाईल.

याप्रमाणें अनु. १२० अन्वयें भारतीय लोकसभेचा कारभार व अनु. २१० अन्वयें राज्यविधिमंडळाचे कामकाज इंग्रजींतून न करता अनुक्रमें हिंदींतून अथवा अन्य राज्यभाषांतून चालविण्याची काय सोय घटनेंत केली आहे त्याचें स्पष्टीकरण झालें. अनु. ३४८ चें बंधन उभय स्थळीं कसें पडणार तेहि दाखविलें.

आज पिढ्यान्‌पिढ्या जोपासलेली आपली संस्कृतीची प्रिय मराठी, जिच्याप्रीत्यर्थ देववाणी संस्कृत बाजूस ठेवून देशीचा आश्रय ज्ञानोबांनी केला; तुकोबांनीं आपलें जातिवंत जिवंत बोल जिच्यांतून उच्चारिले; पंत पंडितांनीं जिचा आदर केला; विष्णुशास्त्री, बाळशास्त्री, टिळक, आगरकर, केळकर, राजवाडे, केतकर, पांगारकर, गडकरी, कोल्हटकर, परांजपे प्रभृतींनीं आपली प्रतिभा जिच्यापायीं वाहिली; मुक्ताबाई, जनाबाई, लक्ष्मीबाई, रमाबाई अशा सारख्या माउलींनीं जिचें लडिवाळपणें संगोपन केलें; अनेक साधुसंतांनीं जिचा प्रसाद चाखविला, ती मराठी आम्ही एकाएकी टाकूं काय, आणि टाकावी काय? चक्रधरादि महानुभाव जिच्यासाठीं कळवळले ती आमची मराठी हरपली तर हजारों वर्षें ज्या पिंडावर आम्ही पोसलों तो शुष्क व नीरस होऊन आम्ही लुळेपांगळे आणि निःसत्त्व होऊन नाहीं का जाणार? नवी भाषा घेतली तरी ती अंगीं मुरण्यास बहुत काळ जावा लागतो. आणि त्या काळांत तें ज्याचें मूळ धन आहे तें किती पटीनें श्रीमंत व समर्थ होऊन जातील? आम्ही भिकारी सहजच होऊन जाऊं. होते तें गेले आणि नवें बेताचेंच, आहे आहे, नाहीं नाहीं; असा आमचा भाषासंसार उध्वस्त होऊन जाणार नाहीं काय? आम्ही या नव्या जगांत शेंकडों कोस मागें पडलों आहोंत, पण मराठीच्या बळकट आश्रयानें आम्ही हें अंतर तोडूं म्हणून उमेदीनें कामाला लागल्याला अजून कोठें शंभर वर्षेंहि पुरी झाली नाहींत तोंच भरल्या ताटावरून उठून आम्ही रंक बनावें काय? आमच्या वैचारिक उद्यानाचें वैराण वाळवंट आपल्या हातांनीं करावें काय? यांत लाभ काय? हें शहाणपणाचें होईल काय? जगाचा अनुभव काय आहे? पस्तीस कोटींची मनाची एक भाषा अवश्य असावी, पण बोलाची? छे छे! तें घडलें नाहीं, घडणार नाहीं. मग जगाची एक भाषा कां नको? झाली तर कोण नको म्हणेल? शेंकडों वर्षें अमृतपान केल्यावरच एकाद्या भाषेंतून लोकात्म्याचा हुंकार होऊं लागतो. महात्मेच ही जादुगिरी करूं जाणतात. ते सारे महात्मे आमच्यासाठीं मराठीची अमृतकुंडें ठेऊन गेले तीं आम्ही लोटून भलत्या भरी पडणें योग्य ठरेल काय?

अनुच्छेद ३४७ ह्यांत लोकांना असा अधिकार आहे कीं जर एखाद्या राज्यांत तेथील कोणी लोकसमूह आपली भाषा राज्यांत मान्य व्हावी अशी मागणी करील आणि जर राष्ट्रपतींची अशी समाधानी होईल कीं ही मागणी करणारा लोकसमूह संख्येनें भरदार आहे तर राष्ट्रपति फर्मावू शकतील कीं त्या संपूर्ण राज्यांत किंवा त्याच्या विशिष्ट विभागांत त्या भाषेला त्यांनीं दर्शित केल्याप्रमाणें मान्यता देण्यांत आली आहे.

## तीन भाषांचें शिक्षण

भारत सरकारनें विद्यापीठ समिति नेमिली होती तिचे प्रमुख डॉक्टर राधाकृष्णन् होते. या समितीला शिक्षणाच्या माध्यमाचा प्रश्न विचारांत घ्यावाच लागला. या समितीचा निष्कर्ष पुष्कळ विचाराअंतीं लिहिला आहे. हा निर्णय असा आहे कीं कमींत कमी तीन भाषा तरी विद्यापीठीय पदवी. धरांना आल्या पाहिजेत : ( १ ) पहिली मातृभाषा, ( २ ) हिंदी भाषा अथवा संघभाषा, ( ३ ) इंग्रजी ( ज्ञानग्रहणास अवश्य इतकी ). हा निर्णय यथायोग्य आहे मातृभाषेंतून सर्व शिक्षण मिळावें हेंहि या समितीस स्थूल मानानें मान्य आहे. परंतु उच्च शिक्षणाचे कामीं मातृभाषेबरोबरच हिंदी माध्यमाचा विकल्प ठेवावा, मग तो सर्व विषयांसाठीं असो किंवा कांहीं विषयांसाठीं असो.

ही सूचना दिसण्यास एकदम वावगी वाटण्यासारखी नाहीं. उच्च शिक्षणांत, ज्या वेळीं विद्यार्थ्यांच्या बुद्धीला खरें प्रौढत्व येऊं लागते आणि त्याची रसिकता बुद्धि व चिकित्सक बुद्धि विकास पावूं लागते त्यावेळीं शिक्षणाचें माध्यम हिंदी ठेवण्याचा विकल्प करावा म्हणून ही समिति आग्रहाची शिफारस करते. पदव्युत्तर शिक्षणासाठीं हिंदी माध्यम आवश्यक असावें असा निर्बंध गुजरात विद्यापीठाचे कायद्यांत त्याप्रमाणें समाविष्टहि झाला आहे. कर्नाटक विद्यापीठ समितीची शिफारस त्याच वळणावर गेली आहे.

पदव्युत्तर विद्यार्थ्यांची खरी कसोटी पाहावयाची तर त्यांची परीक्षा घेणारांत त्यांच्या प्रदेशाबाहेरचे दूरचे अन्य भाषी तज्ज्ञ असलेले चांगले;

पण प्रबन्ध किंवा उत्तर पत्रिका जर देशी भाषेंतच लिहिली तर मग असे बाहेरील तज्ज्ञ परीक्षक कसे आणतां येतील ? अध्यापकांसंबंधानेंहि तशीच अडचण आहे. आधीच उच्च ज्ञानी तज्ज्ञ थोडें असणार. त्यांतून भौतिकादि विषयांत तर परिभाषेची अडचण आहे. मग काय आपल्याच हातांनीं आपणच दिवे ओवाळून घ्यावें आणि बाहेरील तज्ज्ञांना वगळावें ? उलट, उच्च विषयांवरील प्रबंध आणि उच्च विषयांचें अध्यापन देशी भाषांतून होण्याचेंच अशक्य करावें आणि आमच्याच भाषांची स्वाभाविक उन्नति आम्हीच खुंटवावी ? आम्हीच एक प्रकारचा कमीपणा त्याचे पदरी बांधावा ? अनायासें ज्ञानपूर्ण प्रबंधांची भर देशी भाषेंत पडेल ती थांबवावी ? आमच्याच भाषेच्या भरीला रोखून धरावें ? असा हा पेंच आहे. आणि तो खरा आहे. तरी पण तो उतावीळपणें सोडता कामा नये.

अध्यापकानें हिंदीचा आश्रय विशेष प्रसंगी केला तरी चालेल. कारण तितके हिंदी विद्यार्थ्याला आलेंच पाहिजे. पण म्हणून देशी भाषांचा हक्क त्यांस बजावूं दिलाच पाहिजे. तो निदान प्रथम मान्य करून मग अवांतर तजवीजी करून त्यांचा यथोचित व यथासंभव परिहार शोधावा हेंच उचित. एक भाषांतराचा मार्ग आहे. तो त्रास वाटला तरी सोसावा. एक-दम देशी भाषा व संघभाषा उभयतांची भर होईल. किंवा देशी भाषेंत मुख्य व सांगोपांग प्रतिपादन रहावें आणि मुद्यापुरता संक्षेप हिंदींत करीत जावा. तोड काढतां येईल. आणि तीहि निरंतर लागणार नाहीं. भलतेंच तत्व वरून गोंडस दिसलें तरी भोळसटपणें मान्य करूं नये. सवलत द्यावी, दम खावा, गमहि खावी पण मूळ तत्व निखालस सोडूं नये.

असे प्रश्न व पेंच यापुढें सतत येत जाणार. म्हणूनच पक्क्या, स्थिर व दृढ मताची आवश्यकता आहे. घटनेंत सवड ठेवली आहे. वेळींच जागें राहून, योग्य व न्याय्य मार्गानें धिटाईनें जाणें आपलें काम आहे.

भारत आपला आहे. भारतांतील सर्व भाषा एकपरी आपल्याच आहेत. त्या सर्वांवर आपली प्रीति असावी. सर्व गांव आपलें असलें तरी आपलें घर म्हणून वाटणारा आपलेपणा कांहीं निराळाच असतो. तोच न्याय येथें लागू आहे. आंबा म्हणजे आंबा, पण त्यांतहि हापूस, पायरी

अशा परी असतातच. सारे आपण भारतीय. पण त्यांत मराठे, बंगाली, गुजराती, तामीळ वगैरे परी आहेत. वैचित्र्य हें वैभवाचें लक्षण आहे. वैचित्र्य म्हणजे विरोध नव्हे. विरोध भावना विषारी म्हणून ती सर्वथा टाकावी. शुद्ध प्रेम वाढीस लावावें. सर्वांची समान उन्नति कधी होईल हें चिंतावें पण असें करतांना आपलें जें असेल त्यावर सर्वाधिक माया करावी हाच सद्धर्म आहे !

साप्ताहिक मौज, मुंबई १४-२-१९५१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम.......................... वि: ..................
क्रमांक .......................... नों दि ..................

पोतदार समिति मुंबई सरकारनें १७ मे १९५० च्या ठरावानें स्थापन केली आणि तीत म. म. प्रा. दत्तो वामन पोतदार (अध्यक्ष), श्री मगनभाई देसाई, महामंत्री, गुजराथ विद्यापीठ अहमदाबाद, श्री. गो. प. नेने, मंत्री, महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणें, श्रीमती पेरीन बेहेन कॅप्टन, हिंदुस्थानी प्रचार सभा, मुंबई, आणि श्री. सिद्धनाथ पंत, मंत्री, कर्नाटक प्रांतीय हिंदी प्रचार सभा, धारवाड हे सभासद, अशी योजना केली. श्री. एज्युकेशन इन्स्पेक्टर, मुंबई विभाग यांस या समितीचे मंत्री नेमण्यांत आले. समितीने सरकारच्या प्रकाशन खात्यामार्फत एक प्रकट निवेदन प्रसिद्ध करून लोकां-कडून सूचना मागविल्या.

समितीस हिंदुस्थानीचा अभ्यासक्रम रचावयास सांगितलें आहे किंवा काय अशा आशयाच्या लेखी तक्रारीहि सरकारकडे करण्यांत आल्या. समितीनें संविधानांतील अनुच्छेद ३४३ ते ३५१ यांजकडे लक्ष पुरवून आपले निर्णय करावयाचे आहेत असें उत्तर सरकारतर्फें देण्यांत आले. समितीनें अहवालाच्या १५–१६ पानांत आरंभींचे संविधानांतील वरील कलमांची जरूर तेवढी परंतु अत्यंत सूक्ष्म छाननी केलेली आहे. ही छाननी खंडनमंडनाच्या खटपटींत न पडतां केलेली आहे आणि जो निर्णय समितीनें केलेला आहे तो मुंबई सरकारनें स्पष्टपणें ठराव करून स्वीकारला आहे.

मुंबई सरकारनें समितीला संविधानांतील वरील कलमास अनुलक्षून काम करण्यास सांगितलें असल्यामुळें समितीला त्या कलमांचा विचार करणें भागच होतें. समितीला जो अभ्यासक्रम रचावयास सांगितला होता त्या अभ्यासक्रमांत कोणत्या प्रकाराचा समावेश करावा किंवा कोणत्या प्रकारची भाषा, धडे, उतारे वगैरे असावें याचें स्पष्टीकरण समितीस करणें आवश्यक होते. आणि हें स्पष्टीकरण संविधानांतील वरील कलमें विचारांत घेऊन करावयाचें असल्यानें संविधानांतील कलमांचेंहि स्पष्टी-करण करणें समितीस क्रमप्राप्त होते.

## संविधानांतील आदेशक

संविधानांतील ३५१ वा अनुच्छेद हा एक आदेशक आहे. या आदेशकांत प्रारंभीच असें म्हटले आहे कीं हिंदी भाषेच्या प्रसाराचें कार्य पुढें रेटणें हें संघसरकारचें एक कर्तव्य असेल. त्याप्रमाणेंच जेणेंकरून भारताच्या संपृक्त संस्कृतींतील सर्व अंशांच्या प्रकटीकरणांचे माध्यम म्हणून हिंदी उपयोगी पडेल तशा रीतीनें हिंदीचा विकास करणें हा या आदेशाचा दुसरा भाग आहे. आदेशाच्या तिसऱ्या भागांत हिंदीची श्रीमंती साधण्याविषयीं दिग्दर्शन आहे ते असें—" हिंदुस्थानी भाषेंतील शैलीरूप आणि शब्दप्रयोग आत्मसात करून घेणें तसेंच आठव्या परिशिष्टांत (यांत पुढील चौदा भाषांची नांवें आहेत—आसामी, बंगाली, गुजराथी, हिंदी, कन्नड, काश्मीरी, मल्याळी, मराठी, उडीया, पंजाबी, संस्कृत, तामीळ, तेलगू, उर्दू) नमूद केलेल्या इतर भारतीय भाषांतील शैली, रूप आणि शब्दप्रयोग आत्मसात करणें आणि तसे शब्दप्रयोग करीत असतां हिंदीच्या प्रकृतीस धक्का लागू न देणें. त्याचप्रमाणें या श्रीमंतीच्या पोषणार्थ जेथें जेथें गरज पडेल आणि इष्ट वाटेल तेथें तेथें मुख्यतः संस्कृतांतून आणि गौण रूपानें इतर भाषांतून शब्द-संपत्ति ग्रहण करणें. "

या आदेशकाचा अर्थ लावण्यासाठीं कोणा नामांकित कायदेपंडिताची गरज आहे असें कोणासहि वाटणार नाहीं. कायदेपंडितापेक्षां यांतील मुख्य प्रश्न भाषापंडित आणि समाज संस्कृति-विवेचक यांचा आहे. यांत ज्या भागाचें अधिक स्पष्टीकरण करणें समजुतीकरितां आवश्यक आहे अशी दोनच स्थळें आहेत. संपृक्त संस्कृति म्हणून भारताच्या संस्कृतीचा केलेला उल्लेख हा एक कठीण भाग आहे आणि दुसऱ्या भाषांतील अंश आत्मसात करण्याचे जे पंधरा स्रोत सांगितले आहेत— कारण परिशिष्टांत चौदा व प्रत्यक्ष कलमांत लिहिलेली हिंदुस्थानी मिळून पंधरा– त्यांत हिंदीचाहि नाम-निर्देश आहे. याचा उघड अर्थ असा होतो कीं, हिंदीच्या श्रीमंतीचें पोषण हिंदींतून रूपें, शैली आणि शब्दसंपत्ति घेऊन करावें. येथें एका ठिकाणीं हिंदी पोषक म्हणून सांगितली आहे व दुसऱ्या ठिकाणीं ती पोष्य म्हणून सांगितली आहे. यांतील विसंगती प्रथमदर्शनी कोणासहि खटकेल. कारण

त्याच वस्तूचें त्याच वस्तूनें पोषण कसें करतां येईल? त्याच भाषेचें त्याच भाषेनें पोषण कसें करावयाचें? हें कलम जर जाणत्या माणसांनीं लिहिलें असेल तर तीं असें निरर्थक कलम लिहिणारच नाहींत. तेव्हां या कलमाचा अभिप्राय नीट जपून घेणें आवश्यक होतें.

## हिंदी, हिंदुस्थानी व उर्दू

हें कलम व ३४३ हीं दोन्हीं कलमें समोर ठेवून छाननी केली असतां पुढील प्रश्न सोडविणें जरूर झाले (१) ३४३ कलमांत उल्लेखिलेली राज्यभाषा हिंदी म्हणजे काय? (२) ३५१ कलमांत उल्लेखिलेली हिंदी म्हणजे काय? (३) ३५१ कलमांत उल्लेखिलेली हिंदुस्थानी म्हणजे काय? (४) परिशिष्ट ८ मध्यें उल्लेखिलेली हिंदी म्हणजे काय? आणि (५) परिशिष्ट ८ मध्यें उल्लेखिलेली उर्दू म्हणजे काय? ज्यांना हिंदी भाषेचा इतिहास थोडासा अवगत आहे त्यांच्या हें सहज ध्यानांत येईल कीं हिंदी हिंदुस्थानी आणि उर्दू या तीन नांवांनीं याच ठिकाणीं उल्लेखिलेल्या भाषा सर्वस्वी निराळ्या नाहींत. त्या एकमेकींशीं सलग्न आहेत.

समितीनें आपल्या अहवालांत हिंदुस्थानांतील एक भाषाशास्त्रज्ञ पंडित डॉ. सुनीतीकुमार चतर्जी यांच्या (इंडो-आर्यन अँड हिंदी) या ग्रंथांतील उतारे आपल्या म्हणण्याच्या पुष्टयर्थ स्थळोस्थळीं दिले आहेत डॉ. चतर्जी हे एक सर्वमान्य पडित आहेत. शिवाय त्यांची जन्मभाषा बंगाली आहे. मुंबई प्रदेश राज्यांतहि बहुसंख्य प्रजा हिंदीभाषी नाहीं. ज्याला अलीकडे अहिंदी भारत म्हणण्याचा परिपाठ आहे, त्या अहिदी भारतांतच मुंबई राज्य मोडतें आणि बंगाल राज्यहि मोडतें या दृष्टीनें चतर्जी यांच्या अभिप्रायाला समितीनें विशेष महत्व दिले. कलकत्ता विद्यापीठांतील भाषाशास्त्राचे आचार्य डॉ. चतर्जी यांना अहमदाबादच्या गुजराथ व्हर्नाक्यूलर सोसायटीनें वरील विषयावर व्याख्यानें देण्यासाठीं निमंत्रित केलें होतें. हीं व्याख्यानें वरील विद्वानानें १९४० साली दिली व तीं १९४२ त प्रसिद्ध केलीं.

अलाहाबाद विद्यापीठांतील हिंदी विभागाचे अध्यक्ष असलेले सुविख्यात भाषापंडित डॉ. धीरेन्द्र वर्मा एम. ए., डी. लिट्. (पॅरिस) यांनी 'हिंदी

भाषाका इतिहास ' नांवाचा विद्वत्तापूर्ण ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथाच्या 'भूमिकेंत ' हिंदी आणि हिंदी कुलांतील सर्व भाषा यांचे सूक्ष्म विवेचन आहे. प्रथम डॉ. वर्मा यांचें पुढील विधान आपण लक्षांत ठेवावें (भूमिका पृष्ठ ५९ आवृत्ति १९४० )—" प्रयोग तथा रूपकी दृष्टिसे ' हिंदवी ' या 'हिंदी शब्द फारसी भाषाका ही है।" यावरून हिंदी हें नांव परकीयांनीं दिलें आहे हे उघड आहे. या नांवाची कोणती एकच भाषा पूर्वापार चालत आली होती असें म्हणतां येणार नाहीं. हिंदुस्थानावर स्वारी करणाऱ्या मुसलमानांचा हिंदी जनतेशीं पहिला संपर्क घडला आणि नंतर ते दिल्लीकडे सरकत गेले तसतसा तो संपर्क वाढत गेला. या वाढलेल्या संपर्कांतून जी एक भाषा निघाली त्या मिश्र भाषेला हिंदी हें नांव साधारणपणें लोक-व्यवहारांत रुढ होत गेलें. उत्तर हिंदुस्थानांत मुसलमानांचा प्रभावी संपर्क दक्षिण हिंदुस्थानापेक्षां निराळ्या तऱ्हेचा परिणाम करणारा झाला. म्हणूनच डॉ. धीरेन्द्र वर्मा यांना असे विधान करावें लागलें आहे की, ' १००० ईसवीके लगभग ही महंमद गझनवीने भारतपर आक्रमण किया था। इन आधुनिक भारतीय आर्य भाषाओंमें हमारी हिंदी भाषा भी सम्मिलित है। अतः इसका जन्मकाल भी दसवीं शताब्दि ईसवीके लगभग मानना होगा।'

साधारणतः उत्तर हिंदुस्थानांतील मध्यप्रदेश हा कोणत्याहि अर्थानें म्हटलें तरी चालेल कीं हिंदी या ढोबळ नांवानें ओळखल्या जाणाऱ्या भाषेचें जन्मस्थान होय. या हिंदीचे पश्चिमी हिंदी आणि पूर्वी हिंदी असे दोन भाग ठळक पडतात. पश्चिमी हिंदींतून जिला ' खडी बोली ' हिंदी म्हणतात तिचा उदय झाला. तसाच खडी बोली उर्दू म्हणतात तिचाहि झाला कदाचित् खडी बोली उर्दू ही धीरेंद्र वर्मा यांनी लिहिल्याप्रमाणें व्यवहारांत जरा वडील असावी, खडी बोली उर्दू हिचेंच रुपांतर होत होत ती शाही उर्दू झाली. त्याचप्रमाणें खडी बोली जी हिंदी तिचा विकासहि कित्येकांनीं अभ्यासजड संस्कृत निष्ठेच्या वळणाचा आश्रय करून अगदींच थेट संस्कृतच्या जवळ नेण्याचा प्रयत्न केला. थोडक्यांत असे सांगता येईल कीं मूळ खडी बोली ही आर्यावर्तांतील मध्यप्रदेशांतील बोल-चालीची भाषा. काव्याची भाषा मात्र पूर्वेकडे कोसली किंवा मागधी आणि पश्चिमेकडे ब्रज राहिली. बोल-चालीच्या खडचा बोलीच्या दोन शाखा फुटल्या.

एक साहित्यिक शाही उर्दू. या साहित्यिक उर्दूचें रूपांतर अरबी फारसी वळणावर नेण्यांत आलें आणि तशाच धोरणाचा अवलंब करून साहित्यिक हिंदीचाहि विकास संस्कृतनिष्ठ म्हणतात त्या वळणावर नेण्यांत आला. तात्पर्य हिंदी आणि उर्दू यांच्या विशिष्ट साहित्यिक स्वरूपाचें मूळ एकच म्हणजे खडी बोली हे होय हें ध्यानांत घेतले पाहिजे. ब्रज आणि अवधींत पूर्वकाळीं या भाषांत गद्य साहित्य झाले असल्यास आज तरी उपलब्ध नाहीं.

आतां हिंदुस्तानी जिला म्हणतात त्या भाषेचा विचार करूं. येथें डॉ. धीरेंद्र वर्मा यांचा पुढील उतारा वाचण्यास फार उद्‌बोधक वाटेल. डॉ. वर्मा म्हणतात, ' हिंदुस्तानी नाम युरोपीय लोगोंका दिया हुआ है । उर्दूका बोल-चाल रूप हिंदुस्तानी कहलाता है। उत्पत्तिकी दृष्टिसे आधुनिक साहित्यिक हिंदी तथा उर्दूके समान ही इसका आधार भी खडी बोली है । एक तरहसे यह हिंदी उर्दूकी अपेक्षा खडी बोलीके अधिक निकट है क्योंकि यह फारसी तथा संस्कृतके अस्वाभाविक प्रभावसे बहुत कुछ मुक्त है । दक्षिणके ठेठ द्राविड प्रदेशोंको छोडकर शेष समस्त भारतमें उर्दूका यह व्यवहारिक रूप हर जगह समझ लिया जाता है । कलकत्ता, हैदराबाद, बंबई, कराची, जोधपूर, पेशावर, नागपूर, कश्मीर, लाहौर, दिल्ली, लखनौ, पटना आदि सब जगह हिंदुस्तानी बोलीसे काम निकलता है । अंतिम चार पाँच स्थान तो उसके घर ही हैं । '

या उताऱ्यावरून पुढील गोष्टी स्पष्टपणें ध्यानांत येतील— (१) हिंदुस्थानी ही हिंदुस्थानांतीलच भाषा असून तिची उत्पत्ति खडी बोलीपासूनच झाली आहे. (२) हिंदुस्थानी भाषा हीच अशी एक भाषा आहे कीं जी सर्व हिंदुस्थानभर—निदान उत्तर हिंदुस्थानांत तरी—सर्वत्र समजली जाते. याचाच अर्थ असा कीं, हिंदुस्थानी हीच हिंदुस्थानची लोकभाषा म्हणून वावरत आलेली आहे. धीरेंद्र वर्मा यांच्या मताप्रमाणें हिंदुस्थानीची अशी पसंति होण्याचे कारण तिच्या स्वरुपांत फारशी किंवा संस्कृत यांचा अस्वाभाविक उपयोग होत नाहीं. एकाद्या निष्ठेच्या आग्रहानें हिंदुस्थानीला जडता आलेली नाहीं.

## खडी बोलीचीं तीन रूपें

वरील त्रोटक विवेचनावरून कळून येईल कीं, खडी बोली हें सर्वांचेच मूळ. हिंदी, उर्दू आणि हिंदुस्थानी ही तिचीं रूपें. या तिन्हींपैकीं पुढें हिंदी आणि उर्दू या रूपांना एका विशेष निष्ठेच्या आग्रहामुळें एक प्रकारचीं कडक आवरणें घालण्यांत आलीं. इंग्रज युगांत इंग्रजांनीं अवलंबिलेल्या भेदनीतीमुळें वरील आवरणांचें पोषण झाले आणि भावी कटकटीचा पाया रचला गेला. तथापि आपल्या मतलबासाठीं सर्वसामान्य भाषा म्हणून गरज पडली तेथें इंग्रजांनीं हिंदुस्थानीचाच आश्रय केला. नागरी, उर्दू आणि इंग्रजी या तीन लिप्यांचा आश्रय करून इंग्रजांनी आपल्या देशी फौजेची जागवणूक केली. बाहेर भांडण लावून दिलें, आंतून आपलें काम साधून घेतलें. इंग्रजांनीं हिंदुस्थानीचा प्रचार कोणत्याहि हेतूनें व कसाहि केलेला असो; आपल्याला जर आपल्या राष्ट्रसंवर्धनाच्या कार्यांत तिचा उपयोग करून घेण्यासारखा असेल तर तो आपण अवश्य करून घेतला पाहिजे. आपण वर पाहिलेंच आहे कीं इंग्रज हिंदुस्थानांत येण्याच्याहि पूर्वीपासून खडी बोली हिंदुस्थानी हीच सर्व भारतभर सामान्य व्यवहारांत म्हणजे बोलण्या-चालण्यांत रूढ होती आणि तिचाच उपयोग करावा अशा प्रकारचे विचार पुष्कळ दिवसांपासून हिंदुस्थानांतील लोकांच्या डोक्यांत घोळत होते असें दाखवितां येईल.

## महाराष्ट्राचा पुढाकार

या कामीं पुण्यांतील लोकांनीहि पुष्कळ पुढाकार घेतला होता. पुणें येथील वक्तृत्वोत्तेजक सभेकडून ‘ सर्व हिंदुस्थानची एक भाषा करणें ’ या विषयावर कै. केशव वामन पेठे यांनीं १८९३ च्या सुमारास पुणें वक्तृत्व सभेपुढें भाषण करून बक्षिस मिळविले. अशा विषयावर पुस्तक लिहिणारास ३०० रुपयाचें इनाम देण्याची जाहिरात केसरींत कित्येक धुळेकर मित्रांनी प्रसिद्ध केली होती असें पेठे लिहितात. पेठे यांनी आपले भाषण लिहून काढले व तें विविध ज्ञान विस्तारांत प्रसिद्ध केलें. ओकांच्या सूचनेवरून पुष्कळ माहितीच्या टीपा घालून १८९४ सालीं मुंबईस प्रसिद्ध केलें. विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे या निबंधाला पेठे यांनी

दा. क. ११२२

राष्ट्रभाषा असेंच नांव दिलें आहे. कै. प्रो. राजारामशास्त्री भागवत आणि लोकमान्य टिळक इत्यादि विद्वानांनीं या निबंधाची फार प्रशंसा केली आहे. आजहि हा निबंध उद्‌बोधक वाटेल. इंग्रजीचें महत्व ओळखूनहि, इंग्लिश आमची राष्ट्रभाषा होणें शक्य नाहीं असें स्पष्ट प्रतिपादन त्यांत केले आहे. आणि अनेक प्रमाणे देऊन असा निष्कर्ष काढला आहे:–" सर्व गोष्टींचा विचार करून पाहिल्यास हिंदी व तिचें रूप जी उर्दू तीच राष्ट्रभाषा सुलभ व हिताची आहे." किंबहुना हिंदी किंवा उर्दू आजच बहुतेक राष्ट्रभाषा आहे असेंहि सरळ विधान निबंधकारानें केलें आहे. या निबंधांत जे विचार ठिकठिकाणीं आले आहेत ते पाहून वाचणारास आज अत्यंत आश्चर्य व कौतुक वाटल्याशिवाय राहाणार नाहीं. म्हणून त्यांतील सारांश येथें देतों :–(१) "प्रत्येकानें आपली स्वभाषा राखून हिंदीचा परिचय केल्यास थोड्याच काळानें हिंदी सर्वसाधारण होईल. (२) आतां पुढें सर्वत्र होणारी व आजची हिंदी यांत पुष्कळ फरक पडला हें तर उघडच आहे. (३) राष्ट्रीय सभेंतील प्रतिनिधीस हिंदी आलेंच पाहिजे असा नियम असावा. (४) हिंदींत कांहीं प्रांतीं संस्कृत व कोठें पर्शियन शब्द फार आहेत यास्तव या दोन्ही शब्दांचें संमेलन होईल अशी व्याकरण पुस्तकें व कोश तयार करावे. (५) खाजगी शाळांतून हिंदी सुरू करावी. (६) व्यावहारिक भाषेपुरती हिंदी दोन-तीन पुस्तकें शिकल्यानें सहज कळेल. (७) मुलगे व मुली हिंदी शिकली म्हणजे — आईबाप हिंदी बोलूं लागल्यावर –– त्यांची मुलें पुढील पिढींत सहज हिंदी बोलूं लागतील व पुढें कालांतराने –– या गोष्टीस फार काळ नको —हिंदी एक भाषा होईल."

या निबंधकाराचा कल एकभाषेकडे अधिक वळलेला आहे. तथापि मातृभाषा राहून एकभाषा रहावी असेंच त्याचें धोरण आहे. म्हणूनच त्यांनीं असे म्हटलें आहे कीं, " यास्तव प्रत्येक जन्मभाषा बोलणारानें आपली भाषा कायम राखून सर्वसामान्य भाषा होण्याचा जिचा अधिकार आहे तिचाहि स्वीकार करावा म्हणजे थोड्या मेहनतीनें एक भाषा होईल अशी अटकळ आहे." उर्दू कांहीं स्वतंत्र भाषा नाहीं. एका हिंदी विद्वानानें म्हटल्याप्रमाणें ती ' हिंदीची विभाषा ' आहे या मताच्या समर्थनार्थ ग्रंथकारानें मॅक्समुल्लर, बीम्स वगैरेंचे आधार दिले आहेत. बीम्सचे पुढील वाक्य त्यानें उतरून

घेतले आहे--"आर्य कुलांतील भाषांच्या शब्दावांचून उर्दूचें एकहि वाक्य बनवणें अशक्य होय. पण एकहि फारसी शब्द न वापरतां उर्दूची कितीतरी वाक्यें बनवतां येतील." त्यानें दिलेला दुसरा उतारा मॅक्समुल्लरचा आहे :- "उर्दू भाषेचें व्याकरण तंतोतंतपणें हिंदी भाषेच्या व्याकरणासारखेंच आहे. अर्थातच उर्दू ही हिंदीची म्हणजे आर्यकुलांतील भाषेची एक बोली होय."

## हिंदुस्थानीचें स्वरूप

उर्दू ही हिंदी भाषाच आहे, तिचे व्याकरण हिंदींत आहे, मराठी वगैरे भाषांमध्यें फारसी, अरबी, पोर्तुगीज, इंग्लिश वगैरे भाषांतून आलेले शब्द किंवा कांहीं प्रत्यय, अव्यय वगैरे आपण पूर्वकाळीं समावून घेतले, पण त्यायोगें आमच्या पूर्वीच्या भाषा-पंडितांनींहि भर उपयुक्तच मानली. राष्ट्र-भाषेचा विचार करतांना निष्कारण बहिष्कारवादी धोरणाचें अवलंबन कामीं येणार नाहीं. फारसी वळणावर नेलेली अलीकडील कृत्रिम उर्दू किंवा अतिरिक्त संस्कृतनिष्ठपणामुळें बोजड झालेली हिंदी हीं दोन्हींहि रूपें राष्ट्रभाषेच्या दृष्टीनें जनता केव्हांहि त्याज्यच ठरवील. ती तिला कधींच झेपणार नाहींत. म्हणून मुसलमानकाळीं याच देशांतील खडी बोलीचा आधार घेऊन येथीलच व्याकरण संभाळून फारसी वगैरे परभाषांतील शब्दप्रयोगानें त्याला अलंकृत करून जें मिश्र स्वरूप हिंदुस्थानी या नांवानें अधिक प्रसिद्ध झालें तेंच भावी काळांतहि चालू भारतीय कामकाजांत आपल्याला आधारभूत म्हणून उपयोगी पडेल हें उघड आहे.

तिचाच हिंदुस्तानी या नांवानें संविधानांतील ३५१ व्या कलमांत उल्लेख केलेला आहे असें नीट शोधून विचार करून पाहिले असतां कळून येईल. हिंदी या नांवानें स्वतंत्रपणें ज्या दोन भाषांचा उल्लेख संविधानांतील ८ व्या परिशिष्टांत केला आहे तेथें त्यांचा अर्थ आधुनिक काळांतील विशिष्ट वळणाची साहित्यिक हिंदी व साहित्यिक उर्दू असा घेतला पाहिजे. म्हणजे ज्या सर्वसाधारण राष्ट्रीय हिंदीचा प्रसार भारत सरकारनें करावयाचा आहे त्या पोष्य हिंदी भाषेचें पोषण साहित्यिक हिंदी,

साहित्यिक उर्दू व हिंदुस्थानी यांतील अनुकूल आणि आवश्यक अंश घेऊन आपणांस करता येईल.

## शास्त्रीय व पारिभाषिक शब्द

शास्त्रांची आणि ज्ञानाची संशोधनपूर्वक प्रतिष्ठाहि आपणांस हिंदुस्थानांत करावी लागेल. ही प्रतिष्ठा निरनिराळ्या विभागांतील संपन्न अशा मराठी, बंगाली, तामीळ प्रभृति देशी भाषांच्या द्वारेंच व्हावी हें इष्ट आहे. तथापि या सर्व देशी भाषांतून जे केवळ शास्त्रीय आणि पारिभाषिक शब्द वापरावे लागतील ते मात्र सर्व भारतभर एकरूप असावे असा प्रयत्न केला पाहिजे. हें काम पंडितांचें आहे आणि विद्येची वरिष्ठ प्रकारें जोपासना करण्यासाठींच आहे. अशा पंडितांचें अखिल भारतीय मेळावे आपणांस भरवावे लागतील. अखिल भारतीय स्वरूपाच्या एकेका विषयास वाहिलेल्या विशिष्ट संस्थाहि आपणांस चालवाव्या लागतील. भारत सरकारलाहि अशा संस्था चालवून मेळावे आपणांस भरवावे लागतील. अशा प्रसंगीं जेव्हां निरनिराळ्या प्रौढ मातृभाषेंतून आपले सर्व काम आणि व्यासंग नित्यशः करणारे विद्वान एकत्र येतील आणि चर्चा करतील, विचारांची देवाण-घेवाण करतील त्यावेळीं त्यांच्याजवळ हें काम योग्य तऱ्हेनें पार पाडण्यासाठीं दोन प्रकारचें साधन अवश्य असावें लागेल. पैकीं एक म्हणजे त्या त्या शास्त्रांची समान परिभाषा आणि दुसरें म्हणजे त्या परिभाषेच्या आश्रयानें आपलें म्हणणें सुबोध रीतीनें समजावून देण्याइतपत राष्ट्रीय हिंदीचा अभ्यास. एवढें असलें म्हणजे त्यांचें काम कोठेंहि अडणार नाहीं. असे पंडित कार्यप्रसंगानें हिंदुस्थानांत कोठेहि गेले, राहिले किंवा जमले तरी विचारांच्या दळणवळणाला अडथळा येण्याचें कांहीं कारण नाहीं. साहित्यिक रंगाची तेथें कांहीं जरूर नाहीं तो रंग त्यांनी आपापल्या भाषेंत दाखवावा. नवीन राष्ट्रीय हिंदींतहि कांहीं अंशानें कित्येक समर्थ पुरुषांस तो आणतां येईल. पण हें सहज घडणार नाहीं व घडण्याची जरूरी नाहीं. वाङ्मयाच्या तौलनिक अभ्यासकास कदाचित् थोडी निराळी पात्रता अंगीं आणणें शक्य होईल. पण त्यांनाहि अधिक पात्रतेची गरजच कल्पिली पाहिजे असें नाहीं.

## भाषांतर विभाग

शिवाय आजची मोठी गरज अशी आहे कीं, जितक्या लवकर होईल तितके एक सार्वभारतीय भाषांतर खातें चालू केले पाहिजे. सर्वसाधारण-पणें आपली स्वतःची एक भाषा उत्तम जाणून ज्ञानग्रहणासाठीं आणि ज्ञानाच्या समजुतीसाठीं जरूरी प्रमाणें दुसरी एकादी भाषा किंवा दोन भाषा यांचा कमी-अधिक परिचय सर्वांस करून घेतां येईल. विद्वानांस तो विद्वानाच्या रीतीनें करून घ्यावा लागेल, व्यापाऱ्यास व्यापाऱ्याच्या दृष्टीनें करून घ्यावा लागेल, कर्मचारी किंवा नोकरवर्ग यांना त्यांच्या दृष्टीनें करून घ्यावा लागेल असा हा प्रश्न व्यावहारिक तारतम्यानें सोडवावयाचा आहे. व्यवहार होऊं लागला कीं तो सुटूं लागेल. सर्वसाधारण माणसाची गोष्ट सोडून दिल्यावर कित्येक अशा बुद्धीची व शक्तीची माणसें आढळतात कीं, ज्यांच्या ठिकाणीं अनेक भाषा लीलेनें आत्मसात् करण्याचे सामर्थ्य दिसून येतें. असें बुद्धिमान् लोक निवडून काढून आणि त्यांना विशेष उत्तेजन देऊन त्यांची योजना या मध्यवर्ति भाषांतर कार्यालयांत मराठी, बंगाली, कानडी इत्यादि हिंदुस्थानांतील भाषा त्याचप्रमाणें इंग्लिश, रशियन, फ्रेंच, चीनी, फार्सी, अरबी वगैरे परकी भाषा समूहांतील एकाहून अधिक भाषा लीलेनें समजून लिहिणारे व म्हणून एका भाषांतील आशय दुसऱ्या भाषेंत यथार्थपणें व सुगम रीतीनें व्यक्त करण्याचें सामर्थ्य अंगीं असणारें असे लोक आपणांस परीक्षा करून ठेवतां येतील. उदाहरणार्थ, रशियन आणि मराठी दोन्ही उत्तम जाणणारा किंवा चिनी आणि बंगाली दोन्ही उत्तम जाणणारा किंवा तामीळ आणि गुजराथी जाणणारा अशा प्रकारच्या जोड्या तेथें सापडतील. मग यापैकीं कोणत्याहि भाषेंत कांहीं नवीन कल्पना किंवा ज्ञान सांगणारा ग्रंथ तयार झाला तर या कार्यालयांतील भाषापंडित सुमारे शंभर दोनशें पानांच्या लहानशा ग्रंथांत अन्य भाषांत प्रसिद्ध झालेल्या अशा ग्रंथातील ज्ञान किंवा कल्पना हिंदुस्थानांतील कोणत्याहि एखाद्या प्रौढ भाषेंत ग्रथित करून टाकतील. दुसरे पंडित एका देशी भाषेंतून दुसऱ्या भाषेंत तें ज्ञान वाहून नेतील. म्हणजे भाषांच्या अनेकत्वामुळें किंवा स्वतंत्र-पणामुळें आपले कुठलेंहि नुकसान न होता आपल्या ज्ञानांत कमीपणा राहणार नाहीं. इतकेच नव्हें तर आपल्या ज्ञानाला व विचाराला उत्कृष्ट

अनुक्रम ........ विं
क्रमांक ........ नों दि ........

व्यापकता लाभेल. संकुचित विचार आपोआपच लयाला जातील. सर्वच देशी भाषांतून व्यापक व उदार विचारांची पेरणी होईल आणि हे ज्ञान व हे विचार त्या त्या देशी भाषांच्या द्वारे घरपोंच पावते होतील. असें झालें म्हणजे भाषा भेदानें कलह वाढतील ही कल्पना निर्मूल होऊन जाईल. उलट या मध्यवर्ति कार्यालयांत विविध भाषांचे पंडित एकत्र नांदवणूक करू लागल्यामुळें जागतिक विचारांच्या व प्रगतीच्या देवघेवीचें एक महान् केंद्रच भारतांत निर्माण होईल. आणि या केंद्राच्या माऱ्यापुढें क्षुद्र कल्पनांचे व संकुचित भावांचे भुस्कट उडून जाईल.

नुसत्या एकभाषेच्या आश्रयापेक्षां वर वर्णिलेलें मध्यवर्ति कार्यालय निर्माण करण्यानेंच आपल्या सर्व अडचणींचा त्वरेनें आणि निश्चितपणें परिहार होईल. आपलीं सर्व भयें बारा वाटांनीं पळून जातील आणि सर्व भारतांत महान् सुखसंवादी वातावरणाचा सुगंध दरवळून जाईल. राष्ट्रीय हिंदी-पासून अपेक्षित असलेली कार्यें सफल होतील आणि देशी भाषांच्या क्षेत्रांत व्यर्थ हस्तक्षेप न करतां त्याच्या अनिरुद्ध विकासाला वाव देतां येईल.

## सर्व देशी भाषांसाठीं एक लिपि

भाषेपेक्षांहि एका दृष्टीनें लिपीचा प्रश्न महत्वाचा आहे. शोधाअंतीं हिंदुस्थानातील बहुसंख्य लोकांच्या वापरांत येणाऱ्या आर्य कुलांतील लिपी एका मुळापासूनच निघालेल्या असून देवनागरी हे लिपींचें सांप्रतचें रूप भारतांत आज अनेक शतकें सर्वमान्य झालें आहे. म्हणूनच आर्य कुलांतील निरनिराळ्या लिप्यांची सहज न ओळखतां येण्याजोगी म्हणून भिन्न वाट-णारीं रूपें सोडून देऊन देवनागरी रूपाचाच सर्वांनी आश्रय करणें अत्यंत हिताचें होईल. या निरनिराळ्या लिप्यांतून लिहिल्या जाणाऱ्या भाषा जर एका देवनागरी लिपींतून लिहिल्या जातील तर त्यांच्यांतील आंतरिक साम्य लोकांना आपोआपच कळून येईल. देवनागरी लिपी निरनिराळ्या भाषांना व भाषा बोलणारांना जवळ आणील आणि आपल्या प्रभावी रीतीनें ऐक्य अनुभवास आणून देईल.

देवनागरीशिवाय द्राविड कुलांतील लिपि हिंदुस्थानच्या एका भागांत चालू आहे. आणि उर्दू भाषेच्या निमित्तानें सेमेटिक कुळांतील अरबी अथवा उर्दू लिपि हिंदुस्थानांत मुसलमानांच्या कालापासून चालू आहे. वास्तविक उर्दू भाषा ही मूळची हिंदीच आहे. ती एतद्देशीय आहे, तिचें व्याकरणहि निराळें नाहीं. येथील देशी भाषेंत अरबी फारसीचें कांहीं मिश्रण होऊन त्या देशी भाषेचेंच एक वळण म्हणजे उर्दू भाषा होय. नूरनामा रचणारा एक जुना मुसलमान लेखक स्वच्छ सांगतो कीं, 'इसीके सबब मैंने कर फिकरों गौर लिखा नूरनामेको हिंदीके तौरपर' यावरून मुळारंभीं हिंदी-उर्दूंत कांहीं म्हणण्यासारखा भेद नव्हता हें स्पष्ट होईल. म्हणूनच नूरनामाकारानें आपल्या ग्रंथाच्या भाषेला हिंदी असें नांव दिलें आहे.

## उर्दू लिपिचा प्रसार

उर्दू लिपीचा आज अनेक शतकें एका विशिष्ट वर्गांत प्रचार जारी आहे म्हणून आणि एरव्हीहि उर्दू साहित्यांत रसिकगणाचा पुष्कळ भाग आहे, एतदर्थ नि त्याचप्रमाणें आजच्या हिंदुस्थानाबाहेरहि उर्दू भाषेचा स्वीकार झाला आहे, इत्यादि निरनिराळ्या कारणास्तव ज्याची इच्छा असेल त्यानें उर्दूचें अध्ययन केल्यास तें केव्हांहि इष्टच मानावें लागेल. उर्दू लिपीचा अभ्यास प्रत्येकास सक्तीचा करणें हें उत्साहातिरेकाचें लक्षण होय. ज्यांना त्याची आवश्यकताच आहे त्यांना तें शिकावें व शिकवावें लागलें तर त्यांत कांहीं हानि नाहीं. रोमन लिपि देखील त्याचप्रमाणें. तिचें आजचें जागतिक स्थान लक्षांत घेतां जो कोणी ती शिकेल त्याचा फायदाच होईल; पण सर्रास नियम म्हणून संविधानांत मान्य केल्याप्रमाणें व व्यवहार आणि परंपरा यांना धरून देवनागरी लिपीच आपली प्रधान लिपी राहिली पाहिजे आणि तिचा अभ्यास सक्तीचा केला पाहिजे. तो निरपवादपणें केला पाहिजे.

लिपीविषयक हा दृष्टिकोन आम्ही अनेक वर्षें मांडीत आलों आहोंत. इ. स. १९४० च्या सप्टेंबर महिन्याच्या 'सबकी बोली' या मासिकाच्या अंकांत संपादक श्री. काका कालेलकर यांनीं "आमचीं २५ सूत्रें" प्रसिद्ध केलीं आहेत त्यांतील १८ वें सूत्र येणें प्रमाणें आहे. 'देवनागरी लिपीहि हमारी राष्ट्रलिपि हो सकती है। नहीं वह है ही।' त्या वेळच्या सरकारनें हिंदी शिक्षकांसाठीं दोन्ही लिप्या शिकणें आवश्यक केलें होतें आणि त्या धोरणाचा आम्हांस स्वीकार करणें भाग होतें. पुढें १९४५ मध्यें श्री.

शंकरराव देव आणि श्री. द. वा. पोतदार या उभयतांच्या सहीनें 'महाराष्ट्र आणि राष्ट्रभाषा संघटन, नवी योजना' या नांवाचें जें पत्रक प्रसिद्ध झालें आहे; त्यांतहि 'नागरी व उर्दू या दोन्ही लिप्या शिकण्याची प्रत्येक राष्ट्भाषेच्या अभ्यासकावर सक्ति केली पाहिजे हें म्हणणें आम्ही ग्राह्य करूं शकत नाहीं......ही दोन लिप्यांची सक्ति कार्यारंभास बाधक झाल्याशिवाय राहणार नाहीं असें आम्हांस वाटतें." असे स्पष्ट विचार नमूद केले आहेत यावरून सत्यप्रिय वाचकांचें समाधान होईल असा आम्हांस भरंवसा आहे. विधान परिषद संविधानाचा विचार करीत होती त्या वेळेस महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेतर्फे जें निवेदन सादर करण्यांत आलें त्यांतहि 'उसकी प्रधानलिपि देवनागरी हो.' अशीच सूचना केली आहे.

## मुंबई सरकारचें धोरण

मुंबई सरकारनें भारताचें संविधान संमत होण्याच्या पूर्वीच्या काळीं हिंदुस्थानी या नांवानें राष्ट्रभाषेच्या शिक्षणाचें कार्य शाळांतून सुरूं केलें होतें. हिंदुस्तानी म्हणजे हिंदुस्तानांत सर्वांत मोठ्या प्रमाणावर बोलली जाणारी भाषा असल्यानें तिची तोंडओळख सुशिक्षित तरुणांस करून देणें हें आवश्यक असल्याचें सरकारनें १९३९ सालींच जाहीर केलें होतें आणि विद्यार्थ्यास नागरी किंवा उर्दू यांपैकीं कोणत्याहि लिपींतून शिकण्याची मुभा दिली होती. संविधानपूर्वी सुमारें १०.वर्षें मुंबई सरकारनें याप्रमाणें काम केलें. या दहा वर्षांत झालेला वादविवाद पाहिला तर दोन लिप्यांची दिलेली मुभा पुष्कळांस खटकत होती. शिक्षकांवर दोन लिप्यांची सक्ति असल्यानें या खटकण्याला बोचकपणाचें स्वरूप आलें होतें आणि कित्येकांच्या प्रचारांमुळें या बोचकपणाची तीव्रता वाढविण्यांत आली होती; परंतु संविधानानें न्यायपूर्वक देवनागरीचा स्वीकार केल्यामुळें आणि इतर लिप्या शिकण्याचें काम शिकणाऱ्यांच्या इच्छेवर सोंपविल्यामुळें लिपीच्या वादाचा निकाल लागल्यासारखाच आहे. उर्दू लिपीची सक्ति आतां सरकारी क्षेत्रांतून नष्टच झाल्यामुळें वाजवी गाऱ्हाणें कांहीं शिल्लक रहात नाहीं.

भाषेच्या स्वरूपासंबंधानें पाहतां मुंबई सरकारनें हिंदुस्थानीचें चालचलाऊ ज्ञान अपेक्षिलें होतें. हिंदुस्थानी या नांवानें मुंबई सरकारनें हिंदुस्थानांत सर्वसुलभ झालेली आणि म्हणून जिला राष्ट्रभाषा म्हणणें शोभत होतें त्या भाषेचा किंवा भाषेच्या रूपाचा स्वीकार केला होता. संविधानांत

राजभाषेचें नांव आणि संघभाषेचें नांव हिंदी असेंच ठेविलें आहे. नांवापुरतेंच पाहिलें तर या निर्णयाला शास्त्रीय दृष्टीनें कांहीं दोष लावतां येणार नाहीं. हिंदी, हिंदुस्थानी आणि उर्दू हीं तिन्ही नांवें परकीयच आहेत. पैकीं हिंदी हें सर्वांत जुनें; हिंदुस्थानी त्यामागूनचें व उर्दू त्यानंतरचें असा त्यांचा क्रम लागतो. हिंदी नांवानें कदाचित् तें लावलें त्या वेळच्या देशी शब्दभांडाराकडे अधिक लक्ष दिलें असावें. शब्दभांडारापेक्षांहि ती भाषा बोलणाऱ्यांना इतरांनीं जें हिंदु असें नांव दिलें त्या हिंदूंची जी भाषा ती हिंदवी, हिंदुई अथवा हिंदी या क्रमानें हिंदी हा शब्द रूढ झाला असला पाहिजे. एवढा मूलार्थच घेतला तर मराठीला या अर्थानें हिंदी म्हणतां येईल. ज्यांनीं हें हिंदी नांव दिलें त्यांनीं अर्थातच ज्या भाषेचा उपयोग केला, त्या भाषेंत सोईसाठीं मधून मधून आपले शब्द आणि पदावल्या घालून बोलणें अपरिहार्य होतें. हे नवागत हिंदुस्थानचे स्वामी झाले; त्यामुळें त्यांचें अनुकरण होऊन त्यांनीं आत्मसात् केलेलें भाषारूप प्रतिष्ठा पावलें. या रूपालाच पुढें हिंदुस्थानी असें नांव मिळालें. इतर खात्यांपेक्षां लष्करांत या नवागतांचें महत्त्व आणि स्वागत विशेष होत होतें. म्हणून परकीय मिसळीचें प्रमाणहि अधिक होतें. तुर्की भाषेंतून आलेला उर्दू हा शब्द या भाषेच्या लष्करी वळणाला पुढें उपयोजूं लागले; पण सर्वसामान्य लोक हिंदुस्थानी रूपाचाच अधिक प्रमाणांत आश्रय करीत होते. स्थूलमानानें हिंदी, हिंदुस्थानी किंवा उर्दू या तिन्ही नांवानें या संमिश्र भाषेचा बोध होत असे; आणि प्रचारहि होत असे.

## सभेनें स्वीकारलेली व्याख्या

हिंदुस्थानी याच नांवानें सर्व भारतांत समजली जाणारी सामान्य भाषा ओळखली जात असे. म्हणून या नांवाचा स्वीकार मुंबई सरकारनें केला असल्यास त्याचकडे दोष देणें वाजवी होणार नाहीं. हीच गोष्ट स्पष्ट व्हावी म्हणून म. गांधी यांनीं ज्या वेळीं आपण स्थापन केलेली राष्ट्रभाषा प्रचार समिति सोडली आणि म्हणून ज्या वेळीं वर्धा राष्ट्रभाषा प्रचार समितीशीं संबद्ध राहून महाराष्ट्र राष्ट्रभाषा समिति काम करीत होती तिनें वर्धा समितीशीं असलेला संबंध सोडण्याचा निर्णय घेतला आणि आपलें नवें विधान बनवितों, कलह नको, म्हणून आपलें नांवहि बदललें. त्या वेळीं या नव्या विधानांत राष्ट्रभाषेची पुढील सुटसुटीत व्याख्या केली आहे. " भारत वर्षमें आंतरप्रांतीय व्यवहारके लिए जिस एक भाषाका

उपयोग सदियोंसे आम-तौरपर चलता आ रहा है, वह हमारी राष्ट्रभाषा है। इसके लिए हिंदी, उर्दू और हिंदुस्थानी ये तीनों नाम रूढ हैं।" संविधानानें या तीन नांवांपैकीं हिंदी या नांवाचा स्वीकार करण्यापूर्वीहि हिंदी नांवाची ग्राह्यता सभेनें मान्य केलेलीच होती. यास्तव संविधान संमत झाल्यावरहि सभेला आपल्या निर्णयांत कसलाहि बदल करणें आवश्यक पडलें नाहीं. संविधानानें हिंदी हें नांव पसंत केलें तथापि हिंदीच्या संवर्धनाची आणि पोषणाची दिशा दाखवितांना जो आदेशक संविधानांत ३५१ व्या कलमानें दाखल केला आहे तो चिकित्सापूर्वक समजावून घेतला असतां व्यापक आणि सर्वसंग्राहक असाच आहे असें दिसून येईल. इष्ट हिंदीचें पोषण करण्याकरितां हिंदुस्थानीचाहि एक स्रोत ३५१ कलमांत नमूद आहे.

अगदीं अलीकडे शेंपन्नास वर्षांत जें हिंदीचें किंवा उर्दूचें विशिष्ट वळण उत्तर भारतांतील सुशिक्षितांत रूढ होत चाललें आहे त्याला नागरी किंवा साहित्यिक उर्दू म्हणतां येईल. मूळ हिंदीच्या नवीन संस्कृत रूपास हें नागरी हिंदी असें नांव मिळालें आहे आणि मूळ उर्दूच्या अरबी फारसी बहुल रूपास शाही उर्दू असें म्हणणें योग्य होईल.

राष्ट्रभाषा म्हणून मूळ हिंदीचीं हीं दोन्ही अपत्यें अखिल भारतीय म्हणून सर्वमान्यता कधींच पावलीं नव्हतीं व पावणार नाहींत. अखिल भारतीय सर्वमान्यता हिंदीच्या ज्या ज्या रूपास लाभली होती तें हिंदुस्थानी या नांवानें प्रसिद्ध असलेलें रूपच राष्ट्रभाषेचें कार्य करण्यास सर्व दृष्टीनें अधिक पात्र होतें.

स्वतन्त्र भारताची भाषा म्हणून संविधानानें हिंदीचा संकल्प सोडला आहे अशी स्वतंत्र भारताची भाषा केवळ चालचलाऊ असून चालणार नाहीं. तिला अधिक प्रतिष्ठित रूप दिलें पाहिजे. असें प्रतिष्ठित रूप तिला देत असतां, त्या कामीं भारतांत हजारों वर्षें रूढ असलेल्या अनेक देशी भाषांचा सहायक म्हणून उपयोग केला पाहिजे. बोलचालीची किंवा चालचलाऊ हिंदुस्थानी हिचाहि असाच उपयोग केला पाहिजे. अशा अनेक प्रकारानें जुन्या हिंदीचें किंवा हिंदुस्थानीचें संवर्धन केलें पाहिजे. या संवर्धनाची दिशा दाखविणें हेंच ३५१ व्या आदेशकाचें प्रयोजन आहे. एखाद्या भाषेचें

विशिष्टीकृत आणि परिणत असें साहित्यिक किंवा नागर रूप हेंच जर सार्वभारतीय करावयाचें असतें तर ३५१ व्या आदेशकाचें प्रयोजनच नव्हतें. अशा सर्व साहित्यिक भाषांचा ८ व्या परिशिष्टानें एक पोषक वर्ग बनविला आहे व अपेक्षित हिंदीचें पोषक या पोषण वर्गानें करावयाचें आहे. या पोषक वर्गांतच हिंदी हें एक नांव आहे, तें अर्थातच साहित्यिक किंवा नागरी हिंदीस अनुलक्षून घातलें आहे. तसें समजल्याशिवाय अपेक्षित पोष्य-पोषक भाव स्पष्ट होणार नाहीं.

## संविधानानें केलेलें समर्थन

अशी वस्तुस्थिति असल्यामुळें संविधानपूर्वकाळीं मुंबई सरकारनें मर्यादित हेतूनें आणि व्यापक दृष्टीनें ज्या हिंदुस्थानीचें शिक्षण चालू केलें ती मुंबई सरकारची दिशा आणि धोरण संविधानाच्या ज्या दिशेनें वाटचाल चालू केली आहे त्या दिशेकडेच वळलेलें होतें आणि म्हणून मुंबई सरकारास मागें न जातां सरळ पुढें जाण्यास संविधानानें मार्ग खुला केला हें स्पष्ट आहे. संविधानानें मुंबई सरकारच्या मागील धोरणाचें एकपक्षी समर्थनच केलें आहे.

संविधानांतील आदेशकानें दाखविलेली दिशा ज्यांना मनांतून पटत नाहीं त्या आणि संविधानांतील ३५१ वें आदेशक बदलून घ्यावें असेंहि ज्यांना वाटत असेल तेच लोक ३४३ अन्वयें स्वीकारलेल्या हिंदी नांवाचा बोभाटा करून नागरी हिंदीचाच संविधानानें स्वीकार केला आहे असें निराधार प्रतिपादन करतात आणि पोतदार समितीच्या निर्णयावर आग पाखडीत असतात. परिशिष्टांतील हिंदी आणि ३५१ व्या कलमांतील हिंदी यांत क्रमप्राप्त असलेल्या पोष्य-पोषक भावांचें युक्ति-सिद्ध प्रतिपादन करून पोतदार समितीचें खंडन करीत नाहींत.

अहवालांत पोतदार समितीनें कोणत्याहि परीक्षेची मान्यता किंवा अमान्यता यांची विशिष्ट अशी चर्चा केली नाहीं. संविधानाचा समर्पक अर्थ काय निघतो त्याचें विवरण करून सांगणें पोतदार समितीस आवश्यक होतें. हें विवरण सरकारनें स्वीकारल्यानंतर त्यांतील धोरणांस अनुसरून जेथें काम होत असेल तेथें तें सरकारी मान्यतेला पात्र होईल.

—' दैनिक लोकसत्ता ' मुंबई, एप्रिल १९५२

संविधानांतील ३४३ व्या अनुच्छेदांत भारत सरकारची राजभाषा देवनागरी लिपींत लिहिलेली हिंदी राहील असें म्हटलें आहे; आणि अनुच्छेद ३५१ हा हिंदीविषयक भारत सरकारचें कर्तव्य स्पष्ट करणारा असा आहे. अनुच्छेद ३४४ अन्वयें भारताचे राष्ट्रपति यांनीं संविधान संमत झाल्यापासून पांच वर्षें होतांच एक प्रातिनिधिक भाषासमिति नेमावयाची असून या समितीनें राजभाषा हिंदीच्या क्रमिक प्रगतीबद्दल आणि अनुषंगिक प्रश्नाबद्दल राष्ट्रपतींस शिफारशी करावयाच्या आहेत. अनुच्छेद ३४४ व अनुच्छेद ३५१ मध्यें आठव्या परिशिष्टाचा उल्लेख आहे. संविधानांतील या आठव्या परिशिष्टांत चौदा भाषांची यादी दिलेली आहे. तिच्यांत ३४४ मध्यें ज्या भाषांचे प्रतिनिधी बोलवावयाचे आहेत त्या भाषांचीं नांवें राष्ट्रपतींना उपलब्ध करून दिलेलीं आहेत आणि अनुच्छेद ३५१ मध्यें इष्ट हिंदीच्या पोषणार्थ ज्या भाषांचे अंश आत्मसात् करावयास सांगण्याचा आदेश आहे त्या भाषांचीं नांवें नमूद केलीं आहेत.

भारतांत देवनागरीशिवाय देवनागरीच्या मुळांतून निघालेल्या अनेक लिप्या चालत आहेत. शिवाय युरोपियनांच्या संसर्गानंतर रोमन लिपीचाहि प्रचार सर्वत्र झालेला आहे आणि आजहि प्राधान्येंकरून सरकारी कामांत तिचाच अवलंब होत आहे. तसेंच मुसलमानी अमलामुळें फारसी-अरबीमूलक उर्दू लिपीचाहि प्रचार चालू झाला आणि तोहि सांप्रत पुष्कळ प्रमाणांत रूढ आहे. राज्यभाषा हिंदी आणि देवनागरी लिपी यांचा व्यवहार स्थापित करण्यासाठीं संविधानांतील १७ व्या विभागांत स्थूलमानानें पंधरा वर्षांचा काळ नेमला आहे.

संविधानांतील पहिल्याच अनुच्छेदांत भारत हा प्रदेशराज्यांचा संघ राहील असें सांगितलें आहे. अर्थातच भारत हा केवळ एकरंगी, एकदेशी, एकराज्यशासित भूभाग नाहीं. एकराज्यान्तर्गत अनेक उपराज्यें समाविष्ट असलेला तो भूभाग आहे. एकराज्यान्तर्गत म्हणण्यापेक्षां एकराज्याधीन म्हणण्यानें वस्तुस्थिति अधिक स्पष्ट होईल. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें तर शासनदृष्टचा भारत हा एखादा राज्यसंघ नसून भारत हें संघराज्य आहे.

अर्थातच वर सांगितल्याप्रमाणें अनेक प्रादेशिक राज्यें मिळून हें संघराज्य झालें आहे. भारतांत असलेलीं हीं प्रदेशराज्यें किंवा राज्यप्रदेश भारताइतकींच प्राचीन असून त्यांतील प्रजा भिन्नभिन्न भाषा बोलणारी आहे. अशा भिन्न-भिन्न भाषा जरी अनेक असल्या, तरी त्यांतील बहुसंख्य भाषा संस्कृत-प्राकृतोद्भवच आहेत. त्यामुळें त्यांत मूलभूत ऐक्य पुष्कळच आढळून येतें. द्राविड कुलांतील भाषा कदाचित् संस्कृत प्राकृतोद्भव भाषांहूनहि अधिक प्राचीन असण्याचा संभव आहे. या द्राविड भाषाहि भारतांत बद्धमूल आहेत आणि या द्राविड भाषांवरहि संस्कृत-प्राकृतांचा अतिशय परिणाम झाला आहे. शिवाय धर्मसंस्कृतिदृष्टयाहि एकतेचीं पुष्कळ बीजें अखिल भारत-वर्षांत शतकानुशतकें वाढीस लागलेलीं आढळून येतील. अशा या एकतेच्या परंपरेंत वैचित्र्यालाहि भरपूर वाव देण्यांत आलेला आहे. भारताचा विस्तार खंडप्राय आहे. विविध प्रकारचें हवापाणी, विविध प्रकारची जमीन, पिकें-धातुसंचय वगैरे सृष्टसंपत्तीची वांटणी भारतांत झालेली आढळून येते. विविध वंशांतील लोकहि भारतांत येऊन व राहून एकरूप झालेले आहेत. तात्पर्य, एकता आणि विविधता यांचा अत्यंत मनोहर संगम भारताच्या विकासांत आढळून येतो. भारतांतील दीर्घदर्शी चिंतक, प्रतिभासंपन्न कवि, कुशल राजनीतिज्ञ, त्यागी आणि समदर्शी सत्पुरुष, चतुर व्यापारी, विविध कलांचे उपासक इत्यादिकांनीं भारताची ही एकतामूलक वैचित्र्यसंपन्न संस्कृति शतकानुशतकें परिश्रम करून विकसित केली आहे. अनेक महान् आपत्तीशीं टकरा देत भारत आणि भारताची संस्कृति हीं दोन्हीहि अशोष्य राहिलेलीं आहेत हें लक्षांत घेतल्यास, एकराज्याधीन अनेक प्रदेशराज्यें भारतांत असल्यामुळें आणि तीं पुढें राहावयाचीं आणि टिकवावयाचीं असल्यामुळें निष्कारण सचिंत न होतां उल्हसित वृत्तीनें परंतु जागरूकपणें आपलीं कामें करीत गेल पाहिजे. हीं कामें करण्यासाठीं भाषेची आवश्यकता आहे आणि भारतीय संविधानांत भारतीय कामासाठीं देवनागरी लिपींतील हिंदीचा स्वीकार करण्यांत आला आहे. तथापि प्रदेश-राज्यांतील भिन्न भिन्न भाषांनाहि विकसित होण्याची सोय संविधानांत केली आहे. भारत हें गणतंत्र, स्वयंप्रभु लोकराज्य राहणार अशी प्रतिज्ञा संविधानाबरोबर स्वीकारण्यांत आली आहे. लोकतंत्र गणराज्यांत लोकेच्छा ही निर्णायक मानण्यांत येते.

यामुळेंच लोकेच्छा अथवा लोकमत प्रबळ सुसंघटित करण्यासाठीं प्रधान साधन भाषा हें आहे. इतकेंच नाहीं तर लोकजीवन सुसस्कृत आणि सुसंपन्न करण्यासाठींहि भाषेचें अतोनात महत्त्व आहे. ज्ञान आणि विचार हा सर्व प्रगतीचा पाया आहे आणि या ज्ञानासाठीं व विचारासाठीं भाषेची अत्यंत आवश्यकता आहे. अनेक भाषा असलेल्या भारतांतील भाषांचा प्रश्न असाच ज्ञानपूर्वक आणि विचारपूर्वक सोडविला पाहिजे. पैकीं भारतांतील राज्यभाषेचा प्रश्न संविधानांतील १७ व्या विभागांत निर्णय करून सोडविण्यांत आला आहे.

## संपन्न प्रादेशिक भाषा

पण भारतांतील लोकप्रदेशांत ज्या अनेक संपन्न भाषा शतकानुशतकें विविध रूपांनीं आणि मार्गांनीं लोकजीवन संपन्न करीत आलेल्या आहेत, त्यांच्याविषयीं संविधानांत कोणतें दिग्दर्शन केलें आहे हेंहि लक्षांत घेणें आवश्यक आहे. संविधानांत एक निर्णय पक्का करण्यांत आला आहे आणि तो म्हणज इंग्रजांच्या शासनामुळें शासनभाषा बनलेल्या इंग्रजी भाषेचा शासनक्षेत्रांतून त्याग करणें हा होय. इंग्रजीचा त्याग करून हिंदीची घोषणा संविधानानें केलीच आहे; परंतु ही गोष्ट एकदम अंमलांत आणणें दुर्घट असल्यामुळें त्यासाठीं पंधरा वर्षांचा काल आंखून घेतला आहे. या कालांत विविध योजना आणि कार्यें पार पाडलीं पाहिजेत, तेव्हांच या घोषणेला प्रत्यक्षता आणि सार्थकता लाभेल.

सार्वभारतीयेतर क्षेत्रांतील प्रादेशिक भाषांबाबत संविधानांत दोन दिशा दाखविल्या आहेत. यांतील एक दिशा अनुच्छेद २९ मध्यें ग्रथित झाली आहे; ती अशी कीं, भारतांतील कोणत्याहि प्रदेशांत राहणाऱ्या कोण्या एका नागरिकसमूहाची स्वतंत्र भाषा, लिपि किंवा संस्कृति जी असेल तिचें संरक्षण करण्याचा त्या समूहास अधिकार राहील म्हणजे संविधानांत हा प्रश्न लोकेच्छेवर किंवा लोकमतावर सोंपविला आहे त्यामुळें लोक-नेत्यांची आणि समस्त नागरिकांची जबाबदारी वाढलेली आहे. ही जबाब-दारी ओळखण्यांत किंवा यथार्थपणें पार पाडण्यांत आळस, कसूर किंवा चूक झाल्यास अनेक अनिष्ट परिणाम संभवतात. म्हणून विचारी आणि ज्ञानी पुरुषांनीं याकडे विशेष लक्ष पुरविणें अगत्याचें आहे. अनुच्छेद २९ अन्वयें भिन्न-भिन्न लोकभाषांचा प्रश्न लोकेच्छेवर सोपविला आहे. दुसरी

दिशा संविधानांतील १७ व्या विभागांतील 'राज्यभाषा' प्रकरणांतील प्रकरण २, प्रादेशिक भाषाविषयक अनुच्छेद ३४५, ३४६ व ३४७ यांमध्यें ग्रथित झाली आहे. हे तीनहि अनुच्छेद लोकभाषांचा प्रश्न लोकप्रतिनिधींनीं बनलेलें प्रादेशिक शासनमंडळ प्रदेशराज्याची शासनभाषा ठरविण्यास मुखत्यार आहे. या लोकप्रतिनिधींच्या शासनमंडळाला तसें वाटल्यास प्रदेशशासनप्रकरणीं हिंदी भाषेचा स्वीकार करतां येईल किंवा आपल्या प्रदेश सीमेंतील लोकरूढ एक किंवा अनेक भाषांचा शासनक्षेत्रांत स्वीकार करतां येईल. म्हणजे येथेंहि हा प्रश्न संविधानानें पर्यायानें लोकेच्छेवर किंवा लोकमतावर सोंपविला आहे.

## लोकमतावर भर

शासनमंडळाच्या अधिकारांत यद्यपि अनुच्छेद ३४५, ३४६ प्रमाणें शासनभाषेचा निर्णय करण्याचा अधिकार संविधानानें लोकेच्छेवर सोंपविला असला तरी, अनुच्छेद ३४७ मध्यें राष्ट्रपतींना संविधानानें फार मोठा अधिकार देऊन ठेवला आहे. तो असा कीं, जर कोण्या एका प्रदेशांतील कोण्या एका मातब्बर लोकसमूहानें कोण्या एका कार्यासाठीं कोण्या एका भाषेची योजना व्हावी अशी इच्छा व्यक्त केली आणि त्याविषयीं राष्ट्रपतींचें समाधान झालें तर ती इच्छा पुरविण्याविषयींचे हुकूम काढतां येतील. येथें हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, जर प्रदेशराज्यांतील शासनमंडळ हें लोकनियुक्तच असलें पाहिजे, तर त्या शासनमंडळाचा निर्णय प्रतिकूल असल्यास तो बाजूला ठेवून विरुद्ध मताच्या लोकसमूहाच्या इच्छेची ( लोकेच्छेची ) हुंडी राष्ट्रपतींना कोण आणि कशी पटवून देऊं शकेल हें सांगणें कठीण आहे. म्हणून अनुच्छेद ३४७ मध्यें राष्ट्रपतींना दिलेले अधिकार शासनमंडळाला डावलून फलित करून घेणें हें जवळ जवळ अशक्य आहे. तथापि, लोकेच्छा जर अत्यंत ज्वलंत आणि प्रबळ झाली, इतकी कीं, प्रातिनिधिक म्हणून निवडलेलें शासनमंडळ हेंहि लोकेच्छेचे किंवा लोकमताचें प्रतिबिंब यथार्थपणें दिग्दर्शित करीत नाहीं असा निर्णय राष्ट्रपतींना घेणें भाग पडावें, तरच या अनुच्छेदानुसार राष्ट्रपतींना कार्यवाही करणें शक्य होईल. याप्रमाणें संविधानांतील मांडणीचा विचार केला म्हणजे लोकेच्छा आणि लोकमत यांवर भाषाप्रकरणीं संविधानांत केवढा भर दिलेला आहे हें कळून येईल. याचाच अर्थ असा कीं, भाषाविषयक नीतीबाबत किंवा धोरणाबाबत

प्रबळ आणि निश्चित लोकमत तयार करून त्याचें प्रतिबिंब प्रदेशराज्याच्या आणि भारताच्या केंद्रराज्याच्या शासनमंडळातूनहि यथार्थपणें आणि ठसठशीतपणे प्रतिबिंबित आणि प्रतिध्वनित होईल अशी दक्षता जनतेनें आणि जनतेला वळण लावणाऱ्या शिक्षकांनी, पक्षनेत्यांनीं आणि संस्थांच्या चालकांनीं सर्वांनींच घेतली पाहिजे. कसल्याहि आणि कोणत्याहि सबबीवर त्यांत ढिलाई येऊं देतां कामा नये.

## द्रविड भाषांसाठीं नागरी लिपि

भारतीय केंद्रसरकारशीं द्राविड प्रदेशराज्यांनाहि पुढेंमागें हिंदींत व्यवहार करणें भाग पडेल. ह्यापेक्षां द्राविड जनतेला हिंदी शिकावीच लागेल आणि केंद्रसरकारशीं हिंदीतून व्यवहार करावा लागेल यांत शंका नाहीं. भारतांतून निघून गेलेल्या इंग्रजीचा पाय आढून धरून भारताच्या पूर्व समुद्र-किनाऱ्यावर द्राविडांना ती आतां कांहीं फार वेळ स्थिर करतां येणार नाहीं. त्यांना हिंदीचा स्वीकार करावा लागेल व तो ते आज करूंहि लागले आहेत आणि पुढें अधिक करतील. एवढ्यापुरता त्यांनीं हिंदीचा स्वीकार केला तरी वर सांगितल्याप्रमाणें द्राविडी भाषांचा जिव्हाळा ते कधींच विसरूं शकणार नाहींत आणि द्राविड भाषा जाऊन हिंदी भाषा द्राविड देशांत सर्व कार्यारूढ होणार नाहीं. त्यांचा हिंदीचा वापर मर्यादितच राहील व इतर सर्व क्षेत्रांत द्राविड भाषांचा अनिरुद्ध संचार होत राहील. आपल्या द्राविडी भाषांतून आपला सर्व कारभार, आपलें सर्व शिक्षण, आपलें सर्व चिंतन-मनन द्राविडांस करावें लागेल; पण द्राविडांस एक गोष्ट करणें त्यांच्याच हिताचें होणार आहे. द्राविडी लिपींचा आग्रह सोडून सर्व भारतीय देवनागरीचा द्राविड भाषांसाठीं वापर करणें इष्ट होईल. देवनागरीचा द्राविडांनीं आश्रय केल्यावर द्राविड वाङ्मयाची अधिकाधिक ओळख द्राविडेतरास होईल आणि त्यामुळें द्राविड-द्राविडेतर यांच्यांतील एकरूपता वाढीस लागेल.

३०।३५ कोटी लोकसंख्येच्या भारत देशांत एका भाषेचें एकछत्री राज्य घडवून आणण्याचें ध्येय केव्हांहि मोहक आणि भव्य असेंच ठरेल; परंतु तें साध्य आहे किंवा नाही हें हजारो वर्षांच्या मानवी लोकस्थितीचा विचार करून आपण अदाजिलें पाहिजे. कारण शुद्ध तर्कानेंच एखादें मोहक चित्र

उभें करावयाचें असल्यास तर्काला येथेंच अडवून ठेवण्यांत अर्थ नाहीं. आपल्या तर्काला या जागतिक एक भाषेच्या टोंकापर्यंत गेल्यावांचून थांबतां येणार नाहीं ! जागतिक एक भाषेची तर्कसिद्ध किमया साध्य कोटींतील नाहीं तर नाइलाजानें अनेक भाषांसह या जगांत नांदण्यास आपण तयार झालें पाहिजे आणि शुद्ध तार्किक आणि मोहक दृष्टिकोणाचा परित्याग करून व्यावहारिक दृष्टिकोणाचा अंगीकार केला पाहिजे. व्यावहारिक दृष्टिकोणाचा अंगीकार म्हणजेच वस्तुस्थितीचें मापन करून आणि शक्याशक्यतेचा विचार करून सर्वांचें जास्तींत जास्त हित कसें साधतां येईल हें पाहणें होय.

## सर्व भाषांचा सुखी संसार

जगांतील सर्व भाषांविषयीं प्रेमभाव मनांत जागविला पाहिजे. भारतापुरतें बोलावयाचें झाल्यास याच सार्वत्रिक प्रेमभावाचा आपण स्वीकार आणि पुकार केला पाहिजे. " भारतांतील यच्चयावत् भाषा माझ्याच आहेत, माझ्याच बांधवांच्या भाषा आहेत, त्या सर्व भाषांची जोपासना एका कौटुंबिक प्रेमभावानें करणें हें माझें कर्तव्य आहे आणि म्हणून त्या सर्व भाषांच्या समुन्नतीला मला साह्य केलें पाहिजे, त्या सर्व भाषांचा संसार सुखानें आणि मोकळेपणानें चालेल अशी नीति आणि रीति मीं स्वीकारली पाहिजे " असा या स्वीकाराचा आणि पुकाराचा अर्थ होतो आणि तो सर्वांनीं मनांत ठसवून घेऊन त्याकरितां झटलें पाहिजे. अशा झटण्यानेंच इष्ट एकतेचा भक्कम पाया आपणांस घालता येईल, भाषिक एकतेच्या अथवा एकभाषेच्या मोहाला बळी पडण्यानें आपली केवळ फरपट होईल !

शब्दापेक्षां अर्थाला केव्हांहि अधिक महत्त्व आहे. शब्द कोणता कां असेना किंवा निरनिराळे कां असेनात, अर्थ एकच असला पाहिजे. शरीरें भिन्न असतील तर असोत; पण मनें एक असलीं पाहिजेत. जागतिक ऐक्य किंवा भाषिक ऐक्य हें भावनेपेक्षां विचारावर स्थिर केलें पाहिजे. एकाच आई-बापांच्या पोटीं जन्माला आलेली सहोदर प्रजा अगदीं एकच भाषा बोलत असली तरी त्यांचे हितसंबंध आणि विचारधारा जेव्हां भिन्न असतील तेव्हां ती एकमेकांस पाण्यांत पाहून केवळ शत्रुभावाचा अंगीकार करतात आणि एकमेकांचा प्राण घेण्यास उद्युक्त होतात. उलटपक्षीं, जेव्हां हित आणि विचार एक असतो त्यावेळीं अगदी भिन्न-भिन्न भाषा बोलणारे लोक सुद्धां

सहोदरापेक्षांहि अधिक दृढतेनें आणि मित्रभावानें, एकरूपतेनें वागतांना आढळून येतात. हाच मनुष्यस्वभावाचा आणि मानवी इतिहासांतील अनुभवाचा निष्कर्ष आहे. लोकव्यवहाराची आणि राष्ट्रसंवर्धनाची ही कसोटी आपण लक्षांत घेतली पाहिजे. आणि शाब्दिक ऐक्यापेक्षां विचारैक्य आणि हितैक्य यांवर भर दिला पाहिजे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थ
अनुक्रम ........ विः ........
क्रमांक ........ नों. दि: ........

## व्यापक मानसिक ऐक्यधारणा

येथें हें कबूल केलें पाहिजे कीं, असें विचारैक्य साधण्याला भाषा हें एक साधन आहे; पण तेंच एक साधन नाहीं. विचार ज्याच्या त्याच्या मनांत उत्पन्न होतो आणि भाषा ही एकाचा विचार दुसऱ्यांस कळवून त्याचा प्रसार करण्यास उपयोगी होते. विचारांचें उगमस्थान बुद्धि हें आहे. भाषा हें त्याच्या प्रकटीकरणाचें साधन आहे. भाषा दुय्यम, विचार प्रधान असें येथील सूत्र आहे. अधिक विस्तार न करतां वरील विवेचनांतील तात्पर्य ध्यानीं घेतले असतां साधनरूप भाषा ही कोठें, किती आणि कशी वापरावी हा प्रश्न व्यवहारानेंच सोडवावा लागेल. अनेक भाषांतून एक विचार वाढीस लावतां येतो आणि येईल. म्हणून आपला भाषिक प्रश्न सोडवितांना ज्या व्यापक मानसिक ऐक्यधारणेचा वर उद्घोष केला आहे त्याचा घंटानाद आपल्या मनांत आणि मनाबाहेर सतत चालू ठेवला पाहिजे. हा नाद एवढा प्रबळ केला पाहिजे कीं, त्याच्या घोषणा पुढें भाषाभेदांच्या ध्वनिघोषाचा मागमूसहि लागणार नाहीं !

भाषिक आणि वैचारिक ऐक्य यांच्या बलाबलाचा आणि तारतम्याचा राष्ट्रसंवर्धनांतील उपयोग सतत ध्यानीं वागवून भारतांतील भाषासमस्या सोडविली पाहिजे. भारतांतर्गत देशराज्यांत व्यवहार-सौकर्यासाठीं कोणत्या एका भाषा माध्यमाचा स्वीकार आणि वापर कोणत्या मर्यादेनें आणि धोरणानें केला पाहिजे, इंग्रजी-संस्कृत प्रभृति प्राचीन आणि अर्वाचीन संपन्न ज्ञानबलदायक भाषांतून देशी भाषा आणि राष्ट्रभाषा यांचें पोषण योग्य प्रमाणांत कसें केलें पाहिजे इत्यादि सर्व गोष्टींविषयीं आपले विचार निश्चित, स्वच्छ, तर्कशुद्ध आणि राष्ट्रहित पोषक असे असले पाहिजेत. इंग्रजी भाषा कोणीं कोठवर अभ्यासिली पाहिजे हें समजून घेऊन जेथें नको तेथून ती काढून टाकण्याचें ध्येय ठेवून आणि जेथें हवी तेथें ती ठेविली पाहिजे, इतकेंच नव्हे तर तिचा अभ्यास वाढविला पाहिजे, हे ध्यानांत

घेऊन तशी मांडणी मांडण्यास आपण उद्युक्त होऊं. भारतीय भाषांचा सर्वाधार आणि भारतीय संस्कृतीचा मूलाधार असलेली संस्कृत भाषा हिचेंहि अध्ययन व अध्यापन योग्य प्रमाणांत आणि नव्या पद्धतीनें कसें चालवावें हें कळून येईल आणि देशी भाषा आणि राष्ट्रभाषा यांच्या पोषण-संवर्धनांत संस्कृतचा उपयोग कसा करून घ्यावा हें स्पष्ट होईल. फारसी, अरबी, पोर्तुगीज तुर्की आणि द्राविडी भाषा यांच्या द्वारें पूर्वी आपण जें आत्मसात् केलें आणि जें आपल्या भाषांत आपल्या भाषच्या वळणानें एकरूप झालें आणि आपल्या भाषा-संवर्धनास साह्यभूत ठरलें तें काढून फेंकून देण्याचा अवास्तव मोह आपणांस पडणार नाहीं; इतकेंच नव्हे, तर आणखी कांहीं नवे उपयुक्त अंश जगांतील कोणत्याहि भाषेंतून आपणांला आत्मसात करतां आले तर तेंहि निर्भयपणें आपण करून घेऊं शकूं.

## अध्ययनाचें माध्यम

मराठी भाषा-क्षेत्रांत मराठी भाषा जाणणारेच अध्यापक अध्ययन-अध्यापन करतील. मराठी भाषा न जाणणारा अध्यापक हा अपवाद समजावा लागेल आणि त्याची आपणांस विशेष गरज असेल तर विषयानुरोधानें किंवा प्रसंगानुरोधानें हिंदीच काय; पण इंग्रजी किंवा संस्कृत अशा अन्य माध्यमांचाहि मर्यादित वापर अपवाद रूपानें करून घेतां येईल. मराठी विभागांतच असे अध्यापक कायमचे राहूं इच्छितील तर अशा अध्यापकांनीं शक्यतोंवर मराठी भाषा शिकण्याचा प्रयत्न करणें इष्ट होईल. असे बहुभाषी अध्यापक मिळणें किंवा तयार करणें अगदींच कठीण नाहीं. आणखीही कांहीं व्यावहारिक तोडी वेळेप्रमाणें काढून प्रसंग निभावून नेतां येतात. बहुसंख्याकांचें हित प्रधान ठेवूनच अशा प्रश्नांचा निर्णय केला पाहिजे.

भारत हा बहुभाषिक देश आहे. तेथें विद्वान् म्हणून प्रतिष्ठा पावणारांस एकाहून अधिक भाषा आल्या पाहिजेत. स्वतःची मातृभाषा, इंग्रजी अथवा संस्कृत आणि त्याबरोबरच भारतांतील आपल्या मातृभाषेशिवाय दुसरी एखादी प्रौढ देशी भाषा आणि या सर्वांच्या जोडीला सर्वसाधारण जी राष्ट्रीय हिंदी इतक्या भाषांचा वापर करतां आला पाहिजे.

हिंदुस्थानांतील अनेक देशी भाषांत शब्द-साम्य, रूप-साम्य इतकें आहे कीं, त्या भाषांचा वारंवार वापर करण्याचा प्रसंग आला असतां हें साम्य लक्षांत आल्याशिवाय राहणार नाहीं. गुजराती, बंगाली, मराठी, हिंदी या

आर्यकुलांतील भाषांमध्यें आणि बोलींमध्यें आणि एकंदर ठेवणीमध्यें दडून राहिलेलें साम्य हळूंहळूं कळून यऊं लागल्यावर त्यांचा बाऊ वाटणार नाहीं आणि अनेक भाषांत गति करून घेणें तितकेसें अवघड जाणार नाहीं. आज इंग्रजीचेंच स्तोम फार आहे. हें जसजसें कमी होईल तसतसें आपल्या देशी भाषांचें तेज आणि त्यांतील आपलेपणा आपणांस उठावदारपणें दिसूं लागेल. आपल्या पूर्वजांना असाच अनुभव आला असला पाहिजे आणि अडचणींचा जेवढा बाऊ आपणास वाटतो तेंवढा त्यांच्या केव्हांहि अनुभवास आला नसला पाहिजे. आजहि बाजारपेठेंत किंवा तीर्थक्षेत्राच्या ठिकाणीं हा अनुभव आल्याशिवाय राहत नाहीं.

## लिप्यांमधील साम्याची ओळख

आजच्या युगांत लिहिण्याची गरज वाढली आहे, त्यामुळें लिपीच्या प्रश्नांचें महत्त्व वाढलें आहे. भारतांत अनेक लिप्या प्रचलित आहेत. या बहुतेक लिप्या एका प्राचीन मूळ लिपींतील खुणांत थोडी विकृति होत-होत तयार झालेल्या आहेत. त्यांतील साम्याची ओळख पटण्यास जरा अधिक वेळ लागेल म्हणून त्या अनेक लिपींमध्यें सर्वमान्य आणि शिष्ट अशी जी देवनागरी लिपि तिचा भारतांतील सर्व भाषांसाठीं वापर करण्याचा निश्चय आपण केला तर आपलें काम फार सोपें होईल; आपलें भाषिक ऐक्य आपल्या फार लौकर लक्षांत यावयास लागेल आणि आपला सरकारी आणि इतर व्यवहार सुकर होईल. देवनागरी लिपि निरनिराळ्या भाषा वापरणाऱ्यांस फार जवळ आणील. पूर्वींच्या संस्कृत पंडितांस याच लिपीनें एकरूप केलें होतें. तोच परिणाम या लिपीच्या स्वीकारामुळें अखिल भारतावर घडेल. या लिपींत आवश्यक त्या खुणांची भरहि घालतां येईल. उर्दू भाषा म्हणतात ती वास्तविक एक हिंदी भाषा आहे. हिंदुस्थानांत जन्मास आलेली व हिंदुस्थानच्या हवा-पाण्यांत वाढलेली ही भाषा असल्यानें देवनागरी लिपींत ती लिहिली गेली असता तिचा हिंदीपणा आपल्या मनांत चटकन् उतरेल.

नवभारत मासिक, पुणें : एप्रिल १९५२

# ९ : प्रादेशिक भाषा आणि संघ भाषा

राष्ट्रभाषा प्रश्नाची यथार्थ मीमांसा करतांना आपणांला कांहीं स्थिर निर्णय केले पाहिजेत, तेव्हांच यथार्थ असा दृष्टिकोन आपणांला उपलब्ध होईल. भारत हें संघराज्य किंवा संघराष्ट्र या रूपानें नांदावयाचें आहे, ही गोष्ट आपण प्रथम आपल्या मनांत पक्की बिंबवून घेतली पाहिजे. असें करीत असतांना वस्तुस्थिति केव्हांहि दृष्टीआड करतां कामा नये. ज्याप्रमाणें एखादें छायाचित्र घेत असतां चित्रकाराला ठाणमाण काळजीपूर्वक साधावें लागतें, तीच सावधानता येथेंहि बाळगावी लागेल. घ्यावयाची प्रतिमा यथायोग्य यावी म्हणून छायाचित्रकार आपल्या यंत्रस्थापनेसाठीं एक जागा निश्चित करतो. त्याप्रमाणें राष्ट्रभाषेची यथार्थ मीमांसा करतांना आपणांलाहि सर्व प्रश्न बरोबर लक्षांत येईल असा दृष्टिकोन निश्चित केला पाहिजे. छायाचित्रकाराची जागा निवडण्यांत रेसभर चूक झाली तर ज्याप्रमाणें प्रतिमा बिघडून जाईल, तेंच भय या प्रकरणींहि आहे. अनेक संधानें संभाळून हितकर असा दृष्टिकोन आपण साधला पाहिजे.

## संघराज्य व प्रदेशराज्यें

भाषानुसारी प्रदेश आंखून प्रदेशराज्यांची वांटणी भाषावार केली आणि त्या त्या प्रदेश-राज्यांत त्या त्या भाषा प्रभुत्व पावल्या म्हणजे एक प्रदेश-राज्य भाषादृष्टया दुसऱ्या प्रदेशराज्यापासून विभक्त झालेलें दिसेल आणि ह्याप्रमाणें विभक्त झालेल्या भारतीय प्रजा एकमेकांपासून दुरावतील. सर्व भारतीय प्रजा एकरूप नांदविणें हें तर भारतीय संघराज्याचें प्रधान कार्य राहील. हा प्रधान हेतु भाषावार प्रदेशराज्यांच्या स्थापनेनें साध्य न होतां दुरावेल आणि संघभारताचा डोलारा कोसळून पडेल असें भय व्यक्त केलें जातें.

संविधानाचे प्रमुख शिल्पकार आणि विद्वद्-अग्रणी डॉ. आंबेडकर यांचें मत या प्रकरणीं विचारांत घेण्यासारखे आहे. भाषानुसारी असें महाराष्ट्राचें प्रदेशराज्य निर्माण करण्याच्या विचारासाठीं आपले अनुकूल मत डॉ. आंबेडकर यांनीं एका पुस्तिकेच्या द्वारे दार-कमिशनला सादर केलेलें प्रसिद्ध आहे. ( 'महाराष्ट्र ॲज अे लिंग्विस्टिक प्रॉव्हिन्स," ठॅकर ॲण्ड को ) या

पुस्तिकेंत डॉक्टर मजकुरांनीं असें प्रतिपादन केलें आहे कीं, भाषानुसारी प्रांत करावे. परंतु ते एका अटीवर. ती अट अशी कीं या भाषानुसारी प्रदेश-राज्यांत तेथल्या तेथल्या प्रदेशभाषा या केव्हांहि राज्यभाषा असतां कामा नयेत. या म्हणण्याचा अर्थ असा होतो कीं, प्रदेशराज्यें ही भाषानुसारी म्हणावयाचीं; परंतु त्यांच्या राज्यव्यवहारांत ती ती भाषा मात्र नेमकी असावयाची नाहीं. डॉ. आंबेडकर यांचा भर विविध प्रदेशांत जो सांस्कृतिक जीवनाचा एकजिनसीपणा आपणांस आढळून येतो त्यावर आहे. एकजिनसी-पणाच्या आधारावर तेथील प्रदेशराज्यें बनवावयाचीं. म्हणजे महाराष्ट्रांत एक विशिष्ट सामाजिक जीवनाचा एकजिनसीपणा दिसून येतो आणि तसाच तो आंध्र, बंगाल, गुजरात वगैरे विभागांतहि दिसून येतो, म्हणून महाराष्ट्र आंध्र, गुजरात वगैरे प्रदेशराज्यें बनवावीं; परंतु भारतीय ऐक्याला बाध येऊं नये म्हणून या प्रदेशांचा राज्यकारभार त्या त्या प्रदेशांच्या भाषांत म्हणजे मराठी, तेलगु, बंगाली, गुजराती किंवा तामिल इत्यादि भाषांत चालू देतां कामा नये. डॉ. आंबेडकरांना असें भय वाटतें कीं, जर प्रदेश-राज्यांचा राज्यकारभार प्रादेशिक भाषांतून चालविण्यास मुभा दिली तर मग तीं राज्यें स्वयंप्रभु बनण्याची ईर्षा बाळगूं लागतील! तीं परस्परां-पासून दुरावतील आणि भारताचें ऐक्य तडे पडून भग्न होईल. ते असेंहि विचारतात कीं, जर प्रादेशिक भाषांतून प्रदेशराज्यांचा कारभार चालला तर न्यायालयेंहि प्रदेशिक भाषांतून चालतील आणि मग मध्यवर्ति भारतीय न्यायालयाला आपला कारभार कसा करतां येईल? मध्यवर्ति न्यायालय १२-१५ भाषेंत कसें चालवितां येईल? जी गोष्ट मध्यवर्ति न्यायालयाची तीच गोष्ट केंद्रसरकारलाहि लागू पडेल. म्हणून केंद्रसरकारची जी भाषा तीच भाषा प्रदेशराज्याचीहि असली पाहिजे, म्हणजे प्रदेशराज्यांसकट केंद्र-राज्य यांचा कारभार एकाच भाषेंत चालेल. राज्ययंत्र मजबूत राहील आणि भारतीय ऐक्याचें संरक्षण होईल.

असा भाषिक निर्बंध संमत नसेल तर डॉ आंबेडकरांना प्रादेशिक राज्यें मान्य नाहींत. राज्यकारभार जरी प्रादेशिक भाषांत चालला नाहीं तरी तेथील लोकांना आपलें सांस्कृतिक जीवन आपआपल्या भाषांत चालवितां येईल. असें आंबेडकर यांचें म्हणणें आहे. सांस्कृतिक जीवन संपन्न करण्याच्या कामीं

भाषा हें एक प्रमुख साधन आहे हें आंबेडकर कबूल करतात; पण भारतीय ऐक्याच्या रक्षणार्थ राज्यकारभाराची भाषा ते निराळी करूं पाहतात. या विचारसरणींतील विसंगति आंबेडकर यांच्या ध्यानांत आली नाहीं असें नाहीं. प्रदेशाचा राज्यकारभार एका भाषेंत आणि प्रदेशाचें सांस्कृतिक जीवन दुसऱ्या भाषेंत हा प्रकार स्वभावतःच विचित्र होय हें आंबेडकर यांनीं लक्षांत घेतलें आहे; तरीहि त्यांनीं आपली शर्त किंवा निर्बंध घालण्याचा आग्रह आवेशानें प्रतिपादन केला आहे ते उघड म्हणतात कीं प्रदेशराज्याची भाषा आणि तेथील सांस्कृतिक भाषा भिन्न ठेवल्यानें प्रादेशिक संस्कृतीच्या रक्षणास अडचण येईल असें मानण्याचें कारण नाहीं. राज्यकारभाराची भाषा ही केवळ राज्यकारभारापुरतीच चालेल.

## राज्यशासनाची एकच भाषा ?

यावर असा आक्षेप येईल कीं, राज्यकारभाराची भाषा केंद्रांत आणि प्रदेशांत जर एकच ठेवण्याचा निर्बंध आपण पत्करला तर ती राज्य-कारभाराची भाषा केवळ राज्यकारभारापुरतीच मर्यादित राहणार नाहीं. ती हळूहळू जीवनाचीं इतर क्षेत्रेंहि व्यापून टाकील आणि असें झालें म्हणजे अर्थातच प्रांतिक किंवा प्रादेशिक भाषा व्यवहारांतून लयाला जातील. पण आंबेडकर उघडपणें सांगतात की असें झालें तर तें सर्वोत्तम होईल.

भारताच्या प्रस्तुतच्या संविधानांत हा भाषिक प्रश्न पुष्कळ अंशी लोकेच्छेवर व लोकमतावर सोपविण्यांत आला आहे. तें लोकमत म्हणजे प्रबुद्ध मतदारांचें मत होय. प्रबुद्ध मतदार पक्षनिष्ठ असले म्हणजे पक्ष-नेत्यांचें मत हेंच प्रबुद्ध मतदारांचें मत अशी स्थिति होते. प्रबुद्ध मतदारांनीं आपला खऱ्या मताचें प्रतिनिधित्व आपल्या पक्षनेत्यांस करावयास लावलें पाहिजे. पक्षनेत्याच्या मताची ‘ री ’ ओढतां कामा नये, इतकी जागृति प्रबुद्ध मतदारांत निर्माण केली पाहिजे.

एकांतिक एकवादी म्हणून विचारकांचा एक वर्ग हिंदुस्तानांत आहे. या लोकांच्या मतें एक धर्म, एक जात, एक पोषाख, एक भाषा हें सारें एक पाहिजे; म्हणजे भारताला कसलीहि भीती नाहीं ! अशा एक धर्म आणि एक भाषा इत्यादिकांच्यामुळें एक विचार निर्माण होईल आणि तो स्थिर राहील अशी दिशा या लोकांच्या विचाराची असते. याच्या उलट दुसरी विचारसरणी अशी आहे कीं, विचार हा तर्कावर अधिष्ठित असावा लागतो.

भाषा, पोषाख, भोजन हीं सर्व बाह्य साधनें आहेत. यांचें रंगरूप दिसण्यांत निराळें असलें तरीसुद्धां विचारांचें रूप एकरूप राहूं शकतें किंवा राखतां येते. प्रत्येक माणसांत थोडीफार स्वार्थबुद्धि आहे. स्वार्थबुद्धीला न्यायाची जोड दिली पाहिजे. न्याय, सत्य, अहिंसा वगैरे जीं श्रेष्ठ तत्त्वें मानवी व्यक्तींच्या आणि मानवसमुदायांच्या हितार्थ महान् तत्ववेत्यांनी, धर्मशोधकांनीं आणि मानवसेवकांनीं काढून आचरून दाखविलीं आहेत तींच तारकतत्त्वें माणसाला कल्याणप्रद नेतील. जगांत हवापाणी भिन्न आहे, माणसांची रंगरूपें भिन्न आहेत, कृष्ण, रक्त, पीत श्वेत अशा रंगांचीं माणसें आहेत. सगळ्या माणसांचा एक वर्ग आपणाला कल्पितां येतो आणि त्यांच्या हिताचा मनुष्य या दृष्टीनें विचार करतां येतो. माणूस म्हणूनच त्यांचा एक वर्ग आपण कल्पितों. मनुष्यत्वाला प्राधान्य देतों, रंगरूपाला गौणत्व देतों. प्रधान-अप्रधान यांचा विवेक करून आपणांस चालतां येतें. असा विवेक करण्याची बुद्धि माणसाला उत्पन्न करतां येते. ऐक्याची बुद्धि ही प्रधान आहे. भाषा वगैरे हीं साधनरूप आहेत, म्हणून तीं गौण आहेत. मनुष्य हिताविषयीं म्हणजेच सर्वांच्या कल्याणाविषयीं आपल्या मनाला साक्षी ठेवून प्रयत्न करणें ही मुख्य गोष्ट आहे. ‘साधनानां अनेकता’ आणि ‘उपास्यानां अनियमः’ असें धर्माचें लक्षण बांधतांना टिळकांसारख्या विचारवंतांच्या मनांत अशीच व्यापक हितबुद्धि होती.

हिंदुस्थानांतच नव्हे तर जगांत एकभाषा स्थापन व्हावयाचा जो प्रयत्न व्हावयाचा आहे आणि जिचा जन्मकाळ फार जवळ आला आहे असें पाश्चात्य उत्साही प्रचारक मानीत आहेत, त्या उत्साही प्रचारकांच्या वर्गांतच इकडील एकभाषावाद्यांनीं आतांपासूनच सामील व्हावें आणि हिंदुस्थानांत एक भाषा करण्याचा टप्पा आणि खटाटोप गाळून टाकून जागतिक एकभाषेच्या वर्गांत एकदमच उडी मारावी हें अधिक इष्ट नाहीं काय ? असें केल्यानें त्यांचा खटाटोप व वेळहि वांचेल आणि जागतिक वर्गांत एकदम प्रवेश झाल्यानें भावी प्रगतीहि एकदम सुकर होईल. जागतिक भाषेचें जातक सांप्रत वर्तविलें जात आहे, तोंवर आपण आपापल्या भाषांचीं स्थिर आसनें एकदम सोडून देण्याचा विचार करण्यापेक्षां आपल्यापुढें असलेल्या प्रत्यक्ष अडचणींची सोडवणूक अधिक व्यावहारिक पद्धतीनें करूं

शकूं किंवा कसें याचाच विचार अधिक इष्ट ठरणार नाहीं काय ? म्हणून भारतीय ऐक्यसाधनेसाठीं भारतांत एक भाषा रूढ करूं पाहणाऱ्या उत्साही आणि आवेशी प्रतिपादकांनीं आपलें लक्ष जागतिक एक भाषेच्या प्रयत्नाकडे वळविणें त्यांना, आम्हांला आणि जगाला सर्वत्रांनाच अधिक सुखकर ठरणार नाहीं काय ?

## एक-भाषावादाचा परिणाम

ह्यावरून हे लक्षांत येईल कीं, राष्ट्रभाषा आणि एक भाषा असे जे दोन शब्द चर्चा करीत असतांना आपण अनेक वेळां वापरतों त्यांपैकीं एकभाषा या शब्दानें आपण कोणता निश्चित अर्थ अभिप्रेत समजतों तें आपण नीट ध्यानांत वागविलें पाहिजे. ज्या एकभाषावादित्वाचा परिणाम प्रादेशिक भाषांचेहि व्यवहारक्षेत्रांतून निर्मूलन होण्यामध्यें होणार आहे अशा प्रकारची एक-भाषा आपणांस इष्ट आहे कीं, जेथें प्रादेशिक भाषांचा कसलाहि संकोच न करतां त्यांच्यासह गुण्यागोविंदानें नांदणारी एक भाषा या नात्यानें एक-भाषा हा शब्द आपण वापरतों याचा निश्चित निर्णय आपण मनाशीं केला पाहिजे. भाषा म्हटली कीं, तिच्यांत रोजचा फुटकळ व्यवहार, मनोरंजन करणारें साहित्य, विज्ञान आणि उच्च कोटींचें छंदोबद्ध साहित्य असे अनेक प्रकार येतात. या सर्व प्रकारच्या गरजा पुरविणारी एकभाषा रूढ करावयाची असेल तर ती रोजच्या व्यवहारापासून तों थेट विज्ञानापर्यंत आणि महाकाव्या-पर्यंत सर्व क्षेत्रांत अनिरुद्ध संचार करणारी अशी आपली प्रधान भाषा म्हणून तिला वागविलें पाहिजे आणि वाढविलें पाहिजे. उलटपक्षीं कांहीं मर्यादित क्षेत्रांपुरताच जिचा वापर आपणांस करावयाचा आहे आणि म्हणून जिच्यांत महाकाव्याची रचना करण्याचें धोरण आपण मनासमोर ठेवलेलें नाहीं अशी व्यावहारिक भाषा म्हणून एकभाषा आपणांस हवी आहे किंवा कसें याचाहि बोध आपण नीट करून घेतला पाहिजे. संपूर्ण अर्थानें एकभाषा किंवा मर्यादित अर्थानें एकभाषा असा विवेक आपणांस केला पाहिजे.

राष्ट्रभाषा या शब्दाबद्दलहि वरील मर्यादा लक्षांत घेऊनच विचार केला पाहिजे. संपूर्ण भारत हें एकराष्ट्र आहे असें जेव्हां आपण म्हणतों त्या वेळीं तें जर आपण संघराष्ट्र म्हणून एकराष्ट्र असें त्यास संबोधित असूं तर राष्ट्रभाषा हा शब्द वापरतांना आपल्याला निराळ्या अर्थाचा बोध होईल. आणि याच्या उलट एकराष्ट्र म्हणजे सर्वस्वीं एकरूप झालेलें राष्ट्र असें जर

आपण समजत असूं तर अशा एक राष्ट्राची राष्ट्रभाषा म्हणून राष्ट्रभाषा शब्दाचा निराळा अर्थ आपणांस प्रतीत होईल. अशा एकराष्ट्रांत विभाग असतील; परंतु प्रादेशिक राज्यें असणार नाहींत. तात्पर्य, भारत हें संघराष्ट्र आहे असें जर आपण समजत असूं तर त्याच्या या संघरूपाचें यथार्थ स्वरूप आपणांस मनाशीं ठरविल्याशिवाय राष्ट्रभाषा या शब्दाचा आपल्याला योग्य बोध होणार नाहीं राष्ट्रभाषेच्या प्रश्नाची चर्चा करीत असतांना ती केवळ भाषिक भूमिकेवरून करतां येत नाहीं. भारताच्या राष्ट्रस्वरूपाच्या विचाराचा या प्रश्नाच्या विचाराशीं इतका निकट संबंध आहे कीं, त्याचा निर्णय आधीं केल्याशिवाय आपलें भाषाविषयक धोरण निश्चित होणार नाहीं. आपल्या विचारांचा गोंधळ होतो तो या मूलभूत प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्यामुळें होतो. म्हणून भारतीय राष्ट्राचें राजकीय स्वरूप कसें आहे या विषयाची चर्चा आपणांस करावीच लागेल.

## देशाच्या राजकीय रूपाचा विचार

भारताच्या राजकीय रूपाचा विचार करीत असतांना आपण, त्याची आजवरची परंपरा, सामाजिक घडण आणि जागतिक स्थितींत झालेलें आणि होत असलेलें परिवर्तनहि लक्षांत घेतले पाहिजे. त्यांना अनुसरून आपल्याला निर्णय करावा लागेल. राजकीय घडण ही मनुष्याची कृति आहे. व्यवहार परंपरा, परिस्थिति यांचें योग्य आकलन करून सर्व प्रजांचें तात्कालिक आणि सार्वकालिक सुखसंवर्धन ज्या कोणत्या उपायांनीं साधेल त्याचें गणित करून इष्ट उत्तर काढलें पाहिजे. संघराष्ट्राचेहि भिन्न प्रकार संभवूं शकतात. प्रस्तुत ज्याला आपण अमेरिका म्हणून ओळखतों तेंहि एक संघराष्ट्र आहे. एक-भाषा बोलणारे कित्येक लोक मायदेश सोडून अमेरिका खंडांत वसाहती करून राहिले. प्रत्येक वसाहत आपणांस स्वतंत्र समजत होती. पुढें स्वहितार्थ या सर्व वसाहतींचा एक संघ बनला. तोच आज 'अमेरिकेचीं संयुक्त संस्थानें' किंवा अमेरिका या नांवानें ओळखला जातो. नवा रशिया हाहि असाच एक संघ आहे; पण त्यांत अनेक भाषा बोलणारीं राष्ट्रें समाविष्ट आहेत. तथापि अमेरिका आणि रशिया यांची राज्यघटना कांहीं एकरूप नाहीं. आपला भारतवर्षहि संघराष्ट्रच आहे. तथापि मूळ निरनिराळीं संस्थानें किंवा राष्ट्रें यांनीं आपखुषीनें एकतंत्रानें वागण्याचें ठरवून प्रस्तुतच्या भारतवर्षाची निर्मिति

झालेली नाहीं. भारतवर्षांत स्वतंत्र राष्ट्रें होऊन गेलीं, तशीं साम्राज्येंहि होऊन गेलीं. त्यांतील कांहीं स्वकीयांचीं झालीं आणि कांहीं परकीयांचीं झालीं. परकीय साम्राज्य स्थापकांपैकीं मुसलमान हे येथें आल्यानंतर थोडच्या कालानें ते येथें स्थायिक झाले. परकीय इंग्रज येथें आले, त्यांनीं हिंदुस्थानावर साम्राज्य स्थापलें; परंतु ते कांहीं येथें स्थायिक झाले नाहींत. आज तर ते आपलें भारतीय साम्राज्य सोडून येथून निघून गेले आहेत. भारतवर्षांत कितीहि भेद असले आणि भेदांमुळें कितीहि कलह झाले असले तरीहि येथील सर्व समाज परस्परांची एकरूपता ओळखूनच बहुतांशी वागत आलेला आहे.

## एकसंघ राष्ट्र-निर्मिति

भारतातील लोक एकरूप आहेत याविषयीं शंका नाहीं. पूर्वकाळीं बाहेरचे अनेक लोक हिंदुस्थानांत आले; पण ते इतके एकरूप होऊन गेले कीं, त्यांना त्यांच्या निराळेपणाचे विशेष स्मरण नाहीं. या सर्वांत मुसलमान हे मागाहून आलेले आहेत आणि त्यांची संपूर्ण एकता अद्यापि पूर्णावस्थेला गेलेली नाहीं. आतां जगांत लोकशाहीचें युग अवतरलेलें आहे. त्यामुळें विविध लोकसमूहाची अस्मिता जागृत होत आहे. आदिवासी या नांवानें ओळखले जाणारे लोक अस्मितेचा नवा हाकारा देऊं लागले आहेत. या सर्व समस्या सोडवून भारतीय लोकसमूहांतील फटी बुजवून, एकसंघ बलिष्ठ आणि सुखी भारत आपणांस उभा करावयाचा आहे, असा हा प्रश्न फार गुंतागुंतीचा आहे. व तो कौशल्यानें सोडविला पाहिजे. जगांत अवतरलेल्या नवीन यांत्रिक युगाच्या प्रेरणा आणि प्रभाव यांचाहि विचार आपणांस केला पाहिजे. हा सर्व विचार करीत असतांना आपल्या मनाची ओढाताण होते. हिंदुस्थानांत जागोजागी अनेक भाषा आहेत. त्यांचा विचार मनासमोर आला म्हणजे एकदां वाटतें कीं, लोकशाहीच्या संवर्धनासाठीं या भाषांचें संरक्षण आणि संवर्धन करून लोकांना उन्नत आणि सुखी करावें; पण त्याच वेळीं ही अडचण पुढें उभी राहते कीं, दहा-वीस भाषा निरनिराळ्या चालून एकरूप भारताची नांदणूक कशी घडून आणतां येईल ? अशी एकरूप नांदणूक घडवून आणावयाची तर त्यासाठीं एकभाषेची अत्यंत गरज आहे. किंबहुना, अशा एकभाषेशिवाय आजच्या यांत्रिक युगांत आपला निभाव कसा लागेल ? मग विविध लोकभाषा अथवा प्रादेशिक भाषा या

अनुक्रम........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........


उपायकारक वाटण्याऐवजीं अपकारकच वाटूं लागतात आणि 'त्यांची अडचण आपल्या मार्गांतून दूर होईल तर बरें' असा पुसट साक्षात्कार आपल्या अंतर्मनाला होऊं लागतो ! एकदम तसें बोलावें तर धीर होत नाहीं. एकदम तें साधेल असें वाटत नाहीं. मग मन युक्तीची वाट शोधूं लागतें. प्रादेशिक भाषांच्या संरक्षणार्थ पोकळ आश्वासनें देत देत आणि एकभाषेची सहज समजणारी निकड लोकांपुढें मांडीत मांडीत, एकभाषेचें क्षेत्र निरनिराळ्या मार्गांनीं वाढवीत आणि रेटीत न्यावें म्हणजे प्रादेशिक भाषांची कटकट आपोआपच दूर होईल अशाहि क्लृप्त्या सुचूं लागतात ! एकभाषेविषयीं लोकांच्या उत्साहाचा फायदा घेऊन तिचेंच घोडें पुढें दामटीत न्यावें असे उपाय सुचूं लागतात. अशा गोंधळाच्या परिस्थितींत कोणता मार्ग योग्य होईल याचा निर्णय समंजसपणानें केला पाहिजे.

## नागरी लिपीचा व्यवहार वाढवावा

नित्यनैमित्तिक व्यवहारापासून तों महाकाव्यापर्यंत अधिराज्य करणारी एक-भाषा आपणांस करणें आवश्यक आहे काय ? आवश्यक वाटलें तरी तें सुशक्य आहे काय, याचा यथायोग्य निर्णय आपणांस आवश्यकच असेल तर मग कसेंहि करून सुशक्य केलें पाहिजे; पण जर आपणांला असें दिसलें कीं, महाकाव्य एकच असण्याची म्हणजे एकभाषेत असण्याची आपणांला तितकी आवश्यकता नाहीं तर आवश्यकतेचें क्षेत्र निश्चित करून आणि तशा उद्योगाला लागलें पाहिजे. आवश्यकतेचें हें सार्वभारतीय क्षेत्र कोणतें ? जर प्रदेशराज्यें प्रदेशांतील कारभार करणार आणि प्रदेशांतील बहुसंख्य प्रजेचा बहुतेक निर्वाह प्रदेशराज्यांवरच होणार, तर प्रदेशराज्यांतील बहुसंख्य प्रजेचें कार्य प्रादेशिक भाषांवर भागूं शकेल अशा प्रादेशिक भाषा हें कार्य भागावण्याला समर्थहि झालेल्या आहेत. या सर्व प्रजांना एखाद्या नव्या भाषेची या कार्यासाठीं तादृश गरज नाहीं; पण कांहीं थोडी गरज लागेल. आजच्या यांत्रिक युगांत आपणांला आगगाड्या, मोटारी विमानें यांवांचून राहतां येणार नाहीं. आगगाड्यांची पत्रकें किती लिप्यांत आणि भाषांत काढावयाचीं ? आगगाड्या झाल्यामुळे व्यापारासाठी किंवा यात्रांसाठीं आतां आपणांला इकडे तिकडे जाणें सुलभ झालें आहे मग एका प्रदेशराज्यांतून दुसऱ्यांत आपली गाडी गेली आणि अशा जर भाषा जागजागीं बदलूं लागल्या, तर आपणांस मुक्कामाच्या ठिकाणांचीं नावें कशीं

वाचतां येतील? तेव्हां सर्व भारतभर एकलिपि असणें सुकर व इष्ट होणार आहे. कानडी, गुजराथी, बंगाली वगैरे भिन्न प्रादेशिक लिप्या सोडून सर्व भारतभर एक देवनागरी लिपि चालविण्यानें आपला वेळ व खर्च वांचेल. तेव्हां समजुतीनें आणि समजुती न साधल्यास थोड्याशा जबरदस्तीनें देवनागरी लिपीचा व्यवहार वाढविल्यानें भारतांतील भिन्न भिन्न देशी भाषांचा परिचय आपोआपच वाढूं लागेल.

एकलिपि करण्यानें अक्षर वाचनापुरती आपली अडचण दूर होईल आणि भिन्न-भिन्न देशी भाषांमध्यें जवळीक उत्पन्न होईल; परंतु तेवढ्यानें भाषा-भेदामुळें उत्पन्न होणारी अडचण सुटणार नाहीं. त्यासाठीं एकभाषा अथवा राष्ट्रभाषा यांची गरज राहीलच. फक्त ही एकभाषा आणि प्रादेशिक भाषा यांचीं क्षेत्रें आपण निश्चित करून घेतलीं पाहिजेत. प्रादेशिक भाषांच्या संबंधांत त्या त्या भाषा बोलल्या जातात. तो तो प्रदेश हें त्यांचें व्यवहार-क्षेत्र राहील आणि या क्षेत्रात दैनंदिन व्यवहारापासून तों विज्ञान-महाकाव्यापर्यंत यच्चयावत् सर्वत्र क्षेत्रांत त्यांचा व्यवहार आपल्या प्रादेशिक क्षेत्रांत होईल. त्याच्या प्रदेशांत त्या त्या भाषांना कसलीहि अटक असणार नाहीं. लोकव्यवहार, राज्यव्यवहार, सर्व त्यांतून चालेल. शिक्षणाच्या शाखांत माध्यम म्हणून त्यांचाच वापर होईल. याप्रमाणें प्रादेशिक भाषांचें क्षेत्र निश्चित व्हावें.

## राष्ट्रभाषेचें निश्चित क्षेत्र

आतां भिन्न-भिन्न प्रदेशांतील सामान्य व्यवहारासाठीं वापरावयाची जी एकभाषा किंवा राष्ट्रभाषा त्या भाषेचें क्षेत्र निश्चित करावयाचें. उघड आहे कीं, केन्द्रसरकारचा व्यवहार या भाषेंत चालेल, म्हणजें केंद्रीय लोकसत्ता, केंद्रीय न्यायालय, केंद्रीय सत्तेचा प्रादेशिक राज्यांशीं होणारा व्यवहार केंद्रीय सरकारचा परदेशांशीं होणारा व्यवहार, सर्व भारतांतील लष्करी शाखांतील सर्व व्यवहार, सार्वभारतीय परिषदांचे व्यवहार, सार्वभारतीय संस्थांचे व्यवहार इत्यादि सर्व क्षेत्रांतून या एकभाषेचा वापर करावा लागेल. सार्वभारतीय अशा केंद्रसरकारच्या द्वारें चालणाऱ्या शिक्षण-संस्थांत आणि शिक्षणकार्यांत देखील प्रसंगानुरोधानें या एकभाषेचा उपयोग करावा लागेल. त्याप्रमाणें एकभाषेचें क्षेत्रहि विस्तृत राहील.

कायदे करणें, न्याय देणें वगैरे कामांत कांहीं परिभाषेची योजना आव-

श्यक होईल. जेथें परिभाषेचा संबंध आहे अशी ( technical, legal and scientific ) शास्त्रीय किंवा विधानविषयक जीं क्षेत्रें आहेत तेथें सर्व भारतभर निश्चितार्थात्मक अशी एकच परिभाषा वापरावी लागेल. ही परिभाषा अर्थातच संस्कृत भाषेच्या आधारें रचावी लागेल. अशी परिभाषा निश्चित करण्याचें काम सोपें नाहीं. होतां होईल तों विद्वानांचें एकमत या कामीं विचार-विनिमयानें, चर्चेनें आणि तसें न जुळेल त्या वेळेस कृत्रिम निर्णयानें साधावें लागेल. अनुभवानें यांत कांहीं बदलहि वेळोवेळीं होतील. त्यासाठीं आवश्यक तें स्वातंत्र्य विद्वानांस राहीलच; परंतु जेथें सरकारचा संबंध राहील तेथें असें स्वातंत्र्य उपभोगतां येणार नाहीं. शासनसरकाराला आज्ञा काढूनच या प्रकरणीं निर्णय प्रकट करावे लागतील. शासनक्षेत्राबाहेर प्रयोग करण्यास आणि अनुभव घेण्यास स्वातंत्र्य राहील. याप्रमाणें परिभाषेचा प्रश्न निकालांत कढून ती अडचण दूर करतां येईल. कदाचित् कांहीं वर्षें नवीन परिभाषा रूढ होत असतां तिच्या जोडीला स्पष्टतेसाठीं इंग्रजी शब्द द्यावे लागतील. कालांतरानें या कुबड्या टाकून देतां येतील. ज्यांना निश्चित परिभाषिक म्हणतां येईल अशा शब्दांची व शब्दावल्यांची संख्या शक्य तेवढी मर्यादित करावी लागेल. एकच कायदा मराठींत, बंगालींत आणि कानडी भाषेंत लिहिला जाईल. त्या वेळीं त्यांतील परिभाषिक संज्ञा एकच राहतील; पण वर्णनात्मक भाग त्या त्या भाषांच्या प्रकृतीप्रमाणें तोच अर्थ निराळ्या शब्दांत ग्रथित करील. तसेंच ज्यांना ज्यांना तशी गरज पडेल त्यांना त्यांना वर्णनात्मक भाग समजण्याइतपत आणि समजावून देण्याइतपत एकभाषेचें ज्ञान आवश्यक राहील आणि सरकारी किंवा बिनसरकारी कामासाठीं एका सार्वभारतीय भाषेचा आश्रय करून बोलावें किंवा लिहावें लागेल. तेव्हां परिभाषिक शब्द वापरणें आवश्यक असेल तेथें तें एकरूप राहिल्यानें घोटाळ्याचें कारण उरणार नाहीं आणि वर्णनात्मक भाग समजावून सांगण्याइतपत एकभाषेंत गति असली म्हणजे तीहि अडचण राहणार नाहीं. असें केल्यानें प्रादेशिक भाषांना आपलें क्षेत्र मोकळे ठेवून एकभाषेनें साधावयाचें सर्व कार्य सुखरूपपणें पार पाडतां येईल.

(नवभारत मासिक, जून १९५२)

# १० : सक्ती नको, सोय हवी

इंग्रजी ही कांहीं या देशांतील लोकांची भाषा नाहीं. या देशांतील प्रजा ज्ञानसंपन्न व कर्तृत्वसंपन्न व्हावयाची असेल आणि लोकशाही कारभार शिरावर घेऊन ती यशस्वी करून दाखवावयाची असेल तर प्रजेला देशी भाषांचाच आश्रय करावा लागेल. त्यामुळेंच आपलें सामर्थ्य वाढणार आहे देशी भाषांच्या आशयानें आपलें सामर्थ्य वाढलें पाहिजे व आपल्या आशयानें देशी भाषांचें सामर्थ्य वाढले पाहिजे. याशिवाय दुसरा तरणोपाय नाहीं.

या देशांतील कारभारी भाषा इंग्रजी झाली, त्याला कारण इंग्रजी सत्ता. त्यापूर्वीं अखिल भारतीय कारभार देशी भाषांच्या आशयानें चालत होता अशी इतिहासाची प्रत्यक्ष साक्ष आहे. वास्तविक इंग्रजी भाषेची आमच्या कारभारासाठीं तादृश आवश्यकता नाहीं. ती भाषा आगंतुकपणें राज्यकारभाराची भाषा झाली आणि म्हणून इंग्रज गेले तसेंच कारभारी क्षेत्रांतून इंग्रजीहि गेली पाहिजे. यापुढें इंग्रजीची गुलामी नष्ट झाली पाहिजे असा याचा सरळ अर्थ आहे.

## ज्ञानार्जनासाठीं इंग्रजीचा उपयोग

परंतु इंग्रजीचा आम्हांस कारभारासाठीं उपयोग करावयाचा नसला तरी नवीन ज्ञान मिळविण्यासाठीं इंग्रजीचा अतिशय उपयोग होणार आहे व त्यासाठीं आम्हांला इंग्रजीचें संगोपन केलें पाहिजे. जागतिक व्यवहारासाठीं आम्हांला इंग्रजीचें प्राविण्य राखावें लागेल इतकेंच नव्हे तर तें वाढवावें लागेल. या दृष्टीनें आमच्या अभ्यासक्रमांत इंग्रजी हा विषय ठेवणें जरूर आहे. ज्या पक्षीं आम्हाला अजूनहि इंग्रजीची गरज आहे आणि अशी गरज जागतिक क्षेत्रांतहि यापुढें पुष्कळ वर्षें राहणार आहे त्या पक्षीं इंग्रजी भाषेचें उत्कृष्ट अध्ययन होणें या देशांत यापुढेंहि चालविणें क्रमप्राप्त आहे.

इंग्रजी राजवटींत प्राथमिक शिक्षण सोडलें तर इतर मध्य व उच्च शिक्षण बरींच वर्षें इंग्रजीच्याच द्वारां द्यावें लागत असे. त्यामुळें अर्थात् इंग्रजीच्या अध्ययनाला मध्यम व उच्च शाखांत अग्रमान दिला गेला; परंतु

आतां स्वतंत्र भारताच्या दृष्टीनें यापुढें इंग्रजीची जेवढी व जशी सोय आपणांस पाहिजे आहे तशी आणि तेवढीच आपण केली पहिजे.

आपणास स्वतंत्र भारताच्या वकिलाती जगभर चालवावयाच्या आहेत, तसेंच जगांतील सर्व हालचालींशीं संबंध ठेवावयाचा आहे, भारतामधील सर्व हालचालींची यथार्थ माहिती जगाला द्यावयाची आहे, जगाशीं सांस्कृतिक व व्यापारी संबंध पुष्कळच वाढवाव याचे आहेत. हीं सर्व कामें आतां आपणांस नव्यानेंच करावीं लागतील आणि हीं कामें करण्यासाठीं अगदीं एकमेव नसलें तरी इंग्रजी हेंच आपलें प्रधान साधन राहील. कारभारी क्षेत्रांतहि इंग्रजीची जागा भरून निघेपर्यंत आपणांस पोकळी ठेवून चालणार नाहीं. यासाठीं हिंदीचा उपयोग करण्याचं आपण ठरविलें आहे आणि त्यांत यश मिळण्यास कांहीं कालावधि तरी अवश्य दिला पाहिजे. आपल्या प्रस्तुतच्या कारभाऱ्यांनीं यासाठीं १५ वर्षांचा अवधि सांगितला आहे. नेटाचा प्रयत्न केल्यास या मुदतींत आपणांस आपली अडचण दूर करतां येईल. अर्थात् हें सर्वांच्या एकजुटीच्या प्रयत्नावर अवलंबून आहे. अनाठायीं घाई घातक ठरेल हें खरें आहे, तथापि देशी भाषांचीं क्षेत्रें कारभारी विभागांत आणि व्यवहारांत म्हटलें तर आपणांस उद्यांपासूनहि वाढवितां येतील. मात्र यासाठीं निग्रह हवा.

## भाषेबाबत तिहेरी कामगिरी

अर्थात् आपलें धोरण असें हवें कीं एका बाजूनें देशी भाषांचें क्षेत्र वाढवीत जावें व दुसऱ्या बाजूनें इंग्रजीच्या अवास्तव क्षेत्राचा संकोच करीत जावा. अशी आपली दुहेरी कामगिरी राहिली पाहिजे. दुहेरी ऐवजीं तिहेरी म्हटलें तरी चालेल. कारण आपणांस एका साधारण भाषेचा व्यवहारहि वाढवावयाचा आहे. ४० कोटी प्रजेच्या दृष्टीनें विचार केला असतां वरील सूत्रांत ग्रथित केलेलें धोरण आपण निश्चयानें अमलांत आणलें पाहिजे. आपसांतील भेद आड येऊं न देतां या कामीं नियोजनपूर्वक व्यवस्था केल्यास ही उणीव १०-१५ वर्षांत भरून काढण्याचें सामर्थ्य आपणांस खचित आहे.

आपल्या माध्यमिक शाळांतून इंग्रजीला इंग्रजी राजवटींत अग्रमान होता,

तेव्हांची मांडणी अशी होती कीं, आठवड्यांतील ३४ तासांपैकीं १२ तास केवळ इंग्रजीसाठीं ठेवून हें अध्ययन सतत ७ वर्षें चालत असें व तें इतकें कडकपणें चालें कीं, एखादा विद्यार्थी इंग्रजी विषयांत नापास झाला तर तो कधींच वर चढविला जात नसे. इंग्रजी भाषा परकी असल्यानें अर्थात् इतके तास देऊनहि इंग्रजींत नापास होणारांची संख्या सपाटून मोठी असे.

हरएकाला देशी भाषेंत लिहितां वाचतां आलें पाहिजे. या नियमाला आम्हांला अपवाद करतां येणार नाहीं; परंतु हरएकाला इंग्रजी आलेंच पाहिजे असें म्हणण्याचें बिलकुल कारण नाहीं. तसें म्हणणें अन्याय्य आहे व तसें करणें असाध्य आहे माध्यमिक शाळेच्या शैक्षणिक टप्प्यांत देखील इंग्रजीची सक्ती काढून टाकण्यास आज कसलीच हरकत नाहीं; पण आपल्या राज्यकारभारांत इंग्रजीचा संकोच करण्याचें काम वरील कामाच्या जोडीनेंच चाललें पाहिजे. कारभारी कामावरील इंग्रजीची पकड सैल न करतां केवळ शिक्षणांतूनच इंग्रजीची हकालपट्टी केल्यास कारभारहि धड होणार नाहीं व शिक्षणहि धड होणार नाहीं. देशी भाषांचें पाऊल राज्यकारभारांत निश्चित-पणें प्रत्यहीं पुढें टाकल्याचा अनुभव प्रजेस पदोपदीं मिळाला पाहिजे. म्हणजे प्रजा इंग्रजीच्या अवास्तव व्यामोहांतून मुक्त होईल. केवळ एकाच बाजूनें उचल केल्यास समाजाचा गाडा एकारल्याखेरीज राहणार नाहीं. बोगदा करतांना ज्याप्रमाणें दोन्ही बाजूंनीं छिद्रें पाडीत मध्य साधतात त्याच नीतीचा येथेंहि अवलंब केला पाहिजे. एकाच बाजूनें गर्दी केल्यास प्रजेंत अविश्वास तर वाढेलच; पण असंतोषहि वाढल्याखेरीज राहणार नाहीं.

इंग्रजीची बंदी करण्यामुळें निर्माण होणारी पोकळी भरून काढण्याच्या कामीं निव्वळ हुकूम निरुपयोगी ठरेल. यावर विचारानेंच तोड काढली जावी, उतावीळपणें नव्हे. आपणाला इंग्रजीची सक्ती काढावयाची आहे; पण सोय ठेवावयाची आहे या धोरणाचा अजिबात विसर पडतां कामा नये. सक्ति काढणें व सोय लावणें या दोन्ही क्रिया एकदमच घडल्या पाहिजेत.

सक्तीनें किती भाषा शिकवावयाच्या हा प्रश्न आहे; परंतु ज्याची त्याची देशभाषा ही तर सक्तीनें शिकविलीच पाहिजे याबद्दल वाद असण्याचें कारण नाहीं. जवळ जवळ तेवढीच सक्ती जिला राष्ट्रभाषा म्हणून आपण

सांप्रत म्हणतों त्या संघ भाषेचीहि सक्ति केली पाहिजे हें ओघानेंच येतें. दोन भाषांची याप्रमाणें सक्ति केल्यावर ज्ञानाच्या दृष्टीनें भाषेपेक्षां आवश्यक अशा विषयांची सक्ती केली पाहिजे. केवळ भाषांचाच बोजा वाढविल्यास तो एकांगीपणाचा एक प्रकार होईल; पण जर आपण इंग्रजी भाषा ऐच्छिक करूं तर आपलें काम पुष्कळसें हलकें होणार आहे.

## संस्कृतची सक्ती अनावश्यक

येथें हेंहि सांगून ठेवलेलें बरें कीं, आमच्या भारतांतील प्राचीन संस्कृतीचा व ज्ञानाचा ठेवा असलेली संस्कृत भाषा ज्यांना ज्यांना शिकतां येईल त्यांनीं त्यांनीं शिकावी. तिच्या अध्ययनास व अध्यापनास सर्वतोंपरीं साह्य करावें; परंतु संस्कृतच्या अध्ययनाची सक्ति करणें मात्र आम्हांस मान्य नाहीं. ज्यांना मराठीचें व्युत्पन्न पंडित व्हावयाचें आहे त्यांजसाठीं मात्र संस्कृत व प्राकृत भाषांचें अध्ययन आवश्यक केलें पाहिजे. एतावता सामान्य पदवी-शिक्षणांतून संस्कृताचा भार आवश्यक त्या क्षेत्रांतून कमी करणेंच योग्य ठरेल. मराठीचा व संस्कृताचा निकट संबंध लक्षांत घेतां जेवढें संस्कृतमधील ज्ञान मराठींत आणता येईल तेवढा सर्व उद्योग श्रेयस्कर होय. हरएकाच्या माथीं संस्कृत मारून ज्ञान-संपादनाचा त्याचा मार्ग बिकट करणें आजच्या जनता-युगांत योग्य ठरणार नाहीं. म्हणून सामान्य पदवी शिक्षणापर्यंत एक देशी भाषा व दुसरी संघ भाषा, येवढ्या दोनच भाषा सक्तीच्या ठेवाव्यात व या भाषांत सुशिक्षणाला आवश्यक तेवढें सर्व ज्ञान भरून द्यावें, म्हणजे ज्ञानाची दुबळीक समाजांत भासणार नाहीं आणि भाषा-शिक्षणांतील अनावश्यक बोजा कमी होईल.

इंग्रजीच्या अध्यापनालाहि वरील दृष्टि लावली पाहिजे. आधुनिक ज्ञान मिळविण्याचें आम्हांला उपलब्ध असलेलें महाद्वार म्हणजे इंग्रजी हेंच होय. तरी पण येथेंहि जेवढें आवश्यक आधुनिक ज्ञान इंग्रजींतून आमच्या देशी भाषांत भरून आमच्या लोकांस वाटतां येईल तेवढे सर्व प्रयत्न करण आवश्यक आहे. असें केलें म्हणजे सामान्य पदवी-शिक्षणापर्यंत इंग्रजीचें ज्ञान सक्तीचें न करतांहि आपला ज्ञानमार्ग जनतेला बिनधोकपणें चोखाळता येईल. जुन्या ज्ञानासाठीं आवश्यक असणारें संस्कृत आणि नव्यासाठीं

आवश्यक असणारें इंग्रजी या दोहोंतील ज्ञान जनतेला घरच्या घरीं देशी भाषांत व विपुल प्रमाणांत मिळेल अशी सोय करणें हेंच आपलें परम साध्य होय. हें साधत गेलें म्हणजे अर्थातच इंग्रजी व संस्कृत यांच्या सक्तीचें प्रयोजन सामान्य शिक्षणक्रमांत तादृश राहणार नाहीं आणि त्यामुळें जनतेचा ज्ञानमार्ग सोपा वाहता राहील.

## सखोल अध्ययनाची सोय

ही झाली सामान्य मांडणी; पण आमच्या विशेष गरजांसाठीं आणि विशेष प्रकारच्या पांडित्यासाठीं संस्कृत व इंग्रजी या दोन्ही भाषांच्या अध्ययन-अध्यापनाची विपुल सोय आपण करून ठेवली पाहिजे आणि हौशी विद्यार्थ्यांना त्याचें अध्ययन करण्यास हरएक प्रकारचें प्रोत्साहन दिलें पाहिजे. या दोन भाषांतून ज्ञानग्रहण करण्यास असमर्थ असलेला कोणीहि भारतीय तरुण उच्च पांडित्याच्या दृष्टीनें लंगडा ठरल्याखेरीज राहणार नाहीं. हा लंगडेपणा राहूं नये म्हणून इंग्रजी व संस्कृत या दोन्ही भाषांच्या अध्ययन-अध्यापनाची भरपूर सोय अवश्य केली पाहिजे. इंग्रजीचें कारकुनी ज्ञान पांडित्याची निपज करविण्यास उपयोगी पडणार नाहीं. यास्तव इंग्रजीच्या सखोल अध्ययनाची भरपूर तजवीज आपण केली पाहिजे.

एके काळीं इंग्रजीला अवास्तव महत्व दिल्यामुळें इंग्रजींत नापास म्हणजेच त्या इयत्तेंत नापास असा रिवाज होऊन बसला होता. या पद्धतींत आयुष्याचा फार बहुमोल वेळ, माध्यमिक शिक्षणांत इंग्रजी सक्तीचें असल्यामुळें व्यर्थ जात होता व आतांहि जात आहे. आतां स्वतंत्र भारतांत हें इंग्रजीचें कृत्रिम महत्त्व नष्ट करून इंग्रजीची सक्ति बंद केली पाहिजे. या सक्तीमुळें तरुण विद्यार्थ्यांचा व्यर्थ जाणारा अमोलिक काळ वांचविला जाणें आवश्यक आहे. या वांचविलेल्या काळाचा उपयोग त्याच्या भाषेंतून त्याला विविध प्रकारचें जिवंत ज्ञान देण्याकडे केला पाहिजे. धड ना इंग्रजी, धड ना संस्कृत, धड ना मराठी, सर्व भाराभर चिंध्या ! अशा चिंध्यांची गोधडी पांघरून हिंडण्याचा हास्यास्पद क्रम होईल तितक्या लवकर बंद केला पाहिजे.देशी भाषांतूनच गाढें पांडित्य सहजीं हाताला लागेल अशी सर्व व्यवस्था व्हावी. म्हणजेच आपल्या शिक्षणक्रमांत त्वरेनें क्रांति घडवून आणणें

आवश्यक आहे. ही क्रांति घडवून आणीत असतां आज सुशिक्षित म्हण-विणारांच्या घरोघर सजून बसलेलें ढिसूळ बटबटीत इंग्रजी नष्ट झालें तर त्याचा खेद न मानतां आनंद मानला जावा. इंग्रजी गेल्यावर काळजी येवढीच कीं, निर्माण झालेली ही पोकळी भरून कशी निघेल ? ही पोकळी राहण्याचें भय नष्ट होत नसेल तर थोडी गम खाल्यास चालेल. दुसरें कांहीं परवडेल; पण ही पोकळी परवडणार नाहीं. त्याकरितां देशी भाषा, राष्ट्रभाषा, नवीन ज्ञान, प्रत्यक्ष अनुभव इत्यादिकांच्या योगेंकरून ही पोकळी भरून काढावी; पण हें करीत असतांना संस्कृत व इंग्रजी भाषेचे ज्ञानमार्ग साफ व मोकळे ठेवण्याची दक्षता घ्यावी.

## इंग्रजी ऐच्छिक विषय असावा

केवळ इंग्रजी भाषेचेंच अध्यापन करणाऱ्या स्वतंत्र शाळा अगर संस्था चालविल्या जाव्यात. चालू अध्यापन पद्धतींत असलेली इंग्रजीची सोय इंग्रजी विषय ऐच्छिक करून तशीच पुढें चालविल्यास आपला बराच कार्यभाग साधेल. अनुभवी इंग्रजी शिक्षक आज विद्यमान आहेतच. त्यांच्या हातीं हे ऐच्छिक वर्ग द्यावेत. अशा वर्गाचा फायदा ज्या कोणाची इच्छा असेल त्यांस घेऊं द्यावा. मग तो रीतसर शाळेंत जाणारा असो वा नसो. आज तरी असे वर्ग विद्यार्थ्यांनीं गजबजून जातील आणि या योजनेसाठीं सरकारासहि विशेष खर्च करावा लागणार नाहीं. या वर्गांतून हौशी विद्यार्थी येणार असल्यानें व ते पदरचा पैसा खर्च करणार असल्यामुळें आपलें काम कसोशीनें करतील यांत संदेह नाहीं. शरीरप्रकृतीवर फाजील ताण पडूं न देतां लहान वयाच्या विद्यार्थ्यांनाहि या ज्यादा ऐच्छिक इंग्रजीचा लाभ घेण्यास उत्तेजित केलें तर कांहीं निवडक विद्यार्थी लहानपणापासूनच देशी भाषेंतील प्राविण्यास कमीपणा येऊं न देतां इंग्रजींतील प्राविण्य संपादन करतील. कालांतरानें ते विद्यार्थी इंग्रजीचे गाढे पंडित म्हणूनहि गाजतील; पण आजच्या अनेक इंग्रजी पंडिताप्रमाणें ते देशभाषा किंवा संघ भाषा यांचें लाजिरवाणें दैन्य प्रकट करणार नाहींत. ते सव्यसाची होतील. त्यांचा उपयोग इंग्रजीचें ज्ञान देशी भाषांत आणण्यासाठीं करतां येईल व ते देशी भाषेंतील ज्ञान जरूर तेथें इंग्रजीमधून प्रकट करूं शकतील. अशा रीतीनें जोपासलेल्या इंग्रजीच्या द्वारें भारताचा जगाशीं निकटचा संबंध राहील.

विशेष बुद्धिमान् विद्यार्थ्यांचा वर्ग सोडला तर साधारण बुद्धीचे विद्यार्थी कमी प्रतीचें पांडित्य संपादन करतील. कांहीं विद्यार्थी असें आढळतील कीं त्यांची बुद्धि जरी विजेसारखी चमकली नाहीं तरी समईप्रमाणें, मंद पण सतत तेवणारी असेल, तर अशा विद्यार्थ्यांना अधिक वेळ दिल्यास तेहि गाढे विद्वान् होतील. तूर्त तरी इंग्रजीचें उच्चाटन करूं म्हटलें तरी होणार नाहीं. आज आणि पुढेंहि व्यावहारिक इंग्रजी ज्यांना यावें लागेल असा एक मोठा वर्ग देशांत राहील अशा लोकांसाठीं आमच्या स्वतंत्र इंग्रजी वर्गातून व्यावहारिक इंग्रजी शिक्षणाची सोय केली पाहिजे. लष्कर व व्यापार या क्षेत्रांत अशा हजारों लोकांची गरज पडणार आहे.

प्रारंभिकपासून चढत्या क्रमाचा इंग्रजीचा अभ्यासक्रम ठेवावा इंग्रजीचें देशी भाषांतून अचूक आणि आकर्षक भाषांतर शिकविण्याची कलाहि येथें शिकवितां येईल. उत्कृष्ट इंग्रजी लेखन व भाषण शिकविण्याची सोय यांत असावी. परीक्षांची व्यवस्थाहि कसोशीनें व्हावी. कच्चेपणाला थारा देऊं नये. असें केल्यानें अभ्यासाचा दर्जा सांभाळला जाईल आणि इंग्रजीची सक्ति कमी केल्यामुळें उत्पन्न होणारी पोकळी भरून निघेल.

— केसरी पुणें, २६-८-१९५२

# ११ : समन्वयाची दृष्टि

भारताच्या मूलभूत व्यापक ऐक्याचा साक्षात्कार आमच्या सर्व भाषांतून आला म्हणूनच आम्ही भारतीय या नांवानें आजमितीला जिवत वावरत आहोंत, नामशेष झालों नाहीं. आपली जगन्मार्गदर्शक भगवदगीता, आपलें रसाळ रामायण, त्याप्रमाणेंच आपलें सर्वगुणसंपन्न महाभारत आणि आपलें 'स्वादू स्वादू पदे पदे' म्हटलेलें भागवतहि. संस्कृतांतील हीं रत्नें आपल्या भारतांत सर्व दिशादिशांना पसरलीं. पंपाची रचना कानडींत असेल, कृत्तिवासाची बंगालींत असेल, नाथांची मराठींत किंवा तुलसीदासांची अवधींत असेल; पण या सर्व देशी रामायणांतून गायिलेली सीतारामाची जोडी तीच आहे. रामराज्याचा आराखडा एकच आहे, सर्व सारखेंच आहे. भाषा निराळी असली, छंद भिन्न असले, रसाविष्कार वेगवेगळा असला तरी परिणामाला सर्व एकरूपच असल्याचें आढळून येतें. गुण सर्वांचा सारखाच! त्यामुळे दक्षिणेचा मनुष्य उत्तरेकडे आला किंवा पश्चिमेचा पूर्वेकडे गेला तरी राम-लक्ष्मण किंवा भरत-हनुमान अथवा रावण-बिभीषण इत्यादींची ओळख त्याला कोठेंहि चटकन् होते व तो तत्काळ समरस होऊन जातो! रूप, अलंकार, भाषा, संगीत, भजन-पूजन, मंदिर-रचना इत्यादिकांत पुष्कळ विविधता असूनहि आंतरिक ऐक्याचा गाभा एकरूपच वाटतो. रहस्याला कांहींच खोट पडत नाहीं. उलट, विविधतेमुळें वैभवांत भरच पडते.

जी गोष्ट रामायण-भारत-भागवताची तीच गोष्ट वेदांताची, ब्रह्मज्ञानाची आणि भक्तीची! कितीहि विविध पंथ असोत; पण ब्रह्म, माया, आत्मा, योग, व भक्ति यांची स्थूल ओळख सर्वांस सारखी. थेट असम देशांतील कामाख्येपासून तों मल्याळी देशांतील कन्याकुमारी पावेतों अथवा उडिया-देशांतील जगन्नाथपुरीपासून तों सौराष्ट्रांतील द्वारका-सोमनाथ पावेतों, लहान मोठे, स्पृश्यास्पृश्य, साक्षर-निरक्षर, यच्चयावत् सर्वांना या ज्ञानाचा स्पर्श नाहीं असें नाहीं. स्नान नसलें तरी मार्जन तरी आहे.

शेंकडों योजनें औरस-चौरस पसरलेल्या या विस्तीर्ण भूमींत विविध भाषा, पंथ, राज्यें, जाती, संघर्ष, युद्धें यांच्या कोलाहलांतहि एकता कोणीं

आणि कशी साधली ? वेद-उपनिषदें, स्मृति-न्यायमिमांसा, शास्त्रें-पुराणें हीं तर संस्कृत पंडितांनीं—मग ते भारतांत कोठेंहि रहात असोत—सारखींच राखिलीं. उत्तरेचा पाणिनी दक्षिणेंत पढतात आणि दक्षिणेंतला भास्कराचार्य उत्तरेंत शिकतात. काशीचे पंडित कांचीला येतात आणि कुंभकोणचे केदाराला जातात. हें चक्र सतत चालू आहे आणि या चक्रभ्रमणामुळेंच प्राचीन भारतीय पांडित्य, इतक्या क्रांत्या आल्या गेल्या, तरी अद्यापीहि दृढतेनें उभें आहेत.

परंतु पंडितांनीं पांडित्याला आपल्याच पठडींत कोंडून ठेवलें. बाहेरची जनता त्यांनीं बहुतांशीं उपाशीच ठेवली. या जनतेला मग या पांडित्याचें रहस्य आमच्या साधुसंतांनीं प्रकट केलें ! म्हणूनच त्र्यंबक राजांनीं आपल्या ‘ बालबोध ’ ग्रंथांत सुमारें चारशें वर्षांपूर्वीं असे उद्‌गार काढले :

धन्य धन्य हे मराठी
हे ब्रह्मविद्येची कसवटी
कीं हा द्वारशिलेचे पोटीं
परिसु जाहला ॥ १ ॥

वि ........
नों: दि: ........

ब्रह्मविद्येची कसोटी या मराठी भाषेमुळें तुमच्या दारांत अगदीं उमाठ्यावर आणून ठेवली, किंबहुना तुमच्या उंबरठ्याच्या दगडी पोटांतच हा परिस तुम्हांला गवसला ! आतां हे घरचे रोजचे आईचे मराठी शब्द या अज्ञान जनतेचें सोनें करतील. अशिक्षित ज्ञानी होतील. ब्रह्मविद्या त्यांच्या घरींदारीं खेळेल ! मराठीनें जें केलें तेंच मराठीच्या गुजराती, बंगाली, तामिळ, तेलगू इत्यादि अनेक सख्या-सांगातिणींनींहि करून दाखविलें !

समन्वयाची विविधतेंत एकता खेळविण्याची ही अद्‌भुत कामगिरी भारतांतील साधुसंतांनीं आणि भक्त-कवींनीं करून दाखविली, त्या वेळीं आम्हांला प्रकाश दाखविणारे इंग्रज कांहीं येथें येऊन पोंचले नव्हते !

पूर्वी ‘ स तपस्तेपे ’, तसेंच आतां—!

## ज्ञान-संपादन व भाषेचें कार्य

देशी भाषांनीं वर वर्णिलेला जो चमत्कार पूर्वी करून दाखविला तसाच त्या पुन: करून दाखवूं शकणार नाहींत, असें मानण्याला कांहीं तरी वास्तविक कारण दाखवितां येईल काय ? ‘ हां ! गेल्या पांचशें वर्षांत पाश्चात्य

देशांत जें नवें प्रायोगिक ज्ञान एवढ्या योग्यतेला पोंचलें आहे आणि ज्याच्या बळावर पाश्चात्यांनीं जगावर प्रभुत्व स्थापन केलें आहे, तें सर्व ज्ञान आणि तीं सर्व शास्त्रें आपल्या या देशी भाषांत कोठन सामावणार ?' पण कोणी असा प्रश्न आपल्या मनाला विचारीत नाहीं कीं, या शास्त्रज्ञांनीं तरी हा ज्ञानसंचय केला कसा ? त्यांच्या पाठीशीं ग्रीक, लॅटिन या प्राचीन संपन्न भाषांचीं भांडारें होतीं आणि याचे भाषाबळाच्या पायावर त्यांनीं ज्ञानमंदिरें उभारलीं ना ? हा शब्दावलींचा प्रश्नच नाहीं. हा ज्ञानसंपादनाचा प्रश्नच प्रामुख्यानें आहे. पाश्चात्यांनीं या नवीन ज्ञाननिर्मितीसाठीं केवढे भगिरथ प्रयत्न केलें ! आणि पाश्चात्यांची तरी एक भाषा आहे काय ? स्पॅनिश, रूसी, फ्रेंच, इंग्रजी, जर्मन अशा विविध भाषा त्यांच्याकडे चालू आहेत आणि सर्वांतून हें ज्ञान-संग्रहाचें आणि ज्ञाननिर्मितीचें कार्य अव्याहतपणें चालू आहे. आतां आपल्याकडेहि संस्कृताचें भांडार, एकपरीनें वरचढ म्हटलें तरी चालेल असें संपन्न आहे आणि देशी भाषांचेंहि तेज त्यांनीं प्रत्ययास आणून दिलेलें आहे.

इंग्रज गेले, इंग्रजीहि जाईल; म्हणजे—तिचा व्यामोह जाईल ! डोक्यावर बसली होती ती खालीं आमच्या शेजारीं बसेल. स्वामिनी, सम्राज्ञी म्हणून ती तोऱ्यानें वागे, आतां जिव्हाळ्याची जुनी मैत्रीण म्हणून राहील. ती बोलावी, हुकूम करी तेव्हां आम्हीं जात असू. आतां आम्ही बोलावू तेव्हां ती येईल. तिचा छंद सुटेल; पण तिची संगति अधिकच दृढ होईल.

इंग्रजी बाहेरची; पण सध्यां घरांतच एक नवा व्यामोह आकाराला येत आहे. आम्ही मराठी, गुजराती, बंगाली, तामिळ, व तेलगू या सर्वांना आतां ह्या नव्या युगांत वारंवार भेटावें, बसावें, बोलावें लागेल तसें न होईल तर लोकशाही कशी रुजेल आणि यशस्वी होईल ? सर्वांनीं आपापल्या जागीं बसून आणि सणासुदीला भेटून यापुढें निभाव लागणार नाहीं. अशा आपल्या सर्वांच्या बठका वारंवार भरतील त्या वेळीं व्यवहार कसा व्हावा ? पूर्वींहि आपण जात-येत-भेटत नव्हतों कीं काय? मग त्या वेळीं काय आपण मुकें राहत असूं? कसें शक्य आहे? होती, त्या वेळींहि आपल्यामध्यें एक व्यवहारभाषा होती. तीच आपली 'खडी बोली' आजहि आपल्या कामाला येणार नाहीं काय? ती लवचिक, सर्वांना सुलभ वाटणारी ओळखीची खडी बोलीच आतांहि आपलें

काम भागविण्यास उपयोगी पडेल. युग पालटलें, तसें जीवन पालटलें आहे. जगताचें नांवच 'चालणारें, धांवणारें' आहे. आज तेंच जगत् फार वेगानें भ्रमण करीत आहे. तेव्हां आपलें जीवनहि मंद ठेवून कसें निभेल? आपणांलाहि वेग खूप वाढविला पाहिजे आणि हें काम आपली सुटसुटीत, सहजसुंदर सोपी खडी बोली उत्तम प्रकारें पार पाडील. हिलाच हिंदीहि म्हणतात. तेव्हां तेंच नांव आपण सर्वांनीं पसंत केलें. या सार्वभारतीय सर्वसामान्य व्यवहारासाठीं आपणां सर्वांनीं 'राष्ट्रभाषा' म्हणतात त्या हिंदीचें मोकळ्या मनानें स्वागत केलें पाहिजे. जी सर्वांच्या हिताची बाब तिचें अगत्य आपण निःशंकपणें दाखविलें पाहिजे.

येथेंच एक व्यामोह संभवतो. हिंदीचा छंद तर आपणांला लागणार नाहीं? मग आपली मूळची थोर मऱ्हाठी हळूहळू आपणांला पारखी होईल, असें भय मनांत येईल; तथापि ही भीति व्यर्थ आहे. तलवार जशी रणांगणा-वर उपयोगांत आणावयाची, पण घरांत येतांच ती म्यान करून खुंटीला अडकावून ठेवावयाची, तसेंच हिंदी ही जेव्हां सार्वभारतीय कार्य उरकावयाचें त्या वेळींच वापरावयाची घरांत तिला आणण्याचें काय कारण? राष्ट्रभाषा ही सदा भारतभर फिरत राहणार. ती एका ठिकाणीं कशी राहील? आणि तसें राहून तिच्यावर सोंपविलेलें कार्य व्हावें कसें? अर्थात् घरांत ती आली तर तिला मज्जाव करावयाचा असा अर्थ नाहीं; पण घरांत जी मालकीण आहे तिचाच ताबा घरावर अबाधित चालला आणि चालविला पाहिजे! राष्ट्रभाषेला स्वस्थ बसूं द्यावयाचें नाहीं, तिला राबवून तिच्या-वर सोंपविलेलें कार्य यथास्थित पार पाडून घेतलें पाहिजे. राष्ट्रभाषेला तिच्या कामाप्रमाणें वेष दिला पाहिजे आणि तिच्या योग्यतेप्रमाणें तिचा मान राखला पाहिजे. ती जोंपर्यंत आपल्या नियत मर्यादेंत वागत आहे तोंपर्यंत तिजविषयींच्या आपुलकींत कसलेंहि अंतर पाडतां कामा नये.

जेवढ्या म्हणून भारतांतील भाषा आहेत त्या सर्व आपल्याच भाषा आहेत ही बुद्धि आपण पक्की रुजूं घातली पाहिजे. अशा प्रमुख भाषांचा निर्देश आपल्या संविधानांत केला आहे. आतां सिंधी भाषेची भर या चवदांत घातली पाहिजे आणि या पंधराहि भाषा आमच्या आहेत, भारतीय आहेत, त्यांच्या भरणपोषणाची काळजी न्यायानें आणि प्रामाणिकपणानें आम्हीं साऱ्यांनीं वाहिली पाहिजे, असें शिक्षण आपण सर्वांना दिलें पाहिजे.

## परकीय व स्वकीय

मग एक किंचितसें परिवर्तन आपण लिहिण्या-बोलण्यांत केलें तर हा वरील हेतु अधिक सुलभ रीतीनें तडीस नेतां येईल. मराठी भाषेंत आपण लिहितों, बोलतों तेव्हां मराठी शिवाय इतर भाषांस परकीय' असें संबोधितों. परकीय म्हणजे दुसऱ्याची, एवढाच त्याचा खरा अर्थ आहे. ' अर्थोहि कन्या परकीय एव ' या सुप्रसिद्ध वचनांत हा मतलब मोठ्या मार्मिकपणें उमटविला आहे. कन्या मूळचें घर सोडून दुसऱ्या घरांत जाते मग ती परकीयांची वस्तु होते, आपली सत्ता तिच्यावर रहात नाहीं, तरी मायघराचा हक्क थोडाच तुटतो ? हें असो; पण जेव्हां आपण इंग्रजीलाहि परकीय भाषा म्हणतों तेव्हां आपल्या मनांत काय बोध होतो ? गुजराती, परकी आणि इंग्रजीहि परकी, येथें परकेपणाची जात दोहींकडे एकच आहे काय ? आपण सर्व विवेकी आहांत तेव्हां हा शिथिलपणा तूर्तच्या काळीं काढून टाकणें योग्य होईल. येथें केवळ व्युत्पत्ति किंवा शास्त्रीय शब्दचिकित्सेचा प्रश्न नाहीं. आपणांस ज्या भावनेचें पोषण करावयाचें आहे, जें सौहार्द्र जतन करावयाचें आहे त्याला जे शब्द पोषक असतील त्यांची योजना आपण करावी. विषण्णता, विग्रह यांना बळ देणारे शब्द मागें टाकावे. या भाषांतील कित्येकांना भगिनीवर्गांत आपण घालतों. कांहीं सख्ख्या, कांहीं सावत्र, तर कांहीं मानलेल्या; पण साऱ्याच बहिणी—ही कल्पना आपण फैलाविली. आपल्या लिहिण्या-बोलण्यांतून परकेपणाचा धुरकटपणा धुवून काढला तर किती चांगलें होईल. या भाषा सख्ख्यांमध्यें आपणांस प्रेम वाढीस लावावयाचें आहे. यांच्या द्वारानें सौहार्द्राची दाट पेरणी करावयाची आहे. त्यांच्यांतील विविधतेचा गौरव स्वादिष्ट करावयाचा आहे. त्यांच्या अभिवृद्धीविषयीं चिंता वाहावयाची आहे. त्यांच्या विकासाविषयीं जागरूकता ठेवावयाची आहे. अशा वेळीं त्यांना ' परकीय ' संज्ञा लावणें खचित पोषक ठरणार नाहीं. हें समन्वयी मार्गदर्शन आपण साहित्यिकांनीं केलें पाहिजे आणि आबालवृद्धांच्या ठायीं ही भावना मुरविली पाहिजे.

स्वतंत्र भारतांत ज्या अंतर्गत अनेक समस्या आपणांस सोडवाव्या लागतील त्यांत यश मिळण्यासाठीं मोठी उदारता, थोर सामंजस्य आणि प्रखर

न्यायबुद्धि यांची जोड लागेल. सत्त्वाचा मोठा पूर वाहविला पाहिजे. आपलें साहित्य थोर विचारांनीं शुद्ध, सरळ भावनांनीं कांठोकांठ ओसंडून गेलें पाहिजे. आम्ही सर्व भारतीय आहों हा साक्षात्कार तीव्रत्वानें जागविला पाहिजे. त्याबरोबरच आम्ही महाराष्ट्रीय भारतीय, आम्ही गुर्जर भारतीय, आम्ही कन्नड भारतीय अशा वैशिष्टयाला आणि विविधतेला भरपूर अवसर ठेवला पाहिजे. बाह्य एकंकारांच्या किंवा दिखाऊ एकरूपतेच्या मोहांत सांपडतां कामा नये. भारताची प्रकृति येथील द्रष्टयांनीं आणि साधुसत्पुरुषांनीं तशीच घडविली आहे. नवयुगांतहि तशीच घडण आपणांस ठेविली पाहिजे. भारतीय म्हटला म्हणजे तो दुसऱ्या भारतीयांचा स्वार्थासाठीं गळा कापील असा संशय देखील कोणी घेणार नाहीं अशी आपली दृढ भावना झाली पाहिजे. भावना काय तसा प्रत्यय सर्वांना मनोमन आला पाहिजे. आपल्या स्वभावाचें तें एक अंग बनलें पाहिजे. व्यापक बोलावें आणि आंत सारा स्वार्थाचा संकुचित लिडबिडाट असावा असा 'मनस्येकं वचस्येकं' भाव नको.

## मातृभाषेच्या क्षेत्राची व्याप्ति

घरांत बायकांमुलांशीं बोलण्याची भाषा म्हणजेच मातृभाषा आणि तेंच मातृभाषेचें क्षेत्र आणि तेंच आमचें मातृभाषेला संरक्षण असा कोणाचा अभिप्राय असेल तर तो आम्हाला क्षणमात्रहि मंजूर नाहीं. आमच्या मातृभाषेंत आम्हांला आमचे सर्व व्यवहार करावयाचे आहेत, कारभार चालवावयाचा आहे, साहित्य निर्माण करावयाचें आहे; शिक्षण द्यावयाचें आणि घ्यावयाचें आहे. मातृभाषेच्या वापरावर भलतेंच कृत्रिम बंधन मान्य करून आमच्या थोर वारशावर आम्हांस पाणी सोडावयाचें नाहीं. अलबत् सार्वभारतीय मंडळांत सार्वभारतीय कामासाठीं आम्ही राष्ट्रभाषाच वापरूं, त्यासाठीं तिची अभिवृद्धि करूं. त्यासाठीं मातृभाषेचा कृत्रिम संकोच आम्ही संमत करणार नाहीं.

पण जेव्हां मातृभाषेचा सलग भूभाग सोडून आम्ही दुसऱ्या भाषिक भागांत वसतीस जातों, तेव्हां आमची भाषिक नीति काय रहावी ? अशा वेळीं ज्या भूभागांत आम्ही निरंतरच्या वसतीसाठीं गेलों असूं तेथीलच

भाषा आम्ही तेथें वापरूं आणि तेथें आमच्या मूळ भाषेचें रक्षण आणि संवर्धन आमच्या तिजवरील प्रेमाच्या बळावर करूं. आम्हांला ह्या कामीं तेथल्या भाषिकांनीं प्रेमानें होईल तें साहाय्य करावें. आम्ही तेथील भाषेच्या सार्वजनिक प्राथम्याला कधींहि मनांतून देखील धक्का लावणार नाहीं. तथापि आमचा भाषिक वारसा आमच्या बळावर चालविण्याचा आमचा अधिकार अबाधित राहिला पाहिजे. ज्या सामंजस्याचा पुरस्कार आम्हीं वारंवार केला आहे त्याचाच पुनरुच्चार आठवणीसाठीं येथें करीत आहों.

(मराठी वाङ्मय परिषद, बडोदा, जानेवारी १९५३ : अध्यक्षीय भाषण)

# १२ : स्वभाषांचा विकास

‘भारतवर्षे भारतखंडे’ यांसारखे मंत्रघोष आपल्या भारतांत हजारों वर्षांपासून रोज प्रातःसमयीं होत असतात. भारतीयांनीं हा सारा देश एकरूप आणि अखंड मानूनच त्याचें आजवर सतत पूजन केलें आहे. रोज आपण ‘गंगेच यमुने चैव गोदावरि सरस्वति । नर्मदे सिंधु कावेरी जलेऽस्मिन्संनिधिं कुरु ।’ या मंत्रानें या देशांतील पावन नद्यांना आवाहन करीत असतों. ‘अयोध्या मथुरा माया काशी कांची अवंतिका । पुरी द्वारावती चैव सप्तैते मोक्षदायिकाः ।’ अशा मंत्रानें या देशांतील सात नगरांचें आपण स्मरण करतों. सात पर्वतांचेंहि याचप्रमाणें आपण पूजन करतों. पवित्र अशा चार धामांची यात्रा देखील भारताच्या एकात्मतेची साक्ष देते.

असफअल्ली एकदां म्हणाले कीं, भारत देशांचा महादेश आहे. ह्या देशाचा विस्तार केवढा अफाट, याची संस्कृति किती पुरातन आणि याची कीर्ति केवढी थोर ! देशाच्या ऐक्याची भावना आपल्या मनांत दृढमूल झालेली आहे.

ह्या श्रेष्ठ भावनेची आपणांला जोपासना केली पाहिजे. भारताचा गौरव वृद्धिंगत करणें हें आमचें कर्तव्य होय. ह्या कर्तव्यांत कसूर होतांच देश परतंत्र झाला आणि त्याचीं कटु फळें भोगावीं लागलीं. त्याग, प्रेम, सत्य वगैरे सद्गुणांचें संवर्धन केल्यामुळेंच आपण गेलेलें स्वातंत्र्य परत मिळवूं शकलों. ह्या स्वातंत्र्याचें रक्षण केलें पाहिजे. स्वतंत्र आणि सार्वभौम भारताची राज्यघटना आमच्या प्रतिनिधींनीं बनविली. भारत अनेक राष्ट्रांचा राष्ट्रसंघ नसून संघराष्ट्र आहे. भारतांत अनेक राष्ट्रांचा अंतर्भाव झालेला असला तरी भारताचें ऐक्य अभंग राहील.

ह्या ऐक्याच्या रक्षणाचें एक आवश्यक व प्रभावी साधन म्हणजे भाषा. ह्या खंडतुल्य देशांत अनेक भाषा प्रचलित आहेत. ह्या भाषांचे दोन मुख्य वर्ग मानले जातात. आर्य आणि द्रविड, आर्य वर्गांतील भाषांचा प्रभाव द्रविड वर्गांतील भाषांच्या प्रभावापेक्षां अधिक सखोल आहे. आर्य वर्गांतील संस्कृत भाषा जगांतील एक सर्व श्रेष्ठ भाषा मानली जाते. एके काळीं संस्कृतचें

अध्ययन ही ह्या देशांत पांडित्याची कसोटी मानली जाई. मुसलमान लोक आणि युरोपियन लोक ह्यांच्याशीं घनिष्ठ संपर्क आल्यामुळें भारतांत अरबी-फारसी आणि इंग्रजी ह्या भाषांनाहि महत्त्व आलें; पण ह्याच्या पुष्कळच आधींपासून संस्कृत भाषा प्रचलित असतांहि प्राकृत आणि अपभ्रंश भाषांचा प्रभाव इतका वाढत चालला होता कीं, सामान्य जनतेचें कामकाज त्या भाषांच्या द्वारेंच चालत असे. आजच्या प्रमुख भारतीय भाषांचें मूळ या प्राकृत व अपभ्रंश भाषांत आहे. ज्यांचें निर्माण-सामर्थ्य पुरेशा प्रमाणांत विकास पावलें आहे. ज्यांचे ठायीं विविध भावना आणि कल्पना यांचा आविष्कार करण्याची क्षमता आहे, ज्यांचें शब्द-भांडार, वेगवेगळे विचार प्रकट करण्यास समर्थ आहे आणि ज्यांमध्यें नवे नवे विचार आणि कल्पना निर्माण करण्याची शक्ति आहे त्यांना मी प्रमुख देशी भाषा म्हणतों. भारताच्या राज्यघटनेंतील आठव्या परिशिष्टांत ज्या चौदा भाषांचा उल्लेख केलेला आहे त्या भाषा वरील व्याख्येंत व्यवस्थितपणें बसतात.

## भारतीय हिंदी

संविधानाच्या आठव्या अनुसूचींत हिंदी व उर्दू ह्या दोन भाषांचा समावेश केलेला आहे व ३५१ व्या अनुच्छेदांत हिंदुस्तानी भाषेचा उल्लेख आहे. त्या कलमांत असा आदेश देण्यांत आला आहे कीं, संविधानामध्यें ज्या हिंदीचा स्वीकार करून तिचा विकास करणें भारत सरकारचें कर्तव्य होय, त्या हिंदीच्या विकासासाठीं हिंदी, उर्दू व हिंदुस्तानी यांचे शब्द, शैली, स्वरूपें घेऊन तीमध्यें एकरूप करावींत. येथें हिंदीच्या द्वारें हिंदीचें पोषण करण्याचा आदेश चमत्कारिक वाटेल; पण हा आदेश उचित असाच आहे. परिशिष्टांत उल्लेखिलेल्या भाषांपैकीं एक संस्कृत सोडल्यास इतर सर्व भाषा देशाच्या कोणत्या ना कोणत्या भागांत मातृभाषा म्हणून प्रचलित आहेत. ह्याच वर्गांत जर हिंदीचाहि उल्लेख आलेला आहे, त्या अर्थीं असें अनुमान निघतें कीं, परिशिष्टांत सांगितलेली हिंदी ही मातृभाषा हिंदीच होय. मातृभाषा हिंदी भारताची राष्ट्रभाषा होऊं शकणार नाहीं व घटनेंतहि तिचा राष्ट्रभाषा म्हणून स्वीकार केलेला नाहीं. घटनेंत स्वीकारलेल्या हिंदीला मी सोयीसाठीं भारतीय हिंदी म्हणेन. ह्या भारतीय हिंदीच्या विकासाला इतर मातृभाषांप्रमाणेंच मातृभाषा हिंदी पण आपला हातभार लावील. मातृभाषा हिंदी व

भारतीय हिंदी ह्या दोन वस्तु आहेत खऱ्या; पण ह्या दोन्हींचें मूळ एकच आहे. त्याचें आत्मिक ऐक्य नीट सभाळलें पाहिजे. त्याचबरोबर हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, सारे जगच परिवर्तनशील आहे. भगवंतांनीं म्हटलेंच आहे कीं, 'तस्मादपरिहार्यर्थे न त्वं शोचितुमर्हसि ।'

आदि पुरुष एक असूनहि जगांत त्यापासून कुटुंबांच्या शाखा-उपशाखांचा विस्तार वाढलेला दिसतो. मूळ वेद एकच, पण पुढें त्याचे चार विभाग झाले असें म्हणतात. मुळांत ऐक्य असलें तरी अनेकता व विविधता विस्तारत जातात. मातृभाषा हिंदी व भारतीय हिंदी ह्या दोन्हींचें मूळ एक असूनहि त्यांचें प्रयोजन भिन्न-भिन्न असल्यानें त्यांच्या स्वतंत्र विकासाची गरज आणि शक्यता उद्भवल्यास त्याला आडकाठी असू नये दोहोंत विरोध असूंच शकत नाहीं. विविधतेला विरोध मानणें चुकीचें आहे. भारताच्या समृद्धीसाठीं आम्हांला दोन्हींचा उपयोग करून घ्यावयाचा आहे. ही समन्वयाची दृष्टि पत्करल्यास भेदभावाला आणि झगड्याला वाव राहात नाहीं दोन्हीं भाषांचा आपापल्या परी विकास व्हावा व दोन्हींपासून जनतेचा फायदा व्हावा.

ही समन्वयाची दृष्टि स्वीकारल्यास उर्दू आणि हिंदुस्तानी यांच्या मदतीनें आपण भारतीय हिंदीला संपन्न करूं शकूं तसें करणें आवश्यक आहे. म्हणून घटनेंत भारतीय हिंदीच्या उगमस्थानांच्या दृष्टीनें हिंदी व उर्दू या दोन्हींचा उल्लेख असून त्यांचा उपयोग करून घेण्याचा आदेश देण्यांत आलेला आहे.

## हिंदुस्तानीचा पूर्वेतिहास

हिंदुस्तानी ही ठोकून घडवून तयार केलेली एखादी नवीच वस्तु आहे. असें मानणें चूक होय. अकबर आणि जहांगीर यांच्या कारकीर्दीत ख्रिस्ती, पाद्री लोक भारतांत येऊन धर्मप्रचार करीत. सर एडवर्ड मॅक्लागन सारख्या पंडिताच्या १६२२ त लिहिलेल्या 'जेसुइटम् अँड दि ग्रेट मुगल' इत्यादि ग्रंथांत असा पुरावा मिळतो कीं, ख्रिस्ती धर्माच्या प्रचारकांना आपलें काम फारसीऐवजीं हिंदुस्तानींत करणें जास्त उपयुक्त दिसून आलें त्या काळीं फादर उसिडरीनें लिहिलें आहे कीं, तिबेटांत धर्मप्रसारासाठीं जावयाचें

असेल तर आधीं हिंदुस्तानी शिकलें पाहिजे. हिंदुस्तानी शिकल्यावर तिबेटी भाषा शिकणें सोपें होतें. १६१५ त आग्रा येथील ख्रिस्ती प्रचारक हिंदुस्तानी भाषेचा उपयोग करीत असा उल्लेख आढळतो. १६३२ त फादर फिग्युएरेडो याला हिंदुस्तानी भाषा येत असल्याचा उल्लेख आहे. फादर मोरॅंडो व फादर रॉय इ. मंडळी हिंदुस्तानीचे जाडे पंडित मानले जात. असा किती तरी पुरावा देतां येण्यासारखा आहे. सारांश, भारतांत तीन-चारशें वर्षांपूर्वीच हिंदुस्तानीचें रोपटें लावण्यांत आलें होतें आणि मोगल साम्राज्यांत ती सर्वसामान्य लोकांची भाषा झाली होती. अशा प्रकारें हिंदुस्तानी चारशें वर्षांची भाषा असली तरी ती नवीच. कारण तिचा सांचा हिंदीचा होता. राजस्थानी, ब्रज, अवधी इत्यादि जुन्या भाषा देशाच्या वेगवेगळ्या भागांत प्रचलित होत्या. त्या भाषांतच फारसी, अरबी, तुर्की या भाषांचे कांहीं शब्द व कांहीं रूपें मिसळून गेलीं आणि भाषेचा नवा अवतार हिंदुस्तानी या नांवानें प्रकट झाला.

अकबर आणि जहांगीर यांच्या कारकीर्दीत वानारसी कवीनें लिहिलेलें अर्धचरित नांवाचें आत्मचरित मुंबईच्या पं. नाथूराम प्रेमींनीं प्रकाशित केलें आहे. वानारसी हा एक व्यापारी होता. या पुस्तकाची भाषा मध्यदेशांतील प्रचलित भाषा असून सोपी व सुरेख आहे. हिंदुस्तानीबरोबरच तीहि भाषा सामान्य लोकांत प्रचलित होती. दक्षिणेस हैदराबाद, गोवळकोंडा हीं तर दख्खनी भाषेचीं जन्मस्थानें होत. ही दख्खनी म्हणजे उत्तर भारतांतील हिंदुस्तानीची मैत्रीण. शिक्षण व सरकारी कारभार यांतून इंग्रजीचें उच्चाटन करून उर्दूसारख्या एका भारतीय भाषेला उच्चासनावर बसविण्याचा पहिला मान हैदराबादनें पटकावला ही कौतुकाची गोष्ट होय. अर्थात् मराठीसारख्या लोकांच्या भाषांवर अन्याय झाला तो प्रश्न अलाहिदा.

संविधानाच्या २९ (१) अनुच्छेदानुसार उर्दू, कन्नड, तेलगु, मराठी इत्यादि भारतीय भाषा बोलणाऱ्या लोकांना आपापल्या भाषा, संस्कृति व लिपि यांचें रक्षण करण्याचा संपूर्ण हक्क आहे. आतां प्रत्येकानें देवनागरी लिपि अवश्य शिकावी. इतर भाषा व लिप्या शिकण्याचे कामीं सरकार व जनता या दोघांकडूनहि उत्तेजन मिळालें पाहिजे.

स्वतंत्र भारताचा व्यवहार साऱ्या जगाशीं नव्या प्रतिष्ठेनें होऊं लागला आहे. ह्या व्यवहाराच्या यशस्वितेसाठीं जगभरच्या भाषांचा भारतांत अभ्यास झाला पाहिजे. जगांतल्या कोणत्याहि देशांत आमचे विद्यार्थी, प्रतिनिधि, प्रवासी, व्यापारी, वकील जावयाचें तर त्यांना त्या देशाची भाषा अवगत असली पाहिजे. ह्या बाबतींत आवश्यक ती व्यवस्था केली नाहीं तर आपण दुर्बल राहूं. ह्यापूर्वीं जगाकडे डोळेझांक करून आमच्या देशानें स्वतःचें अपरिमित नुकसान करून घेतलें. आतां वृथा दुरभिमान आणि संकुचित दृष्टि टाकून दिली पाहिजे. पाश्चात्य देश ऐहिक व भौतिक क्षेत्रांत आपणांपेक्षां फार पुढारलेले आहेत. भौतिक व ऐहिक शास्त्रांचा अभ्यास आपल्या देशांत वाढला पाहिजे. हा अभ्यास आम्ही आपापल्या भाषांच्या द्वारें करूं. कारण हा ज्ञानाचा प्रकाश देशाच्या कोनाकोंपऱ्यापर्यंत पोंचवावयाचा तर लोकांतील प्रचलित भाषाच त्यासाठीं उपयुक्त होत. पाश्चात्यांचीं मतें व आचरण यांचें अनुकरण करण्याची मुळींच गरज नाहीं. आम्ही स्वतःचें आत्मिक स्वातंत्र्य गमावतां कामा नये, तसेंच ज्ञान-विज्ञानाच्या क्षेत्रांत मागसलेले रहातां कामा नये. कित्येक शतकें आमची प्रगति खुंटून राहिलेली आहे. आतां नवें ज्ञान घेण्यासाठीं शब्दावलि बनवावी लागेल.

## संस्कृतनिष्ठा हवी, संस्कृतैकनिष्ठा नव्हे

सुदैवानें संस्कृत भाषारूपी अक्षय भांडार आपणांला उपलब्ध आहे. पाणिनी, कात्यायन, पतंजलि यांसारखे महान् व्याकरणकार, वार्तिककार, भाष्यकार या देशांत होऊन गेले. आतां आम्हांला नवे पाणिनी, कात्यायन, पतंजलि हवेत. नवीन शब्दावलि तयार करावयाची आहे. पाश्चात्य भाषांचा सखोल अभ्यास करून आपलें काम तडीस नेलें पाहिजे. आमच्या पंडितांनीं संस्कृत व तिच्या उपभाषा यांच्या साहित्याचा अभ्यास केला पाहिजे. प्राचीन ज्ञानभांडार पाहिलें पाहिजे. आमची संस्कृति आणि अर्थरीति यांचा विचार करतां केवळ शाब्दिक भाषांतर कुचकामी ठरेल. कल्पना, भावना, वस्तु यांचें स्वरूप आधीं समजून घ्यावें लागेल. मग नव्या कल्पना व नवें ज्ञान सामान्य लोकांपर्यंत पोंचवण्यासाठीं आमच्या भाषांमार्फत प्रकट करावें लागेल. या कामीं संस्कृतचा उपयोग होईल. ह्या दृष्टीनें आम्ही संस्कृतनिष्ठच

आहोंत. घटनेच्या ३५१ व्या कलमांत संस्कृतचा आधार घेण्याचा आदेश दिलेला आहे. आम्हांला स्वाभाविकपणेंच संस्कृतनिष्ठ असलें पाहिजे; पण आम्ही संस्कृतैकनिष्ठ मात्र नाहीं.

आमच्या प्रकृतीला अनुरूप आणि अर्थवाहक असा शब्द संस्कृतमध्यें मिळत असेल तर तो आम्ही प्रथम घेऊं. नसेल तर त्यासारखा दुसरा शब्द घेऊन त्याला नवा अर्थ देऊं. इतक्यानेंहि जमण्यासारखें नसल्यास नवा शब्द बनवूं. तेंहि न जमल्यास पाश्चात्य शब्दाला भारतीय पोषाख चढवून पचवून टाकूं. सुलतानाला सुरत्राण आणि होराला अवर बनविलेंच ना ? इतर भारतीय भाषांतूनहि शब्द घेऊं शकूं. जगांतल्या कोणत्याहि भाषेंतून शब्द घेण्यास प्रत्यवाय नसावा; पण घेतलेल्या शब्दाचें नियमन आणि संवर्धन आमच्या भाषेच्या नियमानुसार व्हावें.

गरजेप्रमाणें किंवा इच्छेनुसार आम्ही भारताच्या कोणत्याहि भागांत राहूं. ह्यासाठीं देशभर शास्त्राच्या शिक्षणांत पारिभाषिक शब्दावलि सर्वत्र सारखी असावी. म्हणजे देशाच्या कोणत्याहि भागांत गेलें तरी अध्ययन, अध्यापन आणि वैचारिक देवाण-घेवाण यांत अडचण पडूं नये.

## समान लिपि व परिभाषा

देवनागरी लिपि भारताच्या ऐक्याचें प्रमुख साधन होय. देवनागरी लिपींत भारताच्या सर्व भाषांतील साहित्य आलें तर समजून येईल कीं, भारतीय भाषांमध्यें आज जेवढें अंतर भासतें तेवढें तें वास्तविक नाहीं; तर भारतीय भाषांत पुष्कळच सारखेपणा आहे. ही समानतेची वृत्तीच भारतीय ऐक्यभावनेचें पोषण करील. समान पारिभाषिक शब्दावलि हें भारतीय ऐक्याचें दुसरें साधन होय. अखिल भारतीय परिषदांच्या दृष्टीनें तर हें विशेष उपयुक्त ठरेल. भारत सरकारचा कारभार तर हिंदी भाषा व देवनागरी लिपीच्या द्वारेंच होईल. परदेशांतील आमच्या वकिलातींत भारतीय हिंदीमध्येंच कारभार चालेल. ऐक्याचें हें तिसरें मजबूत साधन होय.

भाषा एक असली तरी आपापसांत भेद असतात. भाषेच्या द्वारें येणारें ऐक्य हें मर्यादित असतें. भाषा एक असल्यास विचार, भावना वगैरे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम............................ विः ....................

चांगल्या प्रकारें समजून घेतां येतात. जो फरक रहातो तो अज्ञानामुळें नव्हे. भाषा अगदीं वेगवेगळ्या आहेत; पण हिताहित किंवा विचार किंवा ध्येय मात्र सारखें आहे, असा प्रकार असल्यास भिन्न भाषा असूनहि एकोपा असतो. विचार आणि ध्येय एक असल्यास जो एकोपा निर्माण होतो तो सर्वश्रेष्ठ होय. भारताच्या सर्व भाषांतून एकसारखे विचार-प्रवाह वहात रहातील आणि ह्या विचार-गंगेंत भारतीय जनता न्हाऊन निघेल तर ऐक्याचा रंग असा पक्का होईल कीं, तो कधींच विटणार नाहीं. प्रतिभाशाली कवि, पंडित सारे जण रात्रंदिवस ऐक्याचा पुकारा करतील, ऐक्याचा डंका वाजवतील तर आपण भेदभावांपासून अलिप्त राहूं आणि निर्भय बनूं

## प्रांतिक भाषांचें कार्यक्षेत्र

भारतीय कारभारासाठीं भारतीय हिंदी आणि प्रांतांच्या एकूण व्यवहारासाठीं प्रांत-भाषेचा वापर केला पाहिजे. प्रांत-भाषा फक्त नांवापुरती असतां कामा नये. तिच्या मार्फत साहित्याची अभिवृद्धि, संस्कृतीचें पोषण आणि ज्ञानाचें संवर्धन होत राहिलें पाहिजे. प्रांतांत शिक्षणाचें माध्यम प्रांताची मुख्य भाषाच असलें पाहिजे. प्रांतिक राज्यांची पुनर्रचना भाषा, संस्कृति व जीवनाची समानता ह्यांवर आधारलेली असली पाहिजे. प्रांतिक भाषेच्या बरोबरीनें प्रांताची प्रतिष्ठा वेगानें वाढवतां येईल, प्रांताची अस्मिता जागी करतां येईल, ह्या अस्मितेला भारतीय ऐक्याची दीक्षा देतां येईल. आपण प्रांताला जागरूक, स्वाभिमानी, त्यागी, उद्योगनिष्ठ, बलिष्ठ व भारत-सेवक बनवूं शकूं. एका प्रांताच्या लोकांनीं दुसऱ्या प्रांताच्या लोकांशीं बंधुभावाचे आणि स्नेहाचे संबंध ठेवणें हें आपलें ध्येय असावें. कुटुंबांतील कर्त्या पुरुषाप्रमाणें मध्यवर्ती भारत सरकार साऱ्या प्रांतांशीं सारखेपणानें आणि प्रेमभावानें वागेल आणि त्यांना स्वतंत्र ठेवण्याचें काम करील. प्रांतिक भाषांच्या विकासासाठीं प्रांतिक राज्यांचें वांटप भा ंच्या आधारावर झालें पाहिजे. प्रत्येक भारतीयानें आपली प्रांतिक भाषा आणि भारतीय हिंदी जरूर शिकून घेतली पाहिजे. त्यानंतर इतर भाषांचा आणि साहित्याचा अभ्यास ज्याला जशी अनुकूलता असेल तसा त्यानें करावा. लंडन विद्यापीठांतील स्कूल ऑफ ओरिएंटल एण्ड आफ्रिकन स्टडीजमध्यें मराठी, बंगाली, हिंदी, उर्दू, हिंदुस्तानी, संस्कृत, स्वाहिली, मलायी, चिनी, जपानी,

कुर्द, अरबी, कोरियाई, सोमाली इत्यादि भाषांचा अभ्यास चालतो. त्यापासून आपण योग्य तो बोध घेतला पाहिजे.

भाषांतराच्या कलेला मी विशेष महत्त्व देतों. भारतांत आज भाषांतराकडे कला ह्या दृष्टीनें फारसें लक्ष दिलें जात नाहीं. विद्यापीठांनीं ह्या गोष्टीकडे लक्ष दिलें पाहिजे. परिश्रमपूर्वक अनेक भाषांचा अभ्यास करणाऱ्या लोकांना उत्तेजन दिलें पाहिजे. भारत सरकार, प्रादेशिक सरकारें, विद्यापीठें, साहित्य-संस्था यांनीं भाषांतर-विभाग सुरू करावे. त्यामुळें वेगवेगळ्या भाषांतील ज्ञानाची, विचारांची, साहित्याची देवाण-घेवाण होईल. कुशल भाषांतरकार मिळावेत ह्यासाठीं शिक्षण-पद्धति त्याला अनुकूल अशी असावी. शिक्षणांत भाषांतर-कलेला विशेष स्थान द्यावें. देशी भाषांतील वाङ्मयाच्या अनुवादाप्रमाणेंच, देशी भाषांतून परदेशी भाषांत आणि परदेशी भाषांतून देशी भाषांत सुरेख व बरोबर अनुवाद करण्याचे कामीं वाकबगार अशा लोकांना खास बक्षिसें द्यावींत. भाषांतर मूळ रचनेपेक्षांहि कित्येकदां सरस असूं शकतें. फिटझेरल्डनें उमरखय्यामला जगभर प्रसिद्धि मिळवून दिली. अनेक भाषा येणाऱ्या साहित्यिकांची यादी करून सरकारनें त्यांचें मंडळ बनवावें.

## इंग्रजीच्या अध्ययनाची मर्यादा

प्रांतिक भाषा आणि भारतीय हिंदी यांना बोलबाला सुरूं होतांच इंग्रजीच्या पाठीराख्यांनीं धोक्याची घंटा बडवायला सुरुवात केली आहे. इंग्रजीचें महत्त्व कमी लेखणें चुकीचें होय; पण इंग्रजी देशातील प्रत्येकाच्या माथीं मारूं पहाणें ही तर घोडचूक म्हटली पाहिजे. माझ्या लहानपणीं इंग्रजींत नापास होणाराला खालच्या वर्गांत रहावें लागे. आयुष्याचें एक वर्ष वांयां घालवावें लागे. आजहि कांहीं अंशीं हीच परिस्थिति कायम आहे. यांत शक्ति आणि पैसा यांचा अपव्यय होतो. आम्हांला संपूर्ण शिक्षण देशी भाषांतून मिळालें पाहिजे. तो आमचा हक्क आहे. देशी भाषांसाठीं रस्ता खुला करावा. इंग्रजी शिकूं इच्छिणारांसाठीं फक्त इंग्रजी शिकविणाऱ्या वेगळ्या शाळा असाव्यात. संस्कृतसाठीं जशा पाठशाळा आहेत तशा इंग्रजीसाठीं असतील, देशी भाषांच्या द्वारें जरूर त्या विषयांचा

ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. १२२९८

अभ्यास केल्यावर ज्याला गरज, आवड, वेळेची अनुकूलता असेल त्यानें इंग्रजीचा भरपूर अभ्यास करावा. भाषा समजणें, बोलणें आणि लिहिणें ह्या तीन वेगवेगळ्या शक्ति आहेत. ह्यांपैकीं भाषा समजणें ह्याला विशेष महत्त्व आहे. तिन्हींसाठीं वेगवेगळ्या परीक्षा ठेवाव्यात. ह्यांतहि साहित्यिक इंग्रजीबद्दल विशेष कटाक्ष ठेवूं नये. भौतिक व ऐहिक शास्त्रांचे इंग्रजी ग्रंथ चांगल्या प्रकारें समजण्याची शक्ति असली म्हणजे झालें. तसें केल्यानें शक्तीचा अपव्यय टळेल. धोक्याची घंटा वाजवून लोकांना घाबरून सोडण्याचें कांहीं कारण नाहीं. कारण आम्ही गरजेपुरती इंग्रजी शिकूं. त्यामुळें देशाचें कांहींहि नुकसान होणार नाहीं.

भारतीय हिंदीच्या प्रचारापुरतें बोलावयाचें तर सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनीं हिंदीच्या व्यासपीठावर एकत्र यावें व हिंदीच्या प्रचाराचे कामीं सहकार्य द्यावें. भारतीय हिंदीच्या अध्ययन-अध्यापनांत व्यवहाराची व भारतीय ऐक्याची दृष्टि प्रामुख्यानें असली पाहिजे. हा विचार साहित्याच्या दृष्टिकोणाहून वेगळा आहे. साहित्यिक हिंदीचेंहि अध्ययन-अध्यापन ही माझ्या आवडीची वस्तु असली तरी त्याचा उद्देशच वेगळा होय. भाषांच्या सेवकांनीं त्यांच्या विकासाचा मार्ग तयार करावा. अखेरीस जनतेनेंच निर्णय करावयाचा असतो. जनतेचें मार्गदर्शन करणें एवढेंच आमचें कर्तव्य होय.

## सभेच्या घटनेंतील हिंदीची व्याख्या

मी महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेचा सेवक आहें. आमच्या सभेच्या घटनेंत हिंदीची व्याख्या केलेली आहे ती अशी : “ आंतरप्रांतिक व्यवहारासाठीं जी एक भाषा कित्येक शतकांपासून भारतांत सर्वसाधारणपणें प्रचलित आहे ती आमची राष्ट्रभाषा होय. हिंदी, उर्दू, हिंदुस्तानी अशीं तिन्ही नांवें त्या भाषेसाठीं रूढ आहेत.” ही व्याख्या भारतीय राज्यघटनेच्या फार आधीं-पासून सभेनें स्वीकारलेली आहे. राज्यघटना मंजूर झाल्यानंतरहि सभेनें ह्या व्याख्येंत बदल केलेला नाहीं. कारण राज्यघटनेंत ह्याच व्याख्येचा पर्यायानें पाठपुरावा केलेला आहे.

महाराष्ट्र फार पूर्वींपासून राष्ट्रभाषा म्हणून हिंदीचा आणि प्रांतभाषा म्हणून मराठीचा कैवारी आणि अभिमानी आहे. ६०–७० वर्षांमागें पुण्यांत

मराठी ग्रंथकारांचें संमेलन झालें तेव्हां त्यांत हिंदी-हिंदुस्तानीचा पाठपुरावा करणारा ठराव मांडण्यांत आला होता. ६० वर्षांपूर्वी पुण्याच्या वक्तृत्व सभेच्या वतीनें झालेल्या व्याख्यान-स्पर्धेत पेठे यांनीं 'एक-भाषा' ह्या विषयावर व्याख्यान दिलें व 'राष्ट्रभाषा' हें पुस्तक प्रकाशित केलें. हातवळणे ह्यांनीं राष्ट्रभाषेच्या प्रश्नाचें विवेचन करणारें पुस्तक लिहिलें. मराठींत आणखीहि पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. समर्थ रामदास स्वामी वगैरे प्राचीन मराठी संत-कवींनीं हिंदी-हिंदुस्तानीमध्यें काव्य-रचना केलेली आहे. फारसीचें 'हिंदवी' भाषांतर करावें असा आदेश पेशव्यांच्या काळांतील अनेक पत्रांत आढळतो. भारतभर मराठे लोकसंचार करीत, तेव्हां देशभर प्रचलित असणाऱ्या भाषेचा उपयोग करीत. महाराष्ट्रांतील लोक भारतीय आणि भारतनिष्ठ असून ते नित्य भारत सेवक रहातील.

**हैदराबाद हिंदी प्रचार संमेलन,**

फेब्रुवारी १९५४ : **अध्यक्षीय भाषण**

# १३ : शिक्षणाचें माध्यम

माध्यमिक शिक्षणक्रमांत इंग्रजीचें स्थान आणि शिक्षणाचें माध्यम हे दोन्ही प्रश्न आज परस्परांशीं निगडित असल्यासारखे भासतात. मेकॉलेच्या इतिहास-प्रसिद्ध खलित्यापासून तों आजतागायत इंग्रजीनें आमच्या देशांतील शिक्षणाचें क्षेत्र बळकावून ठेवलें आहे. भारतीय जनतेला व्यापक व आधुनिक दृष्टिकोण प्राप्त करून देण्याच्या बाबतींत इंग्रजीनें महत्त्वाची कामगिरी बजावली. भारताच्या एकराष्ट्रीयतेचाहि उगम इंग्रजीमध्यें असल्याचा कांहींचा समज आहे; पण इंग्रजीपूर्वीं हजारों वर्षें संस्कृतनें भारताचें ऐक्य संवर्धित करण्याची कामगिरी बजावली होती हें विसरतां येणार नाहीं.

समारंभाचीं आणि लग्नमुंजीचींहि निमंत्रणें, नांवांच्या पाट्या, संस्थांचे अहवाल आणि जमाखर्च, पावत्या, बिलें, पत्रव्यवहार वगैरे इंग्रजींतून करावयाची फॅशन अजूनहि प्रचलित आहे. भारतीय संविधानानें देवनागरी लिपींतील हिंदी भाषा राजभाषा म्हणून जाहीर केल्यावरहि ही स्थिति ! राजभाषेच्या पदावर इंग्रजीच्या जागीं हिंदीला स्थानापन्न करण्यासाठीं संविधानानें पंधरा वर्षांचा कालावधि दिला आहे; पण हा कालावधि पुरा होईपर्यंत आणि जणूं कांहीं निरुपायानें धीर धरून राहिलें पाहिजे अशा धोरणानें आमचें आजचें सारें वागणें चाललें आहे. नवनिर्मिति करूं पाहणाऱ्या देशाच्या दृष्टीनें हें वागणें विशोभित आहे. माझें आजचें भाषण हिंदींत देण्याची माझी इच्छा असतांहि स्वागत-समितीच्या आग्रहाखातर इंग्रजींत बोलावें लागत आहे. वस्तुतः अशा बाबतींत शिक्षकांनीं पुढाकार घ्यावयास पाहिजे. माध्यमिक शाळांत हिंदी सुरू झालें असल्यामुळें विद्यार्थी तर या बाबतींत झपाट्यानें पुढें चालले आहेत. आतां शिक्षकांनीं आम्हांला हिंदी कळत नाहीं म्हणणें अयोग्य होईल. जुन्या संवयी इतक्या अंगवळणीं पडलेल्या असतात कीं, त्या लवकर सोडवत नाहींत हेंच खरें. जें कामकाज आमच्या भाषांत किंवा साऱ्या देशाच्या सर्वसाधारण अशा हिंदी भाषेंत करतां येण्यासारखें आहे तें इंग्रजींतच करीत रहाण्याचा हेका कशासाठीं ? शिक्षकांनीं आपली जबाबदारी पार पाडण्यांत कसूर करतां कामा नये. सरकारकडून रास्त मार्गदर्शनाची अपेक्षा असतांना सरकार आपलें कर्तव्य बजावीत नाहीं.

अर्थात् इंग्रजीचें समूळ उच्चाटन करूं पहाणें आत्मघातकीपणाचें होईल. देशाबाहेरच्या अफाट जगाशीं इंग्रजी भाषेच्या वेशींतून आम्ही संबंध ठेवीत आलों आहोंत. ह्या दृष्टीनें इंग्रजीचें मोल मोठें आहे. फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश, रशियन वगैरे तितक्याच तोलाच्या दुसऱ्या भाषा आहेत खऱ्या; पण इंग्रजीशीं आमचा पूर्वीपासून परिचय आहे. तो कायम ठेवणें स्वाभाविक व तर्कसंगत होय. गरज नसेल तेथें इंग्रजीचा त्याग करावा; पण आमच्या प्रगतीला पोषक असलेल्या क्षेत्रांत तिचें स्थान कायम ठेवावें. माध्यमिक शाळांतून शिक्षणाचें माध्यम म्हणून इंग्रजीला स्थान आतां उरलेलें नाहीं. आदर्श व व्यवहार ह्या दोन्ही दृष्टींनीं हें योग्यच झालें; पण अद्याप विद्यापीठांत मात्र देशी भाषांच्या माध्यमाचे द्वारां शिक्षणाची सोय उपलब्ध नाहीं.

## विद्यापीठांतील शिक्षण

विद्यापीठांतील शिक्षणाच्या माध्यमाचा प्रश्न निघाला कीं, कांहीं लोक दुसऱ्याच एका मोहजालांत अडकलेले दिसतात. देशाच्या सर्वसाधारण व्यवहाराची भाषा म्हणून हिंदीला स्थान मिळावयाचें तर साऱ्या विद्यापीठांतील शिक्षणाचें माध्यम म्हणून हिंदीचा स्वीकार करणें उचित होईल, असा त्यांचा युक्तिवाद असतो. त्यामुळें भाषांच्या झगड्यापासून अलिप्त असा एकसंधी व सामर्थ्यशाली भारत देश जन्माला येईल अशीं सुखस्वप्नें ते पहात असतात. राज्यकारभारासाठीं सोयीप्रमाणें कोणत्याहि प्रदेशांतून दुसऱ्या कोणत्याहि प्रदेशांत नोकरवर्गाची बदली करावयाची झाल्यास, मग कोणतीच अडचण येणार नाहीं. कारण सर्वांचें उच्च शिक्षण एकाच समान माध्यमाचे द्वारां झालेलें असेल. देशभर उच्च शिक्षणाचें एकच माध्यम ठेवल्यानें वेगवेगळ्या विषयांवर मुबलक व स्वस्त पाठ्य-पुस्तकें तयार करतां येतील. एकंदरीनें, विद्यापीठांतून येथून तेथून देशभर सर्वत्र समान माध्यम असावें, असा कांहीं जणांचा जोराचा आग्रह आहे.

माध्यमाच्या बाबतींत उच्च शिक्षणाला जो न्याय लागू करावयाचा तोच माध्यमिक आणि प्राथमिक शिक्षणालाहि कां लागू करूं नये ? साऱ्याच शिक्षणाच्या माध्यमाबाबत तोच युक्तिवाद सर्वत्र पुढें करतां येण्यासारखा आहे.

## लोकजीवनाच्या परंपरा

प्रादेशिक भाषांमुळें जन-मानसाचें शेंकडों वर्षांपासून पोषण होत आलें आहे. जीवनरसाचा हा झरा बुजवून टाकला तर त्याचा परिणाम काय होईल हें अत्युत्साहाच्या भरांत या मंडळींच्या लक्षांत येत नाहीं. ह्या प्रादेशिक भाषा आणि त्यांचें वाङमय शेंकडों वर्षांपासून नित्य विकास पावत आलें आहे. लोकजीवनाच्या भूमींत त्यांचीं मुळें खोलवर रुजलीं आहेत. लोकांच्या आत्म्याला स्पर्श करून, त्यांच्या भावनेला आवाहन करून, त्यांना हेलावून सोडण्याचें त्यांचें प्रेरक सामर्थ्य असामान्य आहे. दुसऱ्या एखाद्या भाषेचें साधन ह्या कामीं उपयोगी पडणार नाहीं. आमच्या प्रादेशिक भाषांनीं आमचा विचार-पिंड तयार झाला आहे. पिढ्यान्‌पिढ्या त्या आमच्या हाडीं-मासीं रुजल्या आहेत. आमच्या जीवनावर त्यांचा जो अद्‌भुत प्रभाव आहे, तो प्रभाव दुसऱ्या एखाद्या भाषेमुळें पडणार नाहीं. ओवी, पोवाडा व लावणी ऐकून मराठी माणसाचें चित्त भारावून जातें, थरारतें. दोहा व चौपाईमुळें हा परिणाम घडून येणार नाहीं. ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास यांच्या वचनांचा आमच्या मनावर जादूसारखा परिणाम होतो. इतर भाषांतील वचनांनीं असा परिणाम होणार नाहीं. दूध आणि चहा, आई आणि दाई यांत जो फरक तोच मातृभाषा आणि इतर भाषा यांतहि असतो, हें स्वाभाविक आहे. भारताच्या राजभाषेचा रस्ता प्रशस्त बनविण्या-साठीं हिंदीचा वाफेचा रूळ अवश्य वापरूं; पण हिंदीचा बुलडोझर फिरवून प्रादेशिक भाषांचीं आणि त्यांच्या साहित्याचीं रमणीय उपवनें आम्ही कदापि उध्वस्त करणार नाहीं. लोकजीवनाच्या पुरातन परंपरांचीं पाळें-मुळें उखडून काढणें कदाचित् शक्य असलें तरी इष्ट व शहाणपणाचें मात्र नव्हे.

युनेस्कोच्या डायरेक्टर–जनरलनें असा इषारा दिलेला आहे कीं, ऐक्य हवें; पण एकरूपता नको. एकरंगी, सांचेबंद, सारखेपणा ऐक्यासाठीं आवश्यक नाहीं. भारतांत प्रगतिशील व उत्कृष्ट दर्जाच्या ज्या १२-१४ भाषा आहेत त्या आपापल्या प्रदेशांतील लोकांच्या ऐहिक आणि आत्मिक गरजा भागविण्यास समर्थ आहेत. त्यांचें उच्चाटन करून त्यांचे जागीं हिंदी लादू पहाणें असमर्थ-नीय होय. प्रादेशिक भाषांऐवजीं नव्हे तर त्यांना पूरक म्हणून आम्हांला

हिंदी हवी आहे प्रादेशिक भाषांना प्रादेशिक क्षेत्रांत पूर्ण वाव असला पाहिजे. संघराज्याच्या भाषेचें आसन हिंदीसाठीं राखीव आहे. भारतीय नागरिक या नात्यानें आमच्यावर येणाऱ्या जबाबदाऱ्या भारतीय हिंदीच्या द्वारें पार पाडूं. संघराज्याची संसद, अखिल भारतीय संमेलनें, राज्या-राज्यांतील दळण-वळण, वैज्ञानिक, सांस्कृतिक, साहित्यिक, राजकीय, सामाजिक व आर्थिक इ. बाबींसाठीं अखिल भारतीय पातळीवर भरणाऱ्या परिषदा सर्वोच्च न्यायालय यांमध्यें संविधानामधील आदेशाप्रमाणें हिंदीचा वापर करावा.

## संविधानाचे आदेशक

संविधानाच्या आदेशकाची नीट छाननी केली गेली पाहिजे. संविधानाच्या १७ व्या अधिकरणांतील ३५१ व्या अनुच्छेदांत दिलेल्या आदेशकाची छाननी मुंबई राज्याच्या हिंदी टीचिंग कमिटीनें केली आहे. कमिटीचा अहवाल मुंबई सरकारनें स्वीकारला आहे. हिंदुस्तानी भाषा आणि आठव्या अनुसूचींतील चौदा भाषा यांचें रूप, शैली व पदावलि आत्मसात् करून हिंदी समृद्ध भाषा बनवावी व तिचा प्रचार वाढवावा असा आदेश संघराज्य सरकारला या अनुच्छेदांत दिलेला आहे. अनुसूचींतील चौदा भाषांत मराठी, बंगाली, गुजराती वगैरे प्रादेशिक भाषा आणि संस्कृत या व्यतिरिक्त हिंदी व उर्दूचाहि समावेश आहे. हिंदीच्या सहाय्यानें हिंदीच्या समृद्धीचा आदेश हें काय गौडबंगाल आहे ? माध्यमिक शिक्षण आयोगानेंहि हा मुद्दा विचारांत घेतल्याचें दिसत नाहीं. आठव्या परिशिष्टांतील हिंदीहून संघराज्याची भाषा म्हणून विकसित करावयाची हिंदी वेगळी होय, असाच येथें निष्कर्ष निघतो. ज्यांची मातृभाषा हिंदीहून वेगळी आहे त्यांच्या दृष्टीनें स्वाभाविकच हा मुद्दा महत्त्वाचा आहे. आठव्या अनुसूचींत उल्लेखिलेली हिंदी ही प्रादेशिक हिंदी व ३५१ व्या अनुच्छेदांत उल्लेखिलेली हिंदी ही भारतीय हिंदी. या दोन्हींचा आत्मा एकच. ह्या आत्म्याला धक्का न लावण्याचा आदेश संविधानांत दिलेला असला तरी विकासाची प्रक्रियाच अशी आहे कीं, तीमध्यें बदल अपरिहार्य असतो. ज्ञानेश्वरकालीन मराठी गद्य व पद्य यांच्या शैलीहून पेशवेकालीन मराठीची शैली वेगळी व आतांच्या भाषेची त्या दोन्हींहून वेगळी. अर्थात् ह्या तिन्हींमध्यें मराठीचा आत्मा अक्षुण्ण आहे. भाषेचा आत्मा ही दृश्य वस्तु नसली तरी त्याची ओळख सहज पटते.

## सार्वदेशीय भाषेची भूमिका

संस्कृत भाषेचीं वेद-काळांतील व वेद-कालोत्तर स्वरूपें भिन्न-भिन्न असलीं तरी त्या भाषेचा विशिष्ट आत्मा आहे. आम्ही सारेजण मनूची प्रजा असलों तरी परिस्थिति-वैचित्र्यामुळें भिन्न-भिन्न स्वभाव-विशेष बनले आहेत. भारतीय हिंदी परिस्थितीनुसार विशेष प्रकारें आपला विकास करून घेईल; कारण तिला सार्वदेशीय अशा सर्वसाधारण भाषेची भूमिका वठवावयाची आहे. प्रादेशिक किंवा 'उच्च' हिंदी मात्र मराठी, बंगाली, गुजराती वगैरे प्रादेशिक भाषांच्या भूमिकेवरून काम करील. यांत तंटा-बखेड्याचें कांहींच कारण नाहीं. आपली भूमिका, उद्देश आणि तदनुसार करावयाचें कार्य यांची योग्य जाणीव बाळगून शिस्तबद्धपणानें व एकदिलानें आपणांस पुढील मार्गक्रमण करावयाचें आहे.

प्रादेशिक भाषांमार्फत उच्च शिक्षण द्यावें म्हटलें कीं, लगेच कित्येकजण विचारूं लागतात कीं अहो, देशी भाषांत पाठ्यपुस्तकें कुठें आहेत? स्वातंत्र्य-लढ्याच्या वेळींहि असेंच कोणी कोणी विचारीत कीं, स्वातंत्र्य मिळाल्यावर देशाचें संरक्षण करण्यासाठीं सुसज्ज लष्कर कुठुन आणणार? गांधीजी तर एकदां उद्वेगानें म्हणाले होते कीं, "परकीय माध्यमांतून शिक्षण देणें चालूं ठेवण्यापेक्षां मी देशी भाषांतील पाठ्यपुस्तकांच्या अभावा-मुळें शिक्षणक्षेत्रांत येणारें अराजक पत्करीन," देशी भाषांना शिक्षणाचें माध्यम हें स्थान नसल्यानें देशी भाषांत पाठ्य-पुस्तकें तयार होत नाहींत. या उलट देशी भाषांत पाठ्य-पुस्तकें नाहींत म्हणून त्यांना माध्यमाचें स्थान देण्यास विरोध केला जातो. अशा ह्या दुष्ट चक्राचा भेद कोण व कसा करणार हा प्रश्न आहे. याचें उत्तर असें कीं, इच्छा असतां उपाय सुचतो. माध्यमिक शिक्षणांत देशी भाषांचा माध्यम म्हणून वापर सुरू होण्याआधीं पाठ्य-पुस्तकांचा प्रश्न उद्भवलाच होता; पण आतां पहावें तर भराभर पाठ्य-पुस्तकें तयार होत आहेत. देशांत अगदीं प्रथम इंग्रजी शिक्षणाच्या शाळा निघाल्या तेव्हांहि पाठ्य-पुस्तकांचा दुष्काळ होता. आत्मचरित्रांत दादोबा पांडुरंग यांनीं लिहिलें आहे कीं, बापूशास्त्री शुक्ल पुस्तकाशिवायच मराठी व्याकरण शिकवीत. पुढें स्वतः दादोबांनींच मराठी व्याकरण लिहिलें हा

इतिहास सर्वविश्रुत आहे. पन्नास वर्षांमागें पुण्याच्या बळवंतराव दाभोळकरांनीं कॉलेजच्या अभ्यासक्रमाला उपयुक्त ठरण्याजोगीं नीतिशास्त्र, राज्यशास्त्र, प्राणिशास्त्र इ. शास्त्रीय विषयांवरील पुस्तकें प्रसिद्ध केलीं होतीं; पण तो काळ असा होता कीं, न्यायमूर्ती रानडे यांच्यासारख्या मातबर नेत्यानें मुंबई विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांत मराठीचा समावेश करावा असा प्रयत्न केला; पण तो व्यर्थ ठरला. मग देशी भाषांना माध्यम बनविण्याची गोष्टच कशाला ?

## देशी भाषांची प्रगति

त्या काळीं सत्ताधाऱ्यांची केवळ उपेक्षेची नव्हे तर विरोधाची भूमिका असतांहि देशी भाषांचें साहित्य प्रगतिपथावर वाटचाल करीत राहिलें. नाटकें, कथा, काव्य, निबंध, पत्रें, चरित्रें, आत्मकथा, इतिहास, तत्त्वज्ञान असा साहित्याचा शाखा-विस्तार वाढत राहिला. मराठींत २२ खंडांचा ज्ञानकोश, त्याखेरीज, व्यायाम ज्ञानकोश, चरित्रकोश, कित्येक खंडांचा शब्दकोश अशी विपुल ग्रंथरचना झाली. शं. बा. दीक्षितांसारख्या गरीब शिक्षकानें मराठींत भारतीय ज्योतिःशास्त्राचा इतिहास लिहिला. त्याची आज देशभर वाखाणणी झाली आहे. इतक्या उपरहि लोक विचारतात कीं, "देशी भाषांत पाठ्य-पुस्तकें कुठें आहेत ?" मला मराठी पुस्तकांचीच प्रामुख्यानें माहिती असल्यानें आतां केवळ त्यांचाच उल्लेख केला; पण सर्वच देशी भाषांत विविध स्वरूपाची ग्रंथरचना झालेली आहे. पाठ्य-पुस्तकें सहज तयार होऊं शकतील. उमाशंकर जोशींच्या प्रश्नाला उत्तरादाखल पाठविलेल्या पत्रांत १७ पैकीं १६ तज्ज्ञांनीं मत दिलें कीं, गुजरात विद्यापीठांत गुजराती हें शिक्षणाचें माध्यम असावें. आचार्य नरेंद्र देवांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या बिहार राष्ट्रभाषा परिषदेंत परिसंवाद झाला, त्यांत १७ पैकीं १६ पंडितांनीं सांगितलें कीं, सारें शिक्षण देशी भाषांतून दिलें पाहिजे. पुणें विद्यापीठानें मराठी माध्यमाचें तत्त्व मान्य केलें आहे. या विद्यापीठानें देशांतील विद्यापीठें, राज्यसरकारें, विद्वत्सभा, संघराज्य सरकार यांच्या प्रतिनिधींची परिषद भरविली होती. विद्यापीठांतील शिक्षणाचें माध्यम प्रादेशिक भाषाच होणें सयुक्तिक असल्याचा निष्कर्ष त्यांत निघाला. बड्या सरकारी नोकऱ्यांत

प्रवेश देण्यासाठीं अखिल भारतीय पातळीवर घ्यावयाच्या परीक्षांच्या माध्यमाचाहि प्रश्न आहे. संघराज्य सरकारनें राज्यशासनाच्या पातळीवर संविधानाच्या तरतुदी अमलांत आणण्यासाठीं पावलें टाकलीं पाहिजेत.

'प्रवाहमान' अशा लोक-समूहांच्या अडचणी व हितसंबंध विचारांत घेणें आवश्यक आहे. संघराज्य सरकारचा नोकरवर्ग, व्यापारी, निर्वासित यांसारखे अन्य प्रांतीय लोक एखाद्या विवक्षित प्रदेशांत गरजेसाठीं रहात असले तरी भाषा-भिन्नत्वामुळें त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठीं माध्यम कोणतें योजावयाचें हा प्रश्न आहे. त्यांना संघराज्याच्या भाषेंतून सर्व शिक्षण देण्याची व्यवस्था असावी, हें ह्याचें सरळ उत्तर आहे. पुरेशी विद्यार्थी-संख्या नसल्यास त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी एखाद्या संस्थेला खर्चाच्या दृष्टीनें झेपणार नाहीं. ही केंद्रीय सरकारची जबाबदारी समजली पाहिजे. अशा 'प्रादेशिक' नसलेल्या लोकसमूहांच्या हितरक्षणासाठीं एकादें स्थायी मंडळ असावें. त्यांनीं इतरांशीं सहकार्याच्या वृत्तीनें वागावें यांत त्यांचेंहि हित आहे. ते रहात असलेल्या प्रदेशांतील सर्वसामान्य जनतेनें एखाद्या छोटयाशा गटाच्या सोयीसाठीं आपले न्याय्य हक्क व हितसंबंध यांवर तिलांजलि द्यावी अशी अपेक्षा त्यांनीं बाळगू नये. अन्य-प्रांतीय लोकांच्या छोटयाशा गटाला मराठी येत नाहीं म्हणून महाराष्ट्रीय जनतेनें उच्च शिक्षणांत मराठी ऐवजीं हिंदी माध्यमाचा स्वीकार करावा असा आग्रह असमर्थनीय होय. परस्परांनीं परस्परांच्या सोयींचा विचार करावा व सहानुभूतीच्या वृत्तीनें परस्परांच्या प्रगतीस सहाय्य करावें. अल्पसंख्याकांच्या सोयीसाठीं लोकांनीं आपली भाषा व वाङ्मय यांचा त्याग करणें म्हणजे एक प्रकारें तो आत्मघातच ठरेल.

## माध्यमिक शिक्षणांत इंग्रजी

देशी भाषांत चांगल्या दर्जाचीं पाठ्य-पुस्तकें आणि सहाय्यक पुस्तकें तयार होतील हें निर्विवाद; पण इंग्रजींत उपलब्ध असलेल्या बहुविध व प्रचंड ग्रंथ-भांडाराची अल्पावधींत बरोबरी करणें अशक्यप्राय होय. इंग्रजींतील ज्ञानभांडाराचा उपयोग करून घेण्यासाठीं इंग्रजी शिकलें पाहिजे. मी इंग्रजी म्हणतों त्याचा अर्थ पाश्चात्य देशांतील एखादी प्रगत भाषा.

विद्यापीठांत इंग्रजीचें अध्ययन सक्तीचें असावें व त्यासाठीं माध्यमिक शिक्षणांत इंग्रजीच्या अभ्यासाचा जरूर तो पाया घालावा.

माध्यमिक शिक्षण पुरें करणारे सर्वच विद्यार्थी विद्यापीठांतील शिक्षण घेतात किंवा त्या शिक्षणास पात्र असतात असें नव्हे. म्हणून माध्यमिक शिक्षणांत इंग्रजीची सक्ती नसावी; मात्र इंग्रजी हा ज्यादा ऐच्छिक विषय म्हणून घेण्यास मुभा राहील अशी सक्तीची तरतूद असावी. देशी भाषांत आपण अद्ययावत् ज्ञान आणण्याचा आटोकाट प्रयत्न करूं. स्वभाषांच्या माध्यमांतून भरपूर ज्ञान ग्रहण करण्याची सोय उपलब्ध करूं. ज्यांना इंग्रजी शिकावयाचें आहे त्यांनाहि तशी मुभा देऊन त्यांची सोय करूं.

इंग्रजी शिकविण्यासाठीं संस्कृत पाठशालांच्या धर्तीवर वेगळ्या संस्था असाव्यात; विद्यार्थ्यांच्या विभिन्न गरजांना साजेसे प्रमाणबद्ध अभ्यासक्रम त्यांत योजावेत. माध्यमिक शालांत परीक्षा, विद्यापीठाच्या परीक्षा, यांच्या दर्जाच्या परीक्षा घ्याव्यात. संभाषण-योग्यता, लेखन-योग्यता यांच्याहि परीक्षा असाव्यात. उत्तीर्ण होणारांना डिप्लोमा द्यावा. अभ्यासाच्या व परीक्षेच्या ह्या सोयीमुळें असा फायदा होईल कीं, ज्यांनीं इंग्रजी व्यतिरिक्त शिक्षणक्रम पुरा केला आहे; पण नोकरी-व्यापारासाठीं अथवा विद्यापीठांत प्रवेश मिळविण्यासाठीं इंग्रजींत प्राविण्य मिळविणें ज्यांना आवश्यक वाटतें त्यांना तरी संधि मिळेल.

भाषा शिकण्यामध्यें समजणें, बोलतां येणें व लिहितां येणें असें तीन प्रकारचें नैपुण्य अंतर्भूत होतें. इंग्रजीचा अभ्यास ज्ञान-संपादनाचें एक साधन म्हणून करावयाचा तर इंग्रजी ललित वाङ्मयापेक्षां शास्त्रीय विषयावरील ग्रंथांच्या आकलनाची क्षमता ही मुख्य कसोटी मानली जावी विज्ञान-ग्रंथांच्या अध्ययनावर भर द्यावा, साहित्यिक ग्रंथांवर नव्हे. त्या दृष्टीनें सध्यांच्या इंग्रजीच्या अभ्यासक्रमाची दिशा बदलावी लागेल. हा बदल क्रांतिकारक तसाच मोठा लाभप्रद ठरेल यांत शंका नाहीं.

**मुंबई राज्य माध्यमिक शिक्षक परिषदेचें १० वें अधिवेशन,**
**अहमदनगर २६-४-१९५४ : अध्यक्षीय भाषण**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम.................... वि: ..............
क्रमांक .................... कों. रि. ..........

डॉ. इरावती कर्वे ह्यांच्या 'भारतीय भाषा आणि त्यांचे भारतांतील स्थान' ह्या लेखांतील युक्तिवादाचा व विचारांचा परमार्श प्रस्तुत लेखांत घेतला आहे.

" हिंदुस्थानांत बोलल्या व लिहिल्या जाणाऱ्या तेरा भाषा त्या त्या प्रांताच्या भाषा म्हणून समजल्या जाव्या, ह्यांत उर्दू व इंग्रजीचा अंतर्भाव होऊं नये, कारण ह्या दोन्हीहि प्रादेशिक भाषा नाहींत. कोणाहि माणसाला मातृभाषा म्हणून इंग्रजींत शिक्षण मिळू नये." हा कर्वे यांचा पहिला निष्कर्ष साधारणपणें आम्हांला संमत होण्यासारखा आहे. 'तेरा भाषा' यांतील 'तेरा' हा आंकडा भारताच्या संविधानांतील आठव्या अनुसूचींत परिगणित असलेल्या चौदा भाषांतून उर्दूला वगळून काढलेला असावा. पण या अनुसूचित चौदा भाषांत संस्कृत हीहि एक भाषा आहे. तीहि उर्दू-प्रमाणेंच प्रादेशिक भाषा म्हणून कोणी मानीत नाहीं. उर्दूबरोबर संस्कृतहि वगळावयास पाहिजे. तसें केलें म्हणजे प्रादेशिक संज्ञेला पात्र असलेल्या अनुसूचित भाषांची संख्या बाराच होते, तेरा नाहीं. इंग्रजी आपली मातृभाषा म्हणणारे कांहीं लहान समाज भारतांत आहेत पण ते हळूहळू इतर भाषिक समाजांत झपाट्यानें विलीन होतील असें भविष्य निःशंकपणें करतां येईल.

## कारभाराची भाषा व शिक्षणाचें माध्यम

तथापि 'इंग्रजी ही केंद्रीय कारभाराची भाषा ठेवावी', मात्र 'मातृ-भाषा म्हणून इंग्रजींतून कोणास शिक्षण मिळू नये' या दोन्ही सूत्रांचा यथायोग्य मेळ बसविणें किती घोटाळ्याचें होईल याचा विचार ही सूत्रें पुरस्कारणारांनीं केलेला दिसत नाहीं.

इंग्रजींतून केंद्राचा कारभार चालावा, 'जगाशीं संबंध ठेवण्यासाठीं व पाश्चात्यांची विद्या हस्तगत करण्यासाठीं' इंग्रजी असावी, हें म्हणणें स्वीकारलें तर मग जे आजच इंग्रजी भाषा ही आपली मातृभाषा म्हणून पुढें उभें ठाकले आहेत आणि तसा व्यवहार करीत आहेत त्यांना केंद्राची भाषा इंग्रजी ठरल्यावर केंद्रांशीं लगट करून सर्व जागा धरून ठेवण्याचा

मोह पडला तर नवल नाहीं आणि मग ‘ आम्ही केंद्राची भाषा इंग्रजी ठेवूं; परंतु तुमची मातृभाषा इंग्रजी असली आणि आम्हांला इंग्रजींतूनच केंद्रीय व्यवहार करावयाचा आहे, तरी देखील तुम्हां इंग्रजी मातृभाषिकांना आम्ही कांहीं इंग्रजींत शिक्षण घेऊं देणार नाहीं ’ ह्या म्हणण्यांत न्याय आणि सोय ती कोठें राहिली ? हळूहळू आम्ही सारेंच शिक्षण इंग्रजींतून घेऊं हा त्यांचा आग्रहच आपणांला मान्य करावा लागेल. किंबहुना, चौदा मान्य भाषांच्या जोडीला इंग्रजी हीहि मातृभाषा किंवा मान्य भाषा म्हणून जोडावी लागेल. हा परिणाम अटळ होऊन बसेल. सबब, हा पक्ष किंवा विचार त्याज्य ठरतो.

कर्वे यांनीं ईंग्रजीसाठीं पुढील मांडणी केली आहे:–

( १ ) इंग्रजी ही केंद्रीय राज्याची भाषा असावी.

( २ ) बाहेरच्या जगाशीं संबंध ठेवण्यासाठीं इंग्रजी असावी.

( ३ ) पाश्चात्यांच्या विद्या हस्तगत करण्यासाठीं इंग्रजी असावी.

वरील तीन पैकीं ( २ ) आणि ( ३ ) कोणी अमान्य करणार नाहीं. आजहि तीच व्यवस्था चालू आहे; पण आम्हांला कलम ( १ ) साफ अमान्य आहे. त्याबाबत विवेचन करण्यापूर्वीं, कलम ( २ ) आणि ( ३ ) साठीं सेव्य जी इंग्रजी तिच्या शिक्षणाची तजवीज व धोरण ह्याबाबत कर्वे यांची विचारसरणी प्रथम पाहूं. ती येणें प्रमाणें आहे :–

( १ ) विद्यापीठांत आणि इतरत्रहि इंग्रजी शिकविण्याचा उद्देश ‘ वाचतां यावें व सोपें बोलतां व लिहितां यावें इतकाच असावा. ’ कारण इंग्रजी संबंधांत आपला उद्देश वाङमयीन प्रवीणता व सखोल अभ्यास नसून, फक्त शुद्ध लिहितां, बोलतां येणें व वाचतां येणें एवढाच आपण ठेवावा आणि म्हणून ( २ ) मॅट्रिकच्या आधीं तीन वर्षं इंग्रजी ‘ शिकविण्यास सुरुवात करावी. ’—असें त्यांचें म्हणणें आहे. या निष्कर्षाचा थोडा समाचार घेऊंया.

केंद्रीय कारभारांत शिक्षण, संशोधन, अर्थव्यवहार, परराष्ट्रीय राजकारण, वकालती व्यवहार, संरक्षणाचे लष्करी व्यवहार, औद्योगिक नियोजन, त्याचप्रमाणें सर्व प्रकारचे कायदेकानू न्याय-निवाडे इत्यादि कार्यांचा व जबाबदाऱ्यांचा समावेश होतो. आतां असला आणि एवढा व्यवहार इंग्रजींत

करावयाचा तर त्याला इंग्रजीच्या पात्रतेची वरिष्ठ सेवकवर्गांत, अधिकाऱ्यांत, मंत्रिमंडळांत वगैरे कोणत्या कोटीची अपेक्षा असावी याचा विचार अवश्य केला पाहिजे. नुसतें सोपें व शुद्ध इंग्रजी लिहितां, बोलतां व वाचतां येण्यानें ही अपेक्षित योग्यता प्राप्त होईल काय ? किंवा अर्थशास्त्र, शिक्षण, राजकारण, युद्धशास्त्र, न्यायशास्त्र इत्यादि शास्त्रांवरील इंग्रजीमधील मान्य ग्रंथ, विवेचनें, अहवाल, प्रतिवृत्तें, संदर्भग्रंथ उत्तम रीतीनें समजण्याइतकी, त्यांतील विवेचनाची मातब्बरी मापण्याइतकी आणि त्या प्रकरणीं आपली विचारसरणी आणि त्या प्रमाणें पुढें मांडून त्यांची सयुक्तिकता प्रस्थापित करण्याइतकी इंग्रजी भाषेवरील प्रभुत्वशक्ति आपल्या केंद्रीय राज्याच्या आणि राज्यांगांच्या विविध सचिवालयांच्या सचिवांच्या आणि सचिवसेवकांच्या अंगीं असली पाहिजे कीं नको ? तसेंच पाश्चात्य विद्या हस्तगत करण्यासाठीं तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, आरोग्यशास्त्र वगैरे शेंकडों विषयांवरील उत्तमोत्तम इंग्रजी ग्रंथ तरी बिनचूक आणि लवकर निदान समजण्याइतपत तरी इंग्रजी भाषेवर प्रभुत्व आपल्या केंद्रापाशीं नको काय ?

## भाषा-ज्ञान कीं भाषा-प्रभुत्व

ह्या प्रकारच्या प्रश्नाचें उत्तर ‘हो’ कारार्थी असेल तर मग हें अपेक्षित प्रभुत्व ‘इंग्रजीचा सखोल अभ्यास’ केल्याशिवाय प्राप्त होईल काय ? पण इंग्रजी शिकण्याचा कर्वे यांचा उद्देश ‘सखोल अभ्यास नसून’ फक्त शुद्ध लिहितां, बोलतां, वाचतां येणें एवढाच आहे व तशा शब्दांत त्यांनीं तो स्पष्ट केला आहे. कर्वे यांनीं आंखून दिलेल्या मर्यादेनें जर इंग्रजी शिक्षणाची व्यवस्था आपण केली तर आम्हीं जी केंद्रीय कारभाराची व जबाबदारीची कक्षा वर वर्णन केली आहे ती योग्य प्रकारें संभाळली जाणें आम्हांस यत्किंचितहि शक्य वाटत नाहीं.

येथें हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, केंद्रीय सरकारची भाषा इंग्रजी ठरविली तर केंद्रीय सरकार आणि प्रादेशिक सरकारें यांचा जो पारस्परिक व्यवहार व्हावयाचा तोहि उभयतांना इंग्रजींतून करावा लागेल. अर्थात् तो योग्य रीतीनें पार पाडण्यास प्रादेशिक सरकारांजवळहि इंग्रजीची योग्यता केंद्राच्या तोलाचीच असावी लागेल. कर्वे यांचा आग्रह प्रादेशिक

सरकारांचा कारभार त्या त्या प्रदेशांच्या देशी भाषांतून चालला पाहिजे असा आहे आणि तो सर्वथा वाजवी आहे. मात्र त्याच वेळीं त्याच प्रादेशिक सरकारांवर सर्वथा परकीय अशा इंग्रजी भाषेंतून केंद्राशीं व्यवहार करण्याचें ओझें त्यांना प्रादेशिक सरकारांवर टाकावयाचें आहे. असें हें कुचक्र आहे आणि त्याच्या सर्व परिणामाची कांहींच मातब्बरी त्यांना भासली नसावी असें म्हटलें पाहिजे.

आम्ही हिंदीच केंद्रीय भाषा आणि सार्वभारतीय भाषा म्हणजेच राष्ट्र-भाषा म्हणून स्वीकार करून ही समस्या उत्तम प्रकारें सोडवली आहे; पण कर्वे यांना ती पटलेली नाहीं. कारण त्यांना असें वाटतें कीं, " सर्व भाषा (मराठी, हिंदी वगैरे) एका पायरीवरच्या समजाव्या व कोणत्याहि एकीला केंद्रीय म्हणून प्राधान्य देऊं नये. "

हिंदी ही एक देशी भाषा आहे. ' मराठी, बंगाली व गुजराती ' ह्या भाषा हिंदीपेक्षां ' अधिक संपन्न व प्रगल्भ ' आहेत, असें कर्वे यांचें म्हणणें आहे. मग केवळ बोलणारांची संख्या अधिक आहे, एवढ्याच कारणासाठीं कमी प्रगल्भ अशी हिंदी केंद्रीय भाषा म्हणून कां स्वीकारावी ? एक तर ती अप्रगल्भ आणि दुसरें, ज्यांची मातृभाषा हिंदी आहे त्यांना " सरकारदरबारीं व सर्व परीक्षांतून मोठा फायदा मिळतो व त्यामुळेंहि इतर भाषिकांना आपल्यावर उगीचच अन्याय झाल्यासारखें वाटतें. " या विभागांत ' उगीचच ' याचा अर्थ ' आपला कांहीं दोष नसतांना ' असा कर्वे यांच्या मनांत असावा. दुसरा जो ' निष्कारण ' असा उगीचच या पदाचा अभिप्राय आढळतो तो येथें लागू नसावा. तेव्हां उगाच अशा कटकटींत पडण्यापेक्षां सरळ आपला ' परकीय इंग्रजीचा स्वीकार करा कसे ! ' असा कर्वे यांचा मनसुबा आहे.

हिंदीचा स्वीकार केला त्या वेळीं तिचें ' साहित्य मराठी-बंगालीपेक्षां अधिक समृद्ध नाहीं, हें माहीत असून ' उघड्या डोळ्यांनीं केला. या वेळीं हेंहि मान्य झालें कीं, समजण्याला–शिकविण्याला मराठी-बंगाली वगैरेंपेक्षां सरळ हिंदी खडीबोली फारच सोपी. ती रचनेला अतिशय लवचिक. तिच्या पोटांत रिचवणुकीला जागा मोठी. तिचा हा स्वभाव प्रसाराला फार उपयोगी, म्हणून हिंदीचा स्वीकार केला.

## आंतरप्रांतीय व्यवहाराचें माध्यम

आतां असें पाहूं कीं, इंग्रजीचा स्पर्श होण्यापूर्वींच्या काळीं काय स्थिति होती ? एक भाषी दुसऱ्या भाषिकांशीं त्या काळीं संपर्कांत येतच नव्हते ? उत्तरेचीं सैन्यें दक्षिणेकडे, दक्षिणेचीं उत्तरेकडे उतरत नव्हतीं ? मराठे अटकेवर पोंचले मग विभिन्न भाषी लोकांशीं ते व्यवहार कसा करीत ? विचार-विनिमयाचें, बोलण्या-चालण्याचें कांहीं समान साधन त्यांचेजवळ नव्हतें काय ? रामेश्वर ते पशुपतेश्वर, कन्याकुमारी ते बद्रिकेदार आणि पुरी ते द्वारका याप्रमाणें हजारों यात्रिक तेव्हां जात, ते व्यवहार कसा करीत ? सावकारी पेढ्या मोठमोठ्या शहरीं चालत त्या कशा ? ज्ञानेश्वर, नामदेव, रामदास, एकनाथादि आमचे साधुसंत तीर्थयात्रा करून आले, इतकेंच काय अनेकांनीं कवनें हिंदींतहि केलीं यावरून कोणती साक्ष पटते ? व्यवहारांतला अनुभव असा कीं, व्यवहारापुरती भाषा सहवासानें कामापुरती लवकर शिकून होते.

शिवाय जेथें समान संस्कृति, समान विचारधन, समान परंपरा, समान देवदेवता, समान व्रतोत्सव इत्यादि रूढ होऊन जातात तेथें एका भाषिकाला दुसऱ्या भाषिकांशीं लवकर समरस होतां येते. आणखी अत्यंत महत्त्वाची गोष्ट लक्षांत वागविली पाहिजे कीं, मराठी, बंगाली, गुजराती, हिंदी या आर्यभाषाकुलांतील भाषांत थोडया-फार रूपांच्या फरकानें इतके अनेक शब्द सारखेच आहेत कीं, या भिन्न रूपांच्या व ठेवणीचा परिचय सहजांत होऊन जातो. द्रविड कुलांतील व आर्य कुलांतील भाषा-संबंधानें मात्र अडचण भासते. त्यांचा मिलाफ होत नाहीं. थोडया शांतपणें अनुभव घेतला तर मराठी, बंगाली, उडिया, असमी, गुजराती, पंजाबी इत्यादि भाषांत वरवर जरी चटकन् न समजण्यासारखा भाग पुष्कळ असला आणि प्रथम-प्रथम आपणांला बावरल्यासारखें झालें तरी एकमेकांना एकमेकांशीं जडून जाण्यास मोठे कष्ट पडत नाहींत. आमच्या संस्कृतीचा हा अमोल वारसा आहे. त्याचें महत्त्व आपल्याला अपरिचयामुळें लवकर ध्यानांत येत नाहीं. युरोपांतहि लॅटिन कुलांतील भाषा वा सॅक्सन कुलांतील भाषा यांच्याबद्दल स्थूलमानानें असेंच म्हणतां येईल. समान आचार-विचार, परंपरा यांच्यामुळें एका भाषेची ओळख दुसऱ्या भाषेला होण्यास विशेष विलंब किंवा आयास लागत नाहीं.

हातच्या कंकणाला आरसा कशाला पाहिजे ? एखादी कोणचीहि लहान कथा बंगाली, मराठी, हिंदी, गुजराती वगैरे भाषांत एकासमोर एक लिहून ठेवा आणि पहा कीं, केवळ एकभाषिकाला दुसऱ्यांतील किती अंश प्रथम प्रसंगांतच समजतो ? किती शिल्लक राहतो ? ह्या योगें येणारा अनुभव फार उद्‌बोधक होईल. प्रत्यक्षांत एकतेची साक्ष अधिक दिसेल. कारण आपल्या देशी भाषांना मुख्य आधार संस्कृत-प्राकृतांचा. म्हणून गाभ्यांत एकता फार घट्ट. एखादा मोठा वंशवेल पहा. मूळ पुरुष एक आणि मग सख्खे-चुलत क्रमानें प्रचंड विस्तार, मध्येंच पिढ्या तुटलेल्या ; मग आपलेच आपल्या देशांतले वाटतनासे होतात. तसाच कांहींसा सर्वस्वी नाहीं. प्रकार या देशी भाषाकुलांचे प्रकरणीं मनांत आणला तर उलगडायला थोडी मदत होईल. मात्र दृष्टांत फार ताणतां कामा नये.

## भाषिक प्रगलभता आणि हिंदी

पण या साम्याच्या आणि जवळिकेच्या सर्व खुणा विसरून एकदम परक्या इंग्रजीच्या गळचांत कायमची मिठी मारण्याची कल्पना अत्यंत विपरीतच म्हटली पाहिजे. प्रगलभतेचा मुद्दा आजची स्थिति पाहतां मान्य करावा लागेल; परंतु इतर देशी भाषांच्या बरोबरीची प्रगलभता हिंदीला प्राप्त करून देण्यास कितीसा उशीर लागेल ? बरें, हिंदी एक देशी भाषा आणि अनेकांची मातृभाषा आहे हें मान्य केलें आणि प्रादेशिक कारभार प्रादेशिक भाषांतच चालला पाहिजे. उच्चतम शिक्षणहि प्रादेशिक भाषांतच झाले पाहिजे हा कर्वे यांचा आग्रहहि पत्करला तर मग हिंदी-भाषी लोकांची भाषा अप्रगलभ राहिली तरी भारताच्या दृष्टीनें तें कर्वे यांस किती हितावह वाटेल ? हिंदी-भाषी समूह अप्रगलभ राहिला किंवा रेंगाळत मागें राहिला तर उच्चतम शिक्षण त्यानें हिंदींतूनच घ्यावें हा आग्रह कितपत न्याय्य होईल ? किती फरकानें हा मागासलेपणा एखाद्या भाषिक समूहांत राहूं देणें भारताच्या दृष्टीनें परवडेल ? हिंदीचा हा अप्रगलभपणा कांहीं अंशानें आमचा सर्वांचाच अप्रगलभपणा ठरणार नाहीं काय ? तो भारताला बाधणार नाहीं काय ? आज आपण सर्व अप्रगलभांना साहाय्य करण्यास कंकण बांधून उभें राहूं तरच आपला निभाव लागेल. उलट, जर आजची अप्रगलभ हिंदी लवकरच आमच्या मराठी-बंगालीसारखी अगदीं पूर्णपणें नसली तरी बरीचशी प्रगलभ

केलीच पाहिजे, तर मग तिचा अप्रगल्भपणा हा चिरकालिक न समजतां अल्पकालिकच ठरेल. नव्हे तसें आपणांला घडवून आणावें लागेल. एवढ्याच-साठीं इंग्रजीच्या निर्गमनाला पंधरा वर्षांची मुदत संविधानांत घातली आहे. ही अगदीं गणितानें बरोबर उतरेल असें नाहीं. कदाचित् पांच कमी, पांच जास्तहि होतील; पण याहून अधिक विलंब घातक ठरेल. मात्र पुनः इंग्रजी-कडे राजभाषा म्हणून तोंड फिरवावयाचें नाहीं हा कृतनिश्चय पाहिजे. या प्रतिज्ञेवरच प्रयत्नांची शिकस्त केली पाहिजे.

कर्वे यांच्या मनांत आणखी एक भ्रम आहे. तो इतर अनेक मोठ-मोठ्यांच्याहि मनाला चिकटून बसला आहे. संविधानांत 'हिंदी' हें नांव आमच्या केंद्रीय सरकारी भाषेला दिलें आहे हें खरें आहे आणि त्यांत चूक कांहीं नाहीं, हेंहि तितकेंच खरें आहे. हिंदी भाषा हीच केंद्रीय भाषा व्हावी असें म्हणणारांचा आग्रह नांवापुरता तरी या वाटेनें पुरविला गेला; पण ह्या हिंदीचा विकास कसा करावा ह्याविषयीं स्पष्ट आदेशहि त्याच संविधानांत आहे.

संविधानाच्या १७ व्या भागांतील ३५१ व्या अनुच्छेदांत हिंदीचा विकास करतांना 'हिंदुस्तानी' आणि अनुसूचित चौदा भाषांतील ग्राह्यांश घ्यावे व ते आत्मसात् करावे असा स्पष्ट आदेश आहे.

'पोषक' हिंदी अनुसूचित वर्गांत आहे. या अनुसूचित भाषा-गणनांत चौदापैकीं बारा भाषा उघड-उघड ज्या आज प्रादेशिक म्हणून गणल्या जातात अशाच आहेत आणि म्हणून अनुसूचित हिंदी तिच्या जोडीच्या ज्या इतर अकरा अनुसूचित मराठी, बंगाली, गुजराती प्रभृति प्रादेशिक भाषा आहेत त्याप्रमाणेंच हीहि प्रादेशिक भाषाच गणली गेली पाहिजे. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें तर असें कीं, प्रादेशिक हिंदी किंवा मातृभाषा हिंदी ही भारताची म्हणून स्वीकारलेली हिंदी नव्हे. अर्थात् प्रादेशिक किंवा मातृभाषा हिंदीचा केंद्रीय भाषा म्हणून स्वीकार झालेला नाहीं. म्हणून कर्वेप्रभृतींचें या प्रकरणींचें विवेचन ह्या मुद्यापुरतें निर्मूल समजण्याशिवाय गत्यंतर नाहीं.

## दोन हिंदी भाषा ?

तर मग काय दोन हिंदी आहेत ? त्या निराळ्या भाषा आहेत ? तसें म्हणावें तर तिच्या आत्म्याला धक्का न लावतां ('वुइदाउट इंटर फिअरींग वुइथ् इट्स् जीनिअस्') विकास सा ावा असें जें ३५१ व्या धारेंत संविधानानें स्वच्छ सांगितलें त्याचा उलगडा कसा ? याचें समाधान असें आहे कीं, प्रादेशिक हिंदी आणि दुसरीला आपण भारतीय हिंदी म्हणूं या—ह्या दोन अगदीं स्वतंत्र, एकमेकांशीं कसलाहि संबंध नसलेल्या भाषा नाहींत.

एका दृष्टांतानें आपली थोडी समजूत पडते का पहा ! समजा, एक एकमजली घर आहे पुढें या मजल्यावर दुसरा मजला आपणांस चढवावयाचा आहे. खालच्या मजल्याला एक-दोनच दारें आहेत, पण आतां वरच्या मजल्यावर आपणांस पुष्कळ दारें, खिडक्या व भोंवतालीं प्रदक्षिणामार्ग — अशी कांहीं नवीन रचना करावयाची आहे. तर आपण काय करूं ? पाया आहे तोच कायम ठेवूं आणि त्याच भक्कम पायावर वरील मजला सोईप्रमाणें रचूं. ह्या मजल्यावर येण्यासाठीं आपणांला बारा जिने ठेवावयाचे आहेत तर ठेवू. भिंतीऐवजीं सर्व जाळ्याच बसवूं. हे बारा जिने म्हणजे बारा भाषा समजा. प्रत्येक भाषेसाठीं एक एक निराळा जिना असून त्या त्या जिन्यानें त्या त्या भाषेंतील निवडक व पसंत केलेले शब्द, वाक्प्रचार इत्यादि ग्राह्यांश हिन्दीच्या ह्या दुसऱ्या मजल्यावरील शब्दादि सष्टींत प्रवेश करून सेवा करतील. तळमजल्यावरील हिन्दीला आप..ीं द्वारें उघडीं ठेवण्याची वा बंद करण्याचा किंवा नव्या खिडक्या वगैरे पाडण्याचा पूर्ण अधिकार राहील. पहिल्या किंवा तळमजल्यावर प्रादेशिक हिन्दी नांदेल. तिच्या पायावर बांधलेल्या वरच्या मजल्यांत भारतीय हिंदी नांदेल. वाटलें तर ती आणखीहि मजले चढवील. दोहोंचा पाया एकच, आत्मा एकच. त्या पायाला किंवा आत्म्याला धक्का न लावतां आमची भारतीय हिन्दी आपला संसार स्वतंत्रपणें चालवील. न जाणों, जिने काढून टाकून शेजारच्या बारा भाषांच्या बारा प्रासादांत ती मुक्त संचार वरच्यावर जोड-पूल बांधूनहि करील.

असो, 'दृष्टांत तितुका एकदेशी' असें श्रीसमर्थांनीं बजावलें आहे. मुद्दा, किती कल्पना मनांत असल्या तरी उतरण्यापुरताच त्यांचा उपयोग.

खडीबोली म्हणून जें हिन्दीचें रूप आहे तेंच पूर्वापार भारतीय म्हणून परिचित आहे एरवीं तळमजल्यावर अवधी, भोजपुरी, बुंदेली वगैरे किती तरी मंडळींची गर्दी आहे !

तात्पर्य भारतीय हिंदी बहिष्कारवादी नसेल. ती सर्वसमावेशक, संग्राहक-नीति प्रमाण मानून आपला संसार चालवील. तळमजल्यावरील मंडळींना जितकें सोंवळें परवडेल त्यांनीं ठेवावें.

प्रचंड वटवृक्षाच्या अनेक पारंब्याच वृक्षरूप होऊन बसतात. वृक्ष मूळचा एक असला तरी अनेकपणाचें वैभव दाखवतो. तसाच कांहींसा प्रकार येथें समजावा.

भारतीय हिंदी उंचहि वाढेल आणि आपले बाहू दूरवर पसरतहि जातील. भारतीयांच्या साहाय्यासाठी तिचा अवतार आहे. भारतीय हिंदीचा विकास प्रादेशिक इतर भाषांच्या विकासाला कसलाहि प्रतिबंध न करतां घडून येईल अशी तजवीज करावयाची आहे

पारिभाषिक शब्दांची अडचण मोठी आहे. प्रत्येक प्रादेशिक भाषा आपल्या घरीं कसल्याहि पारिभाषिक संज्ञा वापरो; आम्ही मात्र सर्वत्र भारतांत निदान राज्यकारभारांत आणि आमच्या अखिल भारतीय सभांतून वगैरे एकच परिभाषा वापरूं आणि आम्ही जरी बहिष्कारवादी नाहीं तरी ही पारिभाषिक शब्दावलि आम्हांला आमच्या प्राचीन संस्कृत भाषेकडून घेतली पाहिजे आणि तशी ती आम्ही आनंदानें घेऊं आणि ती सर्वत्र भारतीय व्यवहारांत वापरूं.

## हिंदीबाबत योग्य निर्णय

असा खोल विचार करूनच आमच्या लोकप्रतिनिधींनीं हिंदीचा निर्णय घेतला तो यथायोग्यच आहे. तो निर्णय परिपुष्ट करण्याच्या उद्योगाला उत्साहानें लागण्याऐवजीं परकीय इंग्रजीशीं सोयरीक जोडण्याची किंवा पुढें चालविण्याची उफराटी कल्पना आतां कोणी ऐकणार नाहीं.

घटनाद्रोह, हिंदीद्रोह, देशद्रोह असा आक्रोश करण्याचें वा कोणाला भिवविण्याचें आम्हांला कांहींच प्रयोजन दिसत नाहीं. नडेल तेथें आम्हीच

ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम ........................ वि: .......
क्रमांक ........................ नों. दि. ......

बनविलेली घटना बदलून घेण्याचा आम्हांला अधिकार आहे. विचार-स्वातंत्र्य आणि उच्चार-स्वातंत्र्य केव्हांहि अखंडित राहिलें पाहिजे. आचार-स्वातंत्र्यावर मर्यादा घालावीच लागते. औचित्य आणि सत्य या सर्वव्यापी मर्यादा असल्यानें त्या सांभाळल्याच पाहिजेत.

हिंदीचा आम्हीं स्वीकार केला, सार्वभारतीयांचा सार्वभारतीय व्यवहार ही तिची कक्षा ठरवून दिली, तिचें स्वरूप अखिल भारतीयांनीं आपल्या सोईनें आणि सत्तेनें ठरवावयाचें. कोणा एका प्रदेशाची मातृभाषा म्हणजे भारतीय हिंदी नव्हे, पूर्वींहि आम्ही तिचाच आश्रय त्या वेळच्या परिस्थितीला योग्य असा तिचा नवविकास आम्हीं करूं; पण जवळची, घरची, सर्वसुलभ हिंदी टाकून इंग्रजीच्या गळचांत माळ घालणार नाहीं.

इंग्रजीचें महत्त्व आम्ही जाणतों. पोकळ अभिमानाच्या भरीं पडून तिकडे आमचें दुर्लक्ष होतां कामा नये; पण म्हणून प्रत्येकाच्या माथीं इंग्रजी मारावयाचें आम्हांला कांहींच कारण नहीं. पाश्चात्य ज्ञानाचें संपूर्णपणें हरण किंवा शोषण करून तें आम्हांला आमच्या प्रधान देशी भाषांत भरपूरपणें सांठवून ठेवावयाचें आहे. एका भाषेचें भांडें त्या ज्ञानानें भरलें कीं, दुसऱ्या देशी भाषांत तें वितरित होईल अशी सुंदर व्यवस्था आम्हांस करावयाची आहे. ज्यांना अनेक भाषा लीलेनें शिकतां-शिकवितां येतात अशा चतुरांची पुरेशी संख्या आमच्यापाशीं हुकमी तयार पाहिजे. त्यासाठीं जागरूक प्रयत्न केले पाहिजेत. इंग्रजींतलें यत्किंचित् उपयोगी ज्ञान आम्ही वायां जाऊं देणार नाहीं अशी पक्की तजवीज आम्हांस करावयाची आहे.

जगाशीं घनिष्ठ संबंध जागृत ठेवण्यासाठीं सर्व आवश्यक त्या उपायांची योजना आम्हांस डोळसपणें केली पाहिजे. सरसकट प्रत्येकाला पावशेर इंग्रजींचें वांटप करीत राहणें चुकीचें आहे; पण निवडक व लायक लोकांना इंग्रजींत आमच्यापेक्षांहि अधिक तरबेज करून ठेवणें आम्हांस अत्यावश्यक आहे, त्यासाठीं ' इंग्रजीची सोय हवी; पण सक्ति नको ' हें सूत्र आम्हीं निश्चित करून निर्धास्तपणें पुढें चाललें पाहिजे.

जेथें आपल्या घरच्या देशी भाषांत सर्व प्रजांना साक्षर करण्यासाठीं

आम्ही अजून धडपडत आहोंत तरी करोडों रुपये आणि आणखी कित्येक वर्षें आम्हांला झटावें लागेल, तेव्हां हें साध्य आम्ही साधूं शकूं; मग तेथें परक्या इंग्रजीला केंद्रीय भाषा म्हणून राखून भलत्याच गर्तेत प्रजांना लोटण्यास आम्ही कदापि मान्यता देणार नाहीं. देशी भाषा शिकून आणि शिवाय इंग्रजीसारख्या परकीय भाषेचीहि जोड आम्ही करून घ्यावी म्हटलें तर मागील अनुभवावरून किती वर्षें लागतील ? श्री. ॲनी बेझंट यांनीं या यश:संपादनाला निदान दोनशें वर्षें लागतील असा अंदाज सांगितला होता. तेव्हां हातचें सोडून पळत्याच्या पाठीस लागण्यानें आपलें नुकसान तर होईलच; पण आपलें हसेंहि झाल्याशिवाय राहणार नाहीं.

इंग्रजी शिकण्याला लागणाऱ्या काळापेक्षां किती तरी कमी वेळांत आम्हांला हिंदी शिकतां येतें. लक्षावधि लोकांचीं आयुष्यें व्यर्थ प्राथमिक इंग्रजीच्या पायीं फुकट दवडणें म्हणजे एक राष्ट्रीय आपत्तीच समजली पाहिजे. तेव्हां असल्या व्यामोहांतून आपली जेवढी/लवकर सुटका होईल तितका आपला लाभच समजला पाहिजे.

## प्रकार दोन पण पाया एकच

यद्यपि भारतीय हिंदी आणि प्रदेशिक हिंदी हे दोन प्रकार आम्ही वर स्पष्ट केले आहेत, तथापि त्याचें मूळ किंवा पाया एकच आहे. अर्थात् प्रादेशिक हिंदी-भाषिकाला भारतीय हिंदींत प्रावीण्य मिळविणें बरेंचसें सोपें जाईल. इतर भाषिकांना, विशेषत: द्राविड भाषाकुलांतील भाषिकांना तें बरेंच जड जाईल; पण इंग्रजी– अगदीं सोपें– इंग्रजी देखील शिकण्यापेक्षां हिंदी शिकण्यास द्राविडांनाहि कमी श्रम व वेळ लागेल. सांस्कृतिक साम्य या कामीं पुष्कळ सहायक होतें. संस्कृतचा परिणाम द्राविड भाषांवर फारच झालेला आहे. तेलगु, कन्नड, केरळी या द्राविड भाषांत संस्कृतचा भरणा फारच मोठा आहे. तामिळमध्येंहि आहेच; पण जरा कमी. म्हणून तिकडील कित्येक विरोधी चळवळचे ‘ द्राविड-कळहम् ’ ची चळवळ चालवितात; पण हे नायकार-मंडळ केवळ हिंदी भाषेलाच विरोध करतात असें नव्हे तर त्यांना सर्व आर्यमंडळ संस्कृतादिभाषा वगैरेंचें उच्चाटन करून ‘ द्रविडिस्तान ’ स्थापन करावयाचें आहे. म्हणून त्यांनीं देवनागरींत

लिहिलेल्या पाट्यांनाहि डांबर फासलें ! अशांना आततायी वर्गात गणून त्यांची तशीच संभावना कठोरपणानें केली पाहिजे. एरवीं अनेक समंजस द्राविड हिंदीचा स्वीकार उत्सुकतेनें करीत आहेत. शिवाय पूर्व द्राविड भागांत इंग्रजीचें प्रस्थ पूर्वीपासूनच माजलेलें आहे, तेव्हां तें मोडून काढण्यास अधिक काळ लागेल. खेरीज हिंदी-हिंदी म्हणून गदारोळ करून आणि अनुनयांवर भर देण्याऐवजीं निग्रहावर भर देण्याच्या नीतीमुळेंहि प्रतिक्रिया तीव्र होते. जेथें दुःख मोठें तेथें जरा हळुवारपणानेंच काम साधलें पाहिजे. अगदीं एकाएकीं एकेरीवर येण्यानें विरोध मात्र वाढतो.

कर्वे यांना आपला इंग्रजीचा तोडगा फार 'सुटसुटीत' वाटतो. एक इंग्रजी आणि दुसरी स्वभाषा; पण इंग्रजी घेणें म्हणजे केवढा बोजा आणि अडचण आहे हें तर दाखविलेंच आहे. ह्या एकट्या इंग्रजीचें ओझें अगदीं सोपी इंग्रजी म्हटली तरी देखील — एवढें जड होईल कीं, स्वभाषा हिंदी यांच्या जोड-ओझ्यापेक्षांहि तें अनेक पटींनीं अवघड, शिवाय परकेपणा वगैरे भावनात्मक विचार आहे तो निराळाच.

## एक लिपि, पण कोणती ?

'देवनागरी लिपि' संविधानांत स्वीकारलीच आहे; हें बरें कीं, देशी भाषांनाहि रोमन लिपीच लागू करावी असें स्पष्टपणें कर्वे यांनीं प्रतिपादिलें नाहीं, 'एक लिपि' व्हावी अशी मोघम भाषा त्यांनीं वापरली आहे. पूर्वी नेहरू-सुभाष-प्रभृति महान् 'देशभक्तां'नीं रोमन लिपीचा पुरस्कार चालविला होता अर्थात् आंतरराष्ट्रीय दृष्टि, मुद्रणसुलभता इत्यादि अनेक मोहक फायदे या प्रकरणीं त्यांनीं दाखवून दिले होते; पण आतां 'रोमन' पक्ष थंड झालेला दिसतो; पण देवनागरी लिपीचा जर सर्व भारतीय भाषांसाठीं वापर होईल तर आपली भाषिक समस्या फार त्वरेनें सुटेल. हर-प्रयत्नानें लोकांची समजूत पाडली पाहिजे. जेव्हां केंद्राचा व्यवहार देवनागरींत जोरानें होऊं लागेल आणि मराठी-हिन्दी-प्रभृति नागरी-लिपिक प्रदेशांचा व्यवहारहि त्या लिपींतून जोरावेल तेव्हां फार न बोलतां, न सांगता, आपोआपच इतरलिपिक नागरीकडे वळतील. यानें आपल्या प्रगतीचा वेग अतोनात वाढेल. इंग्रजी कीं हिन्दी–हा प्रश्न वास्तविक सर्व आक्षेपांचा

योग्य विचार करून कागदावर तरी उत्तर मांडून आपण सोडविला आहे. हिन्दीच्या बाजूनें राष्ट्र कौल देऊन चुकलें आहे तथापि कोणाहि विचारकाला भिन्न मत मांडण्यास केव्हांहि मुभा राहिलीच पाहिजे. वास्तविक पाहतां 'इंग्रजी कीं हिंदी' हा प्रश्न आतां जिताजागतां राहिलेला नाहीं. तो 'मृत' समजला तरी चालेल. 'पूर्वनिर्णित' 'रेस जुडिकेटा' चा न्याय तात्त्विक क्षेत्रांत केव्हांच लागू करूं नये. म्हणून व्यवहारी जगांत जरी एखादा विचार 'मृत' कोटींत गेलेला असला तरी बौद्धिक अथवा तात्त्विक क्षेत्रांत कोणचाहि विचार कधींच 'मृत' समजला जात नाहीं. एवढ्याच साठीं जरी कर्वे यांनीं उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांचा विचार होऊन गेलेला असला तरी पुनरपि विचार करण्यास चिंता नाहीं. त्यामुळें 'मृतमारणा' चा आक्षेप ग्राह्य ठरणार नाहीं. वैचारिक क्षेत्र हें अनिर्बंधच समजलें पाहिजे.

नवभारत मासिक, मे १९५५

भारताच्या संविधानांत सतरावा अध्याय राजभाषेबद्दल म्हणजे भारत-सरकारच्या भाषेबद्दल आहे. भारत-सरकारच्या अधीन जीं कार्यें आहेत, त्यांचा कारभार कोणत्या भाषेंत चालवावा ह्या संबंधानें केलेले नियम ह्या सतराव्या अध्यायांत घटनाबद्ध केलेले आहेत. पुष्कळ मतभेद आणि वाटाघाटी, चर्चा आणि वादविवाद होऊन मगच हा सतरावा अध्याय अविरोधानें संमत करण्यांत आला.

## संविधानाचा १७ वा अध्याय

ह्या सतराव्या अध्यायांतील निर्णयांपैकीं पहिलाच निर्णय 'देवनागरी लिपींत लिहिलेली हिन्दी ही भारताची राजभाषा असेल' असा आहे. (३४३ क.) याच संविधानांत ३४४ (१) मध्यें अशी तरतूद आहे कीं, राष्ट्रपतींनीं संविधान अमलांत आणल्यापासून पांच वर्षें संपतांच एक कमिशन म्हणजे आयोग नेमावा. त्यामध्यें संविधानाच्या आठव्या अनुसूचींत (शेड्यूल) मध्यें नमूद केलेल्या चौदा भिन्न भाषांचे प्रतिनिधि असावेत. या कमिशननें पुढील बाबींचा विचार करून राष्ट्रपतींना आपल्या शिफारसी सादर करावयाच्या आहेत ३४४ (२)

१. भारताच्या कारभारी कारणासाठीं करावयाचा हिंदी भाषेचा क्रमागत वापर.

२. भारताच्या कोणत्याहि एका किंवा सर्व कारभारी कारणांसाठीं करावयाच्या इंग्रजी भाषच्या वापरावर निर्बंध.

३. कलम ३४८ मध्यें सांगितलेल्या कोणत्याहि एका किंवा सर्व कारणांसाठीं वापरावयाची भाषा. (टीपः– ३४८ कलम हें सर्वश्रेष्ठ न्यायालय आणि उच्च न्यायालयें यांमध्यें वापरावयाच्या भाषेबाबत आहे.)

४. एक किंवा अधिक निर्दिष्ट कारणांसाठीं भारत सरकारनें वापरावयाच्या अंकांच्या रूपांबद्दल. (फॉर्म ऑफ न्यूमरल्स)

५. भारत सरकारच्या कारभारी भाषेबाबत राष्ट्रपतींनीं आयोगाच्या विचारार्थ सोपविलेली दुसरी कोणतीहि बाब. त्याचप्रमाणें भारत सरकार

आणि प्रादेशिक सरकारें ह्यांच्यांतील परस्पर व्यवहाराची भाषा आणि तिचा वापर आणि एक प्रादेशिक सरकार आणि दुसरें प्रादेशिक सरकार ह्यांच्यांतील व्यवहारांची भाषा आणि ह्या भाषांचा वापर.

सदरील प्रकरणीं आपल्या शिफारशी करतांना कमिशननें भारतांतील औद्योगिक, सांस्कृतिक आणि शास्त्रीय प्रगतीकडे योग्य लक्ष पुरवावें. तसेंच अ-हिंदी भाषिक विभागांतील नागरिकांचें सरकारी नोकरीसंबंधांचे न्याय्य हक्क आणि हितसंबंध ह्यांकडेहि लक्ष पुरवावें. ३४४ (३.)

३४४.४. ह्या कलमान्वयें भारताच्या लोकप्रतिनिधि-सभेंतील २० आणि राज्यसभेंतील १० प्रतिनिधि मिळून प्रमाणशीर पद्धतीनें निवडलेल्या ३० प्रतिनिधींची एक समिति नेमली जाईल.

३४४.५. कलमान्वयें आयोगानें केलेल्या शिफारशींची तपासणी करून आपला त्यासंबंधींचा अभिप्राय राष्ट्रपतींकडे सादर करणें हें ह्या समितीचें कर्तव्य असेल.

३४४.६. प्रमाणें : ३४३ कलमांत ( ज्यांत हिंदी भाषा स्वीकारली आहे तें ) कांहींहि सांगितलें असलें तरी वरील पार्लमेंटरी समितीच्या रिपोर्टाचा विचार करून तो संपूर्ण रिपोर्ट किंवा त्यांतील एखादा भाग ह्याला अनुसरून आदेश देण्याचा अधिकार राष्ट्रपतींना असेल.

## संविधानाच्या तरतुदीचें सार

ह्या सर्वांचें फलित येणेंप्रमाणें : (१) ३४३ कलमांत देवनागरी हिंदीचा स्वीकार केलेला आहे आणि त्याच कलमाप्रमाणें घटनेच्या सुरुवातीपासून (१९५०) पंधरा वर्षेपर्यंत म्हणजे १९६५ अखेर इंग्रजी चालू राहील. दरम्यान इंग्रजीच्या जोडीला हिंदीचा वापर करण्याचा हुकूम राष्ट्रपतींना काढतां येईल.

२. मात्र वरील १५ वर्षांनंतर इंग्रजी पुढें चालविणें असल्यास तसा कायदा पार्लमेंटास करतां येईल.

३. १९५० ते १९६५ ह्या पंधरा वर्षांत राष्ट्रपतींना दोन आयोग नेमावे लागतील–एक १९५५ मध्यें आणि दुसरा १९६० मध्यें.

४. ह्या आयोगांपुढें ठेवावयाचे पांच विषय मागें सांगितलेच आहेत.

५. आयोगांच्या शिफारशीचा विचार करण्याचें काम पार्लमेंटच्या ३० सभासदांच्या समितीकडे आहे.

६. ह्या समितीनें केलेल्या शिफारशींचा विचार करून द्यावयाचें आदेश राष्ट्रपति काढतील.

७. समिति आणि आयोग दोघांनींहि आपल्या शिफारशी राष्ट्रपतींकडे सरळ सादर करावयाच्या आहेत.

८. ह्या ठिकाणीं पार्लमेंटचा संबंध ३० प्रतिनिधि नेमण्यापुरता येतो. १५ वर्षांनंतर इंग्रजी पुढें चालू ठेवावयाची असेल तर तसा कायदा करतां येतो.

९. यावरून असें दिसेल कीं, राजभाषेचा प्रश्न संविधानांत पुष्कळ सावधगिरीनें सोडविला असून त्यांत निरनिराळ्या यंत्रणेच्या परस्परावलंबी मर्यादा ठेवल्या आहेत आणि राष्ट्रपतींवर आदेशांची जबाबदारी टाकली आहे. मात्र त्यांना पार्लमेंट प्रतिनिधींच्या शिफारशींबाहेर जातां येणार नाहीं.

घटना १९५० पासून सुरू झाली आणि राष्ट्रपतींनीं पहिला आयोग ७ जून १९५५ मध्यें नेमला. आयोगाच्या विचारार्थ द्यावयाच्या विषयांपैकीं राष्ट्रपतींनीं पांचवा विषय येणेंप्रमाणें दाखल केला होता—'भारत सरकारच्या कारभारासाठीं त्याचप्रमाणें प्रदेश सरकार आणि भारत सरकार ह्यांच्या अंतर्गत व्यवहारासाठीं आणि एक प्रदेश सरकार आणि दुसरें प्रदेश सरकार ह्यांच्या परस्पर व्यवहारासाठीं वापरांत असलेली इंग्रजी भाषा हळूहळू हटवून तिची जागा क्रमानें हिंदीस केव्हां आणि कशी द्यावी ह्याचें वेळापत्रक तयार करून देणें.'

ह्या आयोगाला राष्ट्रपतींनीं साक्षीपुरावा घेण्यासंबंधानें भरपूर स्वातंत्र्य दिलें होतें आणि आपला अहवाल निदान ३० एप्रिल १९५६ पूर्वी सादर करण्याचा आदेश दिला होता. श्री. बाळासाहेब खेर हे या आयोगाचे अध्यक्ष होते. ह्या आयोगावर २१ सभासद होते. पुढें ही ३० एप्रिलची मुदत ३१ जुलै १९५६ पर्यंत वाढविण्यांत आली. आयोगानें आपल्या शिफारशी वाढविलेल्या मुदतींत सादर केल्या. आयोगानें एक प्रश्नपत्रिका काढली होती. त्यांना १०९४ लेखी निवेदनें सादर झालीं. त्यांनीं ९३० व्यक्ति आणि

## भारताच्या राजभाषेचा प्रश्न

प्रतिनिधि ह्यांच्या साक्षी घेतल्या. आयोगाचा छापील अहवाल १२ ऑगस्ट १९५७ रोजीं पार्लमेंटसमोर सादर झाला. म्हणजे आयोग नेमल्यापासून आयोगाचा मुद्रित अहवाल तयार होण्यास सव्वादोन वर्षांवर काळ गेला.

ह्यानंतर ११ आणि १३ सप्टेंबर १९५७ ह्या दिवशीं आयोगाच्या अहवालाचा विचार करण्यासाठीं पार्लमेंटरी समितीची निवड झाली. समितीची पहिली सभा १६ नोव्हेंबर १९५७ रोजीं भरली. शेवटची सभा २८ नोव्हेंबर १९५८ रोजीं झाली. समितीचा अहवाल ८ फेब्रुवारी १९५९ रोजीं राष्ट्रपतींना सादर झाला.

पार्लमेंटरी समितीनें आपला अहवाल सुटसुटीत असा तयार केला आहे. ह्या अहवालाचें पहिलें प्रकरण प्रास्ताविक आहे. दुसऱ्या प्रकरणांत हा राजभाषेचा विषय आणि त्यांतील अंतर्गत महत्त्वाचे प्रश्न ह्याबद्दल समितीचा सर्वसामान्य दृष्टिकोण काय आहे तें सुमारें पंचवीस पानांत विशद केलें आहे. तिसऱ्या प्रकरणाचे दोन भाग आहेत. आणि त्यांत हिंदी भाषा-आयोगाच्या शिफारशींवरील आपला अभिप्राय समितीनें विभागून दिला आहे. पहिल्या भागांत आयोगाकडे सोंपविलेल्या आणि मागील लेखांत नमूद केलेल्या विषयपंचकाबद्दल आपला अभिप्राय समितीनें विशद केला आहे आणि दुसऱ्या भागांत आयोगाच्या शिफारशी एका रकान्यामध्यें नोंदून त्यासमोर 'मान्य', 'अमान्य', 'नको', 'अधिकाराबाहेरचें', 'आपलें निराळें मत' याप्रमाणें समजूत पडेल अशी नोंद केली आहे. असें म्हणावयास हरकत नाहीं कीं, आयोगाच्या शिफारशी समितीनें नव्वद टक्के मान्य केल्या आहेत.

## आयोगाच्या शिफारशींवर समितीय मत

१. आयोगाची एक शिफारस अशी होती कीं, विविध श्रेणींतील सरकारी नोकरांना हिंदीमध्यें कांहीं प्राविण्य दाखवावें लागेल. पहिलीं कांहीं वर्षें या प्रकरणीं जरा कमी प्रतीचें प्राविण्य खपवून घ्यावें लागेल. समितीला

ही शिफारस साधारणपणें संमत आहे; पण आयोगानें ह्या प्रकरणीं ज्यांना हिंदीचें निर्धारित प्राविण्य संपादन करतां येणार नाहीं, अशा सरकारी नोकरांसाठीं कांहीं दंडयोजना असणें उचित ठरेल, असा अभिप्राय दिला आहे; तसेंच जे विशेष प्राविण्य दाखवितील, त्यांना कांहीं स्वतंत्र प्रोत्साहन आणि पारितोषिक द्यावें असें सुचविलें आहे. समितीनें मात्र ही शिफारस गाळावी असा अभिप्राय व्यक्त केला आहे.

२. भारत सरकारच्या कारभारी यंत्रणेंतील कांहीं विभागांत अनिश्चित काळपर्यंत इंग्रजी पारिभाषिक शब्दांचा वापर (भारतीय पारिभाषिक शब्द त्यासाठीं सिद्ध करण्याची ज्या पातळीवर आवश्यकता भासमान होणार नाहीं तेथ) पुढें चालू ठेवावा असा आयोगाचा अभिप्राय आहे.

समितीनें सामान्यतः ही शिफारस मान्य केली असली तरी अनिश्चित काळपर्यंत इंग्रजी शब्दांचा वापर चालवावा हें मान्य केलें नाहीं. त्या ऐवजीं ज्या काळपर्यंत तशी आवश्यकता भासेल तेथपर्यंत तो वापर चालू ठेवावा असें मत व्यक्त केलें आहे.

३. पंचेचाळीस आणि त्यावरील वयाच्या सरकारी अधिकाऱ्यांना हिंदीचें साधारण समजण्याइतपत ज्ञान असावें आणि हें ज्ञान त्यांना त्यांच्या कामासाठीं लागणाऱ्या इंग्रजीच्या पातळीच्या बरोबरीचें असावें असें आयोगानें सुचविलें आहे. यावर पंचेचाळीस आणि त्यावरील वयाच्या सरकारी अधिकाऱ्यांना हिंदीचें ज्ञान असणें आवश्यक असूं नये असें समितीन सुचविलें आहे.

## हिंदीच्या वापराचें वेळापत्रक

४. राष्ट्रपतींनीं आयोगाकडे सरकारी कारभारांत हिंदीचा वापर करण्याच्या प्रकरणीं वेळापत्रक आंखून देण्याचें काम सोंपविलें होतें. असें वेळापत्रक तयार करण्यासाठीं सरकारच्या विविध मंत्रालयांकडून जी आवश्यक माहिती आणि योजना यावयास पाहिजे होत्या त्या न पुरविल्याकारणानें सामान्य धोरणाचें दिग्दर्शन करून प्रत्यक्ष वेळापत्रक तयार करण्याचें काम आयोगानें परत सरकारच्याच अंगावर टाकून दिलें. किंबहुना त्यांना तसें

करणें भाग पडलें. ह्या प्रकरणीं समितीनें अशी इच्छा व्यक्त केली आहे कीं, सरकारी भाषा म्हणून हिंदीचा वापर करण्यासंबंधानें आयोगाच्या शिफारशींचा विचार करून समितीनें जीं मतें व्यक्त केलीं आहेत त्यांस अनुसरून भारत सरकारनें एक कृतियोजना बनवावी आणि ती अमलांत आणावी.

५. इंग्रजी किंवा आंतरराष्ट्रीय अंकगणनेच्या जोडीला देवनागरी स्वरूपाच्या अंकगणनेचा वापर करण्याबाबत राष्ट्रपतींनीं १९६० पूर्वी कोणते आदेश द्यावे, याबद्दल आपणांस कांहींहि शिफारशी करावयाच्या नाहींत असें आयोगानें म्हटलें आहे. समितीच्या मतें हा मुद्दा अनावश्यक असल्यानें विचारांत घेण्याचें कारण नाहीं.

६. ह्यानंतर समितीनें कायदा, कायदेमंडळ आणि न्यायालय यांत योजावयाच्या भाषेसंबंधानें आयोगानें केलेल्या शिफारशींचा विचार केलेला आहे. त्यांत प्रथम कायदाविषयक भाषेबद्दलच्या आयोगाच्या शिफारशी घेतल्या आहेत. आयोगानें प्रादेशिक विधानसभांतील भाषेबद्दल केलेल्या शिफारशी ह्या आयोगाकडे सोंपविलेल्या अधिकारकक्षेच्या बाहेरच्या असल्यानें आणि संविधान कलम ३४८ च्या कक्षेंत येत नसल्यानें त्यांचा विचार करूं नये असें समितीनें सुचविलें आहे.

## संविधानांतील तीन कलमें महत्वाचीं

७. पार्लमेंटांत कामकाज हिंदी किंवा इंग्रजीमध्यें चालवितां येईल; परंतु त्याला संविधानांतील ३४८ कलमाची मर्यादा राहील. ह्या प्रकरणीं वाचकांनीं संविधानांतील कलम १२० पाहावें. त्याच प्रमाणें वाचकांनीं हेंहि लक्षांत ठेवावें कीं, कलम २१० अन्वयें प्रादेशिक सरकारांच्या विधानसभांतील काम त्या त्या प्रदेशांतील भाषांमधून अथवा हिंदी वा इंग्रजींत चालवितां येईल. अर्थात् त्यालाहि कलम ३४८ ची मर्यादा राहील. ह्या प्रकरणीं वाचकांनीं संविधानांतील कलम २१० चा काळजीपूर्वक अभ्यास करावा. तात्पर्य, संविधान कलम १२०, २१० व ३४८ हीं संयुक्तपणें अभ्यासलीं पाहिजेत; तरच परिस्थिति बरोबर ध्यानांत येईल.

आजच्या परिस्थितींत प्रादेशिक सरकारांना प्रदेशांतील भाषांच्या ऐवजीं आपल्या विधानसभांचा कारभार हिंदींतून चालविण्याचा कायदा करतां येईल. तसा प्रयत्न करण्याचा घाट पूर्वीच्या मुंबई सरकारनें घातला होता

आणि आश्चर्य हें कीं, मुंबई विधानसभेंतील विरोधी पक्षांतील मोठमोठ्या शहाण्यांनींहि भाबडेपणानें त्याचें स्वागत केलें होतें; परंतु ह्यांतील धोका दाखवून दिल्यानंतर आणि जनतेचा विरोध प्रकट होऊं लागल्यानंतर मुंबई सरकारनें असा कायदा घडविण्याचा संकल्प त्या वेळीं सोडून दिला होता. लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, हे धोके अजून कायम आहेत.

ग्रंथसंग्रहालय, ठाणे.
अनुक्रम........................ वि: ......
क्रमांक........................ नों दि: ...

## कायदेकानूंचा हिंदींत महाग्रंथ

८. आयोगानें एक शिफारस अशी केली आहे कीं, प्रदेशांत आणि भारत सरकारांत व्हावयाचें कायदेकानूंचें काम अखेरीस ( इव्हेंच्युअली ) हिंदींत झालें पाहिजे. तथापि जनतेच्या सोयीसाठीं कायदेकानूंचीं भाषांतरें निरनिराळ्या प्रादेशिक भाषांत करावीं लागतील. केव्हांतरी भविष्यकाळीं देशांतील सगळ्या कायदेकानूंचा एक महाग्रंथ झाला पाहिजे आणि तो अर्थात् हिंदींतच झाला पाहिजे. आणि म्हणून प्रदेशांतील आणि पार्लमेंटांतील सर्व कायदे आणि त्यास अनुसरून करावे लागणारे नियम, उपनियम, हुकूम वगैरे हिंदींत व्हावयास पाहिजेत; अशी शिफारस आयोगानें केली आहे. याबाबत समितीची शिफारस अशी आहे कीं, १९६५ किंवा त्यानंतर जेव्हां इंग्रजी जाऊन हिंदी येईल त्या काळपर्यंत पार्लमेंटांतील कायदेकानूंचें काम इंग्रजींत चालूं राहावें आणि त्याच्या जोडीला अधिकृत हिंदी भाषांतर द्यावें. हिंदी भाषांतराप्रमाणेंच इतर देशी भाषांतहि भाषांतरें व्हावीं. प्रादेशिक सरकारांबाबत समितीची शिफारस अशी आहे कीं, त्यांना ह्या कामासाठीं प्रादेशिक भाषांचा वापर करतां येईल; परंतु ३४८ (३) प्रमाणें इंग्रजी भाषांतरें द्यावीं लागतील. जर मूळ कायदा हिंदींत नसेल तर त्याचें हिंदी भाषांतरहि द्यावें. याचा अर्थ असा कीं, जर एखाद्या प्रदेशानें कायदेकानूंची भाषा मराठी किंवा गुजराती केली किंवा दोन्हीं केल्या तर त्यांना त्यांच्याच जोडीला इंग्रजी आणि हिंदी भाषांतरें द्यावीं लागतील.

९. आयोगानें प्रदेश पुनर्रचना मंडळाच्या शिफारशींचा विचार करतां उच्च न्यायालयांतील न्यायमूर्तींसाठीं विशिष्ट देशी भाषा आणि हिंदी ह्यांच्यांतील प्राविण्य-संपादनाविषयीं कांहीं परीक्षा ठवणें विचारार्ह होईल असें सुचविलें आहे. याबाबत समितीची शिफारस अशी आहे कीं, उच्च

न्यायालयीन न्यायमूर्तींना अशा परीक्षा ठेवूं नयेत; पण त्यांना देशी भाषा आणि हिंदीचें ज्ञान असेल तर तें उपयुक्त होईल.

१०. आयोगाचें म्हणणें असें आहे कीं, जेव्हां उच्च न्यायालयांतील भाषेच्या माध्यमांत बदल करण्याची वेळ येईल त्या वेळीं निवाडे हुकूम हे सर्व हिंदुस्थानची राजभाषा जी हिंदी तींत व्हावें हें इष्ट होईल. समितीचें ह्यावर असें म्हणणें आहे कीं, राष्ट्रपतींनीं पार्लमेंटमध्यें एक कायदा पुढें मांडण्यास परवानगी द्यावी. ह्या कायद्यान्वयें हिंदी आणि इतर देशी भाषा ह्यांच्या द्वारें निवाडे, हुकूम वगैरे करतां यावेत. इंग्रजी भाषांतर द्यावेंच लागेल आणि निवडक निवाडे हिंदींत भाषांतर करून द्यावे लागतील.

११. आयोगानें अशीहि एक शिफारस केली आहे कीं, निदान जिल्हा पातळीवर तरी वकील किंवा पक्षकार ह्यांना हिंदीचा वापर करण्याची मुभा असावी. ह्यावर समितीनें असें म्हटलें आहे कीं, सदर शिफारस ३४८ कलमाच्या बाहेरील आणि म्हणून आयोगाच्या कक्षेबाहेरील आहे. जिल्हा पातळीवरील कामाचा विचार यास्तव आपल्या कक्षेंत येत नाहीं.

१२. आयोगानें (अ) प्रचलित कायदेकानूंचा महान संग्रह-ग्रंथ हिंदींत तयार करावा व (आ) कायदा-विषयक परिभाषेचा कोष तयार करावा याबद्दल सविस्तर शिफारशी केल्या आहेत. आयोगानें प्रत्येक उच्च न्यायालयाला एक भाषांतर-खातें जोडावें असेंहि सुचविलें आहे.

समितीला आयोगाच्या ह्या शिफारशी संमत आहेत; पण समितीची जादा शिफारस अशी आहे कीं, हें कार्य उरकण्यासाठीं एक कायमचें मंडळ (स्टँडिंग कमिटी) असावें. ह्या मंडळांत निरनिराळ्या भाषा जाणणारे विधिज्ञ असावेत. ह्या मंडळानें भाषांतरविषयक योजना करून कार्य पार पाडावें.

१३. आयोगानें ह्यानंतर भारत सरकारच्या सेवक-परीक्षांसंबंधानें शिफारशी केल्या आहेत. आयोगानें ह्या प्रकरणीं पहिली शिफारस अशी केली आहे कीं, स्पर्धा-परीक्षांसाठीं वापरावयाचें माध्यम अध्यापनांतील माध्यमाशीं जुळतें असावें. समितीनें आयोगाची ही शिफारस गाळावी असें बहुमतानें सुचविलें आहे. श्री. पुरुषोत्तमदास टंडन आणि श्री. गोविंददास हे ही शिफारस गाळण्याच्या विरुद्ध आहेत.

## अखिल भारतीय शिक्षण-संस्थांतील माध्यम

भारत सरकारतर्फे खडकवासल्याच्या लष्करी शिक्षणसंस्थांसारख्या ज्या संस्था चालविल्या जातात त्यांमध्यें प्रवेश मिळण्याची पात्रता आणि नंतर परीक्षेंत उत्तीर्ण होणें असे दोन भाग आहेत. शिवाय अशा अखिल भारतीय संस्थांतून सर्व भागांतील विद्यार्थी येणार. बहुतेक प्रदेशांतून आतां उच्च शालेय शिक्षणाचें माध्यम देशी भाषा झाल्या आहेत. म्हणन ह्या अखिल भारतीय संस्थांत शिक्षणाचें माध्यम काय असावें, प्रवेशलायकीसंबंधानें भाषाविषयक अटी काय असाव्यात वगैरे विषय गुंतागुंतीचे झाले आहेत. कोणत्याहि कारणास्तव याबाबत प्रदेशवार प्रवेशसंख्या (कोटा सिस्टिम) अमलांत येतां कामा नये असा स्पष्ट आग्रह आयोग आणि समिति या दोघांनींहि केलेला आहे आणि तो वाजवी आहे. ही प्रमाण संख्या टाळून प्रश्न कसा सोडवावा ह्याबद्दल शिफारशी करणें साहजिकच नाजूकपणाचें झालें आहे. प्रमाणसंख्येच्या दिशेकडे आपलें धोरण केव्हांहि झुकूं देतां कामा नये याविषयीं जपणें आवश्यक आहे हें कुणीहि सूज्ञ मनुष्य कबूल करील. म्हणूनच हा प्रश्न भावनावश न होतां, प्रमाणशीर वांटणीच्या आग्रहाला बळी न पडतां सोडविला पाहिजे.

ह्या प्रकरणीं दुय्यम शिक्षणपद्धतींत होणारा बदल आणि भाषामाध्यम याकडे लक्ष पुरवून कमी अधिक प्रमाणांत हिंदी माध्यमाचा वापर भारतीय शिक्षणसंस्थांतून आज ना उद्यां करावा लागेल. म्हणून ह्या प्रश्नाचा पुर्नविचार व्हावा. कारण बहुतांशीं अशा शिक्षणसंस्थांतून इंग्रजी माध्यम चालू राहील असें दिसतें. सर्वस्वी किंवा विभागशः इंग्रजी हटवावें लागेल. तेव्हां दुय्यम शिक्षणसंस्थांतील माध्यमाचा विचार करतां देशाची प्रवृत्ति प्रादेशिक भाषांकडे वळली आहे, म्हणून प्रवेश-परीक्षांसाठीं प्रमाणशीर-संख्या टाळून प्रादेशिक विकेंद्रीकरणाच्या धोरणानें प्रवेश-परीक्षांची नवी मांडणी करावी लागेल. म्हणून आयोगाची सूचना अशी आहे कीं, हिंदीची एक प्रश्नपत्रिका ह्या कामीं अनिवार्य करावी लागेल. तथापि मधल्या परि-वर्तनाच्या अवस्थेंत हिंदीची एक केवळ चांचणी प्रश्नपत्रिका आणि तीहि हलक्या दर्जाची अशी ठेवावी म्हणजे अ-हिंदी विद्यार्थ्यांना अन्याय होणार नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ............ दि: ............

कांहीं काळ या संस्थांतून इंग्रजी माध्यम ठेवावें लागेल; परंतु सर्व विषयांत किंवा कांहीं विषयांपुरतें हिंदी माध्यम आणण्यासाठीं योग्य (सुटेबल) तजवीज करावी असा अभिप्राय आयोगानें दिला आहे. ह्या 'योग्य' शब्दाच्याऐवजीं त्वरित (अर्ली) असा शब्द आसामचे (आतां कै.) प्रफुल्लचंद्र भंजदेव, पुरुषोत्तमदास टंडन, गोविंददास वगैरेंनीं सुचविला होता; पण तो आग्रह बहुमताला मानवला नाहीं.

प्रवेश-परीक्षेबाबत समितीनें इंग्रजी आणि हिंदी अशीं दोन्हीं माध्यमें विकल्पानें सुचविलीं आहेत आणि एक तज्ज्ञ समिति नेमून प्रादेशिक भाषांनाहि यांत वाव देतां येईल किंवा काय ह्याचा विचार करावा असें म्हटलें आहे. स्पर्धा-परीक्षांबाबत समितीची सूचना अशी आहे कीं, इंग्रजीच्या जोडीला कांहीं दिवसांनीं हिंदी-माध्यम ठेवावें आणि हिंदी आणि इंग्रजी माध्यमाचा विकल्प पुढेंहि आवश्यक तितका काळ चालू ठेवावा.

समितीचा अभिप्राय उच्च श्रेणींतील सरकारी अधिकाऱ्यांसाठीं आहे. येथें प्रादेशिक भाषांना वाव द्यावा तर तेरा भिन्न प्रकारच्या परीक्षा होतील; आणि दर्जाची समानता राखणें कठीण होईल; प्रादेशिक भाषांचा विकास माध्यम ह्या नात्यानें विद्यापीठांतून पदवी परीक्षेपर्यंत पोंचला म्हणजे हिंदी-बरोबर त्यांचाहि माध्यमांत समावेश करतां येईल. प्रादेशिक प्रमाणशीर प्रवेश-संख्या नको आणि गुणवत्तेवर भर पाहिजे, तरच भारतीय सरकार-चा सेवकवर्ग कार्यक्षम आणि निकोप राहील असें धोरण आयोगानें प्रकट केलें आहे. समितीनें यावर असें सुचविलें आहे कीं, आगाऊ योग्य सूचना देऊन हिंदी आणि एक हिंदीतर भाषा अशा दोन प्रश्नपत्रिका ठेवाव्यात; परीक्षेचें माध्यम बदललें तरी इंग्रजीच्या जागीं संपूर्णतया हिंदी आरूढ होईपावेतों इंग्रजीची एक प्रश्नपत्रिका आवश्यक राहावी. प्रादेशिक भाषांना अधिक वाव देण्याचा प्रश्न तज्ज्ञ मंडळाकडे सोंपवावा. आयोगानें आणखी असेंहि सुचविलें आहे कीं, आवश्यक त्या कारणांसाठीं परीक्षेच्या ऐच्छिक विषयांच्या यादींत शासकीय सेवक आयोगानें (पब्लिक सर्व्हिस कमिशन) देशी भाषा आणि देशी साहित्य यांना अधिक वाव देण्याचा विचार करावा. समितीचीहि ह्याला संमति आहे.

## हिंदीच्या विकासाची जबाबदारी

इत्युत्तर हिंदीच्या विकासाची जबाबदारी सरकारनें घेतली पाहिजे; ज्या खाजगी संस्था ह्या क्षेत्रांत काम करीत आहेत त्यांच्या कार्याचा विस्तार व्हावा म्हणून त्यांना मुक्त हस्तानें साहाय्य केलें पाहिजे; योग्य प्रकारचीं क्रमिक-पुस्तकें, वाचन-पुस्तकें, ग्रंथालयें, वाचनालयें, अध्यापन सुधारणा, दर्जामध्यें एकरूपता, आवश्यक तर कार्य-क्षेत्राची विभागणी, विशेष गरजा इत्यादि बाबी लक्षांत घेऊन वरील साहाय्य देण्यांत यावें असें आयोगानें सुचविलें आहे. समितीला हें संमत आहे. देशी भाषांतील अभ्यासालाहि उत्तेजन द्यावें आणि प्रादेशिक भाषांतून हिंदी ग्रथांचीं भाषांतरें करून हिंदीच्या अभ्यासाला उत्तेजन द्यावें, अशा अधिक सूचना समितीनें केल्या आहेत. शेवटीं आयोगानें ६४ व्या सूचनान्वयें देवनागरी लिपींत सुधारणा आणि टप्टप् यंत्रावरील अक्षरपट ( टाईपरायटर व कीबोर्ड ) निश्चित करण्याकडे लक्ष्य वेधलें आहे. १९५३ च्या लखनौ परिषदेच्या निर्णयावरील मतभेद लवकर सोडविण्याची निकड दर्शवून आयोगाची सदरील सूचना समितीनें संमत केली आहे.

समितीच्या प्रतिवृत्तावर एकूण सात सभासदांनीं आपल्या भिन्न मत-पत्रिका आणि टिपणें जोडलीं आहेत. यांत एक श्री. फ्रँक अँथनी ह्यांनीं मात्र हिंदीच्या स्वीकारापासूनच कडक विरोध दर्शवून इंग्रजीचा अपरंपार पुरस्कार केला आहे. बाकी सहा सभासद समितीच्या शिफारशींना साधारणतः अनुकूल आहेत; परंतु त्यांना हिंदीचा स्वीकार होईल तितका लवकर पाहिजे. आणि त्या दृष्टीनें समितीनें जेथे इंग्रजीच्या बाजूनें अधिक झोंक दाखविला आहे त्याला ह्या सभासदांचा विरोध असून हिंदी स्वीकाराच्या गतींत पुष्कळ तीव्रता आणली पाहिजे म्हणून तशा सूचना त्यांनीं केल्या आहेत.

## समितीच्या धोरणाचें विवेचन

समितीनें आपल्या सामान्य धोरणाचें जें दिग्दर्शन केलें आहे त्यांतील महत्त्वाच्या मुद्यांचें विवेचन करूं. संविधानांतील सतराव्या अध्यायांतील

कलमांचा विचार समितीनें आपल्या अहवालाच्या दुसऱ्या प्रकरणांत केला आहे. संविधानांतील सतराव्या अध्यायांतील ३४३ ते ३५१ च्या अखेरच्या कलमांत भारताच्या राजभाषेच्या प्रश्नाचा निर्णय दिलेला आहे. अलीकडे कित्येक पुढारी मंडळींनीं हा निर्णय प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें फिरवून हिंदीच्या ऐवजीं इंग्रजीच राजभाषा म्हणून चालू ठेवण्याविषयीं जोराच्या हालचाली चालविल्या आहेत. पार्लमेंटांतील सभासद श्री. फ्रँक अँथनी ह्यांनीं 'हिंदी हें धर्माचें चिन्ह आहे; हिंदी हा भाषिक अल्पसंख्याकांवर जुलूम आहे; हिंदी ही पक्षपाताची निशाणी आहे; हिंदी भारताच्या विभाजनाची खूण आहे; हिंदीचा स्वीकार म्हणजे भारताला एक सहस्र वर्षें मागें लोटणें आहे;' इत्यादि विलक्षण अकांडतांडव केलें आहे! आणि ह्या घटकेला संविधानांतील अनुसूचींतील चौदा भाषांच्या पंगतीला इंग्रजीचें पंधरावें पान मांडावें म्हणून पार्लमेंटासमोर ठराव मांडला आहे. तथापि श्री. अँथनीशिवाय समितींतील एकहि सभासद हिंदीऐवजीं इंग्रजी राजभाषा करावी या मताला अनुकूल झाला नाहीं. उलट संविधानाच्या सतराव्या अध्यायांत जी तडजोड (सेटलमेंट) बिनविरोध स्वीकारण्यांत आली तिलाच समितीनेंहि पाठिंबा दिला आहे. याबद्दल समितीचे आभार मानले पाहिजेत. वस्तुतः फ्रँक अँथनी करूं पाहत होते तसा इंग्रजीचा स्वीकार करणें म्हणजे समितीला सांगितलेल्या रस्त्यानें न जातां उलट दिशेनें जाण्याला प्रवृत्त करण्यासारखें होतें. हिंदीचा स्वीकार करण्याचा किंवा अस्वीकार करण्याचा प्रश्नच समितीसमोर नव्हता. उलट हिंदीची प्रगति कशी साधावी ह्याबद्दलचें वेळापत्रक वगैरे आंखून देण्याचा आदेश राष्ट्रपतींनीं संविधानास अनुसरून आयोगाला दिला होता. अँथनी ह्यांचें म्हणणें नियमबाह्य होतें. तरीहि त्यांना वाव देण्यांत आला आणि म्हणूनच त्यांनीं समितीचे अध्यक्ष श्री. गोविंदवल्लभ पंत ह्यांच्या सौजन्याची बहुत प्रशंसा आपल्या भिन्न मतपत्रिकेच्या प्रारंभीं केली आहे.

समितीनें हिंदीचा निर्णय कायम ठेवला आहे आणि आपलें धोरण लवचिक आणि व्यावहारिक असलें पाहिजे असें सुचविलें आहे म्हणून समितीनें अशी शिफारस केली आहे कीं—

१९६५ सालापर्यंत इंग्रजी ही भारत सरकारच्या राज्यकारभाराची प्रधान

भाषा राहावी आणि हिंदी ही ह्या काळांत दुय्यम राजभाषा राहावी. १९६५ पासून हिंदी ही प्रधान भाषा होईल आणि इंग्रजी ही गौण भाषा म्हणून राहील आणि पार्लमेंट आपल्या कायद्यान्वयें तिच्या वापरासाठीं जें क्षेत्र आंखून देईल त्या क्षेत्रांत इंग्रजी ही तिची जरूरी असेल तोंपर्यंत चालत राहील.

संविधानांत जी व्यवस्था किंवा तडजोड केल्याचें वर म्हटलें आहे तिचें समितीने विशदीकरण केलें आहे. आयोगापुढें राष्ट्रपतींनीं संविधानांस अनुसरून विषय-पंचक ठेवलें होतें. त्याचा निर्देश पहिल्या लेखांकांत केला आहे. वास्तविक पाहतां ह्या पंचकांत दिलेले विषय हे पांच असले तरी त्यांचा पूर्वापार असा कांहीं क्रम असल्याचें मानण्यास संविधानांत आधार नाहीं. उदाहरणार्थ, हिंदीची प्रगति आणि इंग्रजीवर निर्बंध हे एकामागून एक साधावयाचे टप्पे संविधानानें मानलेले नाहींत. त्यामुळें एखादा बोगदा तयार करतांना ज्याप्रमाणें पर्वताच्या दोन्ही अंगानें विवर पाडण्याचें काम एकसमयावच्छेदेंकरून सुरू करतात त्याप्रमाणें एकीकडे हिंदीचा वापर वाढवीत असतां दुसरीकडे इंग्रजीचा संकोच करीत जाणें, ह्या दोन्ही क्रिय एककालीं सुरू ठेवण्यास कांहींच प्रत्यवाय नव्हता. असें असतांहि इंग्रजीच्या जोडीला पहिल्या टप्प्यांत हिंदीची जोड द्यावी आणि दुसऱ्या टप्प्यांत (नेक्स्ट स्टेज) इंग्रजीवर मर्यादा घालाव्यात, अशा प्रकारची जी टप्पेबंदी संविधानांत स्पष्ट प्रतिबिंबित झाल्याचें समितीनें म्हटलें आहे, तो आम्हांला तितक्याच स्पष्टपणें मिथ्याभास आहे असें म्हणणें भाग आहे. हा थोडा लटपटीचा प्रकार आहे. आम्हीं वर दर्शविल्याप्रमाणें दोन्ही कामें हळूहळू पण एककालीं चालू करणें अवश्य आहे आणि हें अशक्य नाहीं.

राजभाषा हिंदीचें स्वरूप काय असावें, हें सांगतांना समितीनें ती सर्व-जनसुलभ असली पाहिजे आणि तिचें स्वरूप साधें आणि सोपें राहून ती जनतेला आपलीशी वाटली पाहिजे म्हणजेच तिनें जनतासंपर्क साधतां आला पाहिजे. एवंच ती भाषा सामान्य प्रजाजनांची (लँग्वेज् ऑफ दि कॉमन पीपल) असली पाहिजे. हें समितीचें विवरण बरोबर आहे; पण ह्या प्रकरणीं आम्हांस स्पष्टपणें असें वाटतें कीं, संविधानांतील ३५१ कलमांतील आदेश स्पष्टपणें लक्षांत घेऊन आणि त्या आदेशाची

जी परिस्फुटता मुंबई सरकारच्या हिंदी शिक्षण-समितीनें (हिंदी टीचिंग कमिटी) केली आहे तिच्या छापील अहवालांत प्रसिद्ध झाली आहे, त्या धोरणाला निर्भयपणें पाठिंबा दिला असता तर तें अधिक उचित झालें असतें. श्री. फ्रँक अँथनी सुद्धां महात्मा गांधींकडे बोट दाखवून हिंदुस्तानीच्या स्वीकाराला आपली अनुकूलता दर्शवितात आणि राष्ट्रीय हिंदी ही मातृभाषा हिंदी नव्हे. आमच्या मतें ३५१ व्या कलमांत हिंदुस्तानीचा स्पष्ट निर्देश आहे, एवढेंच नव्हे तर तें कलम अशा व्यापक अर्थानें रचलें आहे कीं, भारतानें स्वीकारावयाची हिंदी भाषा ही कोणा एका प्रदेशाची केवळ मातृभाषा नसून तिचें मूळ जरी जुन्या हिंदीत असलें तरी तिचा विस्तार सार्वराष्ट्रीय गरजांसाठीं सर्वसंग्राहक पद्धतीनें करावयाचा आहे हें स्पष्ट दिसतें. कुणा एकाची मूळ मातृभाषा हिंदी असली आणि तिचा आत्मा अभंग ठेवावयाचा असला तरी तिचा जो विकास राष्ट्राच्या हितासाठीं कर्तव्य आहे तो तिचे मातृभाषास्वरूप आच्छादित करून तिला सर्वव्यापी राष्ट्रीय हिंदीचें स्वरूप देणारा आहे हें आपण अक्षांत ठेवलें पाहिजे. याप्रमाणें जर निःशंक मांडणीं आपण करीत जाऊं तर हिंदी मातृभाषा असणारे हिंदी राजभाषा झाल्यामुळें शिरजोरी करतील आणि डोक्यावर बसून इतर प्रादेशिक भाषांचा संकोच करतील हें पुष्कळांना वाटणारें भय निर्मूल होईल. म्हणून आमच्या मतें तशी स्पष्ट घोषणा करणें राष्ट्राच्या हिताचें आहे; पण आयोग आणि समिति ह्या दोघांनींहि ही निर्भयता दाखविलेली नाहीं आणि म्हणून फ्रँक अँथनीसारख्यांना आपलें अकांडतांडव करण्याला आणि लोकांना भयचकित करण्याला उत्तेजन मिळतें. संतोषाची गोष्ट एवढीच आहे कीं, वर दर्शविल्याप्रमाणें समितीनें संविधानांतील निर्णय स्थिर आणि कायम करण्याला पुष्टि दिली आहे.

इंग्रजीचें महत्त्व समितीनें उत्तम प्रकारें जाणलें आहे; पण त्याच वेळीं असें स्पष्ट सांगून टाकलें आहे कीं, इंग्रजी फार काळपर्यंत शाळांतून आणि कॉलेजांतून माध्यम म्हणून पुढें चालूं शकणार नाहीं किंवा प्रदेशांतील अथवा भारतांतील राजभाषा म्हणूनहि ती तशी चालूं शकणार नाहीं. मात्र इंग्रजी ही केव्हांहि अभ्यासाचा एक महत्त्वाचा विषय म्हणून राहील आणि भौतिक शास्त्रांतील संशोधनाच्या क्षेत्रांत तिचें महत्त्व राहील.

## नवे शब्द बनविण्याची योजना

इंग्रजीच्या जागीं हिंदी किंवा प्रादेशिक भाषा येणें किंवा आणणें यद्यपि क्रमप्राप्त असलें तरी शास्त्रीय आणि तांत्रिक क्षेत्रांतील जे लाखों परकीय शब्द आपणांला लागतात त्यांची व्यवस्था करणें हा एक बिकट प्रश्न आहे. समितीनें हा प्रश्न सोडविण्यासाठीं तंत्रज्ञ आणि शास्त्रज्ञ ह्यांचें एक कायम मंडळ ( स्टँडिंग कमिशन ) नेमावें आणि ह्या मंडळानें सर्व भारतीय भाषांना उपयोगी पडणारी आणि सर्व भारतांत एकरूप असणारी अधिकृत शब्दावलि प्रसिद्ध करावी असें सुचविलें आहे. हें जरी योग्य असलें तरी केवळ तंत्रज्ञ आणि शास्त्रज्ञ हे उचित शब्दावलि देऊं शकणार नाहींत. त्यांतून भारतीय प्राचीन शास्त्रांचे, साहित्याचे आणि भाषाशास्त्रज्ञ असले पाहिजेत म्हणून तशी काळजी घेतली गेली पाहिजे, असें आमचें म्हणणें आहे.

ह्याप्रमाणें सामान्य दिग्दर्शन केल्यावर राष्ट्रपतींनीं आयोगाकडे सोंपविलेल्या विषयपंचकाचा क्रमवार विचार केलेला आहे. ह्यांतील पहिला विषय हिंदीच्या वाढत्या वापराबाबतचा आहे. कारभाराच्या परिभाषेची एकरूपता आणि अधिकृतता, सरकारी प्रकाशनांचीं भाषांतरें, विविध पातळीवरील सरकारी सेवकांच्या शिक्षणाची तजवीज आणि यांत्रिक साहाय्य ( उदा० टपटप-यंत्रें, मुद्रण-यंत्रें इ. )— ह्यांसंबंधांत भाषिक शुद्धीच्या दुराग्रहाला बळी न पडतां शुद्धता, स्पष्टता नि साधेपणा ह्यांवर लक्ष देऊन शब्दावलि तयार केली पाहिजे. जरूर तर आंतरराष्ट्रीय शब्दावलि आपण अंतर्भूत करावी. परिभाषेची सार्वभारतीय एकरूपता साधण्याचा कटाक्ष ठेवावा इत्यादि ज्या सूचना आयोगानें केल्या आहेत त्याचें समितीनें समर्थन केलें आहे. ह्या कामीं करावयाच्या कामाचा वेग पुष्कळच वाढविला पाहिजे हें उभयतांसहि मान्य आहे. सरकारी नियमांचें हिंदींत रूपांतर करतांना एकरूपता साधण्यासाठीं मध्यवर्ति सरकारनें एखादें विशेष खातें किंवा व्यवस्था करून त्या एकाच व्यवस्थेनें काम पार पाडावें हें इष्ट होईल. आजच निरनिराळ्या खात्यांचीं निरनिराळीं नियमपुस्तकें आहेत. लष्करी खातें वगळून इतर खात्यांनीं ह्या प्रकरणीं जीं नियमपुस्तकें वा पुस्तिका तयार केल्या आहेत त्यांची मोजदाद केल्यास ८६,००० पानें

भरतात. ह्यांपैकीं कित्येक मंत्रालयांनीं आपल्या पुस्तकांचीं भाषांतरेंहि केलीं आहेत. खातीं भिन्न असलीं तरी पुष्कळ नियम सारखेच असतात. म्हणून हिंदीकरण एकमुखीं आणि एकहातीं असावें हें अवश्य आहे.

समितीच्या सूचनांपैकीं कांहीं निर्देश करण्याजोग्या विशेष बाबींचाच उल्लेख येथें करणें शक्य आणि इष्ट होईल. उदा०– पोस्ट, रेल्वे, प्राप्तीकर इत्यादि खात्यातील नोकर नेहमीं दुभाषी असले पाहिजेत. म्हणजे खात्याचें काम त्यांनीं हिंदींत करावें आणि लोकांशीं व्यवहार त्या त्या ठिकाणच्या प्रादेशिक भाषांत करावा. ( पर्मनंट बायलिंग्वलिझम् ) सेवकाच्या हिंदीची पात्रता वाढविण्याच्या संबंधानें खात्याच्या अंतर्गत शिक्षणाची (इन सर्व्हिस ट्रेनिंग) एखादी योजना ठेवावी लागेल. हें आयोगाचें म्हणणें उचित आहे.

## अक्षम्य टाळाटाळ

दुसरा विषय इंग्रजीवरील निर्बंधाचा. तूर्त इंग्रजीच्या वापरावर कांहीं निर्बंध घालूं नयेत असें आयोगानें सुचविलें आहे त्याचेंच समर्थन समितीनें केलें आहे आणि हा महत्त्वाचा विषय १३ ओळींत संपविला आहे. ही टाळाटाळ अक्षम्य आहे.

## न्यायालयांच्या भाषेसंबंधीं धोरण

विषयपंचकांतील तिसरा विषय कायदेकानूंच्या आणि उच्च न्यायालयांच्या भाषांसंबंधींचा आहे. स्थूलमानानें असे म्हणण्यास हरकत नाहीं कीं, केव्हां तरी योग्य वेळीं हिंदुस्थान सरकारचे आणि प्रादेशिक सरकारांचे सर्व कायदे हिंदींत व्हावेत. प्रादेशिक न्यायालयांतून कामकाज प्रदेश भाषांत चालावें आणि अडचण असेल तेथें इंग्रजीला थोडाफार वाव ठेवावा. या धोरणानें आयोग आणि समिति ह्यांनीं तपशीलवार शिफारशी केल्या आहेत. आजच्या पेक्षां हिंदीकरणाची गति वाढवावी, असाहि रोख या प्रकरणीं व्यक्त करण्यांत आला आहे. वैधानिक परिभाषेची अचूकता आणि एकरूपता साधली पाहिजे, यावर दिलेला जोर वाजवी आहे. सांगण्यासारखी गोष्ट अशी कीं, प्रादेशिक सरकारें, वरिष्ठ न्यायालय आणि उच्च न्यायालयें ह्यांनीं आयोगाला

जवळ-जवळ एकमतानें असें कळविलें आहे कीं, अखेरीस पार्लमेंटरी वैधानिक कार्य हिंदींत चालावें. मद्रास सरकारनें वैधानिक कार्य द्विभाषिक ठेवलें पाहिजे; त्याशिवाय तरणोपाय नाहीं आणि १९६५ नंतर हिंदीला प्राथम्य आणि प्राधान्य दिलें पाहिजे हें मान्य केलें आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. समितीच्या मतें न्यायप्रकरणीं प्रदेशांत प्रादेशिक भाषांना पूर्ण वाव दिला पाहिजे. या सर्व गुंतागुंतीची लक्ष्यपूर्वक आणि निर्मळ सोडवणूक करण्यासाठीं निरनिराळ्या भारतांतर्गत राष्ट्रीय भाषांचे तज्ज्ञ, विधिज्ञ ह्यांचें एक कायम मंडळ नेमण्याची समितीची सूचना अवश्य स्वीकारार्ह आहे.

यापुढला चौथा विषय अंकगणनेसंबंधानें आहे. सांप्रतच्या व्यवस्थेंत फारसा बदल न करतां आंतरराष्ट्रीय रूपांतील अंकगणना चालू ठेवावी असा एकंदर आयोगाच्या म्हणण्याचा रोख आहे. ज्या मंत्रालयांचा ज्या प्रकारच्या जनतेशीं संबंध असेल तो लक्षांत घेऊन देवनागरी स्वरूपांतील अंकगणना जोडीला वापरावी. मात्र ह्या प्रकरणीं एकरूप धोरण ठेवावें असें आयोगानें सुचविलें आहे. हें धोरण ठरवितांना समितीनें असें स्पष्टीकरण केलें आहे कीं, सरकारी प्रकाशनांतील विषय पाहून ह्याचा अंमल व्हावा. उदाहरणार्थ, सामान्य कारभार आणि वाङ्मयात्मक किंवा साहित्यिक विषय ह्यांत देवनागरी अंकगणना वापरावी, परंतु शास्त्रीय, तांत्रिक आणि अंकात्मक (स्टॅटिस्टिकल) प्रकाशनांसाठी आंतरराष्ट्रीय अथवा इंग्रजी अंकगणनेचें रूपच चालू ठेवावें.

शेवटचा आणि पांचवा विषय हिंदी-करणाच्या संबंधानें सरकारनें करावयाच्या उद्योगासाठीं एक वेळापत्रक आंखून देणें हा होता. ह्यासंबंधानें वारंवार मागणी करूनहि सरकारनें कांहीं दिग्दर्शन न केल्यामुळें समिति आणि आयोग ह्या उभयतांनींहि वेळापत्रक तयार करण्याची असमर्थता प्रकट करून हा विषय सरकाराधीनच ठेवला आहे. आयोगानें दाखविलेली अडचण योग्य आहे. आपण बांधलें जाऊं ह्या भीतीनें कदाचित् सरकारनें आपल्या भावी कार्यक्रमाचें स्वरूप प्रकट करण्याची टाळाटाळ केली असावी. यावर आमचें म्हणणें असें आहे कीं, वेळापत्रक तयार करण्याचें काम

राष्ट्रपतींनीं आयोगाकडे सोंपविलें होतें. आपला अहवालहि आयोगानें राष्ट्र-पतींकडे सादर करावयाचा आहे. अशा स्थितींत सरकारकडून जर आराखडा मिळाला नाहीं तर आयोगानें आपली अडचण तत्परतेनें राष्ट्रपतींपुढें मांडावयास पाहिजे होती आणि मग त्यांनीं जो आदेश दिला असतां त्याप्रमाणें वागावयाचें होतें. जवळ जवळ वर्ष दोन वर्षें सर्वत्र साक्षीपुरावा गोळा करीत आयोग हिंडत होता; परंतु आम्हीं सुचविल्याप्रमाणें आपल्या अडचणी राष्ट्रपतींच्या कानांवर घालून वेळापत्रक तयार करण्याचा निर्णय आयोगानें लावून घेतला नाहीं. आयोगापुढें दुसराहि एक पर्याय होता कीं, सरकारी योजनांचें मार्गदर्शन मिळालें नाहीं तरी तदभावीं यथाशक्ति आणि यथामति जमेल तसें एक वेळापत्रक आयोगानें मांडावयाला हवें होतें; परंतु तें धाडस त्याच्यानें करवलें नाहीं.

आम्ही दोन उदाहरणें देऊन त्याचा उपन्यास करतों. हीं दोन्ही उदाहरणें आम्हीं आग्रहपूर्वक आयोगासमोरील आमच्या साक्षींत मांडलीं होतीं आणि त्यांना विनंति केली होती कीं, आपण एक मध्यंतर अहवाल सादर करून आमच्या सूचना आपणांला पसंत असल्यास राष्ट्रपतींस सादर कराव्यात; परंतु आयोगानें आमच्या सूचनांसंबंधानें प्रश्नोत्तर-चर्चा वगैरे कांहींच न करतां स्तब्धता स्वीकारली. आयोगांतील एका सभासदानें आमच्या सूचना ऐकून मुद्दाम बाहेर येऊन प्रशंसापूर्वक आम्हांला प्रेमालिंगन दिलें ! पण प्रश्न कांहीं तडीस लावला नाहीं. आमच्या सूचना वेळापत्रकाला प्रारंभ करण्याच्या दृष्टीनें उपयुक्त आहेत, म्हणून त्या येथें देतों. अद्यापहि त्यांचा स्वीकार केल्यास कार्याचा शुभारंभ होईल असा आम्हांस भरंवसा वाटतो.

आमची पहिली सूचना अशी आहे कीं, सरकारी यच्चयावत् कागदपत्रां-वर व्हावयाच्या लहान-मोठ्या अधिकाऱ्यांच्या सह्या देवनागरी लिपींतच झाल्या पाहिजेत यासाठीं आम्हीं तीन महिन्यांची मुदत सुचविली होती. ह्या मुदतींत कोणालाहि देवनागरींत आद्याक्षरी वा संपूर्णाक्षरी आपल्या सह्या घटवून घेणें अगदीं सहज आहे. ह्याला कसला खर्चहि पडणार नाहीं. कागदांतील हुकुमाची भाषा इंग्रजी असो वा दुसरी कोणतीहि असो. खालीं सही मात्र देवनागरी लिपींत पाहिजे एवढाच आमचा आग्रह आहे. मग स्पष्टीकरणार्थ देवनागरी सहीचें उचित लिप्यंतर केलें तरी हरकत नाहीं.

ह्या सूचनेला मानसशास्त्रीय महत्त्व अपरंपार आहे. पारतंत्र्यापासून अशी प्रथा चालू होती कीं, हुकुमाचा किंवा पत्राचा मजकूर देशी भाषांत असला तरी त्याखालील सही इंग्रजींत करण्याची प्रौढी वाटावी. हा क्रम उलटवून देवनागरींत सही करण्यांत प्रौढी वाटावी असा आमच्या सूचनेचा उद्देश आहे. ह्यानें लोकांचीं मनें फिरण्याला प्रारंभ होईल आणि ३४३ व्या कलमांत देवनागरीचा स्वीकार केला आहे त्याला अल्पशी तरी सार्थकता यईल; परंतु कारभाराच्या चालू गाड्याला काडीचीहि खीळ बसणार नाहीं. 'स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्. ।'

## दुसरी सूचना, नवे कायदे, देशी नांवें

आमची दुसरी सूचना अशी आहे कीं, आजपर्यंत झालें तें झालें पण ह्यानंतर सरकारतर्फें निघणाऱ्या संस्था, नेमल्या जाणाऱ्या समित्या आणि ह्यापुढें केले जाणारे कायदे ह्यांचीं नांवें देशी भाषेंत ठेवावींत म्हणजे स्टेट ट्रॅन्स्पोर्ट, वेजबोर्ड ही परिभाषा बंद पडेल. मिल्क स्कीमला दूध योजना म्हणतां येत नाहीं काय ? तेव्हां कायद्यांची आणि कारभाराची भाषा कांहीं असली तरी त्यांचीं केवळ नांवें तरी देशी भाषांत सुरू होऊं द्या. ह्या सूचनेनेंहि कारभारांत कसलीहि खीळ पडणार नाहीं. सांप्रतचीं इंग्रजी नांवेंहि पुष्कळ लांबलचक आणि वेडीवांकडी असतात. शिवाय सोयीसाठीं कायद्याचें नांव कांहींहि असलें तरी त्याचा निर्देश १८६० चा २१ वा कायदा (ॲक्ट ट्वेंटीवन ऑफ एटीन सिक्स्टी) असाहि पर्यायानें केला जातो. आपणांलाहि 'उन्नीस सौ उनचासका तैंतालीसवाँ कायदा' अशासारखा उल्लेख करतां येईल आणि योग्य असें देशी नांवहि ठेवतां येईल.

येणेंप्रमाणें आणखीहि सूचना करतां येतील. ह्या दोन्ही सूचना अमलांत आणण्यासाठीं सहा महिन्यांची मुदत पुरेशी होईल. इंग्रजी नांवें जोडीला ठेवलीं तरी चालतील; पण हिंदीकरणाचें काम चालीस लागलें असतें. अवघड-अवघड इंग्रजी नांवांची नवी निर्मिति आणि व्यवहार आस्ते आस्ते मागें पडला असता आणि तेवढाच आपला हिंदीकरणाचा मार्ग सुकर झाला असता. कांहीं अडचण न होतां हळूहळू नवी हिंदी परिभाषाहि लोकांच्या अंगवळणीं पडत गेली असती.

इंग्रजींत म्हण आहे कीं, " जेथें इच्छा असेल तेथें मार्ग दिसतो." हाच न्याय येथेंहि लागू आहे. वेळापत्रक न दिल्यानें आमच्या मतें आयोगाची आणि समितीची दोघांचीहि दुर्बलताच व्यक्त झाली आहे आतां लौकरच दुसऱ्या आयोगाची स्थापना होईल. त्यांना आपलें काम पुरें करण्यास मोठी मुदत देण्याला कांहींहि वाजवी कारण नाहीं. परंतु जें कार्य १९६५ त अपेक्षित होतें तें आतां उघड उघड १९७० पर्यंत लांबलें आहे हें सांगायला कोणी ज्योतिषी नको. यापुढें तें अधिक लांबूं नये म्हणून जनतेनें एकमुखी मागणी केली पाहिजे आणि राष्ट्रपतींनीं प्रतिगाम्यांच्या वावदुकीस अधिक वाव राहूं देतां कामा नये. गाडें मागें उलटूं न देतां किंवा थांबूं न देतां सावधपणानें पण निश्चयानें पुढें चालूं केलें पाहिजे.

— साप्ताहिक 'साधना' पुणें, मे १९५९

आज आक्षेपांचीं भूतें असें ओरडूं लागलीं आहेत कीं, जर क्षेत्रीय, प्रादेशिक, प्रांतिक किंवा मातृभाषांचा अनिर्बंध संचार भारतांत अभिवृद्ध करण्याचें धोरण अंगिकारलें तर एकेका विभागांत किंवा क्षेत्रांत किंवा प्रदेशांत तेथली तेवढी भाषाच प्रबळ होऊन बसेल आणि मग इतर भाषांचें वारें देखील लागतां कामा नये असा दुरभिमान वाढीस लागून शेजार-शेजारच्या प्रांतांतील भाषा आसपासच्या लोकांना पारख्या होतील आणि परिणामीं ह्या देशाचें ऐक्य भंग पावेल. अभिमानाचा अतिरेकी परिपोष केला तर वरील भय अनुभवाला येणें केवळ काल्पनिक म्हणतां येणार नाहीं. पंजाबांतील लाथाळी आपल्या समोरच आहे आणि भारतीय ऐक्याच्या परिपोषाकडे फार जागरूकतेनें लक्ष्य पोंचविलें पाहिजे हें मी एकदम मान्य करतों. भारत-निरपेक्ष महाराष्ट्र किंवा भारत-निरपेक्ष गुजरात किंवा बंगाल किंवा तामिलनाड किंवा केरळ वा राजस्तान वा पंजाब वा आसाम अशी कल्पनाच सर्वथा अग्राह्य होय. भारत म्हणजेच महाराष्ट्र, बंगाल, गुजरात, राजस्तान, बिहार, आंध्र, काश्मीर वगैरे अगांनीं नि अवयवांनीं घडलेला महादेश होय हें त्रिवार सत्य. सर्वांगानें या सत्याचें पालन हा आमचा सर्वांचा प्रथम धर्म; पण या धर्माचें पालन करणें म्हणजे महाराष्ट्र, बंगाल, केरळ वगैरे विविध अंगभूत देशांचें वा प्रदेशांचें वैशिष्टच नष्ट करणें असें मात्र नव्हे. हीं वैशिष्टचें म्हणजे आमची शोभा आहे. किंबहुना या वैशिष्टचावांचून आमचें जीवन थिटें होईल, अपुरें राहील, आळणी वाटेल म्हणून, आमचें मीठ तोडूं नका. प्रदेशांचें मीठ तोडल्यानें बळ वाढेल हा भ्रम आहे.

## नवरचनेच्या आराखडयास आवश्यक विचार

वर प्रांजलपणें मान्य केलें आहे कीं, या वैशिष्टयांचा प्रतिपाळ करतांना कांहीं मर्यादा पाळणें अवश्य आहे. ज्याप्रमाणें एखाद्या उपवनांत विविध प्रकारचे फलवृक्ष आणि सुगंधित पुष्पलता एकमेकांच्या वाढीनें एकमेकांची शोभा, सौन्दर्य वाढवीत आपला विकास करीत असतात. तद्वत् भारतांत,

भारतांगभूत अंग-वंग कलिंगादि देशांची अभिवृद्धि अशा युक्तीनें, न्यायानें आणि मर्यादेनें घडवून आणली पाहिजे कीं, त्या त्या देशांचीं वैशिष्टयें निर्भयपणें विकसित होतील आणि इतरांनाहि निर्भय करतील. एकोपा, सौहार्द्र व सामंजस्य यांची पारस्परिक अभिवृद्धि करतील. भारताची काय, किंवा जगांतील कोणेका स्वतंत्र आणि यशोवैभव वर्धिष्णु देशांची बांधणी काय, हा एक कल्प किंवा योग आहे आणि योजनापूर्वक मर्यादा ठरवून ज्या त्या देशाच्या प्रकृतिमानाचा विचार करूनच ही बांधणी त्यांनीं करावयाची असते. बांधणी मजबूत आणि उपयुक्त व्हावी म्हणून अनेक पथ्थें सांभाळावीं लागतात. भारताच्या विशिष्ट विकासाचा आणि परिस्थितीचा सांप्रतच्या जागतिक विकास-परिस्थितीच्या संदर्भात विचार करून ह्या भावी बांधणीचा आराखडा तयार केला पाहिजे. असा आराखडा तयार करतांना भारताच्या भूतकालीन संचिताचाहि जमाखर्च करावा लागेल.

## राज्यसंघ नव्हे; संघराज्य

तो सर्व प्रपंच मला येथें करण्यास अवकाश नाहीं; पण ज्या दृष्टीनें, ज्या प्रयत्नांनीं आणि ज्या तत्त्वज्ञानाच्या किंवा ध्येयवादाच्या बळावर आपली अर्वाचीन काळीं ब्रिटिश सत्तेपासून मुक्तता झाली, त्या सर्व घडामोडींचा निष्कर्ष एकमतानें हा निघाला आहे कीं, भारत हा राज्यसंघ नसून भारत हें संघराज्य आहे. अर्थात् भारताच्या ह्या संघस्वरूपांतील अंगभूत घटक राज्यांची स्वायत्तता किंवा प्रभुत्व हें मर्यादित आहे. निराळ्या शब्दांत सांगावयाचें तर भारतीय संघराज्यांतील कोणाहि घटकास केव्हांहि आणि कसल्याहि सबबीवर संघराज्यांतून फुटून अलग होतां येणार नाहीं. अर्थात् भारतांतर्गत अथवा भारतांगभूत घटक प्रदेशराज्यांना संपूर्ण स्वयंप्रभुत्व सार्व्हरिन्टी नाहीं, ती मागण्याचा हक्क नाहीं आणि कोणत्याहि आंतरराष्ट्रीय कायद्यान्वयें इतर स्वयंप्रभु राष्ट्रांस ह्या घटकराज्यांना स्वयंप्रभु समजून त्यांशीं संबंध ठेवण्यास संयुक्त राष्ट्रसंघाचा रुकार पडणार नाहीं हें स्पष्ट आहे. ह्या विवेचनाचा इत्यर्थ असा कीं, भारतांतील प्रदेश राज्यें भाषावार बांधणीप्रमाणें सिद्ध केलीं तरी आक्षेपक जें भय उभें करतात किंवा भारताचीं अनेक पाकिस्तानें होतील, भारताचे तुकडे होतील, भारताचें ऐक्य भंग पावेल इत्यादि जो आविष्कार करुन मांडतात, तो शुद्ध काल्पनिक

बागुलबोवा आहे. सोव्हिएट किंवा अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांतील घटकांना संघांतून फुटून निघण्यांचा हक्क त्यांच्या घटनेंत दिलेला आहे. ती योजना भारताच्या घटनेंत नाहीं. तसा हक्क द्यावा किंवा असावा हें ज्यांच्या स्वप्नींहि नाहीं, तसा ओढा ज्यांनीं चुकून देखील दर्शविला नाहीं किंबहुना जे ठामपणें त्या प्रकारच्या विरुद्ध आहेत त्यांच्याहि माथीं बळेंच एक आक्षेप कल्पनेनें थापणें आणि अशा रीतीनें लोकांना भयकलुषित करणें अत्यंत अन्यायाचें आहे असें साफ साफ सांगणें आम्हांला अवश्य आहे. विरोधकांचा दुसरा आक्षेप प्रादेशिक भाषांचें प्रभुत्व मान्य केल्यानें हिंदुस्थानच्या अखिल भारतीय व्यवहाराला एक भाषेचें साधन रहात नाहीं हा आहे; पण ह्या आक्षेपाला उत्तर भारताच्या संविधानांतच आहे. संविधानाच्या सतराव्या अध्यायांत राजभाषेचें निर्धारण आहे आणि देवनागरी लिपींत लिहिलेली हिंदी ही संघराज्य भारताची भाषा म्हणून घोषित केलें आहे. तिच्या व्यवहार-मर्यादा व कालमर्यादाहि तेथें स्पष्ट केल्या आहेत. आज तरी संघराज्याचे सूत्रधार फारच मंदपणें वागत आहेत ह्यांत संशय नाहीं. वर उल्लेखिलेली माझी साधी सूचना अशी आहे कीं, एकदां जाहीर केल्या दिवसापासून (आणि हा दिवस शक्य तर आज उद्यां इतक्या लवकर जाहीर करण्यास चिंता नाहीं) तीन महिन्यांचे आंत सर्व सरकारी नोकरांनीं वा अधिकाऱ्यांनीं आपली सही देवनागरी लिपींत घटवून तयार करावी. अद्याक्षरें, पूर्णाक्षरें वगैरे सर्व संभाव्य प्रकार घटवून ठेवावे आणि ह्या तीन महिन्यांनंतर कोणताहि सरकारी कागद, त्यावर देवनागरी लिपींत संबंधित कर्मचाऱ्याची सही नसेल तर, तो कागद अग्राह्य समजावा किंवा त्या अधिकाऱ्यांस दंड करण्यांत यावा. भाषा कोणचीहि असो आणि कागदांतील मजकुराची लिपि कोठलीहि असो, कागदाखालची सही देवनागरी लिपींतच असली पाहिजे. परदेशांतहि कागद देवनागरी अक्षरांतील सहीनेंच गेले पाहिजेत. मग खालीं एखाद्या देशी लिपींत वा इंग्रजी लिपींत सहींतील देवनागरी अक्षरांचें उद्‌बोधन पुरवणी म्हणून केलें तरी करू द्यावें.

## देवनागरी सहीचा आग्रह कां ?

देवनागरी सहीनें नव्या युगाला प्रारंभ होईल. संविधानांतील $\frac{१७}{३४३}$ कलमाला चालना मिळेल. आज सबंध कागद मराठींत वा अन्य देशी भाषें

असला तरी त्याच्या खालीं बिनदिक्कतपणें इंग्रजी लिपींत सही करण्यांत प्रतिष्ठा मानली जाते. तो क्रम उलटेल. खालचा गडी वर येईल, घडी बदलेल, देवनागरीला प्रतिष्ठा लाभूं लागेल, मग धीटपणा अंगीं येऊन प्रजा नव्या नजरेनें आणि नव्या विश्वासानें व्याप्त होईल. जादूची कांडीच फिरल्यासारखा परिणाम दिसेल. शेंकडों वर्षांच्या गुलामगिरींतून मुक्त झाल्याचा पुरावा जग पाहील आणि काय समजावयाचें तें चटकन् समजून जाईल.

दुसरी एक लहानशी सूचना अशी. जुन्या काळीं आपण इंग्रजीच्या प्रतिष्ठेखालीं दबून जाऊन आपल्या घरांचीं नांवें, आपल्या कायद्यांचीं नांवें, आपल्या धंद्यांचीं नांवें, आपल्या दुकानांचीं नांवें, आपल्या संस्थांचीं नांवें, आपल्या रस्त्यांचीं, आपल्या पुस्तकांवर, पाट्यांवर, घरादारांवर, पावत्यांवर, पत्रकांवर; अशीं जिकडे तिकडे नांवें इंग्रजींत. लिपि देवनागरी किंवा देशी ठेवली तरी, घालतों, खोदतों, छापतों आणि रंगवितों इंग्रजींतच. एखाद्या शहरांतल्या बाजारांत एक फटका मारून या. जिकडे तिकडे प्रोव्हिजन स्टोअर्स, मेडिकल डिस्पेन्सरी, अमुक रोड, तमुक लेन, हायस्कूल, कॉलेज, स्टेशनरी मार्ट, टेलरिंग फर्म, मोटार स्टँड, फ्रुट मार्केट, क्लॉथ मर्चंट, शू मार्ट यांचीच चारी बाजूंला गर्दी दिसेल. किराणा दुकान, दवाखाना, शाळा, रस्ता, कापड वखार, शिंपी सदन, वगैरे तुरळकच सांपडतील. हें झालें बाजाराचें. आपल्या स्वतःचीं नांवें, तीं देखील एस. एम. जोशी, डी. जी. भावे, एस. पी. शिर्के अशींच आढळतील.

ह्या अक्षरांनीं श्रीधर, दत्तात्रय, शंकर, पांडुरंग इत्यादिक आपल्या नांवांचा कसा बोध व्हावा याचाहि विचार कोणी करीत नाहीं. आपण पूर्णोच्चारी अक्षरांचे धनी असतां लंगड्या इंग्रजी वर्णमालेचे दास व्हावें ह्यापेक्षां अप्रतिष्ठा कोणती ? आणि त्यांत आपण प्रतिष्ठा मानावी ह्याला कोणाची अधम कोटि शोभेल ? अविचारानें आणि अंधानुकरणानें सीमेपरती उडी मारली, नव्हे ? म्हणून सांगतों, आपलीं नांवें तरी नीट आपल्या पद्धतीनें लिहा. एवढेंहि न व्हावेसें काय आहे ? पण जेथें आमचाच दाम खोटा, तेथें मग सरकारला तरी निराळा दोष काय द्यावा ? सरकारचे प्रश्न तरी थोडे अवघड आहेत. घटकाभर कायद्याचेंच कलम घेऊं. ॲक्ट प्रभृति

सारें राज्यच मुळांतलें इंग्रजी. कॉंट्रॅक्ट, टॉर्ट, प्रोसीजर, समन्स, जजमेंट वगैरे हजारों क्रिया आम्ही करीत असलों तरी त्यासाठीं बांधीव शब्द आम्हीं वापरीत नव्हतों आणि इंग्रजी न्यायभांडारांत आणि न्यायपरिवारांत ज्या शेंकडों प्रथा, प्रकार, अधिकारमर्यादा, अधिकारी वर्ग, प्रतिवादी वगैरे जर कांहीं आमच्याकडे मुळांतच त्या स्वरूपांत नव्हतें आणि थोडें कांहीं होतें त्याचा लोप आम्हीं होऊं दिला तर मग आतां येथें शब्द आणावे तरी कोणाचे? त्यालाहि तोड सुचवितां येईल. बुद्धिमान म्हणवावें आणि तोड सांपडूं नये हें कसें शोभेल? पण तो विषय तूर्त बाजूस ठेवूं. झालें तें झालें; पण ह्यापुढें तरी नवा कायदा करतांना अन्नधान्य वांटप कायदा किंवा सर्व भारताला मान्य होऊं शकेल अशी दुसरी शब्दवटिका योजून, तेवढें कायद्याचें नांव तरी आपलें देशी द्यावें. बाकीचा कायदा करा तुमच्या सोयीप्रमाणें इंग्रजींत किंवा हिंदींत; पण नांव तरी तेवढें कटाक्षानें देशी ठेवीत चला यापुढें. म्हणजे नवी इंग्रजी शब्दांची आमच्या घरांतली प्रजावृद्धि तरी थांबेल. तेवढीच लाज वांचली.

एकदां घसरगुंडीला प्रारंभ झाला म्हणजे तळाला येऊन पोंचल्याशिवाय गति नाहीं. कायदे इंग्रजींत, मग लोकलबोर्ड, कम्युनिटी सेंटर्स-सेंटरेंदेखील नव्हे बरं कां?— ह्याची रांग लागावी हें क्रमप्राप्तच आहे. नवीन गाड्या सुरू केल्या; बोला— स्टेट ट्रान्सपोर्ट, त्याबरोबर चार्ज, स्टेज, लगेज, माइलेज, कंडक्टर, ड्रायव्हर, प्यासेंजर वगैरे सर्व तांडाच्या तांडा आंत घुसणार हें उघड आहे.

## लोकशाहीच्या संदर्भात इंग्रजीचा विचार

इंग्रजीचा हा वरचष्मा, हा पसारा पाहिला, नित्य नवीं यंत्रें, नित्य नव्या घटना, नित्य नवे शब्द, नित्य नवें ज्ञान हा अफाट व्यापार पाहिला म्हणजे गलितगात्र होऊन हताशपणाचे विचार मनांत येतात. इतक्या इंग्रजी शब्दांना प्रतिशब्द तरी कोठले आणावयाचे? समजा, तसा प्रयत्न केला तथापि इंग्रजीची वाढ सतत चालू आहे ह्याला काय उपाय करावा? भाषांतरी शब्दानें कांहीं समाधान होत नाहीं. ह्या सर्व धांवाधांवींत व्यर्थ शक्ति खर्चण्यापेक्षां सरळ असें कां करूं नये? इंग्रजीच शिकूं, इंग्रजींतूनच शिकूं.

नाहीं तरी शेंकडों अडाणी लोक काय प्रगति करणार ? आपण निवडक इंग्रजी शिकलेले आणि शिकणारे मिळून सहज पुरे पडूं. तेव्हां मराठी वगैरे देशी भाषांच्या उन्नतीच्या या मृगजळाच्या मागें लागण्यापेक्षां इंग्रजीच्याच राजरस्त्यानें पुढें जावें हें बरें. ह्यावर प्रश्न असा कीं, मग लोकशाहीचें काय ? किती लोकांना आज इंग्रजी चांगलें येतें ? आजपर्यंत इंग्रजी शिकण्यांत केलेल्या प्रगतीचा आढावा घेतला तर हजारांत एक तरी इंग्रजी जाणणारा सांपडेल कीं नाहीं याची वानवाच आहे. तेव्हां सर्व नांवें, ज्ञान, प्रगति या इंग्रजीशिकांच्या हातींच ठेवावी आणि त्यांनीं इंग्रजी न समजणाऱ्या अज्ञानी बहुसंख्यांकांवर अधिराज्य चालवावें, ह्याला लोकशाही म्हणतां येईल काय ?

युरोपांत एवढी आधुनिक प्रगति झाली आहे; पण तेथें तर जर्मन, फ्रेंच, स्पॅनिश, स्लाव, रूसी प्रभृति भाषांतूनच शिक्षण, उच्च शिक्षण वगैरे सर्व प्रगति चालू आहे आणि औद्योगिक प्रगति, संशोधन, इत्यादि सर्व क्षेत्रांत एकमेकांच्या बरोबरीनें तेथें कामें होत आहेत; तरी मला प्रत्यक्ष थोड्या वेळांतहि अनुभव आला कीं, इटली, फ्रान्स वगैरे देशांत साधारणपणानें इटालियन, फरेंच ह्या प्रादेशिक भाषाच लोक समजतात व बोलतात. इंग्रजीनें कांहींहि काम भागत नाहीं. मात्र तेथें शिकलेल्यांचा असा मोठा वर्ग आहे कीं, ज्याला दोन-तीन भाषा साधारणपणें समजतात, बोलतां येतात. तोच प्रकार हिंदुस्थानांत पूर्वी होता. आजहि प्रांताप्रांतांच्या सरहद्दी जेथें मिळतात तेथें दोन्ही भाषांत लीलेनें बोलणारी प्रजा पुष्कळ सांपडते. एकमेकांच्या भाषा निराळ्या; तथापि दोन दोन, तीन तीन भाषा जितक्या आपणांस येतील तितकें चांगलें. वास्तविक नवीन धारणा सर्व भारतांत अशी पसरविली पाहिजे कीं, हिंदुस्थानांतील विख्यात चौदाहि भाषा या आपणां सर्वांच्या भाषा आहेत. अर्थात् ज्याची त्याची प्रादेशिक भाषा समजणारांची संख्या येथें अगदींच क्षुद्र नाहीं. सर्वांनीं, प्रदेश राज्यांतील सर्व कार्यकर्त्यांनीं ही वृत्ति वाढीस लावली पाहिजे—— मातृभाषेशिवाय आणखी एक-दोन भाषा तरी आपणांस लिहितां वाचतां आल्या पाहिजेत. आपल्या अन्य भाषिक शेजाऱ्यांशीं आपली वागणूक आपुलकीची ठेवली पाहिजे. एकमेकांना एकमेकांचा शेजार प्रेमाचा व स्नेहार्द्रतेचा वाटला पाहिजे.

सर्व चौदा भाषांचें रक्षण सर्व भारतीय प्रजांनीं आपलेपणानें करावयाचें आहे. राजकारणाच्या मतांच्या आणि सत्तेच्या ओढाताणीमुळें भाषिक प्रश्नांवर कलहाचें आणि उग्र कटुतेचें खोटें पुट चढवून कालुष्य निर्माण केलें जात आहे. नीट निर्मळ मांडणी केल्यास भाषिक बांधणी बाधक होण्याचें कारण नाहीं आणि दोषमय अवस्थेपर्यंत भाषिक प्रश्न ताणतां येतात ती मर्यादा सांभाळणें देशहिताची खरी कळकळ मनांत रुजली असेल तर अवघड नाहीं. किंबहुना त्यांत प्रयासाचा अथवा कष्टाचा खरोखर प्रसंगहि येण्याचें कारण नाहीं. 'चौदा भाषा माझ्या', 'मी चौदा भाषांचा धनी' ही भावना रूजूं घातली पाहिजे. येथें द्वेषाचें, कलहाचें, आक्रमणाचें बीज यावेंच कां ? आणि कोणी आणून लावूं लागलें कीं, तें दक्षतेनें उपटून टाकलें पाहिजे. द्वेषादिकांप्रमाणें अज्ञान आणि विपरीत ज्ञान यांच्यामुळेंहि फार अनर्थ होतो. कानडी, तामीळ वगैरे भाषांविषयीं आमच्यांत अज्ञान आणि विपरीत ज्ञान हीं दोन्ही भरपूर आढळतील. "आंतरभारती" च्या सोज्वळ कल्पनेच्या आश्रयानें आणि तदनुकूल मनोवृत्तीनें वागण्यास लोकांना शिकविलें पाहिजे.

## संविधानाच्या आदेशाचा अन्वयार्थ

ह्या चौदा भाषांच्या जोडीला १७।३५१ धारेंत 'हिंदुस्तानी' भाषेचा उल्लेख आहे आणि ह्या भाषेंतूनहि लागणारे, पसंत पडणारे शब्द, वाक्यांश वगैरे आत्मसात् करून हिंदीचा विकास करण्याचा आदेश दिला आहे. म्हणजे अनुसूचींतील चौदा आणि १७।३५१ धारेंत उल्लेखिलेली 'हिंदुस्तानी मिळून पंधरा भाषा संविधानांत मान्य झाल्या असें ठरतें. आतां अनुसूचींतील चौदा भाषांमध्यें हिंदी आणि उर्दू अशा दोन भाषा आहेत. म्हणजे आतां ३४३ मधील हिंदी, ३५१ मधील हिंदी, अनुसूचींतील हिंदी व उर्दू आणि ३५१ मधील हिंदुस्तानी अशा एका गोतावळ्यांतल्या पांच वस्तूंचा विचार आपण केला पाहिजे. हें संविधान आहे. यांत वावगा शब्द किंवा पोकळ भाषा वावडी आहे. विचार केला असतां स्पष्ट दिसेल कीं, ३४३ आणि ३५१ ह्या दोन कलमांत उल्लेखिलेली 'हिंदी' ही एकच वस्तु असली पाहिजे. कारण एकाच सन्दर्भांत

तो शब्द आलेला आहे. तो भिन्नार्थवाचक असूंच शकणार नाहीं. तिसरा हिन्दी शब्द अनुसूचींतला आणि ३५१ मधील आदेश असा कीं, इष्ट हिन्दीचा विकास साधण्यासाठीं अनुसूचींतील हिन्दींतून शब्दशैली आणि वाक्यांशादि घेऊन आत्मसात् करावे. हिंदीचा विकास हिंदीच्या द्वारां करावा ही आदेशाची भाषा निरर्थक शब्दावलि वाटूं लागते. हें संविधान आहे. येथें निरर्थकाला वाव नाहीं. तर मग ही शब्दावलि साभिप्राय व सार्थच असली पाहिजे. विचार करून पाहूं. हिंदीच्या द्वारां हिंदीचा विकास साधणाऱ्या शब्दावलीचा अर्थ काय असावा? जरा अनुसूची-कडे पाहूं तेथें हिंदीच्या जोडीला मराठी, बंगाली, पंजाबी, तामिळ, तेलगु, गुजराती वगैरे अकरा भाषा सांगितल्या आहेत. त्या साऱ्या भाषा अर्थात् क्षेत्रीय किंवा प्रादेशिक भाषा आहेत. चौदापैकीं संस्कृत आणि उर्दू ह्या दोन भाषांना प्रादेशिक म्हणतां येणार नाहीं. त्या सार्वभारतीय आहेत. तेव्हां स्पष्ट बोध होतो कीं, अनुसूचींतील संस्कृत, उर्दू ह्या दोन वगळून राहिलेल्या बारा भाषा ह्या सर्वक्षेत्रीय किंवा प्रादेशिक भाषा आहेत आणि हिंदी ही त्या-पैकींच एक आहे. अनुसूचींतील हिंदी ही क्षेत्रीय हिंदी किंवा प्रादेशिक हिंदी अथवा मातृभाषा हिंदी ठरली. अर्थात् राजभाषा म्हणून स्वीकारलेली ३४३ मधील हिंदी आणि जिचा विकास करावा हा ३५१ त आदेश मिळतो ती हिंदी ह्या क्षेत्रीय नव्हत. अनुसूचींतील क्षेत्रीय हिंदी ही पोषक आहे आणि इतर हिंदी पोष्य आहेत. असा सूक्ष्म विचार केला कीं, संविधानांतील भाषा निरर्थक किंवा भोंगळ न ठरतां सार्थ आणि भरीव ठरते. क्षेत्रीय हिंदी आणि राष्ट्रभाषा हिंदी असे विविध प्रकार येथें स्पष्ट असून राजभाषा हिंदी आणि राष्ट्रभाषा हिंदी ह्यांचा विकास साधण्याच्या कामीं क्षेत्रीय हिंदीचें साहाय्य घ्यावें असा बोध होतो. आपणां सर्वांना संविधान हें बंधनकारक आहे त्याचा वर लावला याहून भिन्न असा अर्थ तर्कशुद्ध रीत्या कोणी लावून दाखवावा. एक शंकास्थळ अजून कोणी दाखवील.

## हिंदीच्या तीन स्वरूपांचें मूळ एकच

३५१ धारेंत असें विधान आहे कीं, विकास्य हिंदीचा साध्य जो विकास तो तिच्या आत्मिक स्वरूपास धक्का न लावतां— 'विदाउट इन्टरफिअरिंग वुइथ इट्स जीनिअस'— साधावयाचा आहे. 'इट्स जीनिअस' ह्या शब्दा-वलीनें भिन्न-भिन्न हिंदीचा बोध न होतां बाध होतो. 'इट्स्' शब्दावरील

जोर अवश्य ध्यानांत घेतला पाहिजे. क्षेत्रीय हिंदी काय, राजभाषा करावयाची ती हिंदी काय आणि राष्ट्रभाषा म्हणून रूढ करावयाची ती हिंदी काय दिसावयाला तीन दिसल्या तरी त्यांचें मूळ एकच आहे. गोत्र एकच; पण शाखा-विस्तार भिन्न-भिन्न असतो. वटवृक्षाचें मूळ एकच; पण त्याच्या पारंब्यांचे पुनः वृक्ष होतात, तशांतला प्रकार येथें आहे. मूळ वस्तु एकच आहे, तिला आम्ही भाषा, भाखा म्हणत होतों. हा भाषा शब्द संस्कृतहून भिन्नत्व दाखविण्यासाठीं पंडितमंडळ योजी. असें 'इति भाषायाम् ।' मग भाषा, भाखा शब्दानें मराठीचेंहि ग्रहण करतां यावें. ह्या अशा भाखेला हिंदी नांव कोणीं दिलें ? देशाला हिंदुस्थान आणि भाषेला हिंदी हीं नांवें बाहेरून आलेल्या लोकांनीं दिलेलीं दिसतात. हे बाह्य प्रथम भारताच्या पश्चिम किंवा पश्चिमोत्तर दिशांकडून भारतांत उतरलेले दिसतात. त्यांनीं प्रथम ऐकिली भाखा, तिचें नांव हिंदी. येथून तों आजच्या खडीबोली पावेतों हिचींच रूपें हिंदी ह्या नांवानें ओळखलीं जातात. हिंदुस्थानी हें असेंच ह्या व्यापक भाषेचें एक रूप आहे. युरोपीय विद्वान् पूर्वी—पूर्वेकडील काशी वगैरे विभागांकडील हिंदी-आणि पश्चिमी म्हणजे आग्रादि कडील हिंदी असे स्थूल विभाग पाडीत. उच्च साहित्यानें रसरसलेली मधुर व्रजभाषा हें हिंदीचें रूप व्रजमंडळांत विकसित झालें. अशी हिंदी ही नाना रूपधारिणी झाली. ती तुलसीदासाच्या प्रतिभाशाली मुखांतून अवधीरूपानें प्रकट झाली तर सूरदास-मिराबाईच्या वाणींतून व्रजरूपानें अवतरली. असो; इतक्या खोलांत जाण्याचें कारण एवढेंच कीं, ह्या सर्व हिंदीचा एक स्वभाव असा आहे– त्या बहिष्कारवादी नाहींत, समावेशक आहेत. म्हणून ह्या समावेशक सर्वसंग्राहक 'इन्क्ल्युजिव्ह' अॅण्ड नॉट एक्स्लूजिव्ह– अशा हिंदीच्या आत्मिक प्रकृतीला म्हणजे जिनिअसला धक्का न लावतां तिचा विकास साधावयाचा आहे. हिंदीची ही जी सर्वसमावेशक प्रकृति आहे, हाच राष्ट्रीय हिंदीचाहि आत्मा राहील. त्यांत इंटरफिअरन्स आम्हां अहिंदी लोकांकडून होऊं नये, होण्याचा संभवच नाहीं, संभव असेल तर तो हिंदीला 'एक्स्लूजिव्ह', मर्यादित, सीमित, बहिष्कारवादी करणाऱ्यांच्या कडूनच संभवतो. हिंदींत उर्दू शब्द मग ते सर्वत्र रूढ असले तरी देखील– घेणारच नाहीं, उलट ते जेथें जेथें असतील तेथून तेथून

काढून तारखेचा दिनांक करूं, बरोबरचा संगे करूं, इत्यादि प्रकारचीं प्रतिपादनें करणाऱ्यांच्या कडूनच सर्वसंग्राहक, व्यापक अशा हिंदीच्या स्वरूपाला संकुचित स्वरूप येईल; पण चौदाहि भाषांतून आपला विकास साधणारी आणि आपला कोष पुष्ट करणारी राष्ट्रीय हिंदी सर्वभारतीय कामकाजाची भाषा म्हणून स्वीकारून प्रादेशिक भाषांच्या विकासाचे आक्षेपक जीं ऐक्य-भंगाचें भयें उभीं करून आपणांला भेडसावीत आहेत, त्यांना सक्रिय उत्तर देणें आपणां सर्वांचें कर्तव्य आहे.

## मराठी मुलुखांत प्रधान भाषा मराठी

घरांत मराठी, दारांत मराठी, शाळेंत मराठी, विद्यापीठांत मराठी, शासनांत मराठी आणि मराठी भाषिकांच्या सलग मुलुखांत मराठीच प्रधान भाषा म्हणून नांदली पाहिजे; पण ह्याप्रमाणें मराठीची नांदणूक चालू असतांना राष्ट्रीय हिंदीचाहि वापर करण्याची उत्सुकता आणि पात्रता प्रत्येक मराठी माणसानें दाखविली पाहिजे. मराठी आणि हिंदी अशी दुबळी बंदूक हातीं घेऊन भारतांतील मराठी माणूस भारताच्या आणि महाराष्ट्राच्या सेवेला उभा ठाकला पाहिजे हें आपण लक्षांत ठेवा.

त्या पंधराव्या हिंदुस्तानीचें काय? फारसी, अरबी, तुर्की शब्दांची मिसळ झालेली हिंदी हीच हिंदुस्तानी आणि आठव्या अनुसूचींतील उर्दू ही क्षेत्रीय होऊं शकत नसली तरी जिला उर्दू ए दरबार ए मुअल्ला किंवा खालिस उर्दू म्हणतात ती उर्दू आमच्या राष्ट्रीय हिंदीच्या पोषक धारा समजाव्या असा संविधानांतील आदेशाचा रोख आहे.

आठवी अनुसूची आणि प्रत्यक्ष ३५१ ची धारा यांत संस्कृतचा आधार निर्दिष्ट आहे. नाहीं तरी संस्कृतचा आधार आमच्यापाशीं नसता तर आम्हांला जगांत पुसताच कोण? तो तर आमचा सर्वांत बहुमोल ठेवा. त्याच्या बळावर आम्ही सर्व आपत्तींतून तरून जाऊं. नवे सार्थ शब्द घडविणें आमच्या संस्कृताच्या हातचा मळ आहे. एवढेंच कीं, पाणिनीय धातुपाठांत अथवा गद्यपाठांत आम्हांला नवी भर टाकावी लागेल. या दृष्टीनें सर्वथा स्वीकार्य नसलें तरी आमचे मित्र डॉ. रघुवीर यांच्या दीर्घ प्रयत्नांचें मी सकौतुक स्वागत करतों. आणखी दुसऱ्या रघुवीरांनीं पुढें यावें आम्ही स्वयंवर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि.

क्रमांक ............ नों. दि. ..........

मांडू. आमची मराठी किंवा आमची हिंदी पसंत शब्दवरांच्या गळ्यांत माळा घालतील. तेव्हां शब्दांची आम्हांला वाण पडेल हें भयच नाहीं; पण केवळ संस्कृत हाच एक खजिना आम्ही वापरूं असें नाहीं. नवें इंग्रजीचें भांडार अलीकडे उपलब्ध झालें आहे. त्यांतूनहि पचेल तेवढें शब्दधन आम्ही घेऊं. क्लास, ग्लास, पास, तिकिट, पाकिट, बूट, कोट वगैरे मंडळी आतां घरांतल्यासारखीं रुळलेलीं आहेत. एकजीव झाल्यावर त्यांना कापून बाहेर काढणें हा सोवळेपणा नव्हे. उलट येतील त्यांना डोळे मिटून येऊं द्यावें, घ्यावें हा उदारपणा किंवा व्यापकपणाहि नव्हे.

## इंग्रजी व संस्कृतचें रक्षण

ग्राह्य दृष्टिकोन हा कीं, संस्कृत आणि इंग्रजी या दोघांचेंहि रक्षण लाभासाठीं, स्वार्थासाठीं, आपणांला केलें पाहिजे. त्यांत संस्कृत तर घरचें मूळचेंच; पण म्हणून प्रत्येक प्रौढ विद्यार्थ्याला संस्कृत अनिवार्य केलें पाहिजे हा आग्रह व्यर्थ ताणू नये. कितीहि सोपी केली आणि कितीहि उपयुक्त असली तरी, भाषा म्हणून संस्कृत अनिवार्य करून जनतेचा पुढें जाण्याचा मार्ग अडवूं नये. सर्वत्र संस्कृताच्या अध्ययनाच्या सोयी अनिवार्य कराव्या. संस्कृताच्या शिकण्याला उत्तेजन सर्व बाजूनें द्यावें; परंतु देशी भाषांतून विद्याक्रमणाचा सरळ मार्ग अनिर्बंध वाहता ठेवावा. नाहीं तर जनतेची मोठी कुचंबणा होईल. हां, अशी मर्यादा घालावी लागेल कीं, मराठीचा उच्च आणि तौलनिक अभ्यास करावयाचा आहे तर संस्कृताचें पूर्वज्ञान अनिवार्य मानावें लागेल. अधिक विषय ॲडिशनल म्हणून संस्कृताला स्थान दिलेंच पाहिजे !

आणि इंग्रजीचें काय ? इंग्रजी तर आधुनिक काळाकडे जाण्याचें आम्हांला उपलब्ध झालेलें एकमेव द्वार ! इंग्रज नको होते आम्हांला; पण इंग्रजी हवीच होती आणि आतां तर अधिकच हवी आहे; पण याचा अर्थ असा नव्हे कीं, ऊठ सूट सर्वांच्या डोईवर इंग्रजी मढण्याची कांहीं आवश्यकता आहे. आजच्या युगांत चार इंग्रजी अक्षरें आपणांस यावीं अशी हौस प्रत्येकाचे ठायीं आढळून येते. अशी हौस पुरविण्याचा एक प्रकार म्हणून मी पुष्कळ दिवसांपासून म्हणत आलों आहें कीं, आमच्या प्राथमिक शाळांतच मुलांस फक्त ए, बी सी, डी, ही अक्षरमाला शिकवावी. तो कांहीं मोठा

भार होणार नाहीं आणि मुलें तर फार हौसेनें शिकतील. सहज स्टेशनांची किंवा कचेऱ्यांवरचीं, पाट्यांवरील नांवें तीं वाचूं लागतील. एवढ्यानें ज्यांना आवड लागेल त्यांतले कांहीं चार वाक्यें आपोआपहि शिकतील. बाजारी किंवा व्यापारी इंग्रजी ज्यांना जरूर आहे त्यांचीहि सोय अशा रीतीनें लागून जाईल. फार यातायात त्यासाठीं करावी लागणार नाहीं. इंग्रजीची मुख्य गरज ह्या देशांत लागेल ती विद्येच्या कामीं आणि आधुनिक शासनाच्या कामीं मुख्यतः लागेल. आधुनिक विद्यांसाठीं इंग्रजी हेंच परिचित द्वार आम्हांला उपलब्ध आहे. ह्या सर्व आधुनिक विद्या आणि सर्व आधुनिक ज्ञान देशी भाषांतून करून झालें नाहीं. देशी भाषांचा व्यवहार वाढविला पाहिजे आणि ही ज्ञान हरणभरण क्रियाहि वेगानें चालविली पाहिजे. मग इंग्रजीची गरज त्या प्रमाणांत कमी कमी होत जाईल. आपल्या देशी भाषांतून नवज्ञाननिर्मिति होऊं लागेल. मग इंग्रजीची गरज आणखी रोडावेल; पण ती आजिबात कधींच संपणार नाहीं. विद्या मिळेल तेथून घ्यावी. त्या कामीं देशी परदेशी भेदाभेद मनांत आणूं नये. श्रमाची कदर करूं नये. तडक विद्येला झोंबावें. म्हणून इंग्रजांच्या संबंधानें इंग्रजीचा चांगला परिचय झाला, त्यांत आपली गतिहि उत्तम प्रकारची झाली. यास्तव तो लाभ वाया दवडूं नये. ह्याचा अर्थ केव्हांहि असा नाहीं कीं, येत असली म्हणून इंग्रजीची लुडबुड भलत्याच ठिकाणीं आपण चालूं द्यावी. आपल्या लग्नपत्रिकाहि इंग्रजींत काढाव्या. खुशालीचा साधा पत्रव्यवहारहि इंग्रजींतूनच करावा. हे सारे अत्याचार समजावे आणि त्यांचा परित्यागच सर्वथा विहित होय. विशेषतः साधारण कटाक्ष हा आधीं पहिजे कीं, इंग्रजींतला मजकूर बरोबर बिनचूक समजावा. मग इंग्रजी बोलतां येण्याची आणि लिहिण्याची प्रत्येकाला ततकीशी गरज पडणार नाहीं. सर्वत्र बिनचूकपणावर फार भर दिला पाहिजे. मी तर असें सुचवितों कीं, जशी संस्कृत भाषेच्या शिक्षणासाठीं आम्ही संस्कृत पाठशाळा चालवितों त्याच प्रकारें इंग्रजी शिकण्यासाठीं इंग्रजी पाठशाळा चालवाव्या.

## इंग्रजी पाठशाळांचा शिक्षणक्रम

ह्या इंग्रजी पाठशाळांतून संस्कृत पाठशाळांप्रमाणें फक्त इंग्रजीच शिकवावें. अगदीं मुळाक्षरांपासून थेट पारंगतापर्यंत ह्या इंग्रजी पाठशाळांचा असा उपयोग होईल कीं, ज्याला जशी गरज पडेल तो त्या पाठशाळांत जाऊन त्या त्या दर्जाचें इंग्रजी हस्तगत करील. व्यापारी इंग्रजी, साहित्यिक इंग्रजी, इंग्रजी

वक्तृत्व, इंग्रजी लेखन व प्राचीन इंग्रजी वगैरे वगैरे 'विशेष प्रकारचीं अध्ययनें करण्याची सोयहि ठेवावी. मग इकडे जसा जसा आणि जेवढा भार देशी भाषांकडून उचलला जाईल त्याच्या पुरवणीला जें जेवढें, तसलें इंग्रजी ज्याला पाहिजे असेल तेवढें सर्व ह्या पाठशाळांतून मिळूं शकेल. शिवाय ह्या इंग्रजी पाठशाळांचा स्वतःचा विविध प्रकारचा इंग्रजीचा अभ्यासक्रम व परीक्षाक्रमहि चालूंच राहील. पाठशाळेंतील परीक्षांत बाहेरील विद्यार्थीहि येऊं द्यावेत. ह्या कल्पनेचा संपूर्ण विस्तार मांडण्याचें हें स्थळ नव्हे. येथें केवळ दिग्दर्शन मात्र केलें आहे अशा इंग्रजी पाठशाळांना सरकारनें सढळ हातानें मदत करावी. शिवाय जेथें गरजू व सुपात्र विद्यार्थी पुढें येतील तेथें तेथें सरकारनें लायक इंग्रजी भाषा शिक्षक पुरवावे आणि तो खर्च शक्य तेवढा सरकारनें उचलावा या प्रकारें ज्यांना पाहिजे त्यांना आणि ज्यांनीं शिकणें अगत्याचें आहे त्या सर्वांना उत्तम इंग्रजी शिकण्याची व शिकविण्याची सोय देशांत होईल. विद्यापीठाच्या उच्च शिक्षणांत मराठीसारख्या भाषा माध्यम म्हणून वापराव्या हेंच योग्य; पण अभ्यासाची कक्षा मात्र अशी विस्तृत रहावी कीं, त्यांत इष्ट विषयांवरील नामांकित इंग्रजी ग्रंथ विद्यार्थ्यांच्या अध्ययनांत समाविष्ट करावेत. या ग्रंथाचें वाचन त्यांनीं नीट केलें आहे किंवा कसें याची कसून परीक्षा व्हावी. मराठी भाषेंत योग्य ग्रंथ भरपूर नसल्यानें मराठी भाषेंतून विषय शिकविण्याचें काम लांबणीवर टाकण्याचें कारण नाहीं. अध्यापकाला विषय उत्तम येत असला पाहिजे. त्याला स्वभाषा लीलेनें हाताळतां यावयास पाहिजे. विद्यार्थ्यांना इंग्रजी ग्रंथ यथार्थतेनें समजतील इतपत इंग्रजी भाषेचें पक्कें ज्ञान असलें पाहिजे. एवढी सिद्धता असेल तर मराठी किंवा देशी माध्यमांचा वापर शिक्षणांत आजहि करतां येईल. परिभाषेचे यांत्रिक कृत्रिम शब्द तयार होई पावेतों थांबावयास नको. कारण मराठींतून अध्यापन करण्यास प्रारंभ झाला म्हणजे अनुभवानें परिभाषेच्या वगैरे सर्व अडचणी सुटत जातील. मध्यंतरींच्या काळांत आन्तरराष्ट्रीय समजली गेलेली परिभाषा देवनागरींत लिहून वापरली म्हणून कांहीं बिघडणार नाहीं. नवीन शास्त्रीय परिभाषा अखिल भारतीय मान्यतेची असावयास पाहिजे. तें काम अर्थात् कालावधीचें आहे. ज्ञान, सराव, अनुभव, देवाण घेवाण, समंजसपणा, आर्तता ह्या

सर्वांची फार मोठ्या प्रमाणांत गरज ह्या कामीं पडेल; पण तोंवर कामाची प्रगति अडविण्याचें कारण नाहीं. अशानें लोकमताची विरी निघून जाईल. पुनः तसा मनोयोग येण्यांस बराच काळ जातो. अध्यापकांची सभा प्रदेशांतून अन्य प्रदेशांत कच्ची अदलाबदल अवश्य करावयास पाहिजे. या प्रसंगांतलें त्यांचें काम त्यांनीं राष्ट्रीय हिंदींतून करावें. ह्या आणि अशा संभाव्य प्रसंगासाठीं तयारी विद्यार्थ्यांस आधीं हिंदी शिकविलेलें असलें म्हणजे निराळी करावी लागणार नाहीं.

शोध, बोध, आनंद इत्यादि वाङमय-परिणामांच्या किंवा प्रयोजनांच्या चर्चेकडे मी आज वळणार नाहीं. रसास्वाद हें साहित्याचें मोठें प्रयोजन सर्वमान्य आहे; पण लोकशाहीच्या निमित्तानें साहित्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन लक्षांत घेऊन या भाषिक समस्येचा विचार शारदोत्सवांसारख्या सार्वजनिक प्रसंगीं करणें नुसतें उचितच नव्हे तर कर्तव्य प्राप्त आहे असें मी निश्चयपूर्वक प्रतिपादतों. कारण आज ह्या लोकशाही युगांत जें शासन निर्माण होईल तें राजांपेक्षांहि निरंकुश आणि प्रभावी राहील. कारण राजांना काल्पनिक देव-दैवादि बळांवर अवलंबून राहावें लागे किंवा शक्तीवर. लोकशाहींतले शासक आपण लोक-प्रतिनिधि अतएव लोकच असा दावा मांडूं शकतात. त्यामुळें हीं शासनें करतील तीच लोकांची इच्छा असें सरळ समीकरण मांडण्यांत येतें. ही लोकेच्छा किंवा लोकशासन भाषांना जसें अथवा जितपत साहाय्यक व विरोधक होईल तशा भाषा फोफावतील किंवा कोमेजतील. यास्तव जर लोकतंत्राचें आनुकूल्य संपादावयाचें असेल तर हा भाषिक प्रश्न योग्य रीतीनें हाताळून त्याचे सर्व पैलू स्वच्छ करून लोकांपुढें मांडले पाहिजेत. हे पैलू जर असे पाडले तर ते देशी भाषांचा विकास घडवून आणतील व शासनाला व व्यवहाराला तसें वळण लागेल आणि हीं शासनें जर निराळ्या दिशेनें पावलें टाकतील, तर संघर्ष, गोंधळ आणि विनाश यांच्या मार्गानें आपणांस जावें लागेल. रसास्वाद पक्षाला मग कांहींच सार्वजनिक स्थान व प्रयोजन राहणार नाहीं.

## भाषा प्रकरणीं स्पष्ट धोरण

शारदोत्सवांसारख्या उत्सवांचें आयोजन ज्या संस्थांच्या द्वारां सांप्रत अनेक स्थलीं होत असतें त्यांमध्यें भाषा-प्रकरणीं धोरण अगदीं स्पष्ट पाहिजे.

ज्या त्या प्रदेशांत ती ती भाषा प्रधान, जोडीला राष्ट्रीय हिंदी. ह्या दोन भाषा अनिवार्य. संस्कृत आणि इंग्रजी ह्यांना भरपूर उत्तेजन, त्यांच्या शिक्षणाची उत्तम पण स्वतंत्र अशी पुरेशी सोय आणि ज्ञानाचे प्रवाह बिनधोक सर्व बाजूंनीं भरपूर आणि खुले हीं एवढीं सूत्रें डोळ्यांसमोर ठेवून सर्व उभारणी केली पाहिजे. जर ही विचारसरणी अगदीं ठामपणें ग्राह्य झाली तर मग ह्या स्थिर सिद्धांतिक भूमीवर उभें राहूनच आपण सर्व जीवनाची उभारणी केली पाहिजे. भाषानुसार प्रदेशराज्यें घडविलीं पाहिजेत. त्यांत ती ती प्रधान भाषा हीच सर्व व्यवहाराची, शिक्षणाची वगैरे प्रधान भाषा म्हणून वैभवानें आणि यथार्थपणें नांदविली पाहिजे. या भाषेंत जगांतील सर्व ज्ञानाचा संग्रह केला पाहिजे. तें ज्ञान प्रवाही व वाढतें राहील म्हणून आपणहि प्रवाह वाढता व प्रवाही ठेवला पाहिजे. हें सर्व घडवावयाचें कोणी तर तीन साडेतीन कोटी प्रजांनीं. मराठीपुरतेंच बोलावयाचें तर हा व्याप आणि हें ओझें किती प्रचंड आहे याची सर्वांनीं नीट कल्पना करावी. किती कष्ट, किती प्रयत्न, केवढी योजकता, युक्ति, संयोजन, पाहिजे यांचाहि गंभीरपणें विचार करावा. ह्याच विचार आणि याच योजना साहित्यसंस्था, साहित्यपरिषद साहित्य-सभा, शासनें व लोकाग्रणी यांनीं सर्वांनीं मिळून सिद्ध केल्या पाहिजेत. भाषाभाषांतील खोटया आणि निर्बुद्ध कलहांचें निर्मूलन करून दढतर प्रेमाचा सहकार साधला पाहिजे. मग भाषांभाषांत आज जेवढें अंतर दिसतें, जेवढा परकेपणा व दूरीभाव दिसतो तेवढा दिसणार नाहीं. मराठी, गुजराती, बंगाली, वगैरे भाषा आपण शिकूं लागलों तर फार लवकर समजुतींत येतील. खोटीं भयें अनुभवानें दूर पळतील. नव्या शक्तीचा आविष्कार होईल. नवा आत्मविश्वास धैर्य वाढवील आणि अधिकाधिक परिश्रम करवील. 'अगा ! उपायबळें पंगु । पहाड ठाकी ॥' या ज्ञानोबाच्या वचनाचा प्रत्यय येईल.

### नव्या प्रखर कर्मयोगाचा अवलंब

आज मराठी भाषेंत अवघे पंचवीस- तीस हजार ग्रंथ असतील नसतील. त्यांत चोपडयांचा देखील अंतर्भाव आहे. इंग्रजी प्रभृति भाषांतील ग्रंथसंग्रह ह्यांच्या किती पट आहे याची आपण दखल घ्यावी; पण प्रत्येक गोष्टींत इंग्लंडची आठवण करावी असें नाहीं. नाहीं तरी चिरपरिचयामुळें वेळोवेळीं इंग्लंडचीच आठवण आपणांला होते; पण वर सांगितलेल्या लहान लहान देशांनीं आपली प्रगति कशी साधली आहे तेंहि आपण कसून पाहावें.

स्वित्सर्लंडांत तर तीन चार भाषा चालतात. तरी तो देश आज भौतिक क्षेत्रांत प्रगत आहे, ज्ञानांतहि प्रगतच आहे. ह्या उलट आपला भारत देश विस्तारानें केवढा मोठा, परंपरेनें केवढा प्राचीन व विख्यात. सृष्टिकृपेनें किती समृद्ध, लौकिकानें किती श्रेष्ठ. अशी सर्व अनुकूलता असतांना तीन चारशें वर्षांत केलेल्या खटपटीनें युरोपियनांनीं त्यांस जिकावें आणि तें जिंकणें केवळ भौतिक क्षेत्रापुरतें मर्यादित न राहतां मानसिक व आत्मिक क्षेत्रांच्या अंतर्भागापावेतों जाऊन थडकावें आणि एवढी प्राचीन पुण्याई पदरीं असतां आणि एवढीं साधनें उपलब्ध असतां आपण हताश व्हावें, भ्रांत व्हावें, 'चला आहेच कीं आपली इंग्रजी' म्हणून नेभळेपणानें इंग्रजीच्याच कोशांत फिरून परतावें, हिंदीची जोड देण्याचे कामीं खळखळ करावी, संस्कृताचें अमोल भांडार विसरावें, या विपरीत बुद्धीला काय म्हणावें ! नव्या प्रखर कर्मयोगाचा अवलंब करून, निश्चयाचें निशाण हातीं घेऊन उभें रहावें तरच पुढील अडचणींचे आणि संकटांचे डोंगर वितळतील आणि यशाच्या शिखरावर आपणांला आरूढ होतां येईल. ज्यांनीं कांहीं केलें त्या कर्मयोग्यांच्या कपाळीं उपेक्षा यावी हा कोण थोरपणा ! तेव्हा आतां उद्योगालाच लागलें पाहिजे.

महाराष्ट्र साहित्यसभा, इंदूर, ११ वा शारदोत्सव
अध्यक्षीय भाषण १९५९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 92२९८
संग्र. शाखा (स्थळ प्रत)

Report of

# The Hindi Teaching Committee State of Bombay–1951

*Not of exposition regarding the Articles* 343–351 *of the Constitution of India ( Appended to Chapter II )*

1. As stated in the Government Resolution, 7436 of 17th May 1950, the Committee was asked to work " having regard to Articles 343–351 of the Constitution of India. " The Committee studied the relevant Articles of the Constitution of India contained in Part XVII of the same entitled : Official Language. From this Part XVII the Committee found that it was mainly, if not wholly, concerned with Article 343 ( 1 ) in Chapter I " Language of the Union ", and 351 in Chapter IV–Special Directives.

2. The relevant articles are reproduced below–

( A ) Part XVII, Chapter I, Article 343 ( 1 ).

" The Official Language of the Union shall be Hindi in Devnagari Script."

The form of numerals to be used for the official purposes of the Union shall be the International form of the Indian numerals.

And

( B ) Part XVII, Chapter IV, Article 351.

" It shall be the duty of the Union to promote the spread of the Hindi Language to develop it so that it may serve as a Medium of Expression for all the elements of the

Composite Culture of India and to secure its enrichment by assimilating without interfering with its genius, the forms, style and expression used in Hindustani and in the other languages of India specified in the Eighth Schedule, and by drawing, wherever necessary or desirable, for its vocabulary, primarily on Sanskrit and secondarily on other languages.'"

We reproduce here the Eighth Schedule of the Constitution of India for easy reference.

( C ) Eighth Schedule ( Articles 344 ( I ), and 351. )

1. Assamese
2. Bengali.
3. Gujarati.
4. Hindi.
5. Kannada
6. Kashmiri.
7. Malayalam.
8. Marathi.
9. Oriya.
10. Punjabi.
11. Sanskrit.
12. Tamil.
13. Telugu.
14. Urdu.

3. Let us first turn to Article 351 and the Eighth Schedule. That Article makes it the duty of the Union among other things " to secure the enrichment of Hindi by assimilating without interfering with its genius, the forms, style and expression used in Hindustani and in the other languages of India specified in the Eighth Schedule ". The Eighth Schedule enumerates 14 languages as noted above. Excepting Sanskrit and Urdu all the remaining 12 languages are what are generally called Regional Languages. In this group of 12 languages we find Hindi mentioned along with Bengali, Gujarati, Marathi and Kannada, etc. Obviously the conclusion is undeniable that the Hindi mentioned in the Schedule must be of the same class and status as the other 11 languages popularly known as Regional. Article 351 asks us to secure the enrichment of Hindi by assimilating the important elements of the languages mentioned in the

Eighth Schedule, which includes Hindi and which, as pointed out above, means Regional Hindi.

4. Thus the Constitution directs the Union to secure the enrichment of Hindi mentioned in Article 351 by assimilating the forms, style and expression of Hindi mentioned in the Eighth Schedule. In other words, this amounts to the enrichment of Hindi by Hindi. Unless the word Hindi in this context means two different things, the Directive, in Article 351 becomes totally meaningless. This obviously neither is nor could be. If, however, we understand the Hindi mentioned in the Eighth Schedule as Regional Hindi and the Hindi mentioned in Article 351 as something different from it, the Directive at once becomes meaningful. Further, Article 351 also speaks of Hindustani which, if added to the fourteen languages mentioned the Eighth schedule would make a total of fifteen languages and of these fifteen languages Hindi, Urdu and Hindustani will be synonymous and must be considered as different entities. The Hindi in Article 351 is to be enriched with the help of these three among other languages.

5. Since the Constitution here refers to the duty of the Union and the Composite culture of India for all the elements of which the Hindi of Article 351 is to be developed to serve as a medium of expression, its scope and purpose are clearly and widely different from the scope and purpose of any of the languages mentioned in the Eighth Schedule including Hindi.

6. To determine the functions of these three different languages mentioned above, let us probe the matter a little further. The Constitution clearly mentions the following five things–

1. Hindi as Official Language in Article 343,
2. Hindi as envisaged in Article 351,

3. Hindi as mentioned in the Eighth Schedule,

4. Hindustani as referred to in Article 351, and

5. Urdu as mentioned in the Eighth Schedule.

That all these five languages are allied needs no comment. We have now to determine the exact meaning and scope of each one of them.

7. Let us take the help of Experts.

Dr. Suniti Kumar Chatterji, the eminent linguist, in his book on ' Indo-Aryan and Hindi ' consisting of Eight Lectures delivered at Ahmedabad in 1940 and published by the Gujarat Vernacular Society in 1942 observes in the Preliminary note at the opening of Part II on page 131 as follows :

